****

AADHYATM RAMAYAN

(HINDI)

****

॥ श्रीहरिः ॥

विषय-सूची

सर्ग	विषय	पृष्ठ
१-	माहात्म्य	१

बालकाण्ड

१-	श्रीरामहृदय	७
२-	भारपीडित पृथ्वीचे ब्रह्मदेवांजवळ जाणे तिच्या प्रार्थनेने भगवंतांचे प्रकट होणे व त्यांनी तिला धीर देणे	१३
३-	भगवंतांचा जन्म आणि बाललीला	१७
४-	विश्वामित्रांचे आगमन, राम आणि लक्ष्मणाचे त्यांच्याबरोबर जाणे आणि ताटिकेचा वध करणे	२३
५-	विश्वामित्रांच्या यज्ञाचे रक्षण, मारीच आणि सुबाहू यांचे दमन आणि अहल्योद्धार	२६
६-	धनुर्भंग आणि विवाह	३२
७-	परशुरामांची भेट	३९

अयोध्याकाण्ड

१-	भगवान श्रीरामांजबळ नारदांचे आगमन	४५
२-	राज्याभिषेकाची तयारी व वसिष्ठ आणि रघुनाथ यांचा संवाद	४९
३-	राजा दशरथांनी कैकेयीला वर दिला	५६
४-	रामांनी मातेचा निरोप घेणे आणि सीता व लक्ष्मणासह वनगमनाची तयारी करणे	६३
५-	भगवंतांचे वनगमन	७०
६-	गंगा उतरून पलीकडे गमन आणि भरद्वाज व वाल्मीकी यांची भेट	७७
७-	सुमंत्राचे प्रत्यागमन, राजा दशरथाचे स्वर्गगमन तसेच मातुलगृहातून भरताचे आगमन आणि वसिष्ठांच्या आदेशाने पित्याचे अंत्येष्टीसंस्कार करणे	८४
८-	भरताचे वनाकडे प्रस्थान, वाटेत गुह व भरद्वाज यांची भेट आणि चित्रकूट दर्शन	९४
९-	भगवान राम व भरत यांची भेट, अयोध्या नगरीला भरताचे प्रत्यागमन आणि श्रीरामचंद्रांचे अत्रिमुनींच्या आश्रमाकडे गमन	१००

अरण्यकाण्ड

१-	विराध वध	१०९
२-	शरभंग व सुतीक्ष्ण इत्यादी मुनीश्वरांची भेट	११३
३-	मुनिवर अगस्त्यांची भेट	११७
४-	पंजवटीत निवास आणि लक्ष्मणाला उपदेश	१२२
५-	शूर्पणखेला शिक्षा, खर इत्यादी राक्षसांचा वध आणि शूर्पणखेचे रावणाकडे गमन	१२६
६-	रावण मारीचाकडे जातो	१३१
७-	मारीचाचा वध आणि सीतेचे अपहरण	१३५
८-	सीतेच्या वियोगामुळे रामांचा विलाप आणि त्यांची जटायूशी भेट	१४१
९-	कबंधोद्धार	१४७
१०-	शबरीची भेट	१५२

किष्किंधाकाण्ड

१-	सुग्रीवाशी मैत्री	१५७
२-	वालीचा वध आणि भगवंतांबरोबर त्याचे संभाषण	१६५
३-	तारेचा विलाप, श्रीरामचंद्रांनी तिची समजूत काढणे आणि सुग्रीवाला राजपदाची प्राप्ती	१७१
४-	भगवान राम लक्ष्मणाला क्रियायोग वर्णन करून सांगतात	१७६
५-	भगवान श्रीरामांचा शोक आणि लक्ष्मणाचे किष्किंधापुरीस गमन	१८२
६-	सीतेचा शोध, वानरांचा गुहेत प्रवेश आणि स्वयंप्रभेचे चरित्र	१८७
७-	वानरांचे प्रायोपवेशन आणि संपातीची भेट	१९४
८-	संपातीची आत्मकथा	१९९
९-	समुद्र उल्लंघून जाण्यासंबंधी वानरांची चर्चा	२०४

सर्ग	विषय	पृष्ठ

सुंदरकाण्ड

१-	हनुमानाचे समुद्र उल्लंघन आणि त्याचा लंका-प्रवेश	२०७
२-	हनुमानाचे अशोकवनात गमन आणि रावणाने सीतेला भीती दाखविणे	२१२
३-	जानकीशी भेट, अशोकवनाचा विध्वंस आणि ब्रह्मपाशात बंधन	२१७
४-	हनुमान आणि रावण यांचा संवाद आणि लंकादहन	२२६
५-	हनुमान सीतेचा निरोप घेतो व श्रीरामचंद्रांना तिचा निरोप सांगतो	२३१

युद्धकाण्ड

१-	वानरसेनेचे प्रस्थान	२३७
२-	रावणाकडून बिभीषणाचा धिक्कार	२४१
३-	बिभीषणाची शरणागती, समुद्राचा त्रास आणि सेतु बांधण्याचा प्रारंभ	२४६
४-	समुद्र-तरण, लंकेचे निरीक्षण आणि रावण व शुक यांचा संवाद	२५३
५-	शुकाचे पूर्वचरित्र, माल्यवानाने रावणाला समजावणे आणि वानर व राक्षस यांचे युद्ध	२५८
६-	लक्ष्मणाची मूर्च्छा, राम-रावण युद्ध, हनुमंताने औषधी आणणे आणि रावण-कालनेमि-संवाद	२६५
७-	कालनेमीचे कपट, हनुमानाकडून त्याचा वध, लक्ष्मण जिवंत होणे आणि रावणाने कुंभकर्णास जागे करणे	२७१
८-	कुंभकर्णाचा वध	२७७
९-	मेघनादाचा वध	२८३

सर्ग	विषय	पृष्ठ
१०-	रावणाच्या यज्ञाचा विध्वंस व त्याने मंदोदरीची समजूत घालणे	२८९
११-	राम-रावण-संग्राम आणि रावणाचा वध	२९४
१२-	बिभीषणाचा राज्याभिषेक आणि सीतेची अग्निपरीक्षा	३०२
१३-	देव भगवान रामांची स्तुती करतात, सीतेसह अग्निदेव प्रकट होतो आणि अयोध्येकडे प्रस्थान होते	३०९
१४-	अयोध्या यात्रा, भरद्वाज मुनींचे आतिथ्य आणि भरत-भेट	३१६
१५-	श्रीरामांचा राज्याभिषेक	३२४
१६-	वानरांना निरोप आणि ग्रंथाची प्रशंसा	३३१

उत्तरकाण्ड

१-	भगवान रामांकडे अगस्ती इत्यादी मुनीश्वर येतात आणि रावण इत्यादी राक्षसांचे पूर्वचरित्र ऐकवतात	३३७
२-	राक्षसांच्या राज्यस्थापनेचे विवरण	३४२
३-	वाली आणि सुग्रीव यांचे पूर्वचरित्र तसेच रावण व सनत्कुमार-संवाद	३४९
४-	रामराज्याचे वर्णन आणि सीतेचा वनवास	३५४
५-	श्रीरामगीता	३५९
६-	लवणाचा वध, भगवान रामांच्या यज्ञात कुश-लव यांच्यासह महर्षी वाल्मीकींचे आगमन आणि कुशाला परमार्थाचा उपदेश	३६८
७-	भगवान रामांच्या यज्ञात कुश व लवाचे आगमन, सीतेचा पृथ्वीमध्ये प्रवेश, रामचंद्रांचा मातेला उपदेश	३७३
८-	कालाचे आगमन, लक्ष्मणाचा त्याग आणि त्याचे स्वर्गगमन	३८०
९-	महाप्रयाण	३८५

ॐ

अध्यात्मरामायण

माहात्म्य

रामं विश्वमयं वन्दे रामं वन्दे रघूद्वहम् । रामं विप्रवरं वन्दे रामं श्यामाग्रजं भजे ॥
यस्य वागंशुतश्च्यूतं रम्यं रामायणामृतम् । शैलजासेवितं वन्दे तं शिवं सोमरूपिणम् ॥
सच्चिदानन्दसंदोहं भक्तिभूतिविभूषणम् । पूर्णानन्दमहं वन्दे सद्गुरुं शङ्करं स्वयम् ॥
अज्ञानध्वान्तसंहर्त्री ज्ञानालोकविलासिनी । चन्द्रचूडवचश्चन्द्रचन्द्रिकेयं विराजते ॥

जयति रघुवंशतिलकः कौसल्यानन्दिवर्धनो रामः ।
दशवदननिधनकारी दाशरथिः पुण्डरीकाक्षः ॥१॥
अप्रमेयत्रयातीतनिर्मलज्ञानमूर्तये ।
मनोगिरां विदूराय दक्षिणामूर्तये नमः ॥

रघुवंशाचे भूषण, रावणवध करणारे, कमलासारखे नेत्र असणारे, कौसल्येच्या आनंदाची वृद्धी करणारे कमलनयन दशरथपुत्र श्रीराम यांचा जयजयकार असो. (१)

जे प्रत्यक्ष इत्यादी प्रमाणांच्या पलीकडे आहेत, जे त्रिगुणांच्या पलीकडील आहेत, जे मलरहित, ज्ञानस्वरूप आणि मन, वाणी इत्यादींचा विषय होऊ शकत नाहीत, अशा त्या दक्षिणामूर्ती भगवान सदाशिवांना नमस्कार असो.

सूत उवाच

कदाचिन्नारदो योगी परानुग्रहवाञ्छया ।
पर्यटन्सकलाँल्लोकान् सत्यलोकमुपागमत् ॥२॥

सूत म्हणाले – एकदा योगिराज नारद दुसऱ्यांवर कृपा करण्यासाठी सर्व लोकांत फिरत असताना, सत्यलोकात येऊन पोहोचले. (२)

तत्र दृष्ट्वा मूर्तिमद्भिश्छन्दोभिः परिवेष्टितम् ।
बालार्कप्रभया सम्यग्भासयन्तं सभागृहम् ॥३॥

मार्कण्डेयादिमुनिभिः स्तूयमानं मुहुर्मुहुः ।
सर्वार्थगोचरज्ञानं सरस्वत्या समन्वितम् ॥४॥

चतुर्मुखं जगन्नाथं भक्ताभीष्टफलप्रदम् ।
प्रणम्य दण्डवद्भक्त्या तुष्टाव मुनिपुङ्गवः ॥५॥

तेथे मूर्तिमंत वेदांसमवेत, बालसूर्याप्रमाणे असणाऱ्या आपल्या प्रभेने सभा-भवनाला संपूर्णपणे देदीप्यमान करणारे, मार्कंडेय इत्यादी मुनिजनांकडून वारंवार स्तुती केले जाणारे, सर्व पदार्थांचे ज्ञान असणारे, भक्तांना इष्ट फळ देणारे, सरस्वती-सहित असणारे, असे जगत्पती चतुर्मुख ब्रह्मदेव होते, त्यांना पाहून, मुनिश्रेष्ठ नारदांनी साष्टांग प्रणाम केला आणि त्यांची भक्तिभावाने स्तुती केली. (३-५)

सन्तुष्टस्तं मुनिं प्राह स्वयम्भूर्वैष्णवोत्तमम् ।
किं प्रष्टुकामस्त्वमसि तद्वदिष्यामि ते मुने ॥६॥

तेव्हा स्वयंभू ब्रह्मदेवांनी प्रसन्न होऊन, वैष्णवांचे अग्रणी असलेल्या श्रीनारद मुनींना म्हटले, "अहो मुनी, तुम्हांला काय विचारावयाचे आहे ? ते सर्व काही मी तुम्हांला सांगतो." (६)

इत्याकर्ण्य वचस्तस्य मुनिर्ब्रह्माणमब्रवीत् ।
त्वत्तः श्रुतं मया सर्वं पूर्वमेव शुभाशुभम् ॥७॥

ब्रह्मदेवांचे हे वचन ऐकल्यावर नारदांनी ब्रह्मदेवांना म्हटले, "हे देवश्रेष्ठा, शुभ आणि अशुभ कर्मांचे वर्णन हे मी अगोदरच तुमच्याकडून ऐकलेले आहे. आता मला आणखी एकच गोष्ट ऐकावयाची आहे. जर तुमची माझ्यावर कृपा असेल, तर ती गोष्ट जरी गोपनीय असली तरीसुद्धा मला सांगा. (७-८)

इदानीमेकमेवास्ति श्रोतव्यं सुरसत्तम ।
तद्रहस्यमपि ब्रूहि यदि तेऽनुग्रहो मयि ॥८॥

प्राप्ते कलियुगे घोरे नराः पुण्यविवर्जिताः ।
दुराचारस्ताः सर्वे सत्यवार्तापराङ्मुखाः ॥ ९ ॥

परापवादनिरताः परद्रव्याभिलाषिणः ।
परस्त्रीसक्तमनसः परहिंसापरायणाः ॥ १० ॥

देहात्मदृष्टयो मूढा नास्तिकाः पशुबुद्धयः ।
मातापितृकृतद्वेषाः स्त्रीदेवाः कामकिङ्कराः ॥ ११ ॥

विप्रा लोभग्रहग्रस्ता वेदविक्रयजीविनः ।
धनार्जनार्थमभ्यस्तविद्या मदविमोहिताः ॥ १२ ॥

त्यक्तस्वजातिकर्माणः प्रायशः परवञ्चकाः ।
क्षत्रियाश्च तथा वैश्याः स्वधर्मत्यागशीलिनः ॥ १३ ॥

तद्वच्छूद्राश्च ये केचिद्ब्राह्मणाचारतत्पराः ।
स्त्रियश्च प्रायशो भ्रष्टा भर्त्रवज्ञाननिर्भयाः ॥ १४ ॥

श्वशुरद्रोहकारिण्यो भविष्यन्ति न संशयः ।
एतेषां नष्टबुद्धीनां परलोकः कथं भवेत् ॥ १५ ॥

इति चिन्ताकुलं चित्तं जायते मम सन्ततम् ।
लघूपायेन येनैषां परलोकगतिर्भवेत् ।
तमुपायमुपाख्याहि सर्वं वेत्ति यतो भवान् ॥ १६ ॥

इत्यृषेर्वाक्यमाकर्ण्य प्रत्युवाचाम्बुजासनः ।
साधु पृष्टं त्वया साधो वक्ष्ये तच्छृणु सादरम् ॥ १७ ॥

पुरा त्रिपुरहन्तारं पार्वती भक्तवत्सला ।
श्रीरामतत्त्वं जिज्ञासुः पप्रच्छ विनयान्विता ॥ १८ ॥

प्रियायै गिरिशस्तस्यै गूढं व्याख्यातवान् स्वयम् ।
पुराणोत्तममध्यात्मरामायणमिति स्मृतम् ॥ १९ ॥

भयंकर असे कलियुग आल्यावर, माणसे पुण्य कर्मे करण्याचे सोडून देतील आणि सत्य वचनांकडे पाठ फिरवून दुराचार करण्यास प्रवृत्त होतील. (९)

ते लोक दुसऱ्यांची निंदा करण्यात तत्पर राहतील, इतरांच्या धनाची इच्छा करतील, परस्त्रियांच्या ठिकाणी त्यांचे मन जडेल आणि दुसऱ्यांची हिंसा करण्यास ते तत्पर होतील. (१०)

ते मूढ लोक देहाच्या ठिकाणी आत्मबुद्धी असणारे आणि नास्तिक बनतील. त्यांची बुद्धी पशूप्रमाणे होईल. आणि ते कामाचे गुलाम होऊन स्त्रियांचे भक्त होतील व आपल्या मातापित्यांचा द्वेष करतील. (११)

ब्राह्मण लोभाने ग्रस्त होतील आणि वेद विकून आपला उदरनिर्वाह करू लागतील; धन मिळविण्यासाठीच ते विद्याभ्यास करतील, आणि (विद्या तसेच आपले ब्राह्मणत्व यांच्या) मदाने ते उन्मत्त होतील. (१२)

तसेच क्षत्रिय आणि वैश्य हेसुद्धा स्वधर्माचा त्याग करणारे बनतील आणि आपली जाति-कर्मे सोडून देऊन, प्रायः दुसऱ्यांना फसविणारेच होतील. (१३)

याच प्रमाणे जे शूद्र असतील तेसुद्धा ब्राह्मणांचा आचार करण्यात तत्पर होतील; तसेच स्त्रिया भ्रष्ट आचाराच्या बनतील आणि आपल्या पतीचा अपमान करण्यात त्यांना संकोच वाटणार नाही. (१४)

त्या आपल्या सासू-सासऱ्यांचा द्वेष करतील, यात शंका नाही. अशा या बुद्धीभ्रष्ट लोकांना कोणत्या प्रकाराने परलोक प्राप्त होईल बरे ? (१५)

या चिंतेने माझे चित्त निरंतर व्याकूळ होऊन जात आहे. (तेव्हा) ज्या सुलभ उपायाने या लोकांना परलोक प्राप्त होणे शक्य होईल, तो उपाय आपण मला सांगावा. कारण आपण सर्व काही जाणता." (१६)

देवर्षी नारदांचे हे भाषण ऐकल्यावर कमलासन ब्रह्मदेव म्हणाले, "हे साधू नारदा, तू फार चांगली गोष्ट मला विचारलीस. मी तुला सांगतो, ते तू श्रद्धापूर्वक ऐक. (१७)

पूर्वी एकदा भक्तवत्सल अशा पार्वतीने श्रीरामांचे तत्त्व जाणण्याच्या इच्छेने त्रिपुराचा नाश करणाऱ्या भगवान शंकरांना विनयपूर्वक प्रश्न केला होता. (१८)

त्या वेळी आपल्या प्रिय पत्नीसाठी श्रीमहादेवांनी स्वतः ज्या रहस्याचे विवेचन केले होते, तेच उत्तम पुराण **अध्यात्म रामायण** या नावाने प्रसिद्ध झाले. (१९)

तत्पार्वती जगद्धात्री पूजयित्वा दिवानिशम् ।
आलोचयन्ती स्वानन्दमग्ना तिष्ठति साम्प्रतम् ॥ २० ॥

प्रचरिष्यति तल्लोके प्राण्यदृष्टवशाद्यदा ।
तस्याध्ययनमात्रेण जना यास्यन्ति सद्गतिम् ॥ २१ ॥

तावद्विजृम्भते पापं ब्रह्महत्यापुरःसरम् ।
यावज्जगति नाध्यात्मरामायणमुदेष्यति ॥ २२ ॥

तावत्कलिमहोत्साहो निःशङ्कं सम्प्रवर्तते ।
यावज्जगति नाध्यात्मरामायणमुदेष्यति ॥ २३ ॥

तावद्यमभटाः शूराः सञ्चरिष्यन्ति निर्भयाः ।
यावज्जगति नाध्यात्मरामायणमुदेष्यति ॥ २४ ॥

तावत्सर्वाणि शास्त्राणि विवदन्ते परस्परम् ॥ २५ ॥

तावत्स्वरूपं रामस्य दुर्बोधं महतामपि ।
यावज्जगति नाध्यात्मरामायणमुदेष्यति ॥ २६ ॥

अध्यात्मरामायणसङ्कीर्तनश्रवणादिजम् ।
फलं वक्तुं न शक्नोमि कात्स्न्र्येन मुनिसत्तम ॥ २७ ॥

तथापि तस्य माहात्म्यं वक्ष्ये किञ्चित्तवानघ ।
शृणु चित्तं समाधाय शिवेनोक्तं पुरा मम ॥ २८ ॥

अध्यात्मरामायणतः श्लोकं श्लोकार्धमेव वा ।
यःपठेद्भक्तिसंयुक्तः स पापान्मुच्यते क्षणात् ॥ २९ ॥

यस्तु प्रत्यहमध्यात्मरामायणमनन्यधीः ।
यथाशक्ति वदेद्भक्त्या स जीवन्मुक्त उच्यते ॥ ३० ॥

यो भक्त्यार्चयतेऽध्यात्मरामायणमतन्द्रितः ।
दिने दिनेऽश्वमेधस्य फलं तस्य भवेन्मुने ॥ ३१ ॥

यदृच्छयापि योऽध्यात्मरामायणमनादरात् ।
अन्यतः शृणुयान्मर्त्यःसोऽपि मुच्येत पातकात् ॥ ३२ ॥

तेव्हापासून त्या अध्यात्मरामायणाचे आदरपूर्वक रात्रंदिवस मनन करीत, जगज्जननी पार्वती आत्मानंदामध्ये नित्य निमग्न राहाते. (२०)

ज्या वेळी प्राण्यांच्या सुदैवाने त्या ग्रंथाचा लोकांमध्ये प्रचार होईल, त्या वेळी त्या ग्रंथाच्या केवळ अध्ययनाने लोकांना शुभगती प्राप्त होईल. (२१)

जोपर्यंत अध्यात्मरामायणाचा प्रादुर्भाव होणार नाही, तोपर्यंतच जगात ब्रह्महत्यादी पापे होत राहतील. (२२)

जोपर्यंत जगात अध्यात्म-रामायणाचा उदय होणार नाही, तोपर्यंत कलियुगाचा महान दुष्प्रभाव निःशंकपणे वाढतच राहील. (२३)

जोपर्यंत जगात अध्यात्मरामायण प्रकट होणार नाही, तोपर्यंत यमराजाचे शूर दूत या जगात निर्भयपणे संचार करीत राहतील. (२४)

आणि जोपर्यंत या जगात अध्यात्मरामायणाचा प्रकाश पडणार नाही, तोपर्यंत सर्व शास्त्रांमध्ये परस्पर वाद-विवाद चालू राहतील आणि तोपर्यंत महापुरुषांनासुद्धा भगवान श्रीरामांचे स्वरूप दुर्बोध राहील. (२५-२६)

हे मुनिश्रेष्ठ नारदा, अध्यात्मरामायणाचे कीर्तन आणि श्रवण इत्यादींमुळे प्राप्त होणाऱ्या फळाचे संपूर्ण वर्णन मी करू शकत नाही. तथापि, हे निष्पाप नारदा, मी तुला त्याचे थोडेसे माहात्म्य ऐकवितो. ते मला पूर्वी शिवांनी सांगितले होते. तू सावधान होऊन ऐक. (२७-२८)

जो पुरुष अध्यात्मरामायणाचा एक किंवा अर्धा श्लोकसुद्धा भक्तिपूर्वक वाचतो तो तत्क्षणी पापातून मुक्त होऊन जातो. (२९)

जो माणूस हे अध्यात्मरामायण दररोज अनन्य बुद्धीने भक्तिपूर्वक आपल्या शक्तीनुसार इतरांना ऐकवतो, तो जीवन्मुक्त म्हटला जातो. (३०)

हे नारद मुनी, आळस टाकून देऊन जो मनुष्य भक्तिभावाने प्रत्येक दिवशी अध्यात्मरामायणाचे पूजन करतो, त्याला अश्वमेध यज्ञाचे फळ मिळते. (३१)

एखादा माणूस योगायोगाने अध्यात्मरामायणाच्या पठनाच्या जागी पोचला व त्याला त्याविषयी आदर नसूनही त्याने ते दुसऱ्याकडून ऐकले तरी तोही पातकांतून मुक्त होऊन जातो. (३२)

नमस्करोति योऽध्यात्मरामायणमदूरतः ।
सर्वदेवार्चनफलं स प्राप्नोति न संशयः ॥ ३३ ॥

जो कोणी अध्यात्मरामायणाच्या जवळ जाऊन त्याला नमस्कार करतो, त्याला सर्व देवतांची पूजा केल्याचे फळ मिळते, यात शंका नाही. (३३)

लिखित्वा पुस्तकेऽध्यात्मरामायणमशेषतः ।
यो दद्याद्रामभक्तेभ्यस्तस्य पुण्यफलं शृणु ॥ ३४ ॥

जो पुरुष अध्यात्म-रामायणाचे संपूर्ण पुस्तक लिहून काढून ते रामभक्तांना देतो, त्याला जे पुण्य प्राप्त होते, त्याचे फळ ऐक. (३४)

अधीतेषु च वेदेषु शास्त्रेषु व्याकृतेषु च ।
यत्फलं दुर्लभं लोके तत्फलं तस्य सम्भवेत् ॥ ३५ ॥

त्या माणसाला असे फळ मिळते की ते वेदांच्या अध्ययनाने आणि शास्त्रांचे विवेचन करण्यानेसुद्धा या जगात दुर्लभ आहे. (३५)

एकादशीदिनेऽध्यात्मरामायणमुपोषितः ।
यो रामभक्तः सदसि व्याकरोति नरोत्तमः ॥ ३६ ॥

हे वैष्णवश्रेष्ठा, जो रामभक्त नरश्रेष्ठ एकादशीचे दिवशी उपवास करून, सभेमध्ये अध्यात्मरामायणाचे विवेचन करतो, त्याच्या पुण्याचे फळ मी तुला सांगतो, ते ऐक. अध्यात्म-रामायणातील एकेक अक्षर वाचल्यामुळे त्याला गायत्री-पुरश्चरण केल्याचे फळ मिळते. (३६-३७)

तस्य पुण्यफलं वक्ष्ये शृणु वैष्णवसत्तम ।
प्रत्यक्षरं तु गायत्रीपुरश्चर्याफलं भवेत् ॥ ३७ ॥

उपवासव्रतं कृत्वा श्रीरामनवमीदिने ।
रात्रौ जागरितोऽध्यात्मरामायणमनन्यधीः ।
यः पठेच्छृणुयाद्वापि तस्य पुण्यं वदाम्यहम् ॥ ३८ ॥

श्रीरामनवमीच्या दिवशी निराहार राहून आणि रात्री जागरण करून, जो पुरुष अनन्य बुद्धीने अध्यात्म रामायण वाचतो अथवा ऐकतो, त्याचे पुण्य आता मी तुला सांगतो. (३८)

कुरुक्षेत्रादिनिखिलपुण्यतीर्थेष्वनेकशः ।
आत्मतुल्यं धनं सूर्यग्रहणे सर्वतोमुखे ॥ ३९ ॥

कुरुक्षेत्र इत्यादी सर्व पवित्र तीर्थांचे ठिकाणी, सूर्याच्या खग्रास ग्रहणाचे वेळी, व्यासांसारख्या ब्राह्मणांना अनेकदा एखाद्या पुरुषाने आपल्या अत्यंत प्रिय वस्तू व यथाशक्ती धन दान देण्यामुळे जे फळ मिळते तेच फळ त्याला मिळते, यात मुळीच संशय नाही हे संपूर्णपणे सत्य आहे. (३९-४०)

विप्रेभ्यो व्यासतुल्येभ्यो दत्त्वा यत्फलमश्नुते ।
तत्फलं सम्भवेत्तस्य सत्यं सत्यं न संशयः ॥ ४० ॥

यो गायते मुदाध्यात्मरामायणमहर्निशम् ।
आज्ञां तस्य प्रतीक्षन्ते देवा इन्द्रपुरोगमाः ॥ ४१ ॥

जो मनुष्य रात्रंदिवस प्रसन्न चित्ताने अध्यात्म-रामायणाचे गायन करतो, त्याच्या आज्ञेची प्रतीक्षा इंद्र इत्यादी देवसमूहही करीत राहतात. (४१)

पठन्प्रत्यहमध्यात्मरामायणमनुव्रतः ।
यद्यत्करोति तत्कर्म ततः कोटिगुणं भवेत् ॥ ४२ ॥

दररोज नियमपूर्वक अध्यात्मरामायणाचे पठण करीत एखादा माणूस जे काही पुण्यकर्म करतो, ते कोटीपट होते. (४२)

तत्र श्रीरामहृदयं यः पठेत्पुसमाहितः ।
स ब्रह्महोऽपि पूतात्मा त्रिभिरेव दिनैर्भवेत् ॥ ४३ ॥

या अध्यात्मरामायणातील श्रीरामहृदयाचेपठन जो कोणी मनुष्य चांगल्याप्रकारे एकाग्र होऊन करतो, तो जरी ब्रह्महत्या करणारा असला तरीसुद्धा तीन दिवसांत पवित्र होऊन जातो. (४३)

श्रीरामहृदयं यस्तु हनूमत्प्रतिमान्तिके ।
त्रिःपठेत्प्रत्यहं मौनी स सर्वेप्सितभाग्भवेत् ॥ ४४ ॥

हनुमानांच्या प्रतिमेजवळ जो पुरुष प्रतिदिवशी मौन धारण करून तीन वेळा श्रीरामहृदयाचे पठन करतो, तो सर्व इच्छित फळ प्राप्त करून घेतो. (४४)

पठन् श्रीरामहृदयं तुलस्यश्वत्थयोर्यदि ।
प्रत्यक्षरं प्रकुर्वीत ब्रह्महत्यानिवर्तनम् ॥ ४५ ॥

तसेच तुळशीच्या किंवा पिंपळ वृक्षाच्याजवळ जर एखादा मनुष्य श्रीरामहृदयाचे पठन करील तर तो प्रत्येक अक्षराबरोबर ब्रह्महत्येसारखी आपली पापे दूर करील. (४५)

श्रीरामगीतामाहात्म्यं कृत्स्नं जानाति शङ्करः ।
तदर्धं गिरिजा वेत्ति तदर्धं वेद्म्यहं मुने ॥ ४६ ॥

हे नारद मुनी, (अध्यात्म रामायणातील) श्रीराम गीतेचे महत्त्व फक्त महादेवच पूर्णपणे जाणतात; त्याच्या अर्धे माहात्म्य पार्वती जाणते आणि त्याच्याही अर्धे माहात्म्य मी जाणतो. (४६)

तत्ते किञ्चित्प्रवक्ष्यामि कृत्स्नं वक्तुं न शक्यते ।
यज्ज्ञात्वा तत्क्षणाल्लोकश्चित्तशुद्धिमवाप्नुयात् ॥ ४७ ॥

ते माहात्म्यही पूर्णपणे मला सांगता येणे शक्य नाही. म्हणून मी जाणतो त्यातील थोडेसे माहात्म्य मी तुला सांगतो. ते जाणल्यामुळे त्याच क्षणी माणसाचे चित्त शुद्ध होऊन जाते. (४७)

श्रीरामगीता यत्पापं न नाशयति नारद ।
तन्न नश्यति तीर्थादौ लोके क्वापि कदाचन ।
तन्न पश्याम्यहं लोके मार्गमाणोऽपि सर्वदा ॥ ४८ ॥

हे नारदा, या श्रीरामगीतेचे पठन केल्यामुळे जे पाप नाहीसे होत नाही, ते या जगात कोणत्याही तीर्थक्षेत्रादिकांमध्ये नष्ट होऊ शकत नाही. श्रीरामगीतापठनाने नाहीसे न होणारे पाप मला शोधूनही आढळले नाही . (४८)

रामेणोपनिषत्सिन्धुमुन्मथ्योत्पादितां मुदा ।
लक्ष्मणायार्पितां गीतासुधां पीत्वामरो भवेत् ॥ ४९ ॥

भगवान श्रीरामांनी उपनिषद-सागराचे मंथन करून जे गीतामृत काढून मोठ्या प्रसन्नतेने लक्ष्मणाला दिले, त्याचे पान करून माणूस अमर होतो. (४९)

जमदग्निसुतः पूर्वं कार्तवीर्यवधेच्छया ।
धनुर्विद्यामभ्यसितुं महेशस्यान्तिके वसन् ॥ ५० ॥

पूर्वी सहस्रार्जुनाच्या वधाच्या इच्छेने जमदग्नि-नंदन परशुराम हा धनुर्विद्येचा अभ्यास करण्यासाठी श्रीमहादेवांच्या जवळ राहात होता. (५०)

अधीयमानां पार्वत्या रामगीतां प्रयत्नतः ।
श्रुत्वा गृहीत्वाशु पठन्नारायणकलामगात् ॥ ५१ ॥

त्यावेळी रामगीतेचे अध्ययन करणाऱ्या पार्वतीकडून ही रामगीता श्रद्धेने प्रयत्नपूर्वक ऐकून व ती लगेचच ग्रहण करून,तिचे पठन करता करता तो श्रीनारायणांचा अंशरूप अवतार झाला. (५१)

ब्रह्महत्यादिपापानां निष्कृतिं यदि वाञ्छति ।
रामगीतां मासमात्रं पठित्वा मुच्यते नरः ॥ ५२ ॥

जर कुणी पुरुष ब्रह्महत्या इत्यादी घोर पापांतून सुटका व्हावी अशी इच्छा करीत असेल, तर केवळ एक महिनाभर रामगीतेचे पठन करून तो त्या पापातून सुटू शकतो. (५२)

दुष्प्रतिग्रहदुर्भोज्यदुरालापादिसम्भवम् ।
पापं यत्तत्कीर्तनेन रामगीता विनाशयेत् ॥ ५३ ॥

निषिद्ध दान घेणे, निषिद्ध भोजन करणे आणि खोटे भाषण करणे इत्यादींमुळे जे पाप निर्माण होते, ते रामगीता पठनाने नष्ट करून टाकते. (५३)

शालग्रामशिलाग्रे च तुलस्यश्वत्थसन्निधौ ।
यतीनां पुरतस्तद्वद्रामगीतां पठेत्तु यः ॥ ५४ ॥
स तत्फलमवाप्नोति यद्वाचोऽपि न गोचरम् ॥ ५५ ॥

शालिग्राम शिलेपुढे, तुळस किंवा अश्वत्थ यांच्या सांनिध्यात अथवा यती लोकांच्या पुढे जो कोणी माणूस रामगीतेचे पठन करतो, त्याला वाणीने वर्णनही करता येणार नाही, असे फळ मिळते. (५४-५५)

रामगीतां पठन्भक्त्या यः श्राद्धे भोजयेद् द्विजान् ।
तस्य ते पितरः सर्वे यान्ति विष्णोः परं पदम् ॥ ५६ ॥

श्राद्धामध्ये भक्तिपूर्वक रामगीतेचे पठन करून जो माणूस ब्राह्मणांना भोजन घालतो, त्याचे सर्व पितर भगवान विष्णूंच्या परम धामाप्रत जातात. (५६)

ॐ

अध्यात्मरामायण

बालकाण्ड

प्रथम सर्ग

श्रीरामहृदय

यः पृथ्वीभरवारणाय दिविजैः
संप्रार्थितश्चिन्मयः
संजातः पृथिवीतले रविकुले
मायामनुष्योऽव्ययः ।
निश्चक्रं हतराक्षसः पुनरगाद्
ब्रह्मत्वमाद्यं स्थिरां
कीर्तिं पापहरां विधाय जगतां
तं जानकीशं भजे ॥ १ ॥

विश्वोद्भवस्थितिलयादिषु हेतुमेकं
मायाश्रयं विगतमायमचिन्त्यमूर्तिम् ।
आनन्दसान्द्रममलं निजबोधरूपं
सीतापतिं विदिततत्त्वमहं नमामि ॥ २ ॥

पठन्ति ये नित्यमनन्यचेतसः
शृण्वन्ति चाध्यात्मिकसंज्ञितं शुभम् ।
रामायणं सर्वपुराणसंमतं
निर्धूतपापा हरिमेव यान्ति ते ॥ ३ ॥

अध्यात्मरामायणमेव नित्यं
पठेद्यदीच्छेद्भवबन्धमुक्तिम् ।
गवां सहस्रायुतकोटिदानात्
फलं लभेद्यः शृणुयात्स नित्यम् ॥ ४ ॥

पुरारिगिरिसंभूता श्रीरामार्णवसङ्गता ।
अध्यात्मरामगङ्गेयं पुनाति भुवनत्रयम् ॥ ५ ॥

देवतांच्या प्रार्थनेनुसार पृथ्वीचा भार दूर करण्यासाठी, ज्या चिन्मय अविनाशी प्रभूंनी पृथ्वीतलावर सूर्यवंशामध्ये माया-मानव-रूपाने अवतार घेतला आणि ज्यांनी सर्व राक्षसांना मारून जगातील पापे नाहीशी करणारी व सुस्थिर अशी आपली कीर्ती प्रस्थापित केली, आणि मग जे आपल्या आद्य ब्रह्मस्वरूपात लीन होऊन गेले, त्या श्रीजानकीनाथांचे मी भजन करतो. (१)

विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय इत्यादींचे जे एकमात्र कारण आहेत, ते मायापती आहेत, म्हणून माया त्यांच्या आश्रयाला आहे. जे स्वतः मायातीत आहेत, अचिंत्य-स्वरूप आहेत, आनंदघन आहेत, जे निर्मळ आहेत, जे रागादी दोषांनी रहित आहेत, तसेच जे स्वतः ज्ञानस्वरूप आहेत, त्या तत्त्व जाणणाऱ्या सीतापती श्रीरामांना मी नमस्कार करतो. (२)

सर्व पुराणांना मान्य, पवित्र आणि **अध्यात्म** हे नाव असणाऱ्या रामायणाचे म्हणजे **अध्यात्मरामायणाचे** नित्य पठन जे कोणी एकाग्र मनाने करतात किंवा त्याचे श्रवण करतात, ते लोक पाप-रहित होऊन श्रीहरीलाच प्राप्त होतात. (३)

जर कुणाला संसाराच्या बंधनातून सुटून जाण्याची इच्छा असेल तर त्याने अध्यात्म-रामायणाचेच पठन नित्य करावे. जो कुणी मनुष्य या अध्यात्मरामायणाचे नित्य श्रवण करतो, त्याला लक्षावधी गाई दान केल्याचे फळ प्राप्त होते. (४)

श्रीशंकररूपी पर्वतात उगम पावलेली, श्रीरामरूप समुद्राला मिळणारी ही अध्यात्म-रामायणरूपी गंगा तिन्ही लोकांना पवित्र करणारी आहे. (५)

एकादश्यां निराहारो नियतो द्वादशीदिने ।
स्थित्वागस्त्यतरोर्मूले रामगीतां पठेत्तु यः ।
स एव राघवः साक्षात्सर्वदेवैश्च पूज्यते ॥ ५७ ॥

एकादशीच्या दिवशी निराहार आणि जितेंद्रिय राहून जो कोणी पुरुष द्वादशीच्या दिवशी अगस्त्य वृक्षाच्या खाली बसून रामगीतेचे पठन करतो, तो साक्षात रामरूपच होय. सर्व देवही त्याची पूजा करतात. (५७)

विना दानं विना ध्यानं विना तीर्थावगाहनम् ।
रामगीतां नरोऽधीत्य तदनन्तफलं लभेत् ॥ ५८ ॥

दान न देता, ध्यान न करता किंवा तीर्थस्नान न करताही जर एखाद्या माणसाने रामगीतेचे अध्ययन केले तर त्याला त्याचे अनंतपटीने फळ मिळते. (५८)

बहुना किमिहोक्तेन शृणु नारद तत्त्वतः ।
श्रुतिस्मृतिपुराणेतिहासागमशतानि च ।
अर्हन्ति नाल्पमध्यात्मरामायणकलामपि ॥ ५९ ॥

हे नारदा, या बाबतीत आणखी जास्त काय सांगावे? खरे पाहता, श्रुती, स्मृती, पुराणे, इतिहास इत्यादी शेकडो शास्त्रे ही अध्यात्म-रामायणाच्या एखाद्या अल्प अंशाचीही बरोबरी करू शकत नाहीत." (५९)

अध्यात्मरामचरितस्य मुनीश्वराय
माहात्म्यमेतदुदितं कमलासनेन ।
यः श्रद्धया पठति वा शृणुयात्स मर्त्यः
प्राप्नोति विष्णुपदवीं सुरपूज्यमानः ॥ ६० ॥

अध्यात्मरामायणाचे हे माहात्म्य ब्रह्मदेवांनी मुनिराज नारदाला सांगितले आहे. जो माणूस हे श्रद्धापूर्वक वाचतो अथवा ऐकतो, तो देवांकडून पूजिला जाऊन, श्रीविष्णूंचे पद प्राप्त करून घेतो. (६०)

इति श्रीब्रह्माण्डपुराणे उत्तरखण्डेऽध्यात्मरामायणमाहात्म्यं संपूर्णम् ॥

कैलासाग्रे कदाचिद्रविशतविमले
मन्दिरे रत्नपीठे
संविष्टं ध्याननिष्ठं त्रिनयनमभयं
सेवितं सिद्धसंघैः ।
देवी वामाङ्कसंस्था गिरिवरतनया
पार्वती भक्तिनम्रा
प्राहेदं देवमीशं सकलमलहरं
वाक्यमानन्दकन्दम् ॥ ६ ॥

श्रीपार्वत्युवाच

नमोऽस्तु ते देव जगन्निवास
सर्वात्मदृक् त्वं परमेश्वरोऽसि ।
पृच्छामि तत्त्वं पुरुषोत्तमस्य
सनातनं त्वं च सनातनोऽसि ॥ ७ ॥
गोप्यं यदत्यन्तमनन्यवाच्यं
वदन्ति भक्तेषु महानुभावाः ।
तदप्यहोऽहं तव देव भक्ता
प्रियोऽसि मे त्वं वद यत्तु पृष्टम् ॥ ८ ॥
ज्ञानं सविज्ञानमथानुभक्ति-
वैराग्ययुक्तं च मितं विभास्वत् ।
जानाम्यहं योषिदपि त्वदुक्तं
यथा तथा ब्रूहि तरन्ति येन ॥ ९ ॥
पृच्छामि चान्यच्च परं रहस्यं
तदेव चाग्रे वद वारिजाक्ष ।
श्रीरामचन्द्रेऽखिललोकसारे
भक्तिर्दृढा नौर्भवति प्रसिद्धा ॥ १० ॥
भक्तिः प्रसिद्धा भवमोक्षणाय
नान्यत्ततः साधनमस्ति किञ्चित् ।
तथापि हृत्संशयबन्धनं मे
विभेत्तुमर्हस्यमलोक्तिभिस्त्वम् ॥ ११ ॥
वदन्ति रामं परमेकमाद्यं
निरस्तमायागुणसंप्रवाहम् ।
भजन्ति चाहर्निशमप्रमत्ताः
परं पदं यान्ति तथैव सिद्धाः ॥ १२ ॥

एकदा कैलास पर्वताच्या शिखरावरील, शेकडो सूर्याप्रमाणे प्रकाशमान व शुभ्र अशा मंदिरात, रत्नाच्या सिंहासनावर ध्याननिष्ठ होऊन बसलेल्या, सिद्धांच्या समूहाने सेविलेल्या, निर्भय, सर्व पापांचे हरण करणाऱ्या, आनंदकंद असणाऱ्या, अशा जगन्नियंत्या देवाधिदेव भगवान त्रिनयन शंकरांना, त्यांच्याच डाव्या मांडीवर विराजमान असणारी गिरिराजकुमारी श्रीपार्वती भक्तिभावाने नम्रतापूर्वक असे म्हणाली. (६)

श्रीपार्वती म्हणाली – हे देवा, हे जगन्निवासा, तुम्हांला नमस्कार असो. सर्व अंतःकरणांचे साक्षी आणि परमेश्वर तुम्ही आहात. श्रीपुरुषोत्तम भगवंतांचे सनातन तत्त्व मी तुम्हांला विचारू इच्छिते; कारण तुम्हीसुद्धा सनातन आहात. (७)

जो विषय अत्यंत गोपनीय असतो आणि जो विषय अन्य कुणालाही सांगण्यास योग्य नसतो, असा विषयसुद्धा महानुभाव लोक आपल्या भक्तांना सांगतात. हे देवा, मीसुद्धा तुमची भक्त आहे आणि तुम्हीसुद्धा मला अत्यंत प्रिय आहात. म्हणून मी जे काही तुम्हांला विचारलेले आहे ते तुम्ही मला वर्णन करून सांगा. (८)

ज्या ज्ञानाने या जगातील मनुष्य संसारसागरातून तरून जातात, ते भक्ती आणि वैराग्य यांनी परिपूर्ण असलेले प्रकाशमय विज्ञानासहित आत्मज्ञान तुम्ही मला अशा रीतीने थोडक्यात सांगा की त्यामुळे मी स्त्री असले तरी मला ते सहज कळेल. (९)

हे कमलनयना, आणखी एक परम रहस्य मी तुम्हांला विचारत आहे. तुम्ही ते मला आधी सांगावे. सर्व लोकांचे सारभूत असणाऱ्या अशा श्रीरामचंद्रांच्या ठायी दृढ भक्ती ही संसार- सागर तरून जाण्यासाठी प्रसिद्ध बळकट नौका आहे. (१०)

संसारातून सुटण्यासाठी भक्ती ही प्रसिद्ध असा उपाय आहे. तिच्यापेक्षा श्रेष्ठ असे दुसरे कोणतेही साधन नाही. तरीसुद्धा माझ्या हृदयातील संशयाची गाठ आपण आपल्या विशुद्ध वचनांनी तोडून टाकावी. (११)

श्रीरामचंद्र हे परम, अद्वितीय, सर्वांचे आद्य कारण आणि मायेच्या गुणांच्या प्रवाहाच्या पलीकडे आहेत, असे भक्तीमध्ये दक्ष असणारे सिद्धगण सांगतात. तसेच त्यांचे अहर्निश भजन करून ते परम पदसुद्धा प्राप्त करून घेतात. (१२)

वदन्ति केचित्परमोऽपि रामः
स्वाविद्यया संवृतमात्मसंज्ञम् ।
जानाति नात्मानमतः परेण
सम्बोधितो वेद परात्मतत्त्वम् ॥ १३ ॥
यदि स्म जानाति कुतो विलापः
सीताकृतेऽनेन कृतः परेण ।
जानाति नैवं यदि केन सेव्यः
समो हि सर्वैरपि जीवजातैः ॥ १४ ॥
अत्रोत्तरं किं विदितं भवद्भि-
स्तद्ब्रूत मे संशयभेदि वाक्यम् ॥ १५ ॥

श्रीमहादेव उवाच

धन्यासि भक्तासि परात्मनस्त्वं
यज्ज्ञातुमिच्छा तव रामतत्त्वम् ।
पुरा न केनाप्यभिचोदितोऽहं
वक्तुं रहस्यं परमं निगूढम् ॥ १६ ॥
त्वयाद्य भक्त्या परिनोदितोऽहं
वक्ष्ये नमस्कृत्य रघूत्तमं ते ।
रामः परात्मा प्रकृतेरनादि-
रानन्द एकः पुरुषोत्तमो हि ॥ १७ ॥
स्वमायया कृत्स्नमिदं हि सृष्ट्वा
नभोवदन्तर्बहिरास्थितो यः ।
सर्वान्तरस्थोऽपि निगूढ आत्मा
स्वमायया सृष्टमिदं विचष्टे ॥ १८ ॥
जगन्ति नित्यं परितो भ्रमन्ति
यत्सन्निधौ चुम्बकलोहवद्धि ।
एतन्न जानन्ति विमूढचित्ताः
स्वाविद्यया संवृतमानसा ये ॥ १९ ॥
स्वाज्ञानमप्यात्मनि शुद्धबुद्धे
स्वारोपयन्तीह निरस्तमाये ।
संसारमेवानुसरन्ति ते वै
पुत्रादिसक्ताः पुरुकर्मयुक्ताः ॥ २० ॥
जानन्ति नैवं हृदये स्थितं वै
चामीकरं कण्ठगतं यथाऽज्ञाः ।
यथाऽप्रकाशो न तु विद्यते रवौ
ज्योतिःस्वभावे परमेश्वरे तथा ।

तथापि काही लोक असे म्हणतात की जरी राम परमपुरुष असले तरीसुद्धा ते स्वतःच्या मायेने झाकले गेल्यामुळे आत्मस्वरूप जाणत नव्हते. म्हणून वसिष्ठ इत्यादी दुसऱ्यांच्या उपदेशामुळे त्यांना श्रेष्ठ असे आत्मतत्त्व कळले. (१३)

आता माझा प्रश्न असा की जर राम आत्मतत्त्व जाणत होते, तर त्या परमात्म्यांनी सीतेसाठी इतका विलाप का बरे केला ? याउलट जर त्यांना आत्मज्ञान नव्हते असे समजावे तर ते इतर सर्व सामान्य जीवाप्रमाणेच झाले. अशा स्थितीत कुणी कशासाठी त्यांचे भजन करावे? या विषयी तुमचे काय म्हणणे आहे? माझा संशय दूर होईल, अशा रीतीने ते आपण मला सांगा. (१४-१५)

श्रीमहादेव म्हणाले– हे देवी, तू धन्य आहेस. तू परमात्म्याची भक्त आहेस. म्हणूनच तुला रामांचे तत्त्व जाणून घेण्याची इच्छा झाली आहे. ते परम निगूढ रहस्य यापूर्वी मला कुणीही विचारले नव्हते. (१६)

आज भक्तिपूर्वक तू मला प्रश्न केला आहेस. म्हणून रघूत्तमांना वंदन करून मी तुला ते रहस्य सांगतो. श्रीरामचंद्र हे निःसंदेहपणे प्रकृतीच्या पलीकडील परमात्मा, अनादी, आनंदघन, अद्वितीय असे पुरुषोत्तम आहेत. (१७)

कारण ते स्वतःच्या मायेनेच हे संपूर्ण जग निर्माण करून, आकाशाप्रमाणे त्या जगाच्या आत व बाहेर व्याप्त आहेत, तसेच तेच आत्मरूपाने सर्वांच्या अंतःकरणात गुप्तरूपाने राहातात, त्यांनी स्वतःच्या मायेने निर्माण केलेले हे जग चालविलेले आहे. (१८)

चुंबक जवळ असताना ज्याप्रमाणे जड लोखंडात गती उत्पन्न होते, त्याचप्रमाणे त्यांच्या केवळ सांनिध्याने सगळीकडे हे सर्व विश्व सदा भ्रमण करीत राहते. स्वतःच्या अज्ञानामुळे ज्यांचे मन झाकले गेले आहे आणि ज्यांचे चित्त मूढ झालेले आहे असे लोक ही गोष्ट जाणू शकत नाहीत. (१९)

या जगात त्या मायातीत, शुद्ध, बुद्ध अशा परमात्म्यावरसुद्धा आपल्या अज्ञानाचा आरोप जे कोणी करतात म्हणजे परमात्म्यालासुद्धा आपल्याप्रमाणे अज्ञानी मानतात, ते अज्ञानी जीव नेहमी पुत्र इत्यादींच्या ठिकाणी आसक्त राहून आणि अनेक कर्मात गढून जाऊन संसार-चक्रातच अडकून राहतात. (२०)

ज्या प्रमाणे अज्ञानी लोक आपल्या गळ्यातच असणारा कंठा जाणत नाहीत, त्या प्रमाणे ते अज्ञ जन आपल्याच हृदयात असणाऱ्या परमात्म्या रामांना जाणत नाहीत (म्हणूनच ते त्यांच्यावर अज्ञान इत्यादींचा आरोप करतात). वास्तविक पाहता ज्याप्रमाणे ज्योतिःस्वरूप सूर्याचे

विशुद्धविज्ञानघने रघूत्तमे-
ऽविद्या कथं स्यात्परतः परात्मनि ॥ २१ ॥
यथा हि चाक्षुषा भ्रमता गृहादिकं
विनष्टदृष्टेर्भ्रमतीव दृश्यते ।
तथैव देहेन्द्रियकर्तुरात्मनः
कृतं परेऽध्यस्य जनो विमुह्यति ॥ २२ ॥
नाहो न रात्रिः सवितुर्यथा भवेत्
प्रकाशरूपाव्यभिचारतः क्वचित् ।
ज्ञानं तथाऽज्ञानमिदं द्वयं हरौ
रामे कथं स्थास्यति शुद्धचिद्घने ॥ २३ ॥
तस्मात्परानन्दमये रघूत्तमे
विज्ञानरूपे हि न विद्यते तमः ।
अज्ञानसाक्षिण्यरविन्दलोचने
मायाश्रयत्वान्न हि मोहकारणम् ॥ २४ ॥

अत्र ते कथयिष्यामि रहस्यमपि दुर्लभम् ।
सीतारामसमुत्पन्नसंवादं मोक्षसाधनम् ॥ २५ ॥

पुरा रामायणे रामो रावणं देवकण्टकम् ।
हत्वा रणे रणश्लाघी सपुत्रबलवाहनम् ॥ २६ ॥

सीतया सह सुग्रीवलक्ष्मणाभ्यां समन्वितः ।
अयोध्यामगमद्रामो हनूमत्प्रमुखैर्वृतः ॥ २७ ॥

अभिषिक्तः परिवृतो वसिष्ठाद्यैर्महात्मभिः ।
सिंहासने समासीनः कोटिसूर्यसमप्रभः ॥ २८ ॥

दृष्ट्वा तदा हनूमन्तं प्राञ्जलिं पुरतः स्थितम् ।
कृतकार्यं निराकाङ्क्षं ज्ञानापेक्षं महामतिम् ॥ २९ ॥

रामः सीतामुवाचेदं ब्रूहि तत्त्वं हनूमते ।
निष्कल्मषोऽयं ज्ञानस्य पात्रं नौ नित्यभक्तिमान् ॥ ३० ॥

तथेति जानकी प्राह तत्त्वं रामस्य निश्चितम् ।
हनूमते प्रपन्नाय सीता लोकविमोहिनी ॥ ३१ ॥

ठिकाणी अंधार कधीही असत नाही, त्याप्रमाणे प्रकृती इत्यादींच्या पलीकडे असणाऱ्या, विशुद्ध, विज्ञानघन, ज्योतिःस्वरूप परमेश्वर असणाऱ्या अशा परमात्म्या श्रीरामांचे ठायी अविद्या कशी बरे राहू शकेल ? (२१)

ज्या प्रमाणे डोळे गरगर फिरवले असता दृष्टिदोषामुळे घर वगैरे फिरल्यासारखे वाटते, त्याप्रमाणे देह-इंद्रियांच्या द्वारा अंतःकरणाने केलेल्या कर्मांचा परमात्म्यावर आरोप करून लोक मोहित होतात. (स्वतःच्या भावनांचा आरोप लोक परमात्म्यावर करतात.) (२२)

सूर्याच्या प्रकाश-रूपाचा नाश कधी होत नसल्याने, ज्या प्रमाणे सूर्याच्या बाबतीत दिवस आणि रात्र असा भेद होत नाही , त्याप्रमाणे शुद्ध, चेतनघन अशा हरिरूप रामांच्या ठिकाणी ज्ञान किंवा अज्ञान या दोन गोष्टी कशा बरे राहू शकतील ? (२३)

म्हणून परानंदस्वरूप, विज्ञानरूप व अज्ञानाचा साक्षी असणाऱ्या अशा कमलनयन भगवान रामांच्या ठायी अज्ञानाचा लेशसुद्धा असत नाही. कारण ते मायेचे अधिष्ठान आहेत; म्हणून ती माया श्रीरामांना मोहित करू शकत नाही. (२४)

हे पार्वती, या बाबतीत मी तुला सीता, राम आणि पवनपुत्र हनुमान यांचा मोक्षाचे साधन- स्वरूप असणारा संवाद अत्यंत गोपनीय आणि परम दुर्लभ असला तरी सांगतो. (२५)

पूर्वी रामावताराच्या वेळी, देवांचा शत्रू असणाऱ्या रावणाला त्याची संताने, सैन्ये आणि वाहने यांच्यासह युद्धकुशल श्रीरामांनी युद्धात मारले आणि सीता, सुग्रीव तसेच लक्ष्मण यांच्यासह व हनुमान इत्यादी मुख्य वानरांसह श्रीराम अयोध्या नगरीत परत आले. (२६-२७)

तेथे त्यांच्यावर राज्याभिषेक झाला. नंतर वसिष्ठ इत्यादी महात्म्यांसमवेत कोट्यवधी सूर्यांची प्रभा असणारे श्रीराम सिंहासनावर विराजमान झाले . (२८)

त्या वेळी कृतकृत्य झाल्यामुळे निरपेक्ष असलेल्या व केवळ ज्ञानाची अपेक्षा करणाऱ्या महाबुद्धिवान हनुमंताला हात जोडून पुढे उभा असलेला पाहून, श्रीरामचंद्रांनी सीतेला म्हटले, "सीते, या हनुमानाची आपणा दोघांवर अढळ भक्ती आहे आणि तो पापरहित आहे आणि म्हणूनच तो ज्ञानाचा स्वीकार करण्यास पात्र आहे, म्हणून तू या हनुमानाला माझ्या खऱ्या स्वरूपाचा उपदेश कर. " (२९-३०)

तेव्हा लोकांना मोहित करणारी जनककन्या सीता "ठीक आहे," असे म्हणाली. नंतर ती शरणागत हनुमंताला भगवान श्रीरामांचे निश्चित तत्त्व सांगू लागली. (३१)

श्रीसीता उवाच

रामं विद्धि परं ब्रह्म सच्चिदानन्दमद्वयम् ।
सर्वोपाधिविनिर्मुक्तं सत्तामात्रमगोचरम् ॥ ३२ ॥

आनन्दं निर्मलं शान्तं निर्विकारं निरञ्जनम् ।
सर्वव्यापिनमात्मानं स्वप्रकाशमकल्मषम् ॥ ३३ ॥

मां विद्धि मूलप्रकृतिं सर्गस्थित्यन्तकारिणीम् ।
तस्य सन्निधिमात्रेण सृजामीदमतन्द्रिता ॥ ३४ ॥

तत्सान्निध्यान्मया सृष्टं तस्मिन्नारोप्यतेऽबुधैः ।
अयोध्यानगरे जन्म रघुवंशेऽतिनिर्मले ॥ ३५ ॥

विश्वामित्रसहायत्वं मखसंरक्षणं ततः ।
अहल्याशापशमनं चापभङ्गो महेशितुः ॥ ३६ ॥

मत्पाणिग्रहणं पश्चाद्भार्गवस्य मदक्षयः ।
अयोध्यानगरे वासो मया द्वादशवार्षिकः ॥ ३७ ॥

दण्डकारण्यगमनं विराधवध एव च ।
मायामारीचमरणं मायासीताहृतिस्तथा ॥ ३८ ॥

जटायुषो मोक्षलाभः कबन्धस्य तथैव च ।
शबर्याः पूजनं पश्चात्सुग्रीवेण समागमः ॥ ३९ ॥

वालिनश्च वधः पश्चात्सीतान्वेषणमेव च ।
सेतुबन्धश्च जलधौ लंकायाश्च निरोधनम् ॥ ४० ॥

रावणस्य वधो युद्धे सपुत्रस्य दुरात्मनः ।
बिभीषणे राज्यदानं पुष्पकेण मया सह ॥ ४१ ॥

अयोध्यागमनं पश्चाद्राज्ये रामाभिषेचनम् ।
एवमादीनि कर्माणि मयैवाचरितान्यपि ।
आरोपयन्ति रामेऽस्मिन्निर्विकारेऽखिलात्मनि ॥ ४२ ॥

रामो न गच्छति न तिष्ठति नानुशोच-
त्याकाङ्क्षते त्यजति नो न करोति किञ्चित् ।
आनन्दमूर्तिरचलः परिणामहीनो
मायागुणाननुगतो हि तथा विभाति ॥ ४३ ॥

श्रीसीता म्हणाली – "वत्स हनुमाना, राम हे साक्षात अद्वितीय सच्चिदानंदघन परब्रह्म आहेत, असे तू समज. ते सर्व उपाधींनी रहित, केवळ सत्ता हे स्वरूप असणारे, मन व इंद्रिये यांचा विषय नसणारे, आनंदघन, निर्मळ, शांत व विकाररहित, निरंजन, सर्वव्यापक, स्वयंप्रकाशी आणि रागादी दोषरहित परमात्मा आहेत. (३२-३३)

आणि विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि अंत करणारी मूल प्रकृती मी आहे हे तू समजून घे आणि त्या श्रीरामांच्या केवळ सान्निध्यामुळे मी निरलसपणे हे विश्व उत्पन्न करते. (३४)

तथापि रामांच्या सान्निध्याने मी निर्माण केलेले हे विश्व अज्ञानी लोक त्या रामांवर आरोपित करतात. अयोध्या नगरीमध्ये अतिशय पवित्र रघुकुळात रामांचा जन्म झाला. त्यानंतर त्यांनी विश्वामित्रांना साहाय्य करणे, त्या विश्वामित्राच्या यज्ञाचे रक्षण करणे, अहल्येला शापातून मुक्त करणे, श्रीमहादेवांचे धनुष्य भंग करणे, नंतर माझे पाणिग्रहण करणे, भार्गव परशुरामांचा गर्व खंडन करणे, माझ्यासह बारा वर्षेपर्यंत अयोध्यानगरीत राहणे, मग दंडकारण्यात जाणे, विराधाचा वध करणे, माया-मृग रूपातील मारीचाचे मरण, मायासीतेचे अपहरण होणे, जटायू तसेच कबंध यांना मोक्षाचा लाभ होणे, शबरीने केलेले रामाचे पूजन, नंतर सुग्रीवाशी मैत्री, वालीचा वध, सीतेचा शोध, समुद्रावर सेतू बांधणे, लंकेला वेढा घालणे, पुत्रांसह दुरात्म्या रावणाचा युद्धामध्ये वध करणे, बिभीषणाला लंकेचे राज्य देणे, पुष्पक विमानातून माझ्याबरोबर अयोध्येला परत येणे, त्यानंतर राज्यावर रामांचा राज्याभिषेक होणे- अशा प्रकारची ही सर्व कर्मे जरी मीच केलेली आहेत, तरीही अज्ञानी लोक ती कर्मे निर्विकार, सर्वांचा आत्मा असे जे राम त्यांच्यावर आरोपित करतात. (३५-४२)

तत्त्वतः श्रीराम सर्वव्यापी असल्याने कुठेही जात नाहीत, कुठेही राहात नाहीत, शोक करीत नाहीत, इच्छा करीत नाहीत, त्याग करीत नाहीत, तसेच अन्य कोणतीही क्रिया ते करीत नाहीत. ते आनंदस्वरूप, अविचल, आणि विकार-रहित आहेत; तथापि मायेच्या गुणांशी संबंध आल्यामुळे ते तसे भासतात." (४३)

श्रीमहादेव उवाच

ततो रामः स्वयं प्राह हनूमन्तमुपस्थितम् ।
शृणु तत्त्वं प्रवक्ष्यामि ह्यात्मानात्मपरात्मनाम् ॥ ४४ ॥

आकाशस्य यथा भेदस्त्रिविधो दृश्यते महान् ।
जलाशये महाकाशस्तदवच्छिन्न एव हि ।
प्रतिबिम्बाख्यमपरं दृश्यते त्रिविधं नभः ॥ ४५ ॥

बुद्ध्यवच्छिन्नचैतन्यमेकं पूर्णमथापरम् ।
आभासस्त्वपरं बिम्बभूतमेवं त्रिधा चितिः ॥ ४६ ॥

साभासबुद्धेः कर्तृत्वमविच्छिन्नेऽविकारिणि ।
साक्षिण्यारोप्यते भ्रान्त्या जीवत्वं च तथाऽबुधैः ॥ ४७ ॥

आभासस्तु मृषा बुद्धिरविद्याकार्यमुच्यते ।
अविच्छिन्नं तु तद्ब्रह्म विच्छेदस्तु विकल्पतः ॥ ४८ ॥

अवच्छिन्नस्य पूर्णेन एकत्वं प्रतिपाद्यते ।
तत्त्वमस्यादिवाक्यैश्च साभासस्याहमस्तथा ॥ ४९ ॥

ऐक्यज्ञानं यदोत्पन्नं महावाक्येन चात्मनोः ।
तदाऽविद्या स्वकार्यैश्च नश्यत्येव न संशयः ॥ ५० ॥

एतद्विज्ञाय मद्भक्तो मद्भावायोपपद्यते ।
मद्भक्तिविमुखानां हि शास्त्रगर्तेषु मुह्यताम् ।
न ज्ञानं न च मोक्षः स्यात्तेषां जन्मशतैरपि ॥ ५१ ॥

श्रीमहादेव म्हणाले – त्यानंतर सन्मुख उपस्थित असणाऱ्या हनुमंताला राम स्वतः म्हणाले, "आत्मा, अनात्मा आणि परमात्मा यांचे तत्त्व मी तुला सांगतो. ते तू लक्षपूर्वक ऐक. (४४)

ज्या प्रमाणे आकाशाचे तीन प्रकारचे मोठे भेद स्पष्टपणे दिसून येतात. एक महाकाश[१] दुसरे जलाशयाने मर्यादित झालेले आकाश[२] आणि तिसरे प्रतिबिंब हे नाव असणारे आकाश[३]. अशा प्रकारे तीन प्रकारचे आकाश दिसून येते. (४५)

त्याप्रमाणेच चैतन्य हेसुद्धा तीन प्रकारचे आहे- एक बुद्धीची मर्यादा असणारे चैतन्य (ते बुद्धीमध्ये व्याप्त असते). दुसरे परिपूर्ण असणारे चैतन्य आणि तिसरे जे बुद्धीमध्ये प्रतिबिंबित झालेले असते; या तिसऱ्या चैतन्याला आभास चैतन्य असे म्हणतात. (४६)

यांतील केवळ आभास चैतन्याने युक्त अशा बुद्धीमध्येच कर्तेपण असते म्हणजे चिदाभाससहित असणारी बुद्धी हीच सर्व कार्ये करते; परंतु अज्ञ जन भ्रांतीमुळे अखंड, निर्विकार, साक्षी अशा आत्म्यावर कर्तृत्व आणि जीवत्व यांचा आरोप करतात. म्हणजे ते अज्ञानी लोक त्या आत्म्यालाच कर्ता आणि भोक्ता समजतात. (४७)

(ज्याला आम्ही जीव म्हटले आहे) ते आभास चैतन्य हे मिथ्या आहे (कारण सर्वच आभास हे मिथ्याच असतात). बुद्धी ही अविद्येचे कार्य आहे, तथापि तो परब्रह्म परमात्मा हा वास्तविक अखंड आहे; म्हणून त्याचा भाग मानणे ही केवळ कल्पना आहे. (४८)

अहं (मी) च्या रूपाने प्रत्ययाला येणारे, मर्यादित, साभास (वासनायुक्त) चैतन्य म्हणजेच जीव. 'तत्त्वमसि' (तेच तू आहेस) इत्यादी वाक्यांनी त्याचे पूर्ण चैतन्य परब्रह्माशी एकत्व प्रतिपादन केले जाते. (४९)

जेव्हा (गुरूपदिष्ट, तत्त्वमस्यादी) महावाक्यांचे द्वारा जीवात्मा व परमात्मा यांच्या एकतेचे ज्ञान उत्पन्न होते, तेव्हा आपल्या बुद्ध्यादी कार्यांसह अविद्या ही नष्टच होऊन जाते, यात काहीही संदेह नाही . (५०)

याचा अनुभव येताच माझा भक्त माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो. परंतु जे लोक माझी भक्ती सोडून देऊन, शास्त्ररूपी खड्ड्यामध्ये पडून भटकत राहतात, त्यांना शेकडो जन्मांपर्यंतसुद्धा ज्ञानही होत नाही आणि मोक्षही प्राप्त होत नाही . (५१)

१. जे सर्वत्र व्याप्त आहे २. जे केवळ जलाशयात मर्यादित होऊन आहे ३. जे पाण्यात प्रतिबिंबित आहे.

इदं रहस्यं हृदयं ममात्मनो
मयैव साक्षात्कथितं तवानघ ।
मद्भक्तिहीनाय शठाय न त्वया
दातव्यमेन्द्रादपि राज्यतोऽधिकम् ॥ ५२ ॥

श्रीमहादेव उवाच

एतत्तेऽभिहितं देवि श्रीरामहृदयं मया ।
अतिगुह्यतमं ह्यद्यं पवित्रं पापशोधनम् ॥ ५३ ॥

साक्षाद्रामेण कथितं सर्ववेदान्तसंग्रहम् ।
यः पठेत्सततं भक्त्या स मुक्तो नात्र संशयः ॥ ५४ ॥

ब्रह्महत्यादिपापानि बहुजन्मार्जितान्यपि ।
नश्यन्त्येव न सन्देहो रामस्य वचनं यथा ॥ ५५ ॥

योऽतिभ्रष्टोऽतिपापी परधनपर-
दारेषु नित्योद्यतो वा
स्तेयी ब्रह्मघ्नमातापितृवधनिरतो
योगिवृन्दापकारी ।
यः संपूज्याभिरामं पठति च हृदयं
रामचन्द्रस्य भक्त्या
योगीन्द्रैरप्यलभ्यं पदमिह लभते
सर्वदेवैः स पूज्यम् ॥ ५६ ॥

हे निष्पाप हनुमंता, हे परम रहस्य आत्मस्वरूप अशा माझे हृदय आहे आणि प्रत्यक्ष मीच ते तुला सांगितले आहे. जरी तुला इंद्रलोकातील राज्यापेक्षा अधिक संपत्ती मिळाली, तरीसुद्धा तू हे रहस्य माझी भक्ती न करणाऱ्या कोणत्याही दुष्ट पुरुषाला सांगू नकोस." (५२)

श्रीमहादेव म्हणाले– " हे देवी, हे अत्यंत गोपनीय, मनोहर, परम पवित्र आणि पापनाशक **श्रीरामहृदय** मी तुला सांगितले आहे. (५३)

सर्व वेदांतांचे सार साक्षात श्रीरामचंद्रांनी सांगितले आहे. भक्तिपूर्वक जो कोणी याचे सतत पठन करतो, तो निःसंशयपणाने मुक्त होऊन जातो. (५४)

याच्या पठनाने अनेक जन्मांत संचित झालेली ब्रह्महत्या इत्यादी सर्व पापेसुद्धा निःसंदेहपणे नष्ट होऊन जातात; असे श्रीरामांचेच वचन आहे. (५५)

जो कुणी अतिशय भ्रष्ट असेल, अतिशय पापी असेल, परधन आणि परस्त्री यांच्या ठिकाणी नित्य प्रवृत्त होणारा असेल, जो चोर असेल, ब्रह्महत्या करणारा असेल, जो मातापित्याचा वध करण्यात गुंतलेला असेल आणि जो योगिजनांच्या समूहाचे अहित करणारा मनुष्य असेल, तोसुद्धा जर श्रीरामचंद्रांचे पूजन करून आणि सुंदर अशा रामहृदयाचे भक्तिपूर्वक पठन करील तर तो पूर्वसंचित पापांतून मुक्त होऊन सर्व देवांना पूज्य आणि श्रेष्ठ योग्यांनासुद्धा परम दुर्लभ असे परम पद प्राप्त करून घेईल." (५६)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे बालकाण्डे श्रीरामहृदयं नाम प्रथमः सर्गः ॥ १ ॥

द्वितीय सर्ग

भारपीडित पृथ्वीचे ब्रह्मदेवाजवळ जाणे, तिच्या प्रार्थनेने भगवंतांचे प्रकट होणे व त्यांनी तिला धीर देणे.

श्रीपार्वत्युवाच

धन्यास्म्यनुगृहीतास्मि कृतार्थास्मि जगत्प्रभो ।
विच्छिन्नो मेऽतिसन्देहग्रन्थिर्भवदनुग्रहात् ॥ १ ॥

त्वन्मुखाद्गलितं रामतत्त्वामृतरसायनम् ।
पिबन्त्या मे मनो देव न तृप्यति भवापहम् ॥ २ ॥

श्रीपार्वती म्हणाली – हे जगन्नाथा, आपल्या कृपेने अनुगृहीत होऊन मी धन्य झाले, कृतकृत्य झाले. तसेच माझी संशयग्रंथी पूर्णपणे नाहीशी झाली. (१)

हे देवा, तुमच्या मुखातून आलेले, संसाराचे भय हरण करणारे, रामतत्त्वरूपी अमृतरसायन पिताना माझे मन तृप्त होत नाही. (२)

श्रीरामस्य कथा त्वत्तः श्रुता संक्षेपतो मया ।
इदानीं श्रोतुमिच्छामि विस्तरेण स्फुटाक्षरम् ॥ ३ ॥

श्रीमहादेव उवाच

शृणु देवि प्रवक्ष्यामि गुह्याद्गुह्यतरं महत् ।
अध्यात्मरामचरितं रामेणोक्तं पुरा मम ॥ ४ ॥

तदद्य कथयिष्यामि शृणु तापत्रयापहम् ।
यच्छ्रुत्वा मुच्यते जन्तुरज्ञानोत्थमहाभयात् ।
प्राप्नोति परमामृद्धिं दीर्घायुः पुत्रसन्ततिम् ॥ ५ ॥

भूमिभारेण मग्ना दशवदनमुखाशेष-
रक्षोगणानां
धृत्वा गोरूपमादौ दिविजमुनिजनैः
साकमब्जासनस्य ।
गत्वा लोकं रुदन्ती व्यसनमुपगतं
ब्रह्मणे प्राह सर्वं
ब्रह्मा ध्यात्वा मुहूर्तं सकलमपि हृदा -
वेदशेषात्मकत्वात् ॥ ६ ॥
तस्मात्क्षीरसमुद्रतीरमगमद्
ब्रह्माथ देवैर्वृतो
देव्या चाखिललोकहृत्स्थमजरं
सर्वज्ञमीशं हरिम् ।
अस्तौषीच्छ्रुतिसिद्धनिर्मलपदैः
स्तोत्रैः पुराणोद्भवै-
र्भक्त्या गद्गदया गिरातिविमलै-
रानन्दाब्धौ वृतः ॥ ७ ॥
ततः स्फुरत्सहस्रांशुसहस्रसदृशप्रभः ।
आविरासीद्धरिः प्राच्यां दिशां व्यपनयंस्तमः ॥ ८ ॥

कथंचिददृष्टवान्ब्रह्मा दुर्दर्शमकृतात्मनाम् ।
इन्द्रनीलप्रतीकाशं स्मितास्यं पद्मलोचनम् ॥ ९ ॥

किरीटहारकेयूरकुण्डलैः कटकादिभिः ।
विभ्राजमानं श्रीवत्सकौस्तुभप्रभयान्वितम् ॥ १० ॥

स्तुवद्भिः सनकाद्यैश्च पार्षदैः परिवेष्टितम् ।
शङ्खचक्रगदापद्मवनमालाविराजितम् ॥ ११ ॥

श्रीरामचंद्रांची कथा मी आपल्या मुखातून संक्षेपाने ऐकली. आता तीच कथा विस्तारपूर्वक स्पष्ट शब्दांत ऐकावी, अशी माझी इच्छा आहे. (३)

श्रीमहादेव म्हणाले – हे देवी, ऐक. गुह्यापेक्षा अधिक गुह्य असणारे, महान असे **अध्यात्म रामायण** मी तुला सांगतो. ते पूर्वी रामांनीच मला सांगितले होते. (४)

त्रिविध तापांचे हरण करणारे अध्यात्म-रामायण मी आज तुला सांगतो. ते तू ऐक. ते ऐकल्याने जीव हा अज्ञान-जनित अशा महाभयातून सुटून जातो आणि दीर्घायुषी होऊन तो परम ऐश्वर्य आणि पुत्रपौत्र इत्यादी प्राप्त करून घेतो. (५)

रावण इत्यादी राक्षसांच्या भाराने दुःखी झालेली पृथ्वी ही पूर्वी एकदा गाईचे रूप धारण करून, देव आणि मुनी यांच्यासह, ब्रह्मदेवांच्या लोकात गेली. तेथे पोचल्यावर रडत रडत तिने आपल्यावर आलेले सर्व दुःख ब्रह्मदेवांना सांगितले. तेव्हा एक क्षणभर ध्यानस्थ होऊन, तिच्या दुःखनिवृत्तीचा उपाय ब्रह्मदेवांनी मनात जाणून घेतला; कारण ते सर्वांतर्यामी आहेत. (६)

त्यानंतर सर्व देवांच्यासह ब्रह्मदेव भूदेवीला बरोबर घेऊन, तेथून निघाले आणि क्षीर-सागराच्या किनाऱ्यावर गेले. तेथे अतिशय निर्मल आनंदाश्रूंनी डोळे भरून ब्रह्मदेवांनी, श्रुतीमध्ये सिद्ध असणाऱ्या निर्मल पदांनी आणि पुराणोक्त स्तोत्रांनी तसेच भक्तीने सद्गदित झालेल्या वाणीने सर्वांचे अंतर्यामी, जरारहित, सर्वज्ञ अशा भगवान श्रीहरींची स्तुती केली. (७)

तेव्हा हजारो देदीप्यमान सूर्याप्रमाणे प्रभा असणारे भगवान हरी आपल्या तेजाने सर्व दिशांतील अंधकार दूर करीत पूर्व दिशेला प्रकट झाले. (८)

पुण्यरहित पुरुषांना दर्शन मिळण्यास कठीण अशा भगवान हरींना ब्रह्मदेवांनीसुद्धा कसेबसे पाहिले. इंद्रनील मण्याप्रमाणे त्यांचा तेजोमय श्याम वर्ण होता. त्यांच्या मुखावर मधुर स्मितहास्य होते आणि त्यांचे डोळे कमलाप्रमाणे विशाल आणि मनोहर होते . किरीट, हार, केयूर आणि कुंडले तसेच कंकण इत्यादी अलंकारांनी ते सुशोभित होते. तसेच श्रीवत्स आणि कौस्तुभ मणी यांच्या प्रभेने ते युक्त होते. त्या स्तुती करणाऱ्या सनकादिक आणि त्यांच्या इतर पार्षदांसमवेत ते होते. शंख, चक्र, गदा, पद्म आणि वनमाला यांनी ते शोभत होते. सोन्याचे यज्ञोपवीत

स्वर्णयज्ञोपवीतेन स्वर्णवर्णाम्बरेण च ।
श्रिया भूम्या च सहितं गरुडोपरि संस्थितम् ॥ १२ ॥

हर्षगद्गदया वाचा स्तोतुं समुपचक्रमे ॥ १३ ॥

ब्रह्मोवाच

नतोऽस्मि ते पदं देव प्राणबुद्धीन्द्रियात्मभिः ।
यच्चिन्त्यते कर्मपाशाद्धृदि नित्यं मुमुक्षुभिः ॥ १४ ॥

मायया गुणमय्या त्वं सृजस्यवसि लुम्पसि ।
जगत्तेन न ते लेप आनन्दानुभवात्मनः ॥ १५ ॥

तथा शुद्धिर्न दुष्टानां दानाध्ययनकर्मभिः ।
शुद्धात्मता ते यशसि सदा भक्तिमतां यथा ॥ १६ ॥

अतस्तवाङ्घ्रिर्मे दृष्टश्चित्तदोषापनुत्तये ।
सद्योऽन्तर्हृदये नित्यं मुनिभिः सात्वतैर्वृतः ॥ १७ ॥

ब्रह्माद्यैः स्वार्थसिद्ध्यर्थमस्माभिः पूर्वसेवितः ।
अपरोक्षानुभूत्यर्थं ज्ञानिभिर्हृदि भावितः ॥ १८ ॥

तवाङ्घ्रिपूजानिर्माल्यतुलसीमालया विभो ।
स्पर्धते वक्षसि पदं लब्ध्वापि श्रीः सपत्निवत् ॥ १९ ॥

अतस्त्वत्पादभक्तेषु तव भक्तिः श्रियोऽधिका ।
भक्तिमेवाभिवाञ्छन्ति त्वद्भक्ताः सारवेदिनः ॥ २० ॥

अतस्त्वत्पादकमले भक्तिरेव सदास्तु मे ।
संसारामयतप्तानां भेषजं भक्तिरेव ते ॥ २१ ॥

इति ब्रुवन्तं ब्रह्माणं बभाषे भगवान् हरिः ।
किं करोमीति तं वेधाः प्रत्युवाचातिहर्षितः ॥ २२ ॥

आणि सोनेरी पीतांबर त्यांनी धारण केलेले होते. तसेच लक्ष्मीदेवी आणि भूदेवी यांच्यासह गरुडावर ते विराजमान होते. (असे त्यांचे दिव्यरूप पाहून) हर्षाने गद्‌गद झालेल्या वाणीने पितामह ब्रह्मदेवांनी त्यांची स्तुती करण्यास प्रारंभ केला. (९-१३)

ब्रह्मदेव म्हणाले – "हे देवा, कर्माच्या पाशातून सुटण्यासाठी मुमुक्षू लोक आपले प्राण, बुद्धी, इंद्रिये आणि मन यांचे द्वारा ज्यांचे नित्य चिंतन आपल्या मनात करतात, त्या तुमच्या चरणारविंदांना मी नमस्कार करतो. (१४)

आपल्या त्रिगुणमय मायेचा आश्रय घेऊन तुम्ही या जगाची उत्पत्ती, पालन आणि लय करता. परंतु ज्ञान आणि आनंद हे स्वरूप असणारे तुम्ही त्या कर्मांनी लिप्त होत नाही. (१५)

हे भगवन्, तुमच्या विमल यशाच्या ठिकाणी सदा प्रेम करणाऱ्या भक्तांच्या अंत:करणात जशी शुद्धता असते, तशी मलिन अंत:करण असणाऱ्या दुष्ट पुरुषांना दान, अध्ययन इत्यादी शुभ कर्मे करूनसुद्धा प्राप्त होत नाही. (१६)

म्हणून भक्त मुनिजन ज्यांचे निरंतर ध्यान आपल्या हृदयात करतात त्या आपल्या चरणांचे दर्शन माझ्या अंत:करणातील दोषांचा तत्काळ नाश व्हावा म्हणून मी आज घेतले आहे. (१७)

आपल्या इष्ट सिद्धीसाठी आम्ही ब्रह्मदेव इत्यादींनी या तुमच्या चरणांचे सेवन पूर्वी केले होते आणि ज्ञानी अशा मुनिजनांनी अपरोक्ष साक्षात्कार होण्यासाठी आपल्या हृदयात तुमच्या चरणांचे ध्यान केलेले आहे. (१८)

हे विभो, तुमच्या वक्ष:स्थलावर स्थान प्राप्त करून घेऊनसुद्धा, तुमच्या चरण-पूजेच्या वेळी वाहिलेल्या व निर्माल्य झालेल्या तुळशी मालेचा श्रीलक्ष्मी ही एखाद्या सवतीप्रमाणे मत्सर करते. (१९)

तुमच्या चरणकमलांवर प्रेम करणाऱ्या तुमच्या भक्तांच्या ठायी तुमचे प्रेम हे तुमच्या लक्ष्मीवरील प्रेमापेक्षाही अधिक आहे. म्हणून सार जाणणारे तुमचे भक्तजन हे केवळ तुमच्या भक्तीचीच इच्छा करतात. (२०)

म्हणून हे देवा, तुमच्या चरणकमलांच्या ठिकाणीच माझी भक्ती सर्वदा असू दे. कारण संसार-रोगाने ग्रस्त झालेल्या रोग्यांसाठी तुमची भक्ती हेच एकमात्र औषध आहे." (२१)

अशा प्रकारे स्तुती करणाऱ्या ब्रह्मदेवांना भगवान श्रीहरी म्हणाले, "मी तुमचे कोणते कार्य करू ?" तेव्हा अत्यंत आनंदित होऊन ब्रह्मदेवांनी त्यांना प्रत्युत्तर दिले. (२२)

भगवन् रावणो नाम पौलस्त्यतनयो महान् ।
राक्षसानामधिपतिर्मद्दत्तवरदर्पितः ॥ २३ ॥

त्रिलोकीं लोकपालांश्च बाधते विश्वबाधकः ।
मानुषेण मृतिस्तस्य मया कल्याणकल्पिता ।
अतस्त्वं मानुषो भूत्वा जहि देवरिपुं प्रभो ॥ २४ ॥

श्रीभगवानुवाच

कश्यपस्य वरो दत्तस्तपसा तोषितेन मे ॥ २५ ॥

याचितः पुत्रभावाय तथेत्यङ्गीकृतं मया ।
स इदानीं दशरथो भूत्वा तिष्ठति भूतले ॥ २६ ॥

तस्याहं पुत्रतामेत्य कौसल्यायां शुभे दिने ।
चतुर्धात्मानमेवाहं सृजामीतरयोः पृथक् ॥ २७ ॥

योगमायापि सीतेति जनकस्य गृहे तदा ।
उत्पत्स्यते तया सार्धं सर्वं सम्पादयाम्यहम् ।
इत्युक्त्वान्तर्दधे विष्णुर्ब्रह्मा देवानथाब्रवीत् ॥ २८ ॥

ब्रह्मोवाच

विष्णुर्मानुषरूपेण भविष्यति रघोः कुले ॥ २९ ॥

यूयं सृजध्वं सर्वेऽपि वानरेष्वंशसम्भवान् ।
विष्णोः सहायं कुरुत यावत्स्थास्यति भूतले ॥ ३० ॥

इति देवान्समादिश्य समाश्वास्य च मेदिनीम् ।
ययौ ब्रह्मा स्वभवनं विज्वरः सुखमास्थितः ॥ ३१ ॥

देवाश्च सर्वे हरिरूपधारिणः
स्थिताः सहायार्थमितस्ततो हरेः ।
महाबलाः पर्वतवृक्षयोधिनः
प्रतीक्षमाणा भगवन्तमीश्वरम् ॥ ३२ ॥

"हे भगवन, पुलस्त्यपुत्र विश्रवा याचा पुत्र रावण आहे. तो राक्षसांचा महान राजा असून मी दिलेल्या वरामुळे तो अतिशय गर्विष्ठ झाला आहे. (२३)

संपूर्ण विश्वाला पीडा देणारा तो तीन लोक आणि लोकपाल यांना त्रास देत आहे. हे कल्याणरूप विष्णू, त्याचा मृत्यू माणसाच्या हातून होईल, अशी योजना मी केली आहे. म्हणून हे प्रभो, तुम्ही मनुष्यरूप धारण करून, देवांचा शत्रू असणाऱ्या त्या रावणाचा वध करावा." (२४)

श्रीभगवान् म्हणाले– "कश्यपाच्या तपस्येने संतुष्ट होऊन मी एकदा त्याला वर दिला होता. 'तुम्ही पुत्ररूपाने माझ्या घरी जन्मास यावे' अशी प्रार्थना त्याने मला केली होती. तेव्हा 'ठीक आहे' असे म्हणून मी त्याच्या प्रार्थनेचा स्वीकार केला होता. या वेळी तो कश्यप पृथ्वीतलावर या दशरथ नावाने विद्यमान आहे. (२५-२६)

शुभ दिवशी मी त्याचा पुत्र म्हणून कौसल्या माता व इतर दोन मातांच्या ठिकाणी वेगवेगळ्या चार अंशांनी स्वतःच प्रगट होईन. (२७)

त्याच वेळी माझी योगमायासुद्धा जनकाच्या घरी सीता या नावाने उत्पन्न होईल. तिला बरोबर घेऊन मी तुमचे सर्व कार्य सिद्ध करीन," असे सांगून भगवान विष्णू अंतर्धान पावले. तेव्हा ब्रह्मदेव देवांना म्हणाले . (२८)

ब्रह्मदेव बोलले – "हे देवांनो, रघूच्या कुळात भगवान विष्णू मनुष्यरूपाने अवतार घेणार आहेत. तेव्हा तुम्ही सर्वजण स्वतःच्या अंशाने वानराच्या वंशात जन्म घ्या. तसेच जोपर्यंत भगवान श्रीविष्णू भूतलावर राहतील तोपर्यंत तुम्ही त्यांना साहाय्य करीत राहा." (२९-३०)

अशा प्रकारे देवांना आज्ञा करून आणि पृथ्वीला आश्वासन देऊन, ब्रह्मदेव आपल्या लोकात निघून गेले, आणि तेथे निश्चिंत होऊन सुखाने राहू लागले. (३१)

तेव्हा भगवान हरींना साहाय्य करण्यासाठी सर्व देव पर्वत व वृक्षांच्या आधारे लढणाऱ्या महाबलवान वानरांचे रूप धारण करून भगवंतांच्या येण्याची वाट पाहात इकडे तिकडे राहू लागले. (३२)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे बालकांडे द्वितीयः सर्गः ॥ २ ॥

तृतीय सर्ग

भगवंतांचा जन्म आणि बाललीला

श्रीमहादेव उवाच

अथ राजा दशरथः श्रीमान्सत्यपरायणः ।
अयोध्याधिपतिर्वीरः सर्वलोकेषु विश्रुतः ॥ १ ॥

सोऽनपत्यत्वदुःखेन पीडितो गुरुमेकदा ।
वसिष्ठं स्वकुलाचार्यमभिवाद्येदमब्रवीत् ॥ २ ॥

स्वामिन्पुत्राः कथं मे स्युः सर्वलक्षणलक्षिताः ।
पुत्रहीनस्य मे राज्यं सर्वं दुःखाय कल्पते ॥ ३ ॥

ततोऽब्रवीद्वसिष्ठस्तं भविष्यन्ति सुतास्तव ।
चत्वारः सत्त्वसम्पन्ना लोकपाला इवापराः ॥ ४ ॥

शान्ताभर्तारमानीय ऋष्यशृङ्गं तपोधनम् ।
अस्माभिः सहितः पुत्रकामेष्टिं शीघ्रमाचर ॥ ५ ॥

तथेति मुनिमानीय मन्त्रिभिः सहितः शुचिः ।
यज्ञकर्म समारेभे मुनिभिर्वीतकल्मषैः ॥ ६ ॥

श्रद्धया हूयमानेऽग्नौ तप्तजाम्बूनदप्रभः ।
पायसं स्वर्णपात्रस्थं गृहीत्वोवाच हव्यवाट् ॥ ७ ॥

गृहाण पायसं दिव्यं पुत्रीयं देवनिर्मितम् ।
लप्स्यसे परमात्मानं पुत्रत्वेन न संशयः ॥ ८ ॥

इत्युक्त्वा पायसं दत्त्वा राज्ञे सोऽन्तर्दधेऽनलः ।
ववन्दे मुनिशार्दूलौ राजा लब्धमनोरथः ॥ ९ ॥

श्रीमहादेव म्हणाले – एकदा सर्व लोकांमध्ये प्रसिद्ध, सत्यपरायण, श्रीमान्, अयोध्येचे अधिपती, वीरवर असे महाराज दशरथ होते. (१)

पुत्र नसल्यामुळे ते अत्यंत दुःखी होते. एकदा त्यांनी गुरुवर वसिष्ठ या आपल्या कुलाच्या आचार्यांना प्रणाम करून असे सांगितले. (२)

"अहो स्वामी, सर्व चांगल्या लक्षणांनी युक्त असे पुत्र मला कसे होतील? कारण पुत्र नसल्यामुळे हे संपूर्ण राज्य मला दुःखदायक वाटत आहे." (३)

तेव्हा वसिष्ठ राजांना म्हणाले, "अत्यंत सामर्थ्य-संपन्न आणि जणू साक्षात दुसरे लोकपालच असे चार पुत्र तुम्हांला होतील. (४)

शांतेचे पती तपोधन ऋष्यशृंग,* यांना बोलावून, आमच्यासह तुम्ही लवकरच पुत्र कामेष्टी यज्ञ करा." (५)

'ठीक आहे,' असे म्हणून, पवित्र दशरथ राजांनी मंत्र्यासह मुनिवर ऋष्यशृंगाला बोलावून आणून, पुण्यशील अशा मुनिजनांच्या साहाय्याने यज्ञ सुरू केला. (६)

अग्नीमध्ये श्रद्धापूर्वक आहुती दिल्या जात असता तप्त सुवर्णाप्रमाणे दीप्तिमान असा हव्यवाहन भगवान अग्नी एका सुवर्णपात्रात पायस घेऊन प्रकट झाला आणि म्हणाला. (७)

'हे राजा, देवांनी निर्माण केलेला, पुत्रप्राप्ती करून देणारा, हा दिव्य पायस (खीर) घे. याच्यामुळे तुला साक्षात परमात्मा पुत्र म्हणून लाभेल यात संशय नाही.' (८)

असे बोलून आणि ती खीर राजाला देऊन अग्निदेव अंतर्धान पावला. त्यानंतर ज्याचे मनोरथ सफल झाले आहेत अशा त्या राजाने मुनिश्रेष्ठ वसिष्ठ व ऋष्यशृंग यांच्या चरणांना वंदन केले. (९)

---

* ऋष्यशृंग हा मुनिवर विभांडकाचा पुत्र होता. एके काळी विभांडक मुनी एका कुंडात ध्यानस्थ बसले होते. त्या वेळी त्या बाजूने उर्वशी अप्सरा जात होती. तिला पाहून मुनीचे वीर्य स्खलित झाले. ते वीर्य पाण्याबरोबर एक हरिणी प्याली. त्यापासून या ऋष्यशृंगाचा जन्म झाला. आईप्रमाणे त्याच्या डोक्यावर एक शिंगसुद्धा उद्भवले. म्हणून विभांडक पित्याने त्याचे नाव **ऋष्यशृंग** असे ठेवले. एकदा अंग देशात भीषण दुष्काळ पडला. त्या वेळी अंगदेशाच्या रोमपाद नावाच्या राजाला मुनींनी सांगितले, 'जर बालब्रह्मचारी ऋष्यशृंगाला येथे आणता आले तर पर्जन्यवृष्टी होईल.' राजाच्या प्रयत्नाने ऋष्यशृंग अंगदेशात येताच पुष्कळ वृष्टी झाली. त्याचा असा अद्‌भुत प्रभाव पाहून राजाने त्याला आपली शांता नावाची कन्या दिली. कुठे असेही सांगितले गेले आहे की शांता ही दशरथाची मुलगी होती आणि तिला त्याने रोमपाद या आपल्या मित्राला दत्तक दिली होती.

वसिष्ठऋष्यशृङ्गाभ्यामनुज्ञातो ददौ हविः ।
कौसल्यायै सकैकेय्यै अर्धमर्धं प्रयत्नतः ॥ १० ॥

ततः सुमित्रा संप्राप्ता जगृध्नुः पौत्रिकं चरुम् ।
कौसल्या तु स्वभागार्धं ददौ तस्यै मुदान्विता ॥ ११ ॥

कैकेयी च स्वभागार्धं ददौ प्रीतिसमन्विता ।
उपभुज्य चरुं सर्वाः स्त्रियो गर्भसमन्विताः ॥ १२ ॥

देवता इव रेजुस्ताः स्वभासा राजमन्दिरे ।
दशमे मासि कौसल्या सुषुवे पुत्रमद्भुतम् ॥ १३ ॥

मधुमासे सिते पक्षे नवम्यां कर्कटे शुभे ।
पुनर्वस्वृक्षसहिते उच्चस्थे ग्रहपञ्चके ॥ १४ ॥

मेषं पूषणि संप्राप्ते पुष्पवृष्टिसमाकुले ।
आविरासीज्जगन्नाथः परमात्मा सनातनः ॥ १५ ॥

नीलोत्पलदलश्यामः पीतवासाश्चतुर्भुजः ।
जलजारुणनेत्रान्तः स्फुरत्कुण्डलमण्डितः ॥ १६ ॥

सहस्रार्कप्रतीकाशः किरीटी कुञ्चितालकः ।
शङ्खचक्रगदापद्मवनमालाविराजितः ॥ १७ ॥

अनुग्रहाख्यहृत्स्थेन्दुसूचकस्मितचन्द्रिकः ।
करुणारससम्पूर्णविशालोत्पललोचनः ।
श्रीवत्सहारकेयूरनूपुरादिविभूषणः ॥ १८ ॥

दृष्ट्वा तं परमात्मानं कौसल्या विस्मयाकुला ।
हर्षाश्रुपूर्णनयना नत्वा प्राञ्जलिरब्रवीत् ॥ १९ ॥

कौसल्योवाच

देवदेव नमस्तेऽस्तु शङ्खचक्रगदाधर ।
परमात्माच्युतोऽनन्तः पूर्णस्त्वं पुरुषोत्तमः ॥ २० ॥

वदन्त्यगोचरं वाचां बुद्ध्यादीनामतीन्द्रियम् ।
त्वां वेदवादिनः सत्तामात्रं ज्ञानैकविग्रहम् ॥ २१ ॥

आणि मग वसिष्ठ आणि ऋष्यशृंग या दोघांच्या आज्ञेनुसार राजा दशरथांनी तो पायस महाराणी कौसल्या आणि कैकेयी या दोघींना अर्धा अर्धा वाटून दिला. (१०)

तदनंतर पुत्र प्राप्त करून देणारा तो चरू घेण्यासाठी सुमित्रासुद्धा तेथे येऊन पोचली. तेव्हा कौसल्येने मोठ्या आनंदाने आपल्या भागातील अर्धा भाग तिला दिला. (११)

तसेच कैकेयीनेसुद्धा आपल्या पायसाचा अर्धा भाग प्रेमाने सुमित्रेला दिला. अशा प्रकारे तो पायस खाऊन तिन्ही राण्या गर्भवती झाल्या. (१२)

राजभवनात त्या तिन्ही राण्या स्वतःच्या कांतीने देवतांप्रमाणे शोभू लागल्या. त्यानंतर दहावा महिना लागल्यावर कौसल्येने एका अद्भुत बालकाला जन्म दिला. (१३)

चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील नवमीच्या दिवशी, शुभ अशा कर्क लग्नात, पुनर्वसू नक्षत्राचे समयी, जेव्हा पाचही ग्रह उच्च स्थानी होते आणि सूर्य हा मेष राशीत आला होता, मध्यान्ह काळी, सनातन परमात्मा असलेले जगन्नाथ आविर्भूत झाले. त्या वेळी दिव्य पुष्पांच्या वर्षावाने आकाश भरून गेले. (१४-१५)

त्यांचा नील कमळाच्या पाकळीप्रमाणे श्याम वर्ण होता; त्यांनी पीतांबर परिधान केले होते; ते चतुर्भुज होते; त्यांच्या नेत्रांच्या आतील भाग अरुण कमळाप्रमाणे लालसर होता, चमकणाऱ्या कुंडलांनी ते सुंदर दिसत होते. (१६)

त्यांचा प्रकाश हजारो सूर्यांप्रमाणे होता, त्यांच्या मस्तकावर प्रकाशमान मुकुट होता; त्यांचे केस कुरळे होते, त्यांच्या हातात शंख, चक्र, गदा, व पद्म आणि गळ्यात वैजयंती माला शोभत होती. (१७)

हृदयातील अनुग्रहरूपी चंद्राची सूचना देणारे स्मितरूपी चांदणे त्यांच्या मुखकमलावर चमकत होते, करुणा-रसाने भरलेले त्यांचे डोळे कमळाप्रमाणे विशाल होते; श्रीवत्स, हार, केयूर आणि नूपुर इत्यादी अलंकारांनी ते विभूषित होते. (१८)

त्या परमात्म्यांना पाहून, कौसल्या विस्मयचकित झाली. आनंदाश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी हात जोडून नमस्कार करीत ती म्हणाली. (१९)

कौसल्या म्हणाली – "हे देवदेवा, तुम्हांला नमस्कार असो. शंख, चक्र, गदा धारण करणाऱ्या हे प्रभो, तुम्ही अच्युत आणि अनंत असे परमात्मा आहात. तुम्ही सर्वत्र परिपूर्ण पुरुषोत्तम आहात. (२०)

वाणी तसेच मन इत्यादींचे तुम्ही विषय नाही, तुम्ही इंद्रियातीत, केवळ सत्तारूप आणि केवळ ज्ञान हेच स्वरूप असणारे आहात, असे वेदवेत्ते लोक तुमच्याबद्दल म्हणतात. (२१)

त्वमेव मायया विश्वं सृजस्यवसि हंसि च ।
सत्त्वादिगुणसंयुक्तस्तुर्य एवामलः सदा ॥ २२ ॥

करोषीव न कर्ता त्वं गच्छसीव न गच्छसि ।
शृणोषि न शृणोषीव पश्यसीव न पश्यसि ॥ २३ ॥

अप्राणो ह्यमनाः शुद्ध इत्यादि श्रुतिरब्रवीत् ।
समः सर्वेषु भूतेषु तिष्ठन्नपि न लक्ष्यसे ॥ २४ ॥

अज्ञानध्वान्तचित्तानां व्यक्त एव सुमेधसाम् ।
जठरे तव दृश्यन्ते ब्रह्माण्डाः परमाणवः ॥ २५ ॥

त्वं ममोदरसम्भूत इति लोकान्विडम्बसे ।
भक्तेषु पारवश्यं ते दृष्टं मेऽद्य रघूत्तम ॥ २६ ॥

संसारसागरे मग्ना पतिपुत्रधनादिषु ।
भ्रमामि मायया तेऽद्य पादमूलमुपागता ॥ २७ ॥

देव त्वद्रूपमेतन्मे सदा तिष्ठतु मानसे ।
आवृणोतु न मां माया तव विश्वविमोहिनी ॥ २८ ॥

उपसंहर विश्वात्मन्नदो रूपमलौकिकम् ।
दर्शयस्व महानन्दबालभावं सुकोमलम् ।
ललितालिङ्गनालापैस्तरिष्याम्युत्कटं तमः ॥ २९ ॥

श्रीभगवानुवाच

यद्यदिष्टं तवास्त्यम्ब तत्तद्भवतु नान्यथा ॥ ३० ॥

अहं तु ब्रह्मणा पूर्वं भूमेर्भारापनुत्तये ।
प्रार्थितो रावणं हन्तुं मानुषत्वमुपागतः ॥ ३१ ॥

त्वया दशरथेनाहं तपसाराधितः पुरा ।
मत्पुत्रत्वाभिकाङ्क्षिण्या तथा कृतमनिन्दिते ॥ ३२ ॥

तुम्हीच आपल्या मायेने, सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांनी युक्त होऊन, हे विश्व उत्पन्न करता, त्याचे पालन करता, आणि त्याचा संहार करता. तथापि खरे पाहता तुम्ही सदा निर्मळ अशा तुरीय स्थितीत असता. (२२)

तुम्ही कर्ता नाही तथापि तुम्ही कर्मे करीत असल्यासारखे वाटते. तुम्ही गमन करीत नाही तरीसुद्धा तुम्ही गमन करीत असल्यासारखे वाटते. तुम्ही ऐकत नाही; परंतु तुम्ही शब्द ऐकल्यासारखे दिसून येते. तुम्ही पाहात नाही, तथापि तुम्ही पाहात असल्यासारखे प्रतीत होते. (२३)

तुम्ही प्राण-रहित, मन-रहित आणि शुद्धस्वरूप आहात असे भगवती श्रुतीसुद्धा सांगते. सर्व प्राण्यांमध्ये तुम्ही समान भावाने स्थित आहात, तथापि ज्यांचे अंत:करण अज्ञानरूपी अंधकाराने झाकलेले असते अशा लोकांना तुम्ही दिसत नाही. ज्यांची बुद्धी शुद्ध आहे, अशा पुरुषांनाच तुमचा साक्षात्कार होतो. हे भगवान रघूतमा, तुमच्या उदरात अनेक ब्रह्मांडे परमाणूप्रमाणे दिसतात. तथापि 'माझ्या उदरातून तुम्ही जन्म घेतलात' असे जे तुम्ही लोकांमध्ये प्रकट करीत आहात, ही तुमची लीला आहे, त्यावरून तुमची भक्त-वत्सलता आज मला दिसून आली. (२४-२६)

हे प्रभो, तुमच्या मायेने मोहित होऊन, संसार-सागरात मग्न झालेली मी पती, पुत्र, धन इत्यादींमध्ये गुंतून जन्म-मृत्यूच्या फेऱ्यांमध्ये भटकत होते. परंतु आज माझ्या परम भाग्याने मी तुमच्या पदकमली शरण आले आहे. (२७)

हे देवा, ही तुमची मनोहर मूर्ती सदा माझ्या हृदयात विराजमान राहो आणि विश्वाला मोहात टाकणाऱ्या तुमच्या मायेने मला मोहात टाकू नये. (२८)

हे विश्वात्मन, तुम्ही हे आपले अलौकिक रूप आता आवरून घ्या आणि परम आनंददायक व अतिशय कोमल असे बालरूप मला दाखवा. मग तुम्हांला सुखदायक आलिंगन देणे, तुमच्याशी संभाषण करणे इत्यादींद्वारा मी अज्ञानरूपी घोर अंधकारातून तरून जाईन." (२९)

श्रीभगवान् म्हणाले – "हे माते, तुला जी जी इच्छा असेल ते ते सर्व होवो. दुसरे काही नको. (३०)

भूमीचा भार उतरविण्यासाठी पूर्वी ब्रह्मदेवाने माझी प्रार्थना केली होती. म्हणून रावण इत्यादी निशाचरांना ठार करण्यासाठीच मी मनुष्यरूपाने अवतार घेतला आहे. (३१)

हे पुण्यशील माते, मला पुत्ररूपाने प्राप्त करून घेण्याच्या इच्छेने दशरथांसह तूसुद्धा तपस्येने माझी आराधना केली होतीस. (३२)

रूपमेतत्त्वया दृष्टं प्राक्तनं तपसः फलम् ।
मद्दर्शनं विमोक्षाय कल्पते ह्यन्यदुर्लभम् ॥ ३३ ॥

संवादमावयोर्यस्तु पठेद्वा शृणुयादपि ।
स याति मम सारूप्यं मरणे मत्स्मृतिं लभेत् ॥ ३४ ॥

इत्युक्त्वा मातरं रामो बालो भूत्वा रुरोद ह ।
बालत्वेऽपीन्द्रनीलाभो विशालाक्षोऽतिसुन्दरः ॥ ३५ ॥

बालारुणप्रतीकाशो लालिताखिललोकपः ।
अथ राजा दशरथः श्रुत्वा पुत्रोद्भवोत्सवम् ।
आनन्दार्णवमग्नोऽसावाययौ गुरुणा सह ॥ ३६ ॥

रामं राजीवपत्राक्षं दृष्ट्वा हर्षाश्रुसंप्लुतः ।
गुरुणा जातकर्माणि कर्तव्यानि चकार सः ॥ ३७ ॥

कैकेयी चाथ भरतमसूत कमलेक्षणा ।
सुमित्रायां यमौ जातौ पूर्णेन्दुसदृशाननौ ॥ ३८ ॥

तदा ग्रामसहस्राणि ब्राह्मणेभ्यो मुदा ददौ ।
सुवर्णानि च रत्नानि वासांसि सुरभीः शुभाः ॥ ३९ ॥

यस्मिन् रमन्ते मुनयो विद्ययाऽज्ञानविप्लवे ।
तं गुरुः प्राह रामेति रमणाद्राम इत्यपि ॥ ४० ॥

भरणाद्भरतो नाम लक्ष्मणं लक्षणान्वितम् ।
शत्रुघ्नं शत्रुहन्तारमेवं गुरुरभाषत ॥ ४१ ॥

लक्ष्मणो रामचन्द्रेण शत्रुघ्नो भरतेन च ।
द्वन्द्वीभूय चरन्तौ तौ पायसांशानुसारतः ॥ ४२ ॥

रामस्तु लक्ष्मणेनाथ विचरन्बाललीलया ।
रमयामास पितरौ चेष्टितैर्मुग्धभाषितैः ॥ ४३ ॥

तू माझे जे हे दिव्य रूप पाहिलेस ते तुझ्या पूर्वीच्या तपस्येचे फळ आहे. माझे दर्शन हे मानवांना मोक्ष देणारे असते. पुण्यरहित लोकांना या रूपाचे दर्शन अत्यंत दुर्लभ आहे. (३३)

आपणा दोघांचा हा संवाद जो कोणी पठन करील अथवा ऐकेल त्याला माझ्या कृपेने मरणसमयी माझी स्मृती राहील आणि नंतर माझी सरूपता मुक्ती प्राप्त होईल." (३४)

अशा प्रकारे मातेला सांगून, भगवान राम बालरूप घेऊन रडू लागले. त्यांचे बालरूपसुद्धा इंद्रनील मण्यासारखे कांतिमय, विशाल नेत्र असणारे आणि अतिशय सुंदर होते. प्रभातकालीन बालसूर्याप्रमाणे त्यांची कांती होती. अशा प्रकारे आपल्या अवताराने त्यांनी सर्व लोकपालांना आनंदित केले होते. त्यानंतर पुत्रजन्माचा शुभ समाचार जेव्हा महाराज दशरथांनी ऐकला, तेव्हा ते जणू आनंदसागरात मग्न झाले आणि गुरू वसिष्ठांसह राजभवनात आले. (३५-३६)

तेथे आल्यावर कमल-नयन रामाला पाहून त्यांचे डोळे आनंदाश्रूनी भरून गेले. नंतर गुरुंकडून जात-कर्म इत्यादी आवश्यक संस्कार त्यांनी करवून घेतले. (३७)

त्यानंतर इकडे कमलनयना कैकेयीने भरताला जन्म दिला आणि पूर्णचंद्राप्रमाणे मुख असणारे दोन जुळे पुत्र सुमित्रेला झाले. (३८)

त्या वेळी महाराज दशरथांनी मोठ्या आनंदाने हजारो गावे, पुष्कळ सोने, नाना रत्ने, अनेक प्रकारची वस्त्रे आणि शुभ लक्षणांनी युक्त अशा अनेक गाई ब्राह्मणांना दान दिल्या. (३९)

ज्ञानाने अज्ञान नष्ट झाल्यावर, मुनिजन ज्यांच्या ठिकाणी रमतात अथवा जे भक्तजनांच्या चित्ताला रमवितात ते राम, असा विचार करून गुरूंनी त्यांचे राम असे नाव ठेवले. (४०)

याच प्रमाणे संसाराचे भरणपोषण करणारा असल्याने दुसऱ्या पुत्राचे नाव भरत, सर्व चांगल्या लक्षणांनी युक्त असल्यामुळे तिसऱ्या पुत्राचे नाव लक्ष्मण, आणि शत्रूचा नाश करणारा असल्याने चौथ्या पुत्राचे नाव शत्रुघ्न, अशी नावे गुरूंनी ठेवली. (४१)

कौसल्या आणि कैकेयी यांनी दिलेल्या पायसाच्या भागांनुसार, लक्ष्मण हा रामचंद्रांचा आणि शत्रुघ्न हा भरताचा सहचर होऊन ते जोडीने राहू लागले. (४२)

लक्ष्मणाबरोबर विहार करणारे रामचंद्र आपल्या बाललीला, मधुर अशा गमती आणि बोबडे बोल यांनी आपल्या मातापित्यांना आनंदित करू लागले. (४३)

भाले स्वर्णमयाश्वत्थपर्णमुक्ताफलप्रभम् ।
कण्ठे रत्नमणिव्रातमध्यद्वीपिनखाञ्चितम् ॥ ४४ ॥

कर्णयोः स्वर्णसम्पन्नरत्नार्जुनसटालुकम् ।
शिञ्जानमणिमञ्जीरकटिसूत्राङ्गदैर्वृतम् ॥ ४५ ॥

स्मितवक्त्राल्पदशनमिन्द्रनीलमणिप्रभम् ।
अङ्गणे रिङ्गमाणं तं तर्णकाननु सर्वतः ॥ ४६ ॥

दृष्ट्वा दशरथो राजा कौसल्या मुमुदे तदा ।
भोक्ष्यमाणो दशरथो राममेहीति चासकृत् ॥ ४७ ॥

आह्वयत्यतिहर्षेण प्रेम्णा नायाति लीलया ।
आनयेति च कौसल्यामाह सा सस्मिता सुतम् ॥ ४८ ॥

धावत्यपि न शक्नोति स्प्रष्टुं योगिमनोगतिम् ।
प्रहसन्स्वयमायाति कर्दमाङ्कितपाणिना ।
किञ्चिद् गृहीत्वा कवलं पुनरेव पलायते ॥ ४९ ॥

कौसल्या जननी तस्य मासि मासि प्रकुर्वती ।
वायनानि विचित्राणि समलङ्कृत्य राघवम् ॥ ५० ॥

अपूपान्मोदकान्कृत्वा कर्णशष्कुलिकास्तथा ।
कर्णपूरांश्च विविधान् वर्षवृद्धौ च वायनम् ॥ ५१ ॥

गृहकृत्यं तया त्यक्तं तस्य चापल्यकारणात् ।
एकदा रघुनाथोऽसौ गतो मातरमन्तिके ॥ ५२ ॥

भोजनं देहि मे मातर्न श्रुतं कार्यसक्तया ।
ततः क्रोधेन भाण्डानि लगुडेनाहनत्तदा ॥ ५३ ॥

शिक्यस्थं पातयामास गव्यं च नवनीतकम् ।
लक्ष्मणाय ददौ रामो भरताय यथाक्रमम् ॥ ५४ ॥

शत्रुघ्नाय ददौ पश्चाद्दधि दुग्धं तथैव च ।
सूदेन कथिते मात्रे हास्यं कृत्वा प्रधावति ॥ ५५ ॥

श्रीरामांच्या कपाळावर मोत्यांनी सजलेले, देदीप्यमान, सुवर्णमय अश्वत्थ वृक्षाचे पान होते; तसेच त्यांच्या गळ्यात रत्ने आंणि मध्ये व्याघ्रनख घालून गुंफलेला रत्नहार शोभत होता. (४४)

अर्जुन वृक्षाच्या कच्च्या फळाप्रमाणे शोभणारे रत्नजडित सोन्याचे अलंकार त्यांच्या कानांत शोभते होते. रुणझुण आवाज करणारे मणिमय नूपुर, सुवर्ण मेखला आणि बाजूबंद यांनी ते सुशोभित होते. (४५)

इंद्रनील मण्याप्रमाणे त्यांची प्रभा होती आणि छोट्या छोट्या दातांनी युक्त आणि स्मित करणारे असे त्यांचे मुख होते, अशा श्रीरामांना राजभवनातील अंगणात पाडसांच्या मागे मागे सगळीकडे रांगताना पाहून, महाराज दशरथ आणि कौसल्या त्या वेळी अतिशय आनंदित होत असत. ज्या वेळी महाराज दशरथ भोजन करण्यास बसत असत, त्या वेळी ते 'अरे रामा, ये' असे म्हणत अतिशय हर्षाने आणि प्रेमाने श्रीरामांना वारंवार बोलावीत असत. परंतु खेळात मग्न असल्यामुळे जेव्हा राम येत नसत, तेव्हा दशरथ 'त्याला घेऊन ये,' असे कौसल्येला सांगत. परंतु योगिजनांच्या चित्ताचा एकमात्र आश्रय असणाऱ्या त्या आपल्या पुत्राला, हसत हसत धावणारी कौसल्या पकडू शकत नसे. (मग पळून पळून आई दमली आहे असे पाहून) श्रीराम चिखलाने माखलेल्या हातांनी स्वत:च हसत हसत येत असत आणि मग एखादा घास खाऊन पुन: पळून जात असत. (४६-४९)

प्रत्येक महिन्यात राघवांना चांगल्याप्रकारे वस्त्रे-भूषणे घालून, कौसल्या अनेक प्रकारची वाणे वाटत असे. (५०)

आणि वार्षिक वाढदिवसा दिवशीसुद्धा अनरसे, लाडू, जिलबी, कचोरी इत्यादी नानाप्रकारचे पदार्थ बनवून त्यांची वाणे देत असे. (५१)

श्रीरामांच्या खोड्यांमुळे कौसल्येने घरातील काम करणेसुद्धा सोडून दिले. एकदा रघुनाथ आईच्या जवळ गेले. आणि म्हणाले, 'आई, मला जेवण दे.' कामात गढलेल्या कौसल्येला ते ऐकू आले नाही. तेव्हा श्रीरामांनी काहीशा रागारागाने काठी मारून भांडी फोडून टाकली. (५२-५३)

तसेच शिक्यावर ठेवलेले दही, लोणी खाली पाडले; नंतर दूध, दही, लोणी हेसुद्धा त्यांनी क्रमाने लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांना दिले. स्वयंपाक्याने ही गोष्ट कौसल्या मातेला सांगितली. तेव्हा ती हसून त्यांना पकडण्यास धावली. (५४-५५)

आगतां तां विलोक्याथ ततः सर्वैः पलायितम् ।
कौसल्या धावमानापि प्रस्खलन्ती पदे पदे ॥ ५६ ॥

रघुनाथं करे धृत्वा किञ्चिन्नोवाच भामिनी ।
बालभावं समाश्रित्य मन्दं मन्दं रुरोद ह ॥ ५७ ॥

ते सर्वे लालिता मात्रा गाढमालिङ्ग्य यत्नतः ।
एवमानन्दसन्दोहजगदानन्दकारकः ॥ ५८ ॥

मायाबालवपुर्धृत्वा रमयामास दम्पती ।
अथ कालेन ते सर्वे कौमारं प्रतिपेदिरे ॥ ५९ ॥

उपनीता वसिष्ठेन सर्वविद्याविशारदाः ।
धनुर्वेदे च निरताः सर्वशास्त्रार्थवेदिनः ॥ ६० ॥

बभूवुर्जगतां नाथा लीलया नररूपिणः ।
लक्ष्मणस्तु सदा राममनुगच्छति सादरम् ॥ ६१ ॥

सेव्यसेवकभावेन शत्रुघ्नो भरतं तथा ।
रामश्चापधरो नित्यं तूणीबाणान्वितः प्रभुः ॥ ६२ ॥

अश्वारूढो वनं याति मृगयायै सलक्ष्मणः ।
हत्वा दुष्टमृगान् सर्वान् पित्रे सर्वं न्यवेदयत् ॥ ६३ ॥

प्रातरुत्थाय सुस्नातः पितरावभिवाद्य च ।
पौरकार्याणि सर्वाणि करोति विनयान्वितः ॥ ६४ ॥

बन्धुभिः सहितो नित्यं भुक्त्वा मुनिभिरन्वहम् ।
धर्मशास्त्ररहस्यानि शृणोति व्याकरोति च ॥ ६५ ॥

एवं परात्मा मनुजावतारो
मनुष्यलोकाननुसृत्य सर्वम् ।
चक्रेऽविकारी परिणामहीनो
विचार्यमाणे न करोति किञ्चित् ॥ ६६ ॥

नंतर आई येत आहे हे पाहून ते चौघे पळून गेले. त्यांच्यामागे धावणारी कौसल्यासुद्धा पावलोपावली अडखळू लागली. (५६)

शेवटी तिने रघुनाथांचा हात पकडला. राम बालभावानुसार मुळूमुळू रडू लागले. तेव्हा आई रामांना काहीही बोलली नाही. (५७)

घट्ट मिठीत घेऊन आईने त्यांना कुरवाळले. अशा प्रकारे आनंदघन आणि जगाला आनंद देणाऱ्या भगवान रामांनी मायामय असे बालरूप धारण करून दशरथ आणि कौसल्या या दांपत्याला आनंदित केले. काही काळ व्यतीत झाल्यावर ते चारही भाऊ कौमार अवस्थेत प्रविष्ट झाले. (५८-५९)

तेव्हा वसिष्ठांनी त्यांचा उपनयन संस्कार केला. लीलेनेच नररूप धारण करणारे आणि सर्व लोकांचे स्वामी असे ते चौघे भाऊ सर्व विद्यांमध्ये विशारद, सर्व शास्त्रांचे मर्म जाणणारे आणि धनुर्वेद इत्यादी सर्व विद्यांमध्ये पारंगत झाले. त्या चौघा भावांपैकी लक्ष्मण हा सेव्य- सेवक भावाने आदरपूर्वक सदा रामचंद्रांच्या बरोबर राहात असे. त्याच प्रमाणे शत्रुघ्न नेहमी भरताच्या सेवेत उपस्थित असे. धनुष्यबाण आणि भाते घेऊन, भगवान राम हे दररोज लक्ष्मणासह घोड्यावर स्वार होऊन, मृगयेसाठी वनात जात आणि तेथे सर्व (सिंह, व्याघ्र इत्यादी) दुष्ट पशूंना मारून, घरी परत आल्यावर, सर्व गोष्टी पित्याला सांगत. (६०-६३)

प्रातःकाळी उठून, स्नान करून, श्रीराम मातापित्यांना प्रणाम करीत आणि नंतर नम्रतापूर्वक ते नगरवासी लोकांची सर्व कामे करीत. (६४)

भावांसह भोजन झाल्यावर, ते नेहमी मुनिजनांकडून दररोज धर्मशास्त्रांचे मर्म ऐकत असत आणि स्वतःही त्यांचे स्पष्टीकरण करीत असत. (६५)

अशा प्रकारे राग-द्वेष इत्यादी विकारांनी रहित तसेच षड्विकारांनी रहित असे परमात्मा मनुष्यावतार धारण करून, मनुष्य लोकातील आचरणांचे अनुसरण करीत सर्व कार्ये करीत असत. परंतु विचार करून पाहिले तर ते परमात्मा काहीच करीत नसत. (६६)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे बालकाण्डे तृतीयः सर्गः ॥३॥

चतुर्थ सर्ग

विश्वामित्रांचे आगमन, राम आणि लक्ष्मणाचे त्यांच्याबरोबर जाणे आणि त्राटिकेचा वध करणे

श्रीमहादेव उवाच

कदाचित्कौशिकोऽभ्यागादयोध्यां ज्वलनप्रभः ।
द्रष्टुं रामं परात्मानं जातं ज्ञात्वा स्वमायया ॥ १ ॥

दृष्ट्वा दशरथो राजा प्रत्युत्थायाचिरेण तु ।
वसिष्ठेन समागम्य पूजयित्वा यथाविधि ॥ २ ॥

अभिवाद्य मुनिं राजा प्राञ्जलिर्भक्तिनम्रधीः ।
कृतार्थोऽस्मि मुनीन्द्राहं त्वदागमनकारणात् ॥ ३ ॥

त्वद्विधा यद्गृहं यान्ति तत्रैवायान्ति संपदः ।
यदर्थमागतोऽसि त्वं ब्रूहि सत्यं करोमि तत् ॥ ४ ॥

विश्वामित्रोऽपि तं प्रीतः प्रत्युवाच महामतिः ।
अहं पर्वणि संप्राप्ते दृष्ट्वा यष्टुं सुरान्पितॄन् ॥ ५ ॥

यदारभे तदा दैत्या विघ्नं कुर्वन्ति नित्यशः ।
मारीचश्च सुबाहुश्चापरे चानुचरास्तयोः ॥ ६ ॥

अतस्तयोर्वधार्थाय ज्येष्ठं रामं प्रयच्छ मे ।
लक्ष्मणेन सह भ्रात्रा तव श्रेयो भविष्यति ॥ ७ ॥

वसिष्ठेन सहामन्त्र्य दीयतां यदि रोचते ।
पप्रच्छ गुरुमेकान्ते राजा चिन्तापरायणः ॥ ८ ॥

किं करोमि गुरो रामं त्यक्तुं नोत्सहते मनः ।
बहुवर्षसहस्रान्ते कष्टेनोत्पादिताः सुताः ॥ ९ ॥

चत्वारोऽमरतुल्यास्ते तेषां रामोऽतिवल्लभः ।
रामस्त्वितो गच्छति चेन्न जीवामि कथञ्चन ॥ १० ॥

प्रत्याख्यातो यदि मुनिः शापं दास्यत्यसंशयः ।
कथं श्रेयो भवेन्मह्यमसत्यं चापि न स्पृशेत् ॥ ११ ॥

श्रीमहादेव म्हणाले – स्वतःच्या मायेने परमात्मा रामरूपात प्रकट झाले आहेत, हे जाणून त्यांचे दर्शन घेण्यास, अग्निप्रमाणे तेजस्वी असणारे महर्षी विश्वामित्र एकदा अयोध्या नगरीत आले. (१)

त्यांना पाहताच महाराज दशरथ झटकन उठून उभे राहिले आणि वसिष्ठांसह पुढे येऊन त्यांनी त्यांचे स्वागत केले. नंतर यथाविधी त्यांचे पूजन आणि अभिवादन करून, भक्तीने नम्र झालेल्या चित्ताने, दशरथ राजाने दोन्ही हात जोडून मुनींना म्हटले, "हे मुनिश्रेष्ठ, तुमचे आगमन झाल्यामुळे आज मी कृतकृत्य झालो आहे. (२-३)

तुमच्यासारखे महानुभाव लोक ज्या घरी येतात त्या घरात सर्व संपदा आपोआप येतात. आता तुमचे शुभागमन कोणत्या कारणासाठी झाले आहे, ते मला सांगा. मी तुमच्या आज्ञेचे पालन करीन." (४)

तेव्हा संतुष्ट झालेले महाबुद्धिमान विश्वामित्र - सुद्धा त्यांना म्हणाले, "पर्वकाळ आला असे पाहून, देवगण आणि पितृगण यांच्यासाठी यज्ञ करण्यास मी जेव्हा जेव्हा प्रारंभ करतो, तेव्हा तेव्हा मारीच, सुबाहू आणि त्या दोघांचे अन्य अनुचर असणारे दैत्य हे नेहमी त्या यज्ञात विघ्ने निर्माण करतात. (५-६)

म्हणून त्या दोघांचा वध करण्यासाठी लक्ष्मणासह तुमचा ज्येष्ठ पुत्र श्रीराम मला द्या. तुमचे कल्याण होईल. (७)

याबाबतीत वसिष्ठांचा सल्ला घेऊन, जर तुमची इच्छा असेल तर तुमचे दोन्ही कुमार मला द्या." तेव्हा राजाने चिंताकुल होऊन एकांतात गुरूंना प्रश्न केला. (८)

"हे गुरो, हजारो वर्षे लोटल्यावर, मोठ्या कष्टाने, देवसदृश असे हे चार पुत्र उत्पन्न झाले आहेत. त्यांतील राम हा तर माझा फारच लाडका आहे. त्याला सोडण्यास माझे मन तयार नाही. कारण जर राम येथून निघून गेला तर मी कोणत्याही प्रकारे जिवंत राहू शकणार नाही. (९-१०)

परंतु जर मी मुनींना नकार दिला, तर ते मला शाप देतील, यात संशय नाही. तेव्हा माझे हित होईल आणि असत्य बोलण्यापासून मी वाचेन, असे काहीतरी सांगा." (११)

पंचम सर्ग

विश्वामित्रांच्या यज्ञाचे रक्षण, मारीच आणि सुबाहू यांचे दमन आणि अहल्योद्धार

श्रीमहादेव उवाच

तत्र कामाश्रमे रम्ये कानने मुनिसङ्कुले ।
उषित्वा रजनीमेकां प्रभाते प्रस्थिताः शनैः ॥ १ ॥

सिद्धाश्रमं गताः सर्वे सिद्धचारणसेवितम् ।
विश्वामित्रेण संदिष्टा मुनयस्तन्निवासिनः ॥ २ ॥

पूजां च महतीं चक्रू रामलक्ष्मणयोर्दृतम् ।
श्रीरामः कौशिकं प्राह मुने दीक्षां प्रविश्यताम् ॥ ३ ॥

दर्शयस्व महाभाग कुतस्तौ राक्षसाधमौ ।
तथेत्युक्त्वा मुनिर्यष्टुमारेभे मुनिभिः सह ॥ ४ ॥

मध्याह्ने ददृशाते तौ राक्षसौ कामरूपिणौ ।
मारीचश्च सुबाहुश्च वर्षन्तौ रुधिरास्थिनी ॥ ५ ॥

रामोऽपि धनुरादाय द्वौ बाणौ सन्दधे सुधीः ।
आकर्णान्तं समाकृष्य विससर्ज तयोः पृथक् ॥ ६ ॥

तयोरेकस्तु मारीचं भ्रामयञ्छतयोजनम् ।
पातयामास जलधौ तदद्भुतमिवाभवत् ॥ ७ ॥

द्वितीयोऽग्निमयो बाणः सुबाहुमजयत्क्षणात् ।
अपरे लक्ष्मणेनाशु हतास्तदनुयायिनः ॥ ८ ॥

पुष्पौघैराकिरन्देवा राघवं सहलक्ष्मणम् ।
देवदुन्दुभयो नेदुस्तुष्टुवुः सिद्धचारणाः ॥ ९ ॥

विश्वामित्रस्तु संपूज्य पूजार्हं रघुनन्दनम् ।
अङ्के निवेश्य चालिङ्ग्य भक्त्या बाष्पाकुलेक्षणः ॥ १० ॥

भोजयित्वा सह भ्रात्रा रामं पक्वफलादिभिः ।
पुराणवाक्यैर्मधुरैर्निनाय दिवसत्रयम् ॥ ११ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, त्यानंतर मुनिजनांनी गजबजलेल्या त्या अतिशय सुंदर, कामाश्रम नावाच्या वनात एक रात्र राहून, प्रातःकाळ होताच ते तेथून सावकाश निघाले . (१)

नंतर सकल सिद्ध आणि चारण जेथे राहात होते अशा सिद्धाश्रमात ते सर्वजण पोचले. विश्वामित्रांच्या आज्ञेने तेथे राहणाऱ्या मुनींनी लगबगीने येऊन श्रीराम आणि लक्ष्मण यांचा मोठा सत्कार केला. त्यानंतर श्रीराम विश्वामित्रांना म्हणाले, "हे मुने, आपण यज्ञदीक्षा घ्यावी. (२-३)

तसेच हे महामुने, ते दोघे अधम राक्षस कोठे आहेत ते आम्हांला दाखवा." तेव्हा 'ठीक आहे' असे म्हणून, अन्य मुनींच्यासह विश्वामित्र मुनींनी यज्ञ करण्यास प्रारंभ केला. (४)

मध्याह्नाच्या वेळी मारीच आणि सुबाहू हे दोघे इच्छेप्रमाणे रूप धारण करणारे राक्षस रक्त आणि हाडे यांचा वर्षाव करीत असताना दिसू लागले. (५)

बुद्धिमान रामांनीसुद्धा धनुष्य घेऊन त्याला दोन बाण जोडले आणि कानापर्यंत दोरी खेचून, त्या दोन राक्षसांवर सोडले. (६)

त्या बाणांतील एका बाणाने मारीचाला आकाशात गरगर फिरवून शेकडो योजने दूर असणाऱ्या समुद्रात पाडले. श्रीरामांचे ते अद्‌भुत कृत्यच झाले. (७)

दुसऱ्या अग्निमय बाणाने सुबाहूला क्षणात भस्मसात करून टाकले. तसेच त्यांचे जे इतर अनुयायी होते त्या सर्वांना लक्ष्मणाने एका झटक्यातच ठार केले.(८)

तेव्हा श्रीराम व लक्ष्मण यांचा लोकोत्तर प्रभाव पाहून देवांनी पुष्पवर्षाव केला, दुंदुभी इत्यादी देववाद्यांचा घोष केला आणि त्याच वेळी सिद्ध आणि चारण यांचे समूह त्यांची स्तुती करू लागले. (९)

आनंदाश्रूंनी डोळे भरून आलेल्या विश्वामित्रांनी पूजनीय रघुनाथांचे भक्तिभावाने पूजन केले आणि त्यांना आलिंगन देऊन आपल्याजवळ बसविले. (१०)

नंतर लक्ष्मणासह रामांना पिकलेली फळे इत्यादींचे भोजन देऊन, त्यांना पुराणे आणि इतिहास इत्यादींतील मधुर कथा ऐकवीत, विश्वामित्रांनी तीन दिवस तेथे घालविले. (११)

श्रीदशरथ-नन्दन Śrī Daśarathanandana (The darling of Daśaratha)

क्रीड़ा-वेशमें आनन्दकन्द The blissful Lord in sport-costume



चारों भाई वर-वेशमें

The four brothers in wedding-costume

पादुका-दान

Sandals handed over



जटायुकी स्तुति

The Prayer by Jaṭāyu



हनुमान्‌जीकी प्रार्थना

The Prayer by Hanumān



भूधराकार हनुमान्

The mountainous Hanumān



भगवान् श्रीरामका राज्याभिषेक

The coronation of Lord Rāma



श्रीरामदरबारकी झाँकी

Rāma's Court—A panoramic view

चतुर्थेऽहनि संप्राप्ते कौशिको राममब्रवीत् ।
राम राम महायज्ञं द्रष्टुं गच्छामहे वयम् ॥ १२ ॥

विदेहराजनगरे जनकस्य महात्मनः ।
तत्र माहेश्वरं चापमस्ति न्यस्तं पिनाकिना ॥ १३ ॥

द्रक्ष्यसि त्वं महासत्त्वं पूज्यसे जनकेन च ।
इत्युक्त्वा मुनिभिस्ताभ्यां ययौ गङ्गासमीपगम् ॥ १४ ॥

गौतमस्याश्रमं पुण्यं यत्राहल्यास्थिता तपः ।
दिव्यपुष्पफलोपेतपादपैः परिवेष्टितम् ॥ १५ ॥

मृगपक्षिगणैर्हीनं नानाजन्तुविवर्जितम् ।
दृष्ट्वोवाच मुनिं श्रीमान् रामो राजीवलोचनः ॥ १६ ॥

कस्यैतदाश्रमपदं भाति भास्वच्छुभं महत् ।
पत्रपुष्पफलैर्युक्तं जन्तुभिः परिवर्जितम् ॥ १७ ॥

आह्लादयति मे चेतो भगवन् ब्रूहि तत्त्वतः ॥ १८ ॥

विश्वामित्र उवाच

शृणु राम पुरा वृत्तं गौतमो लोकविश्रुतः ।
सर्वधर्मभृतां श्रेष्ठस्तपसाराधयन् हरिम् ॥ १९ ॥

तस्मै ब्रह्मा ददौ कन्यामहल्यां लोकसुन्दरीम् ।
ब्रह्मचर्येण सन्तुष्टः शुश्रूषणपरायणाम् ॥ २० ॥

तया सार्धमिहावात्सीद्गौतमस्तपतां वरः ।
शक्रस्तु तां धर्षयितुमन्तरं प्रेप्सुरन्वहम् ॥ २१ ॥

कदाचिन्मुनिवेषेण गौतमे निर्गते गृहात् ।
धर्षयित्वाथ निरगात्त्वरितं मुनिरप्यगात् ॥ २२ ॥

दृष्ट्वा यान्तं स्वरूपेण मुनिः परमकोपनः ।
पप्रच्छ कस्त्वं दुष्टात्मन्मम रूपधरोऽधमः ॥ २३ ॥

सत्यं ब्रूहि न चेद्भस्म करिष्यामि न संशयः ।
सोऽब्रवीद्देवराजोऽहं पाहि मां कामकिङ्करम् ॥ २४ ॥

चौथ्या दिवशी, विश्वामित्रांनी श्रीरामांना म्हटले, " अरे रामा, महात्म्या जनकाचा फार मोठा यज्ञ पाहण्यास आपण जनक राजाच्या नगरीला जाऊया. तेथे महादेवांनी ठेवलेले एक फार अवजड माहेश्वर धनुष्य आहे. (१२-१३)

ते सुदृढ धनुष्य तू पाहशील आणि महाराज जनक तुझा चांगल्या प्रकारे सत्कार करतील." असे सांगून, विश्वामित्र रामलक्ष्मण आणि अन्य मुनिजन यांच्यासह गंगानदीच्याजवळ असणाऱ्या मुनिश्रेष्ठ गौतमांच्या पवित्र आश्रमात गेले. तो आश्रम दिव्य अशा फुला-फळांनी भरलेल्या वृक्षांनी वेढलेला होता आणि तेथे अहल्या तप करीत राहिली होती. (१४-१५)

मृग, पक्षी किंवा नाना प्रकारच्या प्राण्यांनी रहित असा तो आश्रम पाहिल्यावर, कमलनयन श्रीरामांनी विश्वामित्रांना प्रश्न केला. "पाने, फुले, फळे इत्यादींनी संपन्न तथापि जीवजंतूंनी रहित असा हा रमणीय आणि पवित्र मोठा आश्रम दिसत आहे, तो कुणाचा बरे ? हा आश्रम पाहून माझे मन आनंदित होत आहे. हे भगवन्, याचा वृत्तांत आपण मला सांगावा." (१६-१८)

विश्वामित्र म्हणाले– "हे रामा, या आश्रमाचा पूर्वीचा वृत्तांत ऐका. पूर्वी येथे जगद्विख्यात, सर्व धार्मिक माणसांत श्रेष्ठ असे मुनिवर गौतम श्रीहरीची आराधना करीत राहात होते. (१९)

त्यांच्या ब्रह्मचर्याने संतुष्ट होऊन भगवान ब्रह्मदेवांनी त्यांना अहल्या नावाची सेवापरायण, जगत्सुंदरी अशी कन्या दिली. (२०)

तापसश्रेष्ठ असे ते गौतम मुनी तिच्यासह येथे राहू लागले. तिला भ्रष्ट करण्याची एखादी संधी इंद्र दररोज पाहू लागला. (२१)

एकदा मुनिश्रेष्ठ गौतम आश्रमातून बाहेर गेले असता, इंद्राने गौतम मुनींचा वेष धारण करून, तिला भ्रष्ट केले. तो झटपट तेथून निघाला. त्याच वेळी गौतम मुनीसुद्धा तेथे परत आले. (२२)

आपले रूप धारण करून तेथून जाणाऱ्या त्या इंद्राला पाहून, गौतम मुनींना अतिशय क्रोध आला आणि त्यांनी त्याला विचारले, "अरे दुष्टात्म्या, अरे अधमा, माझे रूप धारण करणारा तू कोण आहेस ? (२३)

खरे बोल. जर खरे सांगितले नाहीस तर मी नक्की तुला भस्म करून टाकीन." तेव्हा तो म्हणाला, "भगवन, कामवश झालेला मी देवराज इंद्र आहे. माझे रक्षण करा. (२४)

कृतं जुगुप्सितं कर्म मया कुत्सितचेतसा ।
गौतमः क्रोधताम्राक्षः शशाप दिविजाधिपम् ॥ २५ ॥

योनिलम्पट दुष्टात्मन्सहस्रभगवान्भव ।
शप्त्वा तं देवराजानं प्रविश्य स्वाश्रमं द्रुतम् ॥ २६ ॥

दृष्ट्वाहल्यां वेपमानां प्राञ्जलिं गौतमोऽब्रवीत् ।
दुष्टे त्वं तिष्ठ दुर्वृत्ते शिलायामाश्रमे मम ॥ २७ ॥

निराहारा दिवारात्रं तपः परममास्थिता ।
आतपानिलवर्षादिसहिष्णुः परमेश्वरम् ॥ २८ ॥

ध्यायन्ती राममेकाग्रमनसा हृदि संस्थितम् ।
नानाजन्तुविहीनोऽयमाश्रमो मे भविष्यति ॥ २९ ॥

एवं वर्षसहस्रेषु ह्यनेकेषु गतेषु च ।
रामो दाशरथिः श्रीमानागमिष्यति सानुजः ॥ ३० ॥

यदा त्वदाश्रयशिलां पादाभ्यामाक्रमिष्यति ।
तदैव धूतपापा त्वं रामं संपूज्य भक्तितः ॥ ३१ ॥

परिक्रम्य नमस्कृत्य स्तुत्वा शापाद्विमोक्ष्यसे ।
पूर्ववन्मम शुश्रूषां करिष्यसि यथासुखम् ॥ ३२ ॥

इत्युक्त्वा गौतमः प्रागाद्धिमवन्तं नगोत्तमम् ।
तदाद्यहल्या भूतानामदृश्या स्वाश्रमे शुभे ॥ ३३ ॥

तव पादरजःस्पर्शं काङ्क्षते पवनाशना ।
आस्तेऽद्यापि रघुश्रेष्ठ तपो दुष्करमास्थिता ॥ ३४ ॥

पावयस्व मुनेर्भार्यामहल्यां ब्रह्मणः सुताम् ।
इत्युक्त्वा राघवं हस्ते गृहीत्वा मुनिपुङ्गवः ॥ ३५ ॥

दर्शयामास चाहल्यामुग्रेण तपसा स्थिताम् ।
रामः शिलां पदा स्पृष्ट्वा तां चापश्यत्तपोधनाम् ॥ ३६ ॥

ननाम राघवोऽहल्यां रामोऽहमिति चाब्रवीत् ।
ततो दृष्ट्वा रघुश्रेष्ठं पीतकौशेयवाससम् ॥ ३७ ॥

वाईट मनाने मी अतिशय निंद्य कृत्य केले आहे." तेव्हा क्रोधाने डोळे लाल झालेल्या गौतमांनी देवराज इंद्राला शाप दिला. (२५)

"अरे दुष्टात्म्या, तू योनि- लंपट आहेस. म्हणून तुझ्या शरीरावर हजार छिद्रे उत्पन्न होतील." अशा प्रकारे देवराज इंद्राला शाप देऊन मुनींनी त्वरित स्वतःच्या आश्रमात प्रवेश केला. तेव्हा भीतीने कापणारी आणि हात जोडून उभी असणारी अहल्या त्यांना दिसली. तिला पाहून गौतमांनी म्हटले, "हे दुष्टे, हे दुराचारिणी, माझ्या आश्रमातील शिळा होऊन तू राहा. (२६-२७)

येथे तू निराहार राहून ऊन, वारा, पाऊस इत्यादी सहन करीत, रात्रंदिवस कठोर तप कर आणि एकाग्र मनाने आपल्या हृदयात विराजमान असणाऱ्या परमात्म्या श्रीरामांचे ध्यान कर. या क्षणापासून हा माझा आश्रम विविध प्रकारच्या जीवजंतूंनी रहित होईल. (२८-२९)

अशा प्रकारे कित्येक हजार वर्षे निघून गेल्यावर येथे राजा दशरथांचे चिरंजीव पुत्र श्रीमान श्रीराम आपल्या धाकट्या भावासह येथे येतील. (३०)

आणि जेव्हा ते तुझा आश्रय असणाऱ्या शिळेवर आपले दोन्ही पाय ठेवतील, त्या वेळीच तू पापमुक्त होशील. नंतर भक्तिपूर्वक श्रीरामचंद्रांचे पूजन करून, त्यांना प्रदक्षिणा करून, नमस्कारपूर्वक त्याची स्तुती करून, तू शापातून सुटशील आणि मग पूर्वीप्रमाणेच आनंदाने माझी सेवा करू लागशील." (३१-३२)

असे बोलून महर्षी गौतम पर्वतश्रेष्ठ हिमालयात निघून गेले. हे रघुश्रेष्ठा, त्या दिवसापासून वायुभक्षण करून कठोर तप करणारी अहल्या तुमच्या चरणरजांच्या स्पर्शाची इच्छा करीत, अन्य प्राण्यांना न दिसता, आपल्या पवित्र आश्रमात आजसुद्धा राहात आहे. (३३-३४)

हे रामा, आज तुम्ही ब्रह्मदेवाची कन्या आणि गौतम मुनींची पत्नी जी अहल्या हिचा उद्धार करा." असे सांगून रघुनाथाचा हात पकडून, मुनिवर विश्वामित्रांनी, उग्र तपात रत असणारी अहल्या रामांना दाखविली. तेव्हा श्रीरामचंद्रांनी आपल्या पायाने त्या शिळेला स्पर्श करून तपोनिधी अहल्येला पाहिले. (३५-३६)

तिला पाहून 'मी राम आहे' असे सांगून भगवान रामांनी तिला प्रणाम केला. तेव्हा रेशमी पीतांबर परिधान केलेल्या श्रीरघुनाथांना अहल्येने (प्रथम विष्णुरूपात) पाहिले. (३७)

चतुर्भुजं शङ्खचक्रगदापङ्कजधारिणम् ।
धनुर्बाणधरं रामं लक्ष्मणेन समन्वितम् ॥ ३८ ॥

स्मितवक्त्रं पद्मनेत्रं श्रीवत्साङ्कितवक्षसम् ।
नीलमाणिक्यसङ्काशं द्योतयन्तं दिशो दश ॥ ३९ ॥

दृष्ट्वा रामं रमानाथं हर्षविस्फारितेक्षणा ।
गौतमस्य वचः स्मृत्वा ज्ञात्वा नारायणं परम् ॥ ४० ॥

संपूज्य विधिवद्रामममर्घ्यादिभिरनिन्दिता ।
हर्षाश्रुजलनेत्रान्ता दण्डवत्प्रणिपत्य सा ॥ ४१ ॥

उत्थाय च पुनर्दृष्ट्वा रामं राजीवलोचनम् ।
पुलकाङ्कितसर्वाङ्गा गिरा गद्गदयैलत ॥ ४२ ॥

अहल्योवाच

अहो कृतार्थास्मि जगन्निवास ते
पादाब्जसंलग्नरजःकणानहम् ।
स्पृशामि यत्पद्मजशङ्करादिभि-
र्विमृग्यते रन्धितमानसैः सदा ॥ ४३ ॥
अहो विचित्रं तव राम चेष्टितं
मनुष्यभावेन विमोहितं जगत् ।
चलस्यजस्त्रं चरणादिवर्जितः
सम्पूर्ण आनन्दमयोऽतिमायिकः ॥ ४४ ॥
यत्पादपङ्कजपरागपवित्रगात्रा
भागीरथी भवविरिञ्चिमुखान्पुनाति ।
साक्षात्स एव मम दृग्विषयो यदास्ते
किं वर्ण्यते मम पुराकृतभागधेयम् ॥ ४५ ॥
मर्त्यावतारे मनुजाकृतिं हरिं
रामाभिधेयं रमणीयदेहिनम् ।
धनुर्धरं पद्मविशाललोचनं
भजामि नित्यं न परान्भजिष्ये ॥ ४६ ॥
यत्पादपङ्कजरजः श्रुतिभिर्विमृग्यं
यन्नाभिपङ्कजभवः कमलासनश्च ।
यन्नामसारसिको भगवान्पुरारि-
स्तं रामचन्द्रमनिशं हृदि भावयामि ॥ ४७ ॥

त्यांच्या चार हातात शंख, चक्र, गदा आणि पद्म हे शोभत होते. (नंतर रामरूपात पाहिले तेव्हा) त्यांच्या खांद्यावर धनुष्य बाण विराजमान होते. त्यांच्याबरोबर लक्ष्मण होता. (३८)

त्यांच्या मुखावर स्मित होते. त्यांचे डोळे कमळाप्रमाणे होते. त्यांचे वक्षःस्थळ हे श्रीवत्सांकाने सुशोभित होते. नील- मण्यासारख्या कांतीने ते दाही दिशा प्रकाशित करीत होते. (३९)

त्या रमानाथ श्रीरामचंद्रांना पाहून अहल्येचे डोळे आनंदाने विस्फारित झाले. तिला मुनिश्रेष्ठ गौतमांच्या वचनांचे स्मरण झाले. तेव्हा ते साक्षात श्रेष्ठ श्रीनारायण आहेत असे जाणून, त्या पुण्यशील अहल्येने अर्घ्य इत्यादींनी श्रीरामांचे विधिवत पूजन केले; त्या वेळी तिचे नेत्र आनंदाश्रूंनी भरले होते. तिने श्रीरामांना दंडवत प्रणाम केला. (४०-४१)

नंतर उठून उभे राहून आणि पुनः कमलनयन रामांना पाहून तिचे सर्वांग पुलकित झाले आणि ती सद्गदित वाणीने श्रीरामांची स्तुती करू लागली. (४२)

अहल्या म्हणाली –"हे जगन्निवासा रामा, आज मी कृतार्थ झाले आहे ! तुमच्या ज्या पदरजांचे अनुसंधान ब्रह्मदेव, शंकर इत्यादी देव शुद्ध अंतःकरणाने नेहमी करीत असतात, त्या तुमच्या चरणकमलांच्या रजःकणांना मी स्पर्श करीत आहे. (४३)

अहो रामा, तुमच्या लीला अनाकलनीय आहेत. तुमच्या मनुष्यरूपामुळे सर्व जग मोहित होत आहे. तुम्ही संपूर्ण, पूर्ण आनंदमय आणि अतिशय मायावी आहात; कारण तुम्ही चरण इत्यादींनी रहित असूनसुद्धा निरंतर चालतच असता. (४४)

ज्यांच्या चरणकमलांच्या परागांनी शरीर पवित्र झालेली भागीरथी नदी शंकर, ब्रह्मदेव इत्यादी जगदीश्वरांनासुद्धा पवित्र करते, तेच तुम्ही आज माझ्यासमोर प्रत्यक्ष उभे आहात. तेव्हा मी माझ्या पूर्व पुण्याईचे किती वर्णन करू? (४५)

परम सुंदर अशा मानव देहात श्रीहरीने या मर्त्यलोकात अवतार घेतला आहे, त्या धनुर्धारी, कमलाप्रमाणे विशाल लोचन असणाऱ्या भगवान रामांना मी नित्य भजते. अन्य दुसऱ्या कोणालाही मी भजू इच्छित नाही. (४६)

ज्यांच्या चरणकमलांचे रजःकण श्रुतींकडून-सुद्धा शोधले जातात, ज्यांच्या नाभीतून उत्पन्न झालेल्या कमळात ब्रह्मदेव प्रकट झाले, तसेच ज्यांच्या नामामृताचे रसिक स्वतः भगवान शंकर आहेत, अशा त्या रामचंद्रांचे मी माझ्या हृदयात अहर्निश ध्यान करते . (४७)

यस्यावतारचरितानि विरिञ्चिलोके
गायन्ति नारदमुखा भवपद्मजाद्याः ।
आनन्दजाश्रुपरिषिक्तकुचाग्रसीमा
वागीश्वरी च तमहं शरणं प्रपद्ये ॥ ४८ ॥

सोऽयं परात्मा पुरुषः पुराण
एकः स्वयंज्योतिरनन्त आद्यः ।
मायातनुं लोकविमोहनीयां
धत्ते परानुग्रह एष रामः ॥ ४९ ॥

अयं हि विश्वोद्भवसंयमाना-
मेकः स्वमायागुणबिम्बितो यः ।
विरिञ्चिविष्ण्वीश्वरनामभेदान्
धत्ते स्वतन्त्रः परिपूर्ण आत्मा ॥ ५० ॥

नमोऽस्तु ते राम तवाङ्घ्रिपङ्कजं
श्रिया धृतं वक्षसि लालितं प्रियात् ।
आक्रान्तमेकेन जगत्त्रयं पुरा
ध्येयं मुनीन्द्रैरभिमानवर्जितैः ॥ ५१ ॥

जगतामादिभूतस्त्वं जगत्त्वं जगदाश्रयः ।
सर्वभूतेष्वसंयुक्त एको भाति भवान्परः ॥ ५२ ॥

ओंकारवाच्यस्त्वं राम वाचामविषयः पुमान् ।
वाच्यवाचकभेदेन भवानेव जगन्मयः ॥ ५३ ॥

कार्यकारणकर्तृत्वफलसाधनभेदतः ।
एको विभासि राम त्वं मायया बहुरूपया ॥ ५४ ॥

त्वन्मायामोहितधियस्त्वां न जानन्ति तत्त्वतः ।
मानुषं त्वाभिमन्यन्ते मायिनं परमेश्वरम् ॥ ५५ ॥

आकाशवत्त्वं सर्वत्र बहिरन्तर्गतोऽमलः ।
असङ्गो ह्यचलो नित्यः शुद्धो बुद्धः सदव्ययः ॥ ५६ ॥

ब्रह्मलोकामध्ये नारद इत्यादी देवर्षिगण, ब्रह्मदेव, शंकर इत्यादी देवेश्वर तसेच आनंदाश्रूंनी जिचे वक्ष भिजले आहेत अशी सरस्वतीसुद्धा ज्यांच्या अवतार-चरित्रांचे निरंतर गायन करते, त्या प्रभूंना मी शरण आले आहे. (४८)

ते हे पुराणपुरुष परमात्मा, श्रीराम हे एक, स्वयंप्रकाशी, अनंत आणि सर्वांचे आद्य कारण आहेत. असे असूनही जगाला मोहित करणारे मायामय मानवी रूप लोकांवर परम अनुग्रह करण्यासाठी त्यांनी धारण केले आहे. (४९)

जे एकटेच या विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय करण्यासाठी आपल्या मायेच्या तीन गुणांत प्रतिबिंबित होऊन ब्रह्मदेव, विष्णू आणि महादेव या नावांनी तीन रूपे धारण करतात, तो स्वतंत्र आणि परिपूर्ण असा आत्मा तुम्हीच आहात. (५०)

अहो रामा, तुमची चरणकमळे श्रीलक्ष्मी आपल्या वक्षःस्थळावर ठेवून प्रेमाने सेवा करते, ज्यांनी पूर्वी (बलिराजाच्या यज्ञामध्ये) एकाच पायाने संपूर्ण त्रैलोक्य व्याप्त केले होते, तसेच अभिमान-रहित अशा मुनिश्रेष्ठांकडून ज्या चरणांचे निरंतर ध्यान केले जाते, त्या तुमच्या चरणकमळांना मी नमस्कार करते. (५१)

हे प्रभो, तुम्हीच सर्व जगतांचे आदिकारण आहात, तुम्हीच जगद्-रूप आहात, तुम्हीच जगाचे आश्रय आहात. तथापि सर्व चराचराहून तुम्ही अगदी वेगळे आहात आणि अद्वितीय परमात्मरूपाने प्रकाशमान आहात. (५२)

अहो रामा, तुम्ही ॐ कार शब्दाने वाच्य आहात; तसेच वाणीला अगोचर असे परम पुरुष तुम्हीच आहात. हे प्रभो, वाच्य आणि वाचक (=शब्द व अर्थ) या भेदाने तुम्हीच संपूर्ण जगत्-रूप आहात. (५३)

अहो रामा, पुष्कळ रूपे असणाऱ्या मायेच्या आश्रयाने तुम्ही एकटेच कार्य, कारण, कर्तृत्व, फळ आणि साधनांचे भेद यांचे द्वारा अनेक रूपांमध्ये भासमान होता. (५४)

तुमच्या मायेमुळे ज्यांची बुद्धी मोहित झाली आहे असे लोक तुम्हांला यथार्थपणे जाणत नाहीत. ते मूढ लोक मायापती परमेश्वर अशा तुम्हांला सामान्य माणूस असे समजतात. (५५)

आकाशाप्रमाणे तुम्ही आत-बाहेर, सर्वत्र विराजमान आहात. तुम्ही निर्मळ, असंग, अचल, नित्य, शुद्ध, बुद्ध, सत्-स्वरूप आणि अव्यय आहात. (५६)

योषिन्मूढाहमज्ञा ते तत्त्वं जाने कथं विभो ।
तस्मात्ते शतशो राम नमस्कुर्यामनन्यधीः ॥ ५७ ॥

देव मे यत्र कुत्रापि स्थिताया अपि सर्वदा ।
त्वत्पादकमले सक्ता भक्तिरेव सदास्तु मे ॥ ५८ ॥

नमस्ते पुरुषाध्यक्ष नमस्ते भक्तवत्सल ।
नमस्तेऽस्तु हृषीकेश नारायण नमोऽस्तु ते ॥ ५९ ॥

भवभयहरमेकं भानुकोटिप्रकाशं
करधृतशरचापं कालमेघावभासम् ।
कनकरुचिरवस्त्रं रत्नवत्कुण्डलाढ्यं
कमलविशदनेत्रं सानुजं राममीडे ॥ ६० ॥

स्तुत्वैवं पुरुषं साक्षाद्राघवं पुरतः स्थितम् ।
परिक्रम्य प्रणम्याशु सानुज्ञाता ययौ पतिम् ॥ ६१ ॥

अहल्यया कृतं स्तोत्रं यः पठेद्भक्तिसंयुतः ।
स मुच्यतेऽखिलैः पापैः परं ब्रह्माधिगच्छति ॥ ६२ ॥

पुत्रार्थे पठेद्भक्त्या रामं हृदि निधाय च ।
संवत्सरेण लभते वन्ध्या अपि सुपुत्रकम् ॥ ६३ ॥

सर्वान्कामानवाप्नोति रामचन्द्रप्रसादतः ॥ ६४ ॥

ब्रह्मघ्नो गुरुतल्पगोऽपि पुरुषः
स्तेयी सुरापोऽपि वा ।
मातृभ्रातृविहिंसकोऽपि सततं
भोगैकबद्धातुरः ।
नित्यं स्तोत्रमिदं जपन् रघुपतिं
भक्त्या हृदिस्थं स्मरन्
ध्यायन्मुक्तिमुपैति किं पुनरसौ
स्वाचारयुक्तो नरः ॥ ६५ ॥

मी एक मूढ अज्ञानी स्त्री आहे. अहो विभो, तुमचे सत्य स्वरूप मी कसे बरे जाणू शकेन ? म्हणून अहो रामा, मी अनन्य भावाने तुम्हांला शेकडो वेळा नमस्कार करीत आहे. (५७)

अहो देवा, मी जिथे कुठेही असेन, तेथे सर्वत्र सदा तुमच्या पदकमलांचे ठिकाणी माझी अढळ भक्तीच असू दे. (५८)

अहो पुरुषोत्तमा, तुम्हांला नमस्कार असो. अहो भक्तवत्सला, तुम्हांला नमस्कार असो. हे हृषीकेशा, तुम्हांला नमस्कार असो. हे नारायणा, तुम्हांला वारंवार माझा नमस्कार असो. (५९)

जे एक मात्र संसाराचे भय दूर करणारे आहेत, जे कोट्यवधी सूर्यांप्रमाणे प्रकाशमान आहेत, ज्यांनी आपल्या करकमळांत धनुष्य आणि बाण धारण केले आहेत, ज्यांची कांती श्याम मेघाप्रमाणे आहे, ज्यांनी सोन्याप्रमाणे सुंदर असे पीत वस्त्र परिधान केले आहे, जे रत्नाच्या कुंडलांनी सुशोभित आहेत आणि ज्यांचे नेत्र कमलाप्रमाणे विशाल व अतिसुंदर आहेत, अशा लक्ष्मणासह असणाऱ्या श्रीरामांची मी स्तुती करीत आहे." (६०)

अशा प्रकारे पुढे असणाऱ्या साक्षात परम पुरुष श्रीरघुनाथांची स्तुती करून, त्यांना प्रदक्षिणा घालून तिने नमस्कार केला, आणि त्यांच्या अनुमतीने ती लगेच पतीकडे निघून गेली. (६१)

अहल्येने केलेले रामाचे हे स्तोत्र जो कोणी भक्तिपूर्वक पठन करील, तो सर्व पापांतून मुक्त होऊन परब्रह्म पदाला प्राप्त होईल. (६२)

श्रीरामचंद्रांचे हृदयात ध्यान करून पुत्रार्दीच्या प्राप्तीसाठी जी वंध्या स्त्री या स्तोत्राचे भक्तीने पठन करील, तिला एका वर्षातच चांगला पुत्र प्राप्त होईल. (६३)

आणि श्रीरामचंद्रांच्या प्रसादाने तिच्या सर्व इच्छा पूर्ण होतील. (६४)

ब्राह्मणाचा वध करणारा, गुरुपत्नीगमन करणारा, चोरी करणारा, दारू पिणारा, आई-बाप-भाऊ यांची हिंसा करणारा तसेच निरंतर भोगांत रमणारा असा पुरुषसुद्धा जर आपल्या हृदयात विराजमान असणाऱ्या रघुपतींचे भक्तीने नित्य स्मरण करीत आणि ध्यान करीत या स्तोत्राचे नित्य पठन करील, तर त्याला मुक्ती प्राप्त होईल. मग स्वधर्मपरायण अशा पुरुषाबद्दल काय सांगावे? (६५)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे बालकाण्डे अहल्योद्धरणं नाम पंचमः सर्गः ॥ ५ ॥

षष्ठ सर्ग

धनुर्भङ्ग आणि विवाह

श्रीमहादेव उवाच

विश्वामित्रोऽथ तं प्राह राघवं सहलक्ष्मणम् ।
गच्छामो वत्स मिथिलां जनकेनाभिपालिताम् ॥ १ ॥

दृष्ट्वा क्रतुवरं पश्चादयोध्यां गन्तुमर्हसि ।
इत्युक्त्वा प्रययौ गङ्गामुत्तर्तुं सहराघवः ।
तस्मिन्काले नाविकेन निषिद्धो रघुनन्दनः ॥ २ ॥

नाविक उवाच

क्षालयामि तव पादपङ्कजं
नाथ दारुहृषदोः किमन्तरम् ।
मानुषीकरणचूर्णमस्ति ते
पादयोरिति कथा प्रथीयसी ॥ ३ ॥

पादाम्बुजं ते विमलं हि कृत्वा
पश्चात्परं तीरमहं नयामि ।
नोचेत्तरी सद्यवती मलेन
स्याच्चेद्विभो विद्धि कुटुम्बहानिः ॥ ४ ॥

इत्युक्त्वा क्षालितौ पादौ परं तीरं ततो गताः ।
कौशिको रघुनाथेन सहितो मिथिलां ययौ ॥ ५ ॥

विदेहस्य पुरं प्रातर्ऋषिवाटं समाविशत् ।
प्राप्तं कौशिकमाकर्ण्य जनकोऽतिमुदान्वितः ॥ ६ ॥

पूजाद्रव्याणि संगृह्य सोपाध्यायः समाययौ ।
दण्डवत्प्रणिपत्याथ पूजयामास कौशिकम् ॥ ७ ॥

पप्रच्छ राघवौ दृष्ट्वा सर्वलक्षणसंयुतौ ।
द्योतयन्तौ दिशः सर्वाश्चन्द्रसूर्याविवापरौ ॥ ८ ॥

कस्यैतौ नरशार्दूलौ पुत्रौ देवसुतोपमौ ।
मनःप्रीतिकरौ मेऽद्य नरनारायणाविव ॥ ९ ॥

श्रीभगवान शंकर म्हणाले– त्यानंतर लक्ष्मण व श्रीरामचंद्रांना विश्वामित्र म्हणाले, "वत्सांनो, महाराज जनकांनी पालन केलेल्या मिथिला नगरीला आता आपण जाऊ या. (१)

तेथील उत्कृष्ट यज्ञोत्सव पाहून मग तुम्ही अयोध्या नगरीला परत जा." असे बोलून ते रघुनाथांना घेऊन, गंगा पार करून जाण्यास गंगेच्या तटावर आले. त्या वेळी नावाड्याने रघुनाथांना नावेत चढण्यास मनाई केली. (२)

नाविक म्हणाला – "हे नाथा, तुमच्या पायाला मनुष्य बनविणारे चूर्ण आहे, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. (नुकतेच तुम्ही एका शिळेला स्त्री बनविले आहे.) मग शिळा आणि लाकूड यांत फरक तो काय आहे? म्हणून नौकेवर चढण्यापूर्वी मी तुमचे चरणकमल धुतो. (३)

अशा प्रकारे तुमचे चरणकमल धुऊन मग मी तुम्हांला श्रीगंगानदीच्या पलीकडल्या तीरावर घेऊन जाईन. नाहीतर हे विभो, तुमच्या चरणधुळीच्या स्पर्शाने जर माझी ही नौका सुंदर तरुणी बनली, तर माझ्या कुटुंबाला उदरनिर्वाहाचे साधन उरणार नाही. " (४)

असे म्हणून नावाड्याने श्रीरामांचे चरण धुतले. मग त्याने त्यांना आनंदाने पैलतीराला नेले. तेथून लक्ष्मण व श्रीराम यांच्यासह श्रीविश्वामित्र मिथिला नगरीला गेले. (५)

प्रातःकाळी ते विदेहाच्या नगरात पोचल्यावर ऋषींच्यासाठी असणाऱ्या निवासस्थानी उतरले. विश्वामित्र आल्याचे ऐकून अतिशय आनंदाने जनक राजा पूजेची सामग्री घेऊन, आपले पुरोहित शतानंद यांना बरोबर घेऊन तेथे आले आणि साष्टांग प्रणाम करून त्यांनी विश्वामित्रांची पूजा केली. (६-७)

त्यानंतर सर्व लक्षणांनी संपन्न, जणू दुसऱ्या सूर्य-चंद्राप्रमाणे आपल्या तेजाने सर्व दिशांना देदीप्यमान करणाऱ्या त्या दोघा रघुकुलातील कुमारांना पाहून, जनकांनी विचारले. (८)

"देव-पुत्रांप्रमाणे असणारे हे दोन नरोत्तम कुणाचे पुत्र आहेत? या प्रसंगी हे दोघे नर-नारायणाप्रमाणे माझ्या मनात प्रीती उत्पन्न करीत आहेत." (९)

प्रत्युवाच मुनिः प्रीतो हर्षयन् जनकं तदा ।
पुत्रौ दशरथस्यैतौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥ १० ॥

मखसंरक्षणार्थाय मयानीतौ पितुः पुरात् ।
आगच्छन् राघवो मार्गे ताटकां विश्रुघातिनीम् ॥ ११ ॥

शरेणैकेन हतवान्नोदितो मेऽतिविक्रमः ।
ततो ममाश्रमं गत्वा मम यज्ञविहिंसकान् ॥ १२ ॥

सुबाहुप्रमुखान्हत्वा मारीचं सागरेऽक्षिपत् ।
ततो गङ्गातटे पुण्ये गौतमस्याश्रमं शुभम् ॥ १३ ॥

गत्वा तत्र शिलारूपा गौतमस्य वधूः स्थिता ।
पादपङ्कजसंस्पर्शात्कृता मानुषरूपिणी ॥ १४ ॥

दृष्ट्वाहल्यां नमस्कृत्य तया सम्यक्प्रपूजितः ।
इदानीं द्रष्टुकामास्ते गृहे माहेश्वरं धनुः ॥ १५ ॥

पूजितं राजभिः सर्वैर्दृष्टमित्यनुशुश्रुवे ।
अतो दर्शय राजेन्द्र शैवं चापमनुत्तमम् ।
दृष्ट्वायोध्यां जिगमिषुः पितरं द्रष्टुमिच्छति ॥ १६ ॥

इत्युक्तो मुनिना राजा पूजार्हाविति पूजया ।
पूजयामास धर्मज्ञो विधिदृष्टेन कर्मणा ॥ १७ ॥

ततः सम्प्रेषयामास मन्त्रिणं बुद्धिमत्तरम् ।
शीघ्रमानय विश्वेशचापं रामाय दर्शय ॥ १८ ॥

ततो गते मन्त्रिवरे राजा कौशिकमब्रवीत् ।
यदि रामो धनुर्धृत्वा कोट्यामारोपयेद्गुणम् ॥ १९ ॥

तदा मयात्मजा सीता दीयते राघवाय हि ।
तथेति कौशिकोऽप्याह रामं संवीक्ष्य सस्मितम् ॥ २० ॥

शीघ्रं दर्शय चापाग्र्यं रामायामिततेजसे ।
एवं ब्रुवति मौनीश आगताश्चापवाहकाः ॥ २१ ॥

तेव्हा महाराज जनकांना आनंद देत मुनिश्रेष्ठ विश्वामित्र प्रसन्नतापूर्वक म्हणाले, "हे दोन भाऊ राम आणि लक्ष्मण, राजा दशरथांचे पुत्र आहेत. (१०)

यज्ञाच्या रक्षणासाठी मी त्यांना त्यांच्या पित्याच्या अयोध्या नगरीतून आणले होते. येताना रस्त्यात माझ्या प्रेरणेने या अतिशय पराक्रमी रघुनाथांनी एकाच बाणाने जगाला त्रास देणाऱ्या ताटकेला ठार केले. त्यानंतर माझ्या आश्रमात येऊन माझ्या यज्ञाचा विध्वंस करणाऱ्या सुबाहू इत्यादी राक्षसांना त्यांनी मारून टाकले आणि मारीचाला शेकडो योजने दूर समुद्रात फेकून दिले. नंतर गंगेच्या पावन तीरावरील महर्षी गौतमांच्या पवित्र आश्रमात जाऊन, तेथे त्यांनी शिळारूपात असणाऱ्या गौतमपत्नीला पाहून आपल्या चरण-कमळांच्या स्पर्शाने मनुष्य-रूप दिले. (११-१४)

अहल्येला पाहून रामांनी तिला नमस्कार केला. त्यानंतर तिच्याकडून यथासांग पूजा स्वीकारून आता ते तुमच्या राजभवनात शंकरांचे पूज्य धनुष्य पाहण्यास आले आहेत. आम्ही असे ऐकले आहे की सर्व राजे ते धनुष्य केवळ पाहून गेले आहेत. (परंतु कोणीही त्यावर बाण लावू शकला नाही.) म्हणून हे राजेंद्रा, महादेवांचे ते अतिशय उत्तम धनुष्य तुम्ही त्यांना दाखवा. ते धनुष्य पाहिल्यावर, ते आपल्या मातापित्यांना भेटण्यास लौकरच अयोध्येला जाऊ इच्छितात." (१५-१६)

मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांनी असे सांगितल्यावर, धर्मज्ञ जनकांनी राम व लक्ष्मण पूजनीय आहेत, असे जाणून त्यांची विधिपूर्वक पूजा केली. (१७)

त्यानंतर राजा जनकांनी आपल्या अतिशय बुद्धिमान मंत्र्यास बोलाविले आणि श्रीविश्वेश्वर शंकराचे धनुष्य त्वरित आणवून ते रामचंद्राला दाखविण्यास सांगितले. (१८)

मंत्री निघून गेल्यावर राजा जनक विश्वामित्रांना म्हणाले "ते धनुष्य सज्ज करून जर रामचंद्र त्याला दोरी लावतील तर मी रामांना माझी कन्या सीता देईन." तेव्हा स्मित करीत रामांकडे पाहून विश्वामित्रही म्हणाले, "ठीक आहे. (१९-२०)

हे राजा, तुम्ही लागलीच ते श्रेष्ठ धनुष्य अत्यंत तेजस्वी रामांना दाखवा." ते मुनिश्रेष्ठ असे बोलत आहेत तोच अतिशय बलवान असे पाच हजार धनुष्य-वाहक धनुष्य घेऊन तेथे आले. त्या धनुष्याला शेकडो घंटा

चापं गृहीत्वा बलिनः पञ्चसाहस्रसङ्ख्यकाः ।
घण्टाशतसमायुक्तं मणिवज्रादिभूषितम् ॥ २२ ॥

दर्शयामास रामाय मन्त्री मन्त्रयतां वरः ।
दृष्ट्वा रामः प्रहृष्टात्मा बद्ध्वा परिकरं दृढम् ॥ २३ ॥

गृहीत्वा वामहस्तेन लीलया तोलयन् धनुः ।
आरोपयामास गुणं पश्यत्स्वखिलराजसु ॥ २४ ॥

ईषदाकर्षयामास पाणिना दक्षिणेन सः ।
बभञ्जाखिलहृत्सारो दिशः शब्देन पूरयन् ॥ २५ ॥

दिशश्च विदिशश्चैव स्वर्गं मर्त्यं रसातलम् ।
तदद्भुतमभूत्तत्र देवानां दिवि पश्यताम् ॥ २६ ॥

आच्छादयन्तः कुसुमैर्देवाः स्तुतिभिरीडिरे ।
देवदुन्दुभयो नेदुर्ननृतुश्चाप्सरोगणाः ॥ २७ ॥

द्विधा भग्नं धनुर्दृष्ट्वा राजालिङ्ग्य रघूद्वहम् ।
विस्मयं लेभिरे सीतामातरोऽन्तःपुराजिरे ॥ २८ ॥

सीता स्वर्णमयीं मालां गृहीत्वा दक्षिणे करे ।
स्मितवक्त्रा स्वर्णवर्णा सर्वाभरणभूषिता ॥ २९ ॥

मुक्ताहारैः कर्णपत्रैः क्वणच्चरणनूपुरा ।
दुकूलपरिसंवीता वस्त्रान्तर्व्यञ्जितस्तनी ॥ ३० ॥

रामस्योपरि निक्षिप्य स्मयमाना मुदं ययौ ।
ततो मुमुदिरे सर्वे राजदाराः स्वलङ्कृतम् ॥ ३१ ॥

गवाक्षजालरन्ध्रेभ्यो दृष्ट्वा लोकविमोहनम् ।
ततोऽब्रवीन्मुनिं राजा सर्वशास्त्रविशारदः ॥ ३२ ॥

भो कौशिक मुनिश्रेष्ठ पत्रं प्रेषय सत्वरम् ।
राजा दशरथः शीघ्रमागच्छतु सपुत्रकः ॥ ३३ ॥

विवाहार्थं कुमाराणां सदारः सहमन्त्रिभिः ।
तथेति प्रेषयामास दूतांस्त्वरितविक्रमान् ॥ ३४ ॥

बांधलेल्या होत्या. तसेच हिरे इत्यादी रत्नांनी ते मढविले होते. (२१-२२)

तेव्हा त्या मंत्रिश्रेष्ठाने श्रीरामांना ते धनुष्य दाखविले. प्रसन्नचित्त असणाऱ्या श्रीरामांनी ते पाहताच कंबर कसून सहजपणे ते धनुष्य डाव्या हाताने उचलून वर धरले, आणि सर्व राजेलोकांच्या देखत त्यांनी धनुष्यावर दोरी चढविली. (२३-२४)

नंतर सर्वांच्या हृदयात साररूपाने असणाऱ्या भगवान श्रीरामांनी आपल्या उजव्या हाताने ते धनुष्य थोडेसे ओढले तोच ते धनुष्य मोडून पडले आणि त्या आवाजाने दाही दिशा भरून गेल्या. (२५)

दिशा, उपदिशा, स्वर्ग-लोक, मर्त्य लोक आणि रसातळ इत्यादी सर्व लोक त्या आवाजाने दुमदुमून गेले. हे पाहणाऱ्या स्वर्गलोकातील देवांना आश्चर्य वाटले. देवांनी भगवान श्रीरामांवर अमाप पुष्पवर्षाव केला आणि त्यांची स्तुती केली. देव नगारे वाजवू लागले, आणि अप्सरांचे समूह नाचू लागले. (२६-२७)

धनुष्याचे दोन तुकडे झालेले पाहून महाराज जनकांनी रघुनाथांना आलिंगन दिले. इकडे अंतःपुरातील अंगणामध्ये जमलेल्या सीतेच्या माता अत्यंत आश्चर्यचकित झाल्या. (२८)

त्यानंतर सर्व अलंकारांनी विभूषित, सुहास्य - वदना, सुवर्णाप्रमाणे कांती असणारी सीता आपल्या उजव्या हातात सुवर्ण वरमाला घेऊन तेथे आली. (२९)

मोत्यांचे हार, कर्णफुले, आणि रुणझुण आवाज करणारी नूपुरे व सुंदर पैठणी इत्यादी ल्यालेल्या सीतेचे सौंदर्य झळकत होते. (३०)

तेव्हा स्मित करीत श्रीरामांच्या गळ्यात वरमाला घालताना तिला परम आनंद झाला. त्या वेळी सकल अलंकारांनी उत्तम प्रकारे विभूषित, भुवन-मोहन रामचंद्रांचे ते रूप गवाक्षांच्या जाळ्यांतून पाहून जनक राजांच्या सर्व राण्या आनंदित झाल्या. मग सर्व शास्त्रांत विशारद असणाऱ्या जनक राजांनी मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांना म्हटले. (३१-३२)

"हे मुनिश्रेष्ठ विश्वामित्रा, तुम्ही सत्वर महाराज दशरथांना पत्र पाठवा की आपल्या कुमारांच्या विवाहासाठी आपले पुत्र, राण्या आणि मंत्री यांच्यासह त्यांनी येथे या." तेव्हा 'ठीक आहे' असे बोलून विश्वामित्रांनी शीघ्रगामी दूतांना दशरथांकडे पाठविले. (३३-३४)

ते गत्वा राजशार्दूलं रामश्रेयो न्यवेदयन् ।
श्रुत्वा रामकृतं राजा हर्षेण महताप्लुतः ॥ ३५ ॥

मिथिलागमनार्थाय त्वरयामास मन्त्रिणः ।
गच्छन्तु मिथिलां सर्वे गजाश्वरथपत्तयः ॥ ३६ ॥

रथमानय मे शीघ्रं गच्छाम्यद्यैव मा चिरम् ।
वसिष्ठस्त्वग्रतो यातु सदारः सहितोऽग्निभिः ॥ ३७ ॥

राममातृः समादाय मुनिर्मे भगवान् गुरुः ।
एवं प्रस्थाप्य सकलं राजर्षिर्विपुलं रथम् ॥ ३८ ॥

महत्या सेनया सार्धमारुह्य त्वरितो ययौ ।
आगतं राघवं श्रुत्वा राजा हर्षसमाकुलः ॥ ३९ ॥

प्रत्युजगाम जनकः शतानन्दपुरोधसा ।
यथोक्तपूजया पूज्यं पूजयामास सत्कृतम् ॥ ४० ॥

रामस्तु लक्ष्मणेनाशु ववन्दे चरणौ पितुः ।
ततो हृष्टो दशरथो रामं वचनमब्रवीत् ॥ ४१ ॥

दिष्ट्या पश्यामि ते राम मुखं फुल्लाम्बुजोपमम् ।
मुनेरनुग्रहात्सर्वं सम्पन्नं मम शोभनम् ॥ ४२ ॥

इत्युक्त्वाघ्राय मूर्धानमालिङ्ग्य च पुनः पुनः ।
हर्षेण महताविष्टो ब्रह्मानन्दं गतो यथा ॥ ४३ ॥

ततो जनकराजेन मन्दिरे सन्निवेशितः ।
शोभने सर्वभोगाढ्ये सदारः ससुतः सुखी ॥ ४४ ॥

ततः शुभे दिने लग्ने सुमुहूर्ते रघूत्तमम् ।
आनयामास धर्मज्ञो रामं सभ्रातृकं तदा ॥ ४५ ॥

रत्नस्तम्भसुविस्तारे सुविताने सुतोरणे ।
मण्डपे सर्वशोभाढ्ये मुक्तापुष्पफलान्विते ॥ ४६ ॥

अयोध्येला जाऊन, त्या दूतांनी राजश्रेष्ठ दशरथांना श्रीरामांची मंगल कीर्तिवार्ता सांगितली. रामचंद्रांनी केलेल्या त्या अद्‌भुत कृत्याची हकीकत ऐकून महाराज दशरथ परमानंदात बुडाले. (३५)

मिथिला नगरीत जाण्यासाठी दशरथांनी त्वरा करण्यास मंत्र्यांना सांगितले. ते म्हणाले, " हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ सैन्य यांच्यासह सर्व लोक मिथिला पुरीला जाऊ देत. (३६)

त्वरित माझा रथ आणा. उशीर करू नका. मी आजच मिथिलेस जाण्यास निघेन. अरुंधती पत्नीसह आणि अग्नीसह माझे गुरू मुनिश्रेष्ठ वसिष्ठ हे रामाच्या मातांना बरोबर घेऊन सर्वांच्या पुढे चालू देत." अशा प्रकारे सर्वांना कूच करावयास लावून, आणि विशाल रथावर आरूढ होऊन, राजर्षी दशरथ आपल्या चतुरंग सेनेसह लागलीच मिथिला नगरीकडे निघाले. रघुकुलतिलक दशरथ आले आहेत, हे ऐकून महाराज जनक आनंदविभोर झाला. शतानंद नावाच्या पुरोहितासह जनक राजा दशरथांना सामोरा गेला आणि त्याने पूज्य दशरथांचा यथोचित सत्कार करून त्याची पूजा केली. (३७- ४०)

त्यानंतर लक्ष्मणासहित श्रीरामांनी पित्याच्या चरणांना वंदन केले. तेव्हा आनंदित झालेले दशरथ श्रीरामांना म्हणाले. (४१)

"अरे रामा, मोठ्या भाग्याने आज मी प्रफुल्लित कमलाप्रमाणे असणारे तुझे मुख पाहात आहे. मुनिश्रेष्ठांच्या अनुग्रहाने सर्व प्रकारे माझे कल्याण झाले आहे." (४२)

असे बोलून रामांच्या मस्तकाचे अवघ्राण करून आणि पुनः पुनः त्यांना आलिंगन देऊन, अत्यंत आनंदित झालेले दशरथ राजा जणू ब्रह्मानंदात बुडून गेले. (४३)

त्यानंतर जनकाने सर्व राजकुमार आणि राण्या यांच्यासह आनंदी दशरथांना, सर्व सोयींनी पूर्ण असणाऱ्या परम सुंदर महालात उतरविले. (४४)

त्यानंतर एका शुभ दिवशी शुभ लग्न असणाऱ्या सुमुहूर्तावर, धर्मज्ञ जनकांनी श्रीरामांना भावांसह बोलावून घेतले. (४५)

त्यानंतर रत्नजडित स्तंभ असणाऱ्या, सुंदर छत, मनोहर तोरणे, मोती, फुले, फळे यांनी युक्त तसेच सर्व प्रकारच्या शोभादायक वस्तूंनी संपन्न असा विस्तृत मंडपच घातला होता. तेथे सुवर्ण अलंकारांनी भूषित असे वेदवेत्ते

वेदविद्भिः सुसम्ब्राधे ब्राह्मणैः स्वर्णभूषितैः ।
सुवासिनीभिः परितो निष्ककण्ठीभिरावृते ॥ ४७ ॥

भेरीदुन्दुभिनिर्घोषैर्गीतनृत्यैः समाकुले ।
दिव्यरत्नाञ्चिते स्वर्णपीठे रामं न्यवेशयत् ॥ ४८ ॥

वसिष्ठं कौशिकं चैव शतानन्दः पुरोहितः ।
यथाक्रमं पूजयित्वा रामस्योभयपार्श्वयोः ॥ ४९ ॥

स्थापयित्वा स तत्राग्निं ज्वालयित्वा यथाविधि ।
सीतामानीय शोभाढ्यां नानारत्नविभूषिताम् ॥ ५० ॥

सभार्यो जनकः प्रायाद्रामं राजीवलोचनम् ।
पादौ प्रक्षाल्य विधिवत्तदपो मूर्ध्न्यधारयत् ॥ ५१ ॥

या धृता मूर्ध्नि शर्वेण ब्रह्मणा मुनिभिः सदा ।
ततः सीतां करे धृत्वा साक्षतोदकपूर्वकम् ॥ ५२ ॥

रामाय प्रददौ प्रीत्या पाणिग्रहविधानतः ।
सीता कमलपत्राक्षी स्वर्णमुक्तादिभूषिता ॥ ५३ ॥

दीयते मे सुता तुभ्यं प्रीतो भव रघूत्तम ।
इति प्रीतेन मनसा सीतां रामकरेऽर्पयन् ॥ ५४ ॥

मुमोद जनको लक्ष्मीं क्षीराब्धिरिव विष्णवे ।
ऊर्मिलां चौरसीं कन्यां लक्ष्मणाय ददौ मुदा ॥ ५५ ॥

तथैव श्रुतकीर्तिं च माण्डवीं भ्रातृकन्यके ।
भरताय ददावेकां शत्रुघ्नायापरां ददौ ॥ ५६ ॥

चत्वारो दारसम्पन्ना भ्रातरः शुभलक्षणाः ।
विरेजुः प्रभया सर्वे लोकपाला इवापरे ॥ ५७ ॥

ततोऽब्रवीद्वसिष्ठाय विश्वामित्राय मैथिलः ।
जनकः स्वसुतोदन्तं नारदेनाभिभाषितम् ॥ ५८ ॥

ब्राह्मण होते. गळ्यात सोन्याचे अलंकार घातलेल्या सुवासिनी स्त्रिया तेथे आजूबाजूला वावरत होत्या. त्या विस्तीर्ण मंडपात जनकांनी श्रीरामचंद्रांना एका दिव्य रत्नजडित सोन्याच्या सिंहासनावर बसविले. त्या वेळी तुताऱ्या, नगारे इत्यादी वाद्यांच्या मंगल ध्वनीने तसेच नृत्य, गायन यांनी मंडप गजबजून गेला होता. (४६-४८)

त्यानंतर वसिष्ठ ऋषी आणि विश्वामित्र यांचे क्रमशः पूजन करून शतानंद पुरोहिताने त्यांना रामचंद्रांच्या दोन्ही बाजूंना बसविले. तेथे त्याने विधिपूर्वक अग्नी प्रज्वलित केला. नंतर नाना रत्नालंकारांनी विभूषित आणि अतिशय सुंदर अशा सीतेला घेऊन, महाराणीसह महाराज जनक कमलनयन रामांजवळ गेले, आणि विधिपूर्वक त्यांचे चरण धुऊन, ते चरणोदक त्यांनी आपल्या मस्तकावर धारण केले. (४९-५१)

हेच चरणोदक शिव, ब्रह्मदेव आणि इतर मुनिजन नेहमी आपल्या मस्तकांवर धारण करतात. नंतर सीतेचा एक हात धरून, पाणिग्रहणाच्या विधीप्रमाणे, अक्षता व पाणी यांसह जनकांनी आनंदाने श्रीरामांना सीतेचे दान केले, आणि ते म्हणाले, "हे रघुश्रेष्ठा, सुवर्णालंकार, मोती इत्यादींनी विभूषित कमलनयना अशी माझी कन्या सीता मी तुम्हांला देत आहे. याने तुम्ही प्रसन्न व्हा. " अशा प्रकारे संतुष्ट मनाने सीतेला श्रीरामचंद्रांच्या करकमळी अर्पण करून, ज्या प्रमाणे भगवान श्रीविष्णूंच्या करकमळी लक्ष्मीला अर्पण केल्यावर क्षीरसागर हा आनंद-मग्न झाला, त्याप्रमाणे जनक आनंदमग्न झाले. त्यानंतर त्यांनी आनंदाने आपली औरस कन्या ऊर्मिला लक्ष्मणाला दिली. (५२-५५)

तसेच मांडवी आणि श्रुतकीर्ती यांतील आपल्या भावाची पहिली मुलगी भरताला आणि दुसरी शत्रुघ्नाला दिली. (५६)

अशा प्रकारे शुभ लक्षणांनी संपन्न आणि पत्नींनी युक्त असे ते सर्व चारही भाऊ आपल्या तेजाने साक्षात लोकपालांप्रमाणे शोभू लागले. (५७)

त्यानंतर मिथिलापती जनकांनी आपली मुलगी जानकी हिच्या बाबतीत नारदाने पूर्वी जो वृत्तांत सांगितला होता, तो सर्व वसिष्ठ आणि विश्वामित्र यांना सांगितला. (५८)

यज्ञभूमिविशुद्ध्यर्थं कर्षतो लाङ्गलेन मे ।
सीतामुखात्समुत्पन्ना कन्यका शुभलक्षणा ॥ ५९ ॥

तामद्राक्षमहं प्रीत्या पुत्रिकाभावभावितम् ।
अर्पिता प्रियभार्यायै शरच्चन्द्रनिभानना ॥ ६० ॥

एकदा नारदोऽभ्यागाद्विविक्ते मयि संस्थिते ।
गायन्महतीं वीणां गायन्नारायणं विभुम् ॥ ६१ ॥

पूजितः सुखमासीनो मामुवाच सुखान्वितः ।
शृणुष्व वचनं गुह्यं तवाभ्युदयकारणम् ॥ ६२ ॥

परमात्मा हृषीकेशो भक्तानुग्रहकाम्यया ।
देवकार्यार्थसिद्ध्यर्थं रावणस्य वधाय च ॥ ६३ ॥

जातो राम इति ख्यातो मायामानुषवेषधृक् ।
आस्ते दाशरथिर्भूत्वा चतुर्धा परमेश्वरः ॥ ६४ ॥

योगमायापि सीतेति जाता वै तव वेश्मनि ।
अतस्त्वं राघवायैव देहि सीतां प्रयत्नतः ॥ ६५ ॥

नान्येभ्यः पूर्वभार्यैषा रामस्य परमात्मनः ।
इत्युक्त्वा प्रययौ देवगतिं देवमुनिस्तदा ॥ ६६ ॥

तदारभ्य मया सीता विष्णोर्लक्ष्मीर्विभाव्यते ।
कथं मया राघवाय दीयते जानकी शुभा ॥ ६७ ॥

इति चिन्तासमाविष्टः कार्यमेकमचिन्तयम् ।
मत्पितामहगेहे तु न्यासभूतमिदं धनुः ॥ ६८ ॥

ईश्वरेण पुरा क्षिप्तं पुरदाहादनन्तरम् ।
धनुरेतत्पणं कार्यमिति चिन्त्य कृतं तथा ॥ ६९ ॥

सीतापाणिग्रहार्थाय सर्वेषां माननाशनम् ।
त्वत्प्रसादान्मुनिश्रेष्ठ रामो राजीवलोचनः ॥ ७० ॥

आगतोऽत्र धनुर्द्रष्टुं फलितो मे मनोरथः ।
अद्य मे सफलं जन्म राम त्वां सह सीतया ॥ ७१ ॥

जनक म्हणाले- "एकदा यज्ञभूमीच्या शुद्धीसाठी मी जमीन नांगरीत असताना, शुभ लक्षणे असणारी ही चंद्रवदना कन्या सीता नांगराच्या अग्रभागातून उत्पन्न झाली आहे. (५९)

त्या वेळी प्रेमामुळे माझ्या मनात तिच्याविषयी माझी कन्या असा भाव उत्पन्न झाला. तेव्हा शरद् ऋतूतील चंद्राप्रमाणे मुख असणाऱ्या या सीतेला मी माझ्या प्रिय पत्नीच्या स्वाधीन केले. (६०)

एकदा मी जेव्हा एकांत स्थानी बसलो होतो त्या वेळी आपली महती नावाची वीणा वाजवीत आणि मुखाने सर्वव्यापक नारायणाचे गुण गात महर्षी नारद माझ्याजवळ आले. (६१)

आदर-सत्कार झाल्यावर प्रसन्नतेने ते बसले आणि मला म्हणाले, "हे राजा, तुझ्या अभ्युदयाचे कारण असणारे हे परम गुह्य वचन ऐका. (६२)

भक्तांवर अनुग्रह करण्याच्या इच्छेने, देवांचे कार्य सिद्ध करण्यासाठी व रावणाचा वध करण्यासाठी परमात्मा हृषीकेश माया-मानव वेष धारण करून जन्माला आले आहेत आणि ते राम या नावाने विख्यात आहेत. ते परमेश्वर आपल्या चार अंशांनी दशरथाचे पुत्र होऊन अयोध्येत राहात आहेत. (६३-६४)

तसेच परमेश्वराची योगमाया हीसुद्धा सीता या रूपाने तुमच्या घरी जन्माला आली आहे. म्हणून तुम्ही प्रयत्नपूर्वक ही सीता श्रीरामांनाच द्या. अन्य कुणालाही देऊ नका. कारण ही सीता पूर्वीपासून परमात्म्या रामांची भार्या आहे." असे सांगून देवर्षी नारद आकाश मार्गाने निघून गेले. (६५-६६)

तेव्हापासून ही सीता म्हणजे भगवान विष्णूंची भार्या लक्ष्मी आहे असेच मी समजत आहे. ही शुभलक्षणा जानकी कशा प्रकारे रघुनाथांना देता येईल या विचारात मी गुंतलो असताना, मी एक युक्ती लढविली. पूर्वी श्रीमहादेवाने त्रिपुरासुराची पुरे जाळल्यावर हे धनुष्य माझ्या आजोबांच्या घरी ठेव म्हणून ठेवले होते. सीतेच्या पाणिग्रहणासाठी, सर्वांचा गर्वहरण करणारे हे धनुष्यच पण म्हणून ठेवावयास हवे, असा विचार मी केला. हे मुनिश्रेष्ठा, तुमच्या कृपेने कमलनयन राम हे धनुष्य पाहण्यास येथे आले; यामुळे माझा मनोरथ सिद्ध झाला. हे रामा, सूर्याप्रमाणे देदीप्यमान अशा तुम्हांला सीतेबरोबर एकाच आसनावर

एकासनस्थं पश्यामि भ्राजमानं रविं यथा ।
त्वत्पादाम्बुधरो ब्रह्मा सृष्टिचक्रप्रवर्तकः ॥ ७२ ॥

बलिस्त्वत्पादसलिलं धृत्वाभूद्दिविजाधिपः ।
त्वत्पादपांसुसंस्पर्शादहल्या भर्तृशापतः ॥ ७३ ॥

सद्य एव विनिर्मुक्ता कोन्यस्त्वत्तोऽधिरक्षिता ॥ ७४ ॥
यत्पादपङ्कजपरागसुरागयोगि-
वृन्दैर्जितं भवभयं जितकालचक्रैः ।
यन्नामकीर्तनपरा जितदुःखशोका
देवास्तमेव शरणं सततं प्रपद्ये ॥ ७५ ॥

इति स्तुत्वा नृपः प्रादाद्घाघवाय महात्मने ।
दीनाराणां कोटिशतं रथानामयुतं तदा ॥ ७६ ॥

अश्वानां नियुतं प्रादाद्गजानां षट्शतं तथा ।
पत्तीनां लक्षमेकं तु दासीनां त्रिंशतं ददौ ॥ ७७ ॥

दिव्याम्बराणि हारांश्च मुक्तारत्नमयोज्ज्वलान् ।
सीतायै जनकः प्रादात्प्रीत्या दुहितृवत्सलः ॥ ७८ ॥

वसिष्ठादीन्सुसंपूज्य भरतं लक्ष्मणं तथा ।
पूजयित्वा यथान्यायं तथा दशरथं नृपम् ॥ ७९ ॥

प्रस्थापयामास नृपो राजानं रघुसत्तमम् ।
सीतामालिङ्ग्य रुदतीं मातरः साश्रुलोचनाः ॥ ८० ॥

श्वश्रूशुश्रूषणपरा नित्यं राममनुव्रता ।
पातिव्रत्यमुपालम्भ्य तिष्ठ वत्से यथासुखम् ॥ ८१ ॥

प्रयाणकाले रघुनन्दनस्य
भेरीमृदङ्गानकतूर्यघोषः ।
स्वर्वासिभेरीघनतूर्यशब्दैः
संमूर्च्छितो भूतभयङ्करोऽभूत् ॥ ८२ ॥

विराजमान झालेले पाहून, आज माझा जन्म सफळ झाला. हे रामा, तुमचे चरणोदक मस्तकावर धारण करूनच ब्रह्मदेव हा सृष्टिचक्राचा प्रवर्तक झाला आहे. (६७-७२)

तुमच्या चरणोदकाच्या सामर्थ्याने बलीला इंद्रपद प्राप्त झाले आणि तुमच्या चरण-धुळीच्या स्पर्शाने अहल्या तत्काळच पतीच्या शापातून मुक्त झाली, तुमच्यापेक्षा दुसरा असा कोण बरे आमचा रक्षक आहे? (७३-७४)

कालचक्र जिंकणाऱ्या योग्यांच्या समूहांनी तुमच्या पादकमलांच्या परागावर अतिशय प्रेम करून संसाराचे भय सुद्धा जिंकले आहे, तसेच ज्यांच्या नामकीर्तनात तत्पर होऊन देवांनी दुःख आणि शोक जिंकले आहेत, अशा त्या तुमच्या चरणी मी निरंतर शरण आलो आहे." (७५)

अशा प्रकारे श्रीरामांची स्तुती करून, शंभर कोटी सुवर्ण मुद्रा, दहा हजार रथ, दहा लक्ष घोडे, सहाशे हत्ती, एक लक्ष पायदळ सैन्य आणि तीनशे दासी जनक महाराजांनी महात्म्या श्रीरामांना दिल्या. (७६-७७)

अनेक दिव्य वस्त्रे तसेच मोती व रत्ने घालून तयार केलेले उज्वल हार कन्यावत्सल जनकांनी प्रेमाने सीतेला दिले. (७८)

त्यानंतर वसिष्ठ इत्यादींची व्यवस्थित पूजा केल्यावर, भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न, तसेच दशरथ राजा यांचा यथोचित सत्कार करून, जनक राजांनी रघुश्रेष्ठ महाराज दशरथाला निरोप दिला. त्या प्रसंगी रुदन करणाऱ्या सीतेला आलिंगन देऊन, डोळ्यांत अश्रू आलेल्या माता सीतेला म्हणाल्या. (७९-८०)

"मुली, सासूच्या सेवेत तत्पर होऊन तू सदा रामचंद्रांच्या मनाप्रमाणे वागून, पतिव्रता धर्माचा अवलंब करून आनंदात राहा." (८१)

त्यानंतर रघुकुलातील श्रीरघुनाथांच्या प्रयाणाचे वेळी तुताऱ्या, मृदंग, आनक इत्यादी वाद्यांचा घोष व स्वर्गात राहणाऱ्या देवतांनी वाजविलेल्या तुताऱ्या, मृदंग इत्यादींच्या आवाजात मिसळून वाढत गेला आणि त्या तुमुल ध्वनीमुळे सर्व प्राणी विस्मयचकित झाले. (८२)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे बालकाण्डे षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

सप्तम सर्ग

परशुरामांची भेट

श्रीमहादेव उवाच

अथ गच्छति श्रीरामे मैथिलाद्योजनत्रयम् ।
निमित्तान्यतिघोराणि ददर्श नृपसत्तमः ॥ १ ॥

नत्वा वसिष्ठं पप्रच्छ किमिदं मुनिपुङ्गव ।
निमित्तानीह दृश्यन्ते विषमाणि समन्ततः ॥ २ ॥

वसिष्ठस्तमथ प्राह भयमागामि सूच्यते ।
पुनरप्यभयं तेऽद्य शीघ्रमेव भविष्यति ॥ ३ ॥

मृगाः प्रदक्षिणं यान्ति पश्य त्वां शुभसूचकाः ।
इत्येवं वदतस्तस्य ववौ घोरतरोऽनिलः ॥ ४ ॥

मुष्णंश्चक्षूंषि सर्वेषां पांसुवृष्टिभिरर्दयन् ।
ततो व्रजन्ददर्शाग्रे तेजोराशिमुपस्थितम् ॥ ५ ॥

कोटिसूर्यप्रतीकाशं विद्युत्पुञ्जसमप्रभम् ।
तेजोराशिं ददर्शाथ जामदग्न्यं प्रतापवान् ॥ ६ ॥

नीलमेघनिभं प्रांशुं जटामण्डलमण्डितम् ।
धनुःपरशुपाणिं च साक्षात्कालमिवान्तकम् ॥ ७ ॥

कार्तवीर्यान्तकं रामं दृप्तक्षत्रियमर्दनम् ।
प्राप्तं दशरथस्याग्रे कालमृत्युमिवापरम् ॥ ८ ॥

तं दृष्ट्वा भयसन्त्रस्तो राजा दशरथस्तदा ।
अर्घ्यादिपूजां विस्मृत्य त्राहि त्राहीति चाब्रवीत् ॥ ९ ॥

दण्डवत्प्रणिपत्याह पुत्रप्राणं प्रयच्छ मे ।
इति ब्रुवन्तं राजानमनादृत्य रघूत्तमम् ॥ १० ॥

उवाच निष्ठुरं वाक्यं क्रोधात्प्रचलितेन्द्रियः ।
त्वं राम इति नाम्ना मे चरसि क्षत्रियाधम ॥ ११ ॥

श्रीमहादेव म्हणाले – श्रीरामचंद्र मिथिला नगरीपासून तीन योजने दूर गेले असता, नृपश्रेष्ठ दशरथांना अतिशय घोर असे अपशकुन दिसू लागले. (१)

तेव्हा वसिष्ठांना प्रणाम करून त्यांनी विचारले, "अहो मुनिश्रेष्ठ, काय आहे हे ? येथे चारी बाजूंना भयंकर अपशकुन दिसून येत आहेत." (२)

तेव्हा वसिष्ठ म्हणाले, "या अपशकुनांनी कोणते तरी आगामी भय दर्शविले जात आहे. तरीपण लौकरच तुम्हांला पुनः अभय प्राप्त होईल. (३)

कारण शुभ सुचविणारे मृग हे तुमच्या उजव्या बाजूने जात आहेत." वसिष्ठ असे बोलत आहेत तोच फार भयंकर असा वारा वाहू लागला. (४)

त्या वाऱ्याने सर्वांना त्रस्त केले. धुळीचा वर्षाव करीत त्या वाऱ्याने सर्वांचे डोळे मिटावयास लावले. त्यानंतर दशरथ पुढे जात असतानाच एक तेजोगोल समोरून येत असलेला त्यांना दिसला. (५)

त्यानंतर कोटिसूर्याप्रमाणे तेजस्वी, विजेच्या पुंजाप्रमाणे कांतिमय, तेजाने संपन्न, निळ्या मेघाप्रमाणे तेज असणारे, उंच, जटाजूटाने विभूषित, हातामध्ये धनुष्य आणि परशू धारण करणारे, प्राण्यांचा नाश करणाऱ्या साक्षात् काळाप्रमाणे भासणारे, असे जमदग्निपुत्र परशुराम येत आहेत, असे त्या प्रतापी दशरथ राजांना समोर दिसले. कार्तवीर्य अर्जुनाचा वध करणारे, गर्विष्ठ क्षत्रियांच्या अभिमानाचे मर्दन करणारे, जणू दुसऱ्या यमराजाप्रमाणे असणारे, अशा जमदग्निनंदन परशुरामांना पराक्रमी दशरथांनी पाहिले. (६-८)

त्यांना पाहताच महाराज दशरथ भयभीत झाले. आणि अर्घ्य इत्यादींनी त्याची पूजा करण्याचे विसरून जाऊन, 'रक्षण करा, रक्षण करा,' असे म्हणू लागले. दंडवत प्रणाम करून ते म्हणाले, "माझ्या पुत्राचे रक्षण करा." अशी प्रार्थना करणाऱ्या त्या राजाकडे मुळीच लक्ष न देता, क्रोधाने ज्यांचे अंग थरथरत आहे असे परशुराम रघुश्रेष्ठ श्रीरामचंद्रांना निष्ठुरपणे म्हणाले, "अरे अधम क्षत्रिया, तू राम या माझ्याच नावाने व्यवहार करीत आहेस. (९-११)

द्वन्द्वयुद्धं प्रयच्छाशु यदि त्वं क्षत्रियोऽसि वै ।
पुराणं जर्जरं चापं भङ्क्त्वा त्वं कत्थसे मुधा ॥ १२ ॥

अस्मिंस्तु वैष्णवे चाप आरोपयसि चेद्गुणम् ।
तदा युद्धं त्वया सार्धं करोमि रघुवंशज ॥ १३ ॥

नो चेत्सर्वान्हनिष्यामि क्षत्रियान्तकरो ह्यहम् ।
इति ब्रुवति वै तस्मिंश्चचाल वसुधा भृशम् ॥ १४ ॥

अन्धकारो बभूवाथ सर्वेषामपि चक्षुषाम् ।
रामो दाशरथिर्वीरो वीक्ष्य तं भार्गवं रुषा ॥ १५ ॥

धनुराच्छिद्य तद्धस्तादारोप्य गुणमञ्जसा ।
तूणीराद्बाणमादाय संधायाकृष्य वीर्यवान् ॥ १६ ॥

उवाच भार्गवं रामं शृणु ब्रह्मन्वचो मम ।
लक्ष्यं दर्शय बाणस्य ह्यमोघो मम सायकः ॥ १७ ॥

लोकान्पादयुगं वापि वद शीघ्रं ममाज्ञया ।
अयं लोकः परो वाथ त्वया गन्तुं न शक्यते ॥ १८ ॥

एवं त्वं हि प्रकर्तव्यं वद शीघ्रं ममाज्ञया ।
एवं वदति श्रीरामे भार्गवो विकृताननः ॥ १९ ॥

संस्मरन्पूर्ववृत्तान्तमिदं वचनमब्रवीत् ।
राम राम महाबाहो जाने त्वां परमेश्वरम् ॥ २० ॥

पुराणपुरुषं विष्णुं जगत्सर्गलयोद्भवम् ।
बाल्येऽहं तपसा विष्णुमाराधयितुमञ्जसा ॥ २१ ॥

चक्रतीर्थं शुभं गत्वा तपसा विष्णुमन्वहम् ।
अतोषयं महात्मानं नारायणमनन्यधीः ॥ २२ ॥

ततः प्रसन्नो देवेशः शङ्खचक्रगदाधरः ।
उवाच मां रघुश्रेष्ठ प्रसन्नमुखपङ्कजः ॥ २३ ॥

तेव्हा जर तू खरा क्षत्रिय असशील तर चट्दिशी माझ्याबरोबर द्वंद्वयुद्ध कर. एक जुने-पुराणे, जीर्ण-शीर्ण धनुष्य तोडून तू उगाच प्रौढी मिरवत आहेस. हे राघवा, जर या वैष्णव धनुष्याला तू दोरी लावलीस, तर मी तुझ्याबरोबर युद्ध करीन.नाहीतर मी आताच तुम्हां सर्वांना ठार करीन. कारण मी क्षत्रियांचा अंत करणारा आहे." परशुराम असे बोलत असता, पृथ्वी चळचळा कापू लागली आणि सर्वांच्या डोळ्यापुढे अंधकार पसरला. तेव्हा दशरथ-नंदन, वीरश्रेष्ठ, रामांनी परशुरामांकडे रागाने पाहिले आणि त्यांच्या हातातून धनुष्य हिसकावून घेतले, सहजपणे त्याच्यावर दोरी चढविली, भात्यांतून एक बाण घेतला, तो धनुष्याला जोडला, आणि मग दोरी खेचून पराक्रमी श्रीराम भृगुनंदन परशुरामाला म्हणाले, "अरे ब्राह्मणा, माझे वचन ऐका. माझा बाण हा अमोघ आहे; त्या बाणाचे लक्ष्य दाखवा. (१२-१७)

आपल्या पुण्याने जिंकलेले लोक अथवा तुमचे दोन चरण यांपैकी एक, बाणाचे लक्ष्य म्हणून माझ्या आज्ञेने ताबडतोब सांगा. त्याचा वेध मी या बाणाने करीन. त्यामुळे तुम्ही इहलोकी व परलोकी कोठेही जाऊ शकणार नाही. (१८)

मी तुमच्याबरोबर कसे वागावे हे आता तुम्ही चट्कन माझ्या आज्ञेने मला सांगा." रामचंद्र असे बोलत असतानाच भृगुनंदन परशुरामाचे मुख निस्तेज झाले. (१९)

मग पूर्वीच्या वृत्तांताचे स्मरण करीत ते बोलले, "अहो रामा, अहो महाबाहो, तुम्ही परमेश्वर आहात हे मला आता कळले आहे. (२०)

विश्वाची उत्पत्ती, स्थिती व प्रलय यांचे कारण असणारे पुराण पुरुष भगवान विष्णू तुम्ही आहात. बालपणी मी भगवान विष्णूंची तपाने आराधना करण्यासाठी पवित्र अशा चक्रतीर्थावर गेलो होतो. तेथे दररोज अनन्य बुद्धीने मी तप करीत असता परमात्मा नारायणांना मी संतुष्ट केले. (२१-२२)

त्या वेळी हे रघुश्रेष्ठा, शंख, चक्र व गदा धारण करणाऱ्या आणि प्रसन्न मुखकमल असणाऱ्या देवेश्वर विष्णूंनी प्रसन्न होऊन मला सांगितले. (२३)

श्रीभगवानुवाच

उत्तिष्ठ तपसो ब्रह्मन्फलितं ते तपो महत् ।
मच्चिदंशेन युक्तस्त्वं जहि हैहयपुङ्गवम् ॥ २४ ॥

कार्तवीर्यं पितृहणं यदर्थं तपसः श्रमः ।
ततस्त्रिःसप्तकृत्वस्त्वं हत्वा क्षत्रियमण्डलम् ॥ २५ ॥

कृत्स्नां भूमिं कश्यपाय दत्त्वा शान्तिमुपावह ।
त्रेतामुखे दाशरथिर्भूत्वा रामोऽहमव्ययः ॥ २६ ॥

उत्पत्स्ये परया शक्त्या तदा द्रक्ष्यसि मां ततः ।
मत्तेजः पुनरादास्ये त्वयि दत्तं मया पुरा ॥ २७ ॥

तदा तपश्चरँल्लोके तिष्ठ त्वं ब्रह्मणो दिनम् ।
इत्युक्त्वान्तर्दधे देवस्तथा सर्वं कृतं मया ॥ २८ ॥

स एव विष्णुस्त्वं राम जातोऽसि ब्रह्मणार्थितः ।
मयि स्थितं तु त्वत्तेजस्त्वयैव पुनराहृतम् ॥ २९ ॥

अद्य मे सफलं जन्म प्रतीतोऽसि मम प्रभो ।
ब्रह्मादिभिरलभ्यस्त्वं प्रकृतेः पारगो मतः ॥ ३० ॥

त्वयि जन्मादिषड्भावा न सन्त्यज्ञानसंभवाः ।
निर्विकारोऽसि पूर्णस्त्वं गमनादिविवर्जितः ॥ ३१ ॥

यथा जले फेनजालं धूमो वह्नौ तथा त्वयि ।
त्वदाधारा त्वद्विषया माया कार्यं सृजत्यहो ॥ ३२ ॥

यावन्मायावृता लोकास्तावत्त्वां न विजानते ।
अविचारितसिद्धैषाऽविद्या विद्याविरोधिनी ॥ ३३ ॥

अविद्याकृतदेहादिसङ्घाते प्रतिबिम्बिता ।
चिच्छक्तिर्जीवलोकेस्मिन् जीव इत्यभिधीयते ॥ ३४ ॥

श्रीभगवान् म्हणाले – "हे ब्राह्मणा, तपस्या सोडून तू आता ऊठ. तुझे महान तप सफल झाले आहे. माझ्या चैतन्याच्या अंशाने तू युक्त झालास. ज्याच्यासाठी हे तप करण्याचे श्रम तू घेतले आहेस, त्या तुझ्या पित्याचा घात करणाऱ्या हैहयश्रेष्ठ कार्तवीर्याचा वध कर; त्यानंतर एकवीस वेळा सर्व क्षत्रियांना ठार करून, संपूर्ण पृथ्वी कश्यपाला दान देऊन, शांती धारण कर. अविनाशी परमात्मा असा मी त्रेतायुगाच्या प्रारंभी दशरथाचा पुत्र होऊन राम या नावाने जन्मास येईन. त्या वेळी सीता या माझ्या शक्तीसह मला तू पाहाशील. त्यानंतर पूर्वी तुला दिलेले माझे तेज मी पुनः तुझ्याकडून परत घेईन. नंतर तू तपस्या करीत ब्रह्मदेवाच्या एका दिवसापर्यंत-कल्पांतापर्यंत- या पृथ्वीवर राहा," असे सांगून ते भगवान विष्णू अंतर्धान पावले आणि मग त्यांनी जसे सांगितले होते, तसेच मी केले. (२४-२८)

हे रामा, ते विष्णू तुम्ही आहात. ब्रह्मदेवाच्या प्रार्थनेला अनुसरून, तुम्ही जन्माला आलेले आहात. तुमचे जे तेज माझ्या ठिकाणी होते ते तुम्हीच आज परत घेतले आहे. (२९)

हे प्रभू, तुम्हांला विष्णूच्या रूपात मी ओळखले आहे. म्हणून आज माझा जन्म सफल झाला आहे. ब्रह्मदेव इत्यादींना तुम्ही अप्राप्य आहात आणि प्रकृतीच्या पलीकडे आहात, असे मानले जाते. (३०)

अज्ञानामुळे निर्माण होणारे जन्म इत्यादी सहा विकार तुमच्या ठिकाणी नाहीत. तुम्ही गमन इत्यादींनी रहित, विकारांनी रहित आणि पूर्ण आहात. (३१)

अहो आश्चर्य! पाण्यापासून पाण्यावर जसा फेसाचा समूह, अग्नीपासून अग्नीवर जसा धूर उत्पन्न होतो आणि त्यालाच झाकून टाकतो, त्याप्रमाणे तुमच्याच आधाराने असणारी माया तुम्हांला विषय करून, नाना प्रकारची विचित्र कार्ये निर्माण करते आणि तुमच्या खऱ्या स्वरूपाला झाकते. जोपर्यंत माणसे मायेने झाकलेली असतात, तोपर्यंत ती तुम्हांला जाणत नाहीत. अविवेकामुळे उत्पन्न झालेली ही अविद्या विद्येला विरोधी आहे. जोपर्यंत विचार केला जात नाही तोपर्यंत ती अविद्या टिकून राहाते. (३२-३३)

अविद्येने निर्माण झालेल्या देह इत्यादींच्या संघातामध्ये प्रतिबिंबित झालेल्या चित्-शक्तीला या जीवलोकात जीव असे म्हटले जाते. (३४)

यावद्देहमनःप्राणबुद्ध्यादिष्वभिमानवान् ।
तावत्कर्तृत्वभोक्तृत्वसुखदुःखादिभाग्भवेत् ॥ ३५ ॥

जोपर्यंत हा जीव, मन, प्राण, बुद्धी इत्यादींच्या बद्दल अभिमान धारण करतो, तोपर्यंत तो कर्तृत्व, भोक्तृत्व, सुख, दुःख इत्यादी भोगतो. (३५)

आत्मनः संसृतिर्नास्ति बुद्धेर्ज्ञानं न जात्विति ।
अविवेकाद्द्वयं युङ्क्त्वा संसारीति प्रवर्तते ॥ ३६ ॥

वास्तविक पाहता आत्म्याला जन्म, मरण इत्यादी संसार कोणत्याही अवस्थेत असत नाही आणि बुद्धी ही अविद्येचे कार्य असल्यामुळे तिच्या ठिकाणीसुद्धा ज्ञान-शक्ती असत नाही. अविवेकाने ते दोन्ही एकत्र करून, 'मी संसारी आहे', असे मानून जीव कर्मे करण्यास प्रवृत्त होतो. (३६)

जडस्य चित्समायोगाच्चित्त्वं भूयाच्चितेस्तथा ।
जडसङ्गाज्जडत्वं हि जलाग्न्योर्मेलनं यथा ॥ ३७ ॥

पाणी आणि अग्नी यांचा संयोग झाला असता ज्या प्रमाणे पाण्यात उष्णता येते आणि अग्नी शांत होतो, त्या प्रमाणे जडबुद्धीचा चेतन आत्म्याशी संयोग झाला असताना, बुद्धीमध्ये चेतना येते आणि चेतन आत्म्याचा जड बुद्धीशी संयोग झाला असताना त्या चेतन आत्म्याचे ठिकाणी (कर्तृत्व, भोक्तृत्व इत्यादी) जडत्व प्रकट होते. (३७)

यावत्त्वत्पादभक्तानां सङ्गसौख्यं न विन्दति ।
तावत्संसारदुःखौघान्न निवर्तेन्नरः सदा ॥ ३८ ॥

हे रामा, जोपर्यंत मनुष्य तुमच्या चरणकमळी स्थित भक्तांच्या संगतीचे सौख्य निरंतर प्राप्त करून घेत नाही, तोपर्यंत तो संसारातील दुःखसमूहातून सुटत नाही. (३८)

तत्सङ्गलब्धया भक्त्या यदा त्वां समुपासते ।
तदा माया शनैर्याति तानवं प्रतिपद्यते ॥ ३९ ॥

जेव्हा तुमच्या भक्तांच्या संगतीने प्राप्त झालेल्या भक्तीमुळे मनुष्य तुमची उपासना करतो, तेव्हा तुमची माया हळूहळू निघून जाऊन ती क्षीण होऊन जाते. (३९)

ततस्त्वज्ज्ञानसम्पन्नः सद्गुरुस्तेन लभ्यते ।
वाक्यज्ञानं गुरोर्लब्ध्वा त्वत्प्रसादाद्विमुच्यते ॥ ४० ॥

मग त्या साधकाला तुमच्या ज्ञानाने संपन्न अशा सद्गुरूची प्राप्ती होते आणि त्या सद्गुरुदेवाकडून महावाक्याचे ज्ञान मिळाल्यावर, तो तुमच्या कृपेने मुक्त होतो. (४०)

तस्मात्त्वद्भक्तिहीनानां कल्पकोटिशतैरपि ।
न मुक्तिश्चाङ्गा विज्ञानशङ्का नैव सुखं तथा ॥ ४१ ॥

म्हणून तुमच्या भक्तीने रहित अशा पुरुषांना शेकडो कोटी कल्पांमध्येसुद्धा मुक्ती मिळणे अथवा ब्रह्मज्ञान प्राप्त होणे हे संभवनीय नाही आणि म्हणून त्यांना वास्तविक सुख प्राप्त होणे हेसुद्धा संभवनीय नाही. (४१)

अतस्त्वत्पादयुगले भक्तिर्मे जन्मजन्मनि ।
स्यात्त्वद्भक्तिमतां सङ्गोऽविद्या याभ्यां विनश्यति ॥ ४२ ॥

म्हणून तुमच्या चरणयुगलांवर माझी जन्मोजन्मी भक्ती असू दे. तसेच तुमच्या भक्तांची संगती मला मिळू दे. कारण या दोन्ही साधनांनी अविद्या नष्ट होते. (४२)

लोके त्वद्भक्तिनिरतास्त्वद्धर्मामृतवर्षिणः ।
पुनन्ति लोकमखिलं किं पुनः स्वकुलोद्भवान् ॥ ४३ ॥

जगात तुमच्या भक्तीमध्ये तत्पर आणि भगवद् धर्म-रूपी अमृताचा वर्षाव करणारे तुमचे भक्त हे संपूर्ण जगाला पवित्र करतात; मग त्यांच्या स्वतःच्या कुळात उत्पन्न झालेल्या माणसांविषयी काय सांगावे ? (४३)

नमोऽस्तु जगतां नाथ नमस्ते भक्तिभावन ।
नमः कारुणिकानन्त रामचन्द्र नमोऽस्तु ते ॥ ४४ ॥

हे जगन्नाथा, तुम्हांला नमस्कार असो. हे भक्ति-भावना, तुम्हांला नमस्कार असो. हे करुणामया, हे अनंता, तुम्हांला नमस्कार असो. हे रामचंद्रा, तुम्हांला नमस्कार असो. (४४)

देव यद्यत्कृतं पुण्यं मया लोकजिगीषया ।
तत्सर्वं तव बाणाय भूयाद्राम नमोऽस्तु ते ॥ ४५ ॥

ततः प्रसन्नो भगवान् श्रीरामः करुणामयः ।
प्रसन्नोऽस्मि तव ब्रह्मन्यत्ते मनसि वर्तते ॥ ४६ ॥

दास्ये तदखिलं कामं मा कुरुष्वात्र संशयम् ।
ततः प्रीतेन मनसा भार्गवो राममब्रवीत् ॥ ४७ ॥

यदि मेऽनुग्रहो राम तवास्ति मधुसूदन ।
त्वद्भक्तसङ्गस्त्वत्पादे दृढा भक्तिः सदास्तु मे ॥ ४८ ॥

स्तोत्रमेतत्पठेद्यस्तु भक्तिहीनोऽपि सर्वदा ।
त्वद्भक्तिस्तस्य विज्ञानं भूयादन्ते स्मृतिस्तव ॥ ४९ ॥

तथेति राघवेणोक्तः परिक्रम्य प्रणम्य तम् ।
पूजितस्तदनुज्ञातो महेन्द्राचलमन्वगात् ॥ ५० ॥

राजा दशरथो हृष्टो रामं मृतमिवागतम् ।
आलिङ्ग्यालिङ्ग्य हर्षेण नेत्राभ्यां जलमुत्सृजत् ॥ ५१ ॥

ततः प्रीतेन मनसा स्वस्थचित्तः पुरं ययौ ।
रामलक्ष्मणशत्रुघ्नभरता देवसंमिताः ।
स्वां स्वां भार्यामुपादाय रेमिरे स्वस्वमन्दिरे ॥ ५२ ॥

मातापितृभ्यां संहृष्टो रामः सीतासमन्वितः ।
रेमे वैकुण्ठभवने श्रिया सह यथा हरिः ॥ ५३ ॥

युधाजिन्नाम कैकेयीभ्राता भरतमातुलः ।
भरतं नेतुमागच्छत्स्वराज्यं प्रीतिसंयुतः ॥ ५४ ॥

प्रेषयामास भरतं राजा स्नेहसमन्वितः ।
शत्रुघ्नं चापि संपूज्य युधाजितमरिन्दमः ॥ ५५ ॥

हे देवा, पुण्यलोकांच्या प्राप्तीसाठी जे काही पुण्यकर्म मी केले आहे, ते सर्व तुमच्या बाणांचे लक्ष्य होऊ दे. हे रामा, तुम्हांला नमस्कार असो." (४५)

तेव्हा करुणामय भगवान श्रीरामचंद्रांनी प्रसन्न होऊन म्हटले, "अरे ब्राह्मणा, मी तुमच्यावर प्रसन्न आहे. तुमच्या मनात ज्या ज्या इच्छा आहेत त्या सर्व इच्छा मी पूर्ण करीन. या बाबतीत तुम्ही मुळीच संशय धरू नका." तेव्हा आनंदित मनाने परशुराम श्रीरामांना म्हणाले. (४६-४७)

"हे मधुसूदना, रामा, जर तुमची माझ्यावर कृपा असेल, तर मला सदा तुमच्या भक्तांची संगती प्राप्त होवो आणि तुमच्या चरणकमळांवर माझी सुदृढ भक्ती असू दे. (४८)

तसेच एखादा पुरुष भक्ति-रहित असूनसुद्धा तो जर या स्तोत्राचे पठन करील, तर त्याला सर्वदा तुमची भक्ती प्राप्त होवो, तसेच त्याला ज्ञान प्राप्त होवो आणि त्याला अंतकाळी तुमची स्मृती राहो." (४९)

त्यानंतर "असेच होऊ दे" असे रघुनाथांनी म्हटल्यावर, परशुरामांनी श्रीरामांना प्रदक्षिणा घालून त्यांना नमस्कार केला आणि त्यांच्याकडून सन्मानित झाल्यावर, त्यांच्याच आज्ञेने ते महेंद्र पर्वताकडे निघून गेले. (५०)

श्रीराम जणू मृत्यु-मुखातून परत आले असे समजून राजा दशरथांनी अत्यंत हर्षाने रामांना वारंवार आलिंगन दिले. तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. (५१)

त्यानंतर स्वस्थ चित्त झालेले दशरथ आनंदित मनाने अयोध्या नगरीला गेले. तेथे पोचल्यावर राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न हे आपापल्या भार्यांसह आपापल्या महालात देवांप्रमाणे रमू लागले. (५२)

ज्या प्रमाणे वैकुंठ लोकात भगवान विष्णू लक्ष्मीसह रमतात, त्या प्रमाणेच आपल्या माता-पित्यांचा आनंद वाढवीत श्रीरामचंद्र सीतेसह रमू लागले. (५३)

काही काळानंतर युधाजित् नावाचा कैकेयीचा भाऊ,- भरताचा मामा- हा प्रेमाने भरताला आपल्या राज्यात नेण्यासाठी आला. (५४)

शत्रूचे दमन करणाऱ्या महाराज दशरथांनी प्रेमपूर्वक युधाजिताचा सत्कार करून भरत आणि शत्रुघ्न या दोघांना त्याच्याबरोबर पाठवून दिले. (५५)

कौसल्या शुशुभे देवी रामेण सह सीतया।
देवमातेव पौलोम्या शच्या शक्रेण शोभना ॥ ५६ ॥
साकेते लोकनाथप्रथितगुणगणो
लोकसङ्गीतकीर्तिः
श्रीरामः सीतयास्तेऽखिलजननिकरा-
नन्दसन्दोहमूर्तिः ।
नित्यश्रीर्निर्विकारो निरवधिविभवो
नित्यमायानिरासो
मायाकार्यानुसारी मनुज इव सदा
भाति देवोऽखिलेशः ॥ ५७ ॥

इकडे ज्या प्रमाणे देवांची माता अदिती ही पुलोम-पुत्री शची आणि इंद्र यांसह शोभते त्याप्रमाणे राम व सीता यांच्यासह देवी कौसल्या शोभत होती. (५६)

ज्यांच्या गुणांचे समूह (ब्रह्मदेव इत्यादी) सर्व लोकपालांमध्ये प्रसिद्ध आहेत, ज्यांची कीर्ती सर्व लोकांमध्ये गाईली जात आहे, जे सर्व माणसांच्या आनंद -समूहाची मूर्ती आहेत, जे नित्य शोभाधाम आहेत, जे निर्विकार, आणि अनंत वैभवाने युक्त आहेत आणि जे सदा मायातीत असूनसुद्धा मायेच्या कार्याचे अनुसरण करीत असल्यामुळे नेहमी सामान्य माणसाप्रमाणे प्रतीत होतात, असे ते सर्वांचे स्वामी देव, भगवान राम हे सीतेसह अयोध्या नगरीत राहू लागले. (५७)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे बालकाण्डे सप्तमः सर्गः ॥ ७ ॥

बालकाण्ड समाप्त

अध्यात्मरामायण

अयोध्याकाण्ड

प्रथम सर्ग

भगवान श्रीरामांजवळ नारदांचे आगमन

श्रीमहादेव उवाच

एकदा सुखमासीनं रामं स्वान्तःपुराजिरे ।
सर्वाभरणसंपन्नं रत्नसिंहासने स्थितम् ॥ १ ॥

नीलोत्पलदलश्यामं कौस्तुभामुक्तकन्धरम् ।
सीतया रत्नदण्डेन चामरेणाथ वीजितम् ॥ २ ॥

विनोदयन्तं ताम्बूलचर्वणादिभिरादरात् ।
नारदोऽवतरद्द्रष्टुमम्बराद्यत्र राघवः ॥ ३ ॥

शुद्धस्फटिकसङ्काशः शरच्चन्द्र इवामलः ।
अतर्कितमुपायातो नारदो दिव्यदर्शनः ॥ ४ ॥

तं दृष्ट्वा सहसोत्थाय रामः प्रीत्या कृताञ्जलिः ।
ननाम शिरसा भूमौ सीतया सह भक्तिमान् ॥ ५ ॥

उवाच नारदं रामः प्रीत्या परमया युतः ।
संसारिणां मुनिश्रेष्ठ दुर्लभं तव दर्शनम् ।
अस्माकं विषयासक्तचेतसां नितरां मुने ॥ ६ ॥

अवाप्तं मे पूर्वजन्मकृतपुण्यमहोदयैः ।
संसारिणापि हि मुने लभ्यते सत्समागमः ॥ ७ ॥

अतस्त्वद्दर्शनादेव कृतार्थोऽस्मि मुनीश्वर ।
किं कार्यं ते मया कार्यं ब्रूहि तत्करवाणि भोः ॥ ८ ॥

अथ तं नारदोऽप्याह राघवं भक्तवत्सलम् ।
किं मोहयसि मां राम वाक्यैर्लोकानुसारिभिः ॥ ९ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, सर्व अलंकारांनी विभूषित श्रीरामचंद्र एके दिवशी आपल्या अंतःपुरातील अंगणात रत्नजडित सिंहासनावर सुखाने बसले होते. (१)

नीलकमळाप्रमाणे त्यांचा श्याम वर्ण होता व कौस्तुभ मणी त्यांच्या गळ्यांत शोभत होता. अशा रघुनाथांना श्रीसीता ही रत्नखचित दंडाच्या चवरीने वारा घालीत होती. आदरपूर्वक दिलेल्या तांबूलाचे चर्वण करीत श्रीराम सीतेला आनंदित करीत होते. त्या वेळी त्यांचे दर्शन घेण्यास, देवर्षी नारद आकाशातून खाली आले. (२-३)

शुद्ध स्फटिक मण्याप्रमाणे स्वच्छ आणि शरद ऋतूतील चंद्राप्रमाणे निर्मळ आणि दिव्य दृष्टी असणारे श्रीनारद अचानक तेथे आले. (४)

त्यांना पाहून भगवान श्रीराम लगबगीने उठून उभे राहिले आणि सीतेसह भक्तियुक्त होऊन रामांनी प्रेमाने हात जोडले आणि जमिनीवर मस्तक ठेवून नारदांना प्रणाम केला. (५)

परम प्रीतीने भगवान श्रीरामांनी नारदांना म्हटले, "हे मुनिश्रेष्ठा, विषयांमध्ये ज्यांची मने अतिशय आसक्त झाली आहेत, अशा आमच्यासारख्या संसारी माणसांना तुमचे दर्शन अत्यंत दुर्लभ आहे. हे मुने, मी पूर्व जन्मात केलेल्या पुण्याच्या संचयाचा उदय झाल्यामुळेच मला आज तुमचे दर्शन झाले आहे. कारण पुण्याचा उदय झाल्यावरच संसारी पुरुषांनासुद्धा सत्संगाचा लाभ होतो. (६-७)

म्हणून हे मुनीश्वरा, आज तुमच्या दर्शनानेच मी कृतार्थ होऊन गेलो आहे. आता तुमचे अभीष्ट कार्य मला सांगा. हे मुने, ते मी पूर्ण करतो." (८)

तेव्हा नारदांनी भक्तवत्सल भगवान श्रीरामांना सांगितले, "प्रभू रामा, सामान्य माणसांप्रमाणे बोलून तुम्ही मला का बरे मोहित करीत आहात ? (९)

संसार्यहमिति प्रोक्तं सत्यमेतत्त्वया विभो ।
जगतामादिभूता या सा माया गृहिणी तव ॥ १० ॥

हे विभो, मी संसारी आहे, असे जे तुम्ही म्हणालात, ते अगदी खरे आहे. कारण संपूर्ण जगताचे आदिकारण जी माया ती तुमची गृहिणी आहे. (१०)

त्वत्सन्निकर्षाज्जायन्ते तस्यां ब्रह्मादयः प्रजाः ।
त्वदाश्रया सदा भाति माया या त्रिगुणात्मिका ॥ ११ ॥

हे प्रभो, तुमच्या केवळ सान्निध्यानेच त्या मायेपासून ब्रह्मदेव इत्यादी सर्व प्रजा उत्पन्न होते. सत्त्व, रज आणि तम या त्रिगुणांनी युक्त जी माया आहे, ती तुमच्या आश्रयानेच सदा भासमान होते. (११)

सूतेऽजस्रं शुक्लकृष्णलोहिताः सर्वदा प्रजाः ।
लोकत्रयमहागेहे गृहस्थस्त्वमुदाहृतः ॥ १२ ॥

तसेच स्वगुणांना अनुसरून ती नेहमी शुक्ल, लाल आणि कृष्ण वर्ण असणारी प्रजा निर्माण करीत असते. त्रैलोक्याच्या समूहरूपी मोठ्या घरात तुम्हीच गृहस्थाश्रमी आहात, असे म्हटले जाते. (१२)

त्वं विष्णुर्जानकी लक्ष्मीः शिवस्त्वं जानकी शिवा ।
ब्रह्मा त्वं जानकी वाणी सूर्यस्त्वं जानकी प्रभा ॥ १३ ॥

तुम्ही भगवान विष्णू आहात आणि जानकी ही लक्ष्मी आहे. तुम्ही शंकर आहात तर जानकी ही पार्वती आहे. तुम्ही ब्रह्मदेव आहात आणि जानकी सरस्वती आहे. तुम्ही सूर्य आहात तर जानकी ही प्रभा आहे. तुम्ही चंद्र आहात तर शुभ लक्षणे असणारी जानकी ही रोहिणी आहे. तुम्ही इंद्र आहात आणि सीता ही पुलोमकन्या शची (इंद्राणी) आहे. तुम्ही अग्नी आहात तर सीता ही स्वाहा आहे. हे प्रभो, कालरूप असा सर्वांचा यम तुम्ही आहात तर सीता ही संयमिनी आहे. हे जगन्नाथा, तुम्ही निर्ऋती आहात तर मंगलस्वरूप असणारी जानकी ही तामसी आहे. हे श्रीरामा, तुम्हीच वरुण आहात आणि शुभ लक्षणांनी संपन्न जानकी ही भृगु-कन्या वारुणी आहे. हे श्रीरामा, तुम्ही वायू आहात तर सीता ही सदागती आहे , असे म्हटले जाते. हे रामा, तुम्ही कुबेर आहात तर सीता ही त्याची सर्व संपत्ती आहे. लोकांचा नाश करणारे रुद्र तुम्ही आहात तर जानकी ही रुद्राणी आहे. हे राघवा, या जगात जे जे काही पुरुषवाचक नाम असलेले आहे ते ते सर्व तुम्ही आहात आणि जे काही स्त्रीवाचक नाम असलेले आहे ते सर्व म्हणजे शुभ लक्षणांनी संपन्न अशी जानकी आहे, यात संशय नाही. म्हणून हे देवा, तिन्ही लोकांत तुम्हा दोघांखेरीज अन्य काहीही नाही. (१३-१९)

भवान् शशाङ्कः सीता तु रोहिणी शुभलक्षणा ।
शक्रस्त्वमेव पौलोमी सीता स्वाहानलो भवान् ॥ १४ ॥

यमस्त्वं कालरूपश्च सीता संयमिनी प्रभो ।
निर्ऋतिस्त्वं जगन्नाथ तामसी जानकी शुभा ॥ १५ ॥

राम त्वमेव वरुणो भार्गवी जानकी शुभा ।
वायुस्त्वं राम सीता तु सदागतिरितीरिता ॥१६ ॥

कुबेरस्त्वं राम सीता सर्वसंपत्प्रकीर्तिता ।
रुद्राणी जानकी प्रोक्ता रुद्रस्त्वं लोकनाशकृत् ॥ १७ ॥

लोके स्त्रीवाचकं यावत्तत्सर्वं जानकी शुभा ।
पुत्रामवाचकं यावत्तत्सर्वं त्वं हि राघव ॥ १८ ॥

तस्माल्लोकत्रये देव युवाभ्यां नास्ति किञ्चन ॥ १९ ॥

तुमच्या आभासामुळे उत्पन्न होणाऱ्या अज्ञानाला अव्याकृत असे म्हटले जाते. त्यापासून महत् हे तत्त्व, त्या महत्- तत्त्वापासून सूत्रात्मा म्हणजे हिरण्यगर्भ आणि त्या सूत्रात्म्यापासून सर्वात्मक लिंग देह उत्पन्न होतो. (२०)

त्वदाभासोदिताज्ञानमव्याकृतमितीर्यते ।
तस्मान्महांस्ततः सूत्रं लिङ्गं सर्वात्मकं ततः ॥ २० ॥

अहंकारश्च बुद्धिश्च पञ्चप्राणेन्द्रियाणि च ।
लिङ्गमित्युच्यते प्राज्ञैर्जन्ममृत्युसुखादिमत् ॥ २१ ॥

अहंकार, बुद्धी, पाच प्राण, दहा इंद्रिये यांच्या समूहालाच शहाणे लोक जन्म, मरण, सुख, दुःख इत्यादी धर्म असणारे लिंगशरीर असे म्हणतात. (२१)

स एव जीवसंज्ञश्च लोके भाति जगन्मयः ।
अवाच्यानाद्यविद्यैव कारणोपाधिरुच्यते ॥ २२ ॥

लिंग देहाचा अभिमानी या जगात जगव्यापक जीव या नावाने विख्यात आहे. अनिर्वचनीय आणि अनादी अशी अविद्या ही या जीवाची कारण उपाधी आहे, असे सांगितले जाते. (२२)

स्थूलं सूक्ष्मं कारणाख्यमुपाधित्रितयं चितेः ।
एतैर्विशिष्टो जीवः स्याद्वियुक्तः परमेश्वरः ॥ २३ ॥

शुद्ध चैतन्याला स्थूल, सूक्ष्म आणि कारण अशा तीन देहांच्या उपाधी आहेत. जीव या उपाधींनी युक्त आहे. या उपाधींनी रहित झाल्यावर तोच जीव परमेश्वर आहे, असे म्हटले जाते. (२३)

जाग्रत्स्वप्नसुषुप्त्याख्या संसृतिर्या प्रवर्तते ।
तस्या विलक्षणः साक्षी चिन्मात्रस्त्वं रघूत्तम ॥ २४ ॥

हे रघुश्रेष्ठा, जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती अशी जी तीन प्रकारची सृष्टी आहे, तिच्यापेक्षा तुम्ही संपूर्णपणे विलक्षण आहात. केवळ चैतन्यरूप असे तुम्ही तिचे साक्षी आहात. (२४)

त्वत्त एव जगज्जातं त्वयि सर्वं प्रतिष्ठितम् ।
त्वय्येव लीयते कृत्स्नं तस्मात्त्वं सर्वकारणम् ॥ २५ ॥

हे संपूर्ण जगत तुमच्यापासूनच निर्माण झाले आहे, ते तुमच्या ठिकाणी स्थित आहे आणि ते संपूर्णपणे तुमच्याच ठिकाणी लीन होऊन जाते. म्हणून तुम्हीच सर्वांचे कारण आहात. (२५)

रज्जावहिमिवात्मानं जीवं ज्ञात्वा भयं भवेत् ।
परात्माहमिति ज्ञात्वा भयदुःखैर्विमुच्यते ॥ २६ ॥

रज्जूच्या ठिकाणी दिसणाऱ्या सापाप्रमाणे स्वतःला जीव मानल्यामुळे मनुष्याला भय वाटते. परंतु 'मीच परमात्मा आहे,' असे जेव्हा माणूस जाणून घेतो तेव्हा संपूर्ण भय आणि दुःख यांतून मुक्त होऊन जातो. (२६)

चिन्मात्रज्योतिषा सर्वाः सर्वदेहेषु बुद्धयः ।
त्वया यस्मात्प्रकाश्यन्ते सर्वस्यात्मा ततो भवान् ॥२७॥

चिन्मात्र ज्योतिःस्वरूपाने तुम्ही सर्व देहांत राहून सर्व देहांतील सर्व बुद्धींना प्रकाशित करता, म्हणून तुम्हीच सर्वांचे आत्मा आहात. (२७)

अज्ञानान्न्यस्यते सर्वं त्वयि रज्जौ भुजङ्गवत् ।
त्वज्ज्ञानाल्लीयते सर्वं तस्माज्ज्ञानं सदाभ्यसेत् ॥ २८ ॥

रज्जूवर भासणाऱ्या सर्पाप्रमाणे, अज्ञानामुळे तुमच्या ठिकाणी सर्व जगाची कल्पना केली जाते. तुमचे ज्ञान झाल्यावर सर्व काही लीन होऊन जाते. म्हणून मनुष्याने नेहमी ज्ञान-प्राप्तीचा अभ्यास करावयास हवा. (२८)

त्वत्पादभक्तियुक्तानां विज्ञानं भवति क्रमात् ।
तस्मात्त्वद्भक्तियुक्ता ये मुक्तिभाजस्त एव हि ॥ २९ ॥

तुमच्या चरणकमळांवरील भक्तीने युक्त असणाऱ्या पुरुषांनाच क्रमाने ज्ञानाची प्राप्ती होते. म्हणून जे पुरुष तुमच्यावरील भक्तीने युक्त आहेत, तेच मुक्तीला पात्र आहेत. (२९)

अहं त्वद्भक्तभक्तानां तद्भक्तानां च किङ्करः ।
अतो मामनुगृह्णीष्व मोहयस्व न मां प्रभो ॥ ३० ॥

हे प्रभो, जे तुमच्या भक्तांचे भक्त आणि त्यांचेही भक्त आहेत, त्यांचा मी दास आहे. म्हणून मला मोहित न करता तुम्ही माझ्यावर अनुग्रह करा. (३०)

त्वन्नाभिकमलोत्पन्नो ब्रह्मा मे जनकः प्रभो ।
अतस्त्वाहं पौत्रोऽस्मि भक्तं मां पाहि राघव ॥ ३१ ॥

हे प्रभो, तुमच्या नाभिकमलातून उत्पन्न झालेला ब्रह्मदेव हा माझा पिता आहे. म्हणून मी तुमचा नातू आहे. हे राघवा, तुमचा भक्त असणाऱ्या माझे तुम्ही रक्षण करा." (३१)

इत्युक्त्वा बहुशो नत्वा स्वानन्दाश्रुपरिप्लुतः ।
उवाच वचनं राम ब्रह्मणा नोदितोऽस्म्यहम् ॥ ३२ ॥

रावणस्य वधार्थाय जातोऽसि रघुसत्तम ।
इदानीं राज्यरक्षार्थं पिता त्वामभिषेक्ष्यति ॥ ३३ ॥

यदि राज्याभिसंसक्तो रावणं न हनिष्यसि ।
प्रतिज्ञा ते कृता राम भूभारहरणाय वै ॥ ३४ ॥

तत्सत्यं कुरु राजेन्द्र सत्यसंधस्त्वमेव हि ।
श्रुत्वैतद्वदितं रामो नारदं प्राह सस्मितम् ॥ ३५ ॥

शृणु नारद मे किञ्चिद्विद्यतेऽविदितं क्वचित् ।
प्रतिज्ञातं च यत्पूर्वं करिष्ये तन्न संशयः ॥ ३६ ॥

किन्तु कालानुरोधेन तत्तत्प्रारब्धसंक्षयात् ।
हरिष्ये सर्वभूभारं क्रमेणासुरमण्डलम् ॥ ३७ ॥

रावणस्य विनाशार्थं श्वो गन्ता दण्डकाननम् ।
चतुर्दश समास्तत्र ह्युषित्वा मुनिवेषधृक् ॥ ३८ ॥

सीतामिषेण तं दुष्टं सकुलं नाशयाम्यहम् ।
एवं रामे प्रतिज्ञाते नारदः प्रमुमोद ह ॥ ३९ ॥

प्रदक्षिणत्रयं कृत्वा दण्डवत्प्रणिपत्य तम् ।
अनुज्ञातश्च रामेण ययौ देवगतिं मुनिः ॥ ४० ॥

संवादं पठति शृणोति संस्मरेद्वा
यो नित्यं मुनिवररामयोः स भक्त्या ।
संप्राप्नोत्यमरसुदुर्लभं विमोक्षं
कैवल्यं विरतिपुरःसरं क्रमेण ॥ ४१ ॥

अशा प्रकारे बोलून आणि वारंवार प्रणाम करून आनंदाश्रूंनी भरून येऊन नारदांनी पुढे म्हटले, "हे रामा, ब्रह्मदेवाच्या प्रेरणेने मी तुमच्याकडे आलो आहे. (३२)

हे रघुश्रेष्ठा, रावणाचा वध करण्यासाठी तुमचा अवतार झाला आहे. आता तुमचे पिता दशरथ राज्याच्या रक्षणासाठी तुमच्यावर राज्याभिषेक करणार आहेत. (३३)

हे श्रीरामा, जर तुम्ही राज्यामध्ये आसक्त होऊन, रावणाचा वध केला नाही तर भूमीचा भार हरण करण्याची जी प्रतिज्ञा तुम्ही केली होती, तिचे काय? (३४)

ती खरी करा. कारण हे राजेंद्रा, तुम्ही सत्यप्रतिज्ञ आहात." नारदांचे हे भाषण ऐकल्यावर श्रीरामचंद्र स्मित करून नारदांना म्हणाले. (३५)

"नारदमुनी, ऐका. अशी एखादी गोष्ट आहे का की जी मला ज्ञात नाही ? पूर्वी मी जी प्रतिज्ञा केली होती ती मी पूर्ण करीन, यात कोणताही संशय नको. (३६)

परंतु कालक्रमाने ज्यांचे प्रारब्ध क्षीण होईल, त्या सर्व असुरांना मारून पृथ्वीचा सर्व भार मी हरण करीन. (३७)

रावणाचा वध करण्यासाठी मी उद्याच दंडकारण्यात जाईन आणि तेथे मुनीचा वेष धारण करून चौदा वर्षे राहीन. (३८)

आणि मग सीतेला निमित्त करून मी त्या दुष्टांचा त्यांच्या कुळासह नाश करीन." श्रीरामचंद्रांनी अशी प्रतिज्ञा केल्यावर नारदांना अतिशय आनंद झाला. (३९)

त्यानंतर श्रीरामांना तीन प्रदक्षिणा घालून, दण्डवत प्रणाम करून व श्रीरामांची आज्ञा घेऊन नारद मुनी आकाश मार्गाने देवलोकात निघून गेले. (४०)

मुनिश्रेष्ठ नारद आणि रामचंद्र यांचा हा संवाद जो कोणी माणूस भक्तिपूर्वक वाचेल, ऐकेल किंवा स्मरण करील, तो वैराग्यपूर्वक देवांनाही अतिशय दुर्लभ असणारे कैवल्य रूपी मोक्षपद क्रमाक्रमाने प्राप्त करून घेईल. (४१)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे अयोध्याकाण्डे प्रथमः सर्गः ॥१॥

द्वितीय सर्ग

राज्याभिषेकाची तयारी व वसिष्ठ आणि रघुनाथ यांचा संवाद

श्रीमहादेव उवाच

अथ राजा दशरथः कदाचिद्रहसि स्थितः ।
वसिष्ठं स्वकुलाचार्यमाहूयेदमभाषत ॥ १ ॥

भगवन् राममखिलाः प्रशंसन्ति मुहुर्मुहुः ।
पौराश्च निगमा वृद्धा मन्त्रिणश्च विशेषतः ॥ २ ॥

ततः सर्वगुणोपेतं रामं राजीवलोचनम् ।
ज्येष्ठं राज्येऽभिषेक्ष्यामि वृद्धोऽहं मुनिपुङ्गव ॥ ३ ॥

भरतो मातुलं द्रष्टुं गतः शत्रुघ्नसंयुतः ।
अभिषेक्ष्ये श्च एवाशु भवांस्तच्चानुमोदताम् ॥ ४ ॥

सम्भाराः सम्भ्रियन्तां च गच्छ मन्त्रय राघवम् ।
उच्छ्रीयन्तां पताकाश्च नानावर्णाः समन्ततः ॥ ५ ॥

तोरणानि विचित्राणि स्वर्णमुक्तामयानि वै ।
आहूय मन्त्रिणं राजा सुमन्त्रं मन्त्रिसत्तमम् ॥ ६ ॥

आज्ञापयति यद्यत्त्वां मुनिस्तत्तत्समानय ।
यौवराज्येऽभिषेक्ष्यामि श्वोभूते रघुनन्दनम् ॥ ७ ॥

तथेति हर्षात्स मुनिं किं करोमीत्यभाषत ।
तमुवाच महातेजा वसिष्ठो ज्ञानिनां वरः ॥ ८ ॥

श्वः प्रभाते मध्यकक्षे कन्यकाः स्वर्णभूषिताः ।
तिष्ठन्तु षोडश गजः स्वर्णरत्नादिभूषितः ॥ ९ ॥

चतुर्दन्तः समायातु ऐरावतकुलोद्भवः ।
नानातीर्थोदकैः पूर्णाः स्वर्णकुम्भाः सहस्रशः ॥ १० ॥

स्थाप्यन्तां नववैयाघ्रचर्माणि त्रीणि चानय ।
श्वेतच्छत्रं रत्नदण्डं मुक्तामणिविराजितम् ॥ ११ ॥

श्रीमहादेव म्हणाले– नंतर एकदा एकांत स्थानी बसलेल्या राजा दशरथांनी आपल्या कुलपुरोहित वसिष्ठांना बोलावून घेऊन सांगितले. (१)

'हे भगवन्, सर्व नगरवासी लोक, वेदार्थ जाणणारे ज्ञानवृद्ध पुरुष आणि विशेषतः मंत्री-जन हे वारंवार रामाची प्रशंसा करतात. (२)

म्हणून हे मुनिश्रेष्ठा, सर्व-गुण-संपन्न आणि कमलनयन अशा माझ्या ज्येष्ठ पुत्र रामाला राज्यपदावर अभिषिक्त करावे, असा माझा विचार आहे. कारण आता मी वृद्ध झालो आहे. (३)

या वेळी शत्रुघ्नाबरोबर भरत हा आपल्या मामाला भेटण्यास गेला आहे. तरीसुद्धा उद्या लगेच रामाचा राज्याभिषेक करावा, अशी माझी इच्छा आहे. या बाबतीत तुम्ही आपली संमती द्यावी. (४)

हे मुनिश्रेष्ठा, अभिषेकाच्या सर्व साहित्याची जळवाजुळव करा आणि रघुनाथाजवळ जाऊन त्याला ही गोष्ट सांगा. नगरामध्ये सर्व बाजूंनी नाना रंगाच्या पताका उभारा, तसेच सोने आणि मोती यांनी युक्त असणारी चित्रविचित्र तोरणे बांधा," नंतर मंत्रिश्रेष्ठ सुमंताला दशरथ राजांनी बोलावून घेतले आणि त्याला आज्ञा केली, "मुनिश्रेष्ठ वसिष्ठ तुला जे जे साहित्य आणावयास सांगतील, ते ते तू आणून घे. कारण उद्याच मी रघुनाथाला युवराजपदावर अभिषेक करणार आहे." (५-७)

'ठीक आहे 'असे म्हणून तो सुमंत्र आनंदाने मुनिश्रेष्ठ वसिष्ठांना म्हणाला, 'मी काय करू ?' तेव्हा ज्ञानी पुरुषांमध्ये श्रेष्ठ आणि महातेजस्वी अशा वसिष्ठांनी त्याला सांगितले. (८)

"उद्या प्रातःकाळी मध्यभागात सुवर्ण- अलंकारांनी विभूषित अशा सोळा कन्या उपस्थित असू देत. तसेच सुवर्ण अलंकार आणि रत्ने यांनी भूषित झालेला आणि ऐरावताच्या कुळातील आणि चार सुळे असणारा हत्ती तेथे आणा आणि नाना तीर्थांतील पाण्यांनी पूर्ण भरलेले असे हजारो सोन्याचे कलश तेथे स्थापन करा. तीन नवीन व्याघ्रचर्मे आणा. तसेच रत्नांचा दांडा असणारे आणि मोती व रत्ने यांनी सुशोभित असलेले एक पांढरे छत्र आणा. (९-११)

दिव्यमाल्यानि वस्त्राणि दिव्यान्याभरणानि च ।
मुनयः सत्कृतास्तत्र तिष्ठन्तु कुशपाणयः ॥ १२ ॥

नर्तक्यो वारमुख्याश्च गायका वेणुकास्तथा ।
नानावादित्रकुशला वादयन्तु नृपाङ्गणे ॥ १३ ॥

हस्त्यश्वरथपादाता बहिस्तिष्ठन्तु सायुधाः ।
नगरे यानि तिष्ठन्ति देवतायतनानि च ॥ १४ ॥

तेषु प्रवर्ततां पूजा नानाबलिभिरादृता ।
राजानः शीघ्रमायान्तु नानोपायनपाणयः ॥ १५ ॥

इत्यादिश्य मुनिः श्रीमान् सुमन्त्रं नृपमन्त्रिणम् ।
स्वयं जगाम भवनं राघवस्यातिशोभनम् ॥ १६ ॥

रथमारुह्य भगवान्वसिष्ठो मुनिसत्तमः ।
त्रीणि कक्ष्याण्यतिक्रम्य रथात्क्षितिमवातरत् ॥ १७ ॥

अन्तः प्रविश्य भवनं स्वाचार्यत्वादवारितः ।
गुरुमागतमाज्ञाय रामस्तूर्णं कृताञ्जलिः ॥ १८ ॥

प्रत्युद्गम्य नमस्कृत्य दण्डवद् भक्तिसंयुतः ।
स्वर्णपात्रेण पानीयमानिनायाशु जानकी ॥ १९ ॥

रत्नासने समावेश्य पादौ प्रक्षाल्य भक्तितः ।
तदपः शिरसा धृत्वा सीतया सह राघवः ॥ २० ॥

धन्योऽस्मीत्यब्रवीद्रामस्तव पादाम्बुधारणात् ।
श्रीरामेणैवमुक्तस्तु प्रहसन्मुनिरब्रवीत् ॥ २१ ॥

त्वत्पादसलिलं धृत्वा धन्योऽभूद्गिरिजापतिः ।
ब्रह्मापि मत्पिता ते हि पादतीर्थहताशुभः ॥ २२ ॥

इदानीं भाषसे यत्त्वं लोकानामुपदेशकृत् ।
जानामि त्वां परात्मानं लक्ष्म्या संजातमीश्वरम् ॥ २३ ॥

अनेक दिव्य माळा, दिव्य वस्त्रे आणि दिव्य अलंकार आणा. तसेच अभिषेकाच्या स्थानी ज्यांचा योग्य प्रकारे सत्कार केलेला आहे, असे मुनिजन हातात दर्भ घेऊन उपस्थित असू देत. (१२)

अनेक नर्तकी, प्रमुख वारांगना, गायक, वेणु-वादक तसेच अनेक प्रकारची वाद्ये वाजविण्यात कुशल लोक महाराज दशरथांच्या अंगणात नर्तन- गाणे- बजावणे करू देत. (१३)

अभिषेक-स्थानाच्या बाहेर हत्ती, घोडे, रथ आणि पायदळ अशी चतुरंग सेना आपापल्या अस्त्र-शस्त्रांनी सुसज्जित होऊन उभी असू दे. नगरातील सर्व देवालयांमध्ये नाना प्रकारच्या बलि- सामग्रीने युक्त अशी पूजा सुरू करा आणि हातांमध्ये नाना प्रकारच्या भेट- वस्तू घेऊन राजेलोक त्वरित येऊ देत." (१४-१५)

सुमंत्र या मंत्रिश्रेष्ठाला अशा प्रकारचा आदेश देऊन श्रीमान वसिष्ठ मुनी स्वतःच रथात बसून श्रीरघुनाथांच्या अतिशय सुंदर महालाकडे गेले. महालाचे तीन कक्ष ओलांडून रथातून खाली उतरले. (१६-१७)

वसिष्ठ हे स्वतः आचार्य असल्यामुळे कुणी त्यांना अडविले नाही. ते श्रीरामांच्या महालात शिरले. गुरू आले आहेत हे पाहून रामचंद्रांनी लगबगीने हात जोडले, वसिष्ठांचे स्वागत करण्यास ते पुढे गेले आणि भक्तिपूर्वक त्यांनी वसिष्ठांना दंडवत प्रणाम केला. त्या वेळी सीतेने लगेच एका सुवर्णपात्रातून पाणी आणले. (१८-१९)

गुरूंना रत्नसिंहासनावर बसवून रघुनाथांनी त्यांचे पाय धुतले आणि ते चरणोदक भक्तिपूर्वक सीतेसह आपल्या मस्तकाला लावून, श्रीराम म्हणाले, "हे मुने, आपले चरणोदक मस्तकावर धारण केल्याने आज मी धन्य झालो आहे." भगवान रामांनी असे म्हटल्यावर, हसत हसत मुनिश्रेष्ठ वसिष्ठ म्हणू लागले. (२०-२१)

"हे प्रभू रामा, तुमचे चरणोदक मस्तकी धारण करून पार्वती- पति भगवान शंकर धन्य धन्य होऊन गेले. तसेच माझे पिता ब्रह्मदेव हेसुद्धा तुमच्या पादतीर्थाचे सेवन करूनच पवित्र झाले आहेत. (२२)

गुरूंशी कसा व्यवहार करावा याचा लोकांना उपदेश करण्यासाठीच आत्ता तुम्ही असे बोलत आहात. मला चांगल्या प्रकारे माहीत आहे की लक्ष्मीसहित प्रकट झालेले तुम्ही साक्षात परमात्मा विष्णू आहात. (२३)

देवकार्यार्थसिद्ध्यर्थं भक्तानां भक्तिसिद्धये ।
रावणस्य वधार्थाय जातं जानामि राघव ॥ २४ ॥

तथापि देवकार्यार्थं गुह्यं नोद्घाटयाम्यहम् ।
यथा त्वं मायया सर्वं करोषि रघुनन्दन ॥ २५ ॥

तथैवानुविधास्येऽहं शिष्यस्त्वं गुरुरप्यहम् ।
गुरुर्गुरूणां त्वं देव पितृणां त्वं पितामहः ॥ २६ ॥

अन्तर्यामी जगद्यात्रावाहकस्त्वमगोचरः ।
शुद्धसत्त्वमयं देहं धृत्वा स्वाधीनसम्भवम् ॥ २७ ॥

मनुष्य इव लोकेऽस्मिन् भासि त्वं योगमायया ।
पौरोहित्यमहं जाने विगर्ह्यं दूष्यजीवनम् ॥ २८ ॥

इक्ष्वाकूणां कुले रामः परमात्मा जनिष्यते ।
इति ज्ञातं मया पूर्वं ब्रह्मणा कथितं पुरा ॥ २९ ॥

ततोऽहमाशया राम तव सम्बन्धकाङ्क्षया ।
अकार्षं गर्हितमपि तवाचार्यत्वसिद्धये ॥ ३० ॥

ततो मनोरथो मेऽद्य फलितो रघुनन्दन ।
त्वदधीना महामाया सर्वलोकैकमोहिनी ॥ ३१ ॥

मां यथा मोहयेन्नैव तथा कुरु रघूद्वह ।
गुरुनिष्कृतिकामस्त्वं यदि देह्येतदेव मे ॥ ३२ ॥

प्रसङ्गात्सर्वमप्युक्तं न वाच्यं कुत्रचिन्मया ।
राज्ञा दशरथेनाहं प्रेषितोऽस्मि रघूद्वह ॥ ३३ ॥

त्वामामन्त्रयितुं राज्ये श्वोऽभिषेक्ष्यति राघव ।
अद्य त्वं सीतया सार्धमुपवासं यथाविधि ॥ ३४ ॥

कृत्वा शुचिर्भूमिशायी भव राम जितेन्द्रियः ।
गच्छामि राजसान्निध्यं त्वं तु प्रातर्गमिष्यसि ॥ ३५ ॥

हे राघवा, मला माहीत आहे की, देवतांचे कार्य सिद्ध करण्यासाठी, भक्तांची भक्ती सफल करण्यासाठी आणि रावणाचा वध करण्यासाठी तुम्ही अवतार घेतला आहे. (२४)

तथापि देवांचे कार्य सिद्ध व्हावे या हेतूने मी हे गुप्त रहस्य प्रकट करीत नाही. हे रघुनन्दना, तुम्ही स्वतःच्या मायेचा आश्रय घेऊन, सर्व कार्य करीत आहात, म्हणून तुम्ही शिष्य आहात आणि मी तुमचा गुरू आहे, या लौकिक व्यवहाराला अनुसरून मी वागेन. परंतु हे देवा, वास्तविक तुम्हीच गुरूंचे गुरू आहात आणि पितृ-समूहाचे पितामह तुम्हीच आहात. (२५-२६)

तुम्ही सर्वांचे अंतर्यामी, जगाच्या व्यवहाराचे प्रवर्तक आणि मन व वाणी यांचा विषय नसणारे आहात, तथापि स्वतःचा जन्म तुमच्या स्वाधीन असल्यामुळे शुद्ध सत्त्वमय शरीर धारण करून, इहलोकी तुम्ही आपल्या योगमायेने एखाद्या सामान्य माणसासारखे भासवत आहात. मला हेही माहीत आहे की, पुरोहिताचे कार्य हे अतिशय निंदनीय आणि दूषित जीवन असणारे असते. (२७-२८)

तथापि पूर्वी ब्रह्मदेवांनी सांगितलेले, 'इक्ष्वाकूंच्या कुळात परमात्मा राम अवतार घेणार आहेत,' हे जेव्हा मला कळले, तेव्हा हे रामा, मोठ्या आशेने आणि तुमच्याशी संबंध साधण्याच्या इच्छेने तुमचे आचार्यत्व प्राप्त करून घेण्यासाठी, पुरोहिताचे असूनही हे निंद्य पद मी स्वीकारले आहे. (२९-३०)

हे रघुनन्दना, तो माझा मनोरथ आज सफल झाला आहे. आता, हे रघुश्रेष्ठा, तुमच्या स्वाधीन असणारी, सर्व लोकांना मोहात पाडणारी, तुमची महामाया मला मोहित करणार नाही, असे काही करा. गुरूच्या ऋणातून मुक्त होण्याची जर तुमची इच्छा असेल तर तुम्ही मला इतकेच वरदान द्या. (३१-३२)

हे रघुश्रेष्ठा, या वेळी प्रसंगावशात् हे सर्व मी तुम्हांला सांगितले आहे; हे मी अन्य कुणालाच सांगणार नाही. हे राघवा, महाराज दशरथांनी तुम्हांला आमंत्रण देण्यासाठी मला पाठविले आहे. उद्या ते तुम्हांला राज्यपदावर अभिषेक करणार आहेत. तेव्हा आज तुम्ही शास्त्राप्रमाणे सीतेसह उपवास करून, शुद्ध होऊन आणि इंद्रिये जिंकून जमिनीवर शयन करा. आता मी राजांकडे जातो. तुम्ही उद्या सकाळी याल." (३३-३५)

इत्युक्त्वा रथमारुह्य ययौ राजगुरुर्द्रुतम् ।
रामोऽपि लक्ष्मणं दृष्ट्वा प्रहसन्निदमब्रवीत् ॥ ३६ ॥

सौमित्रे यौवराज्ये मे श्वोऽभिषेको भविष्यति ।
निमित्तमात्रमेवाहं कर्ता भोक्ता त्वमेव हि ॥ ३७ ॥

मम त्वं हि बहिःप्राणो नात्र कार्या विचारणा ।
ततो वसिष्ठेन यथा भाषितं तत्तथाकरोत् ॥ ३८ ॥

वसिष्ठोऽपि नृपं गत्वा कृतं सर्वं न्यवेदयत् ।
वसिष्ठस्य पुरो राज्ञा ह्युक्तं रामाभिषेचनम् ॥ ३९ ॥

यदा तदैव नगरे श्रुत्वा कश्चित्पुमान् जगौ ।
कौसल्यायै राममात्रे सुमित्रायै तथैव च ॥ ४० ॥

श्रुत्वा ते हर्षसम्पूर्णे ददतुर्हारमुत्तमम् ।
तस्मै ततः प्रीतमनाः कौसल्या पुत्रवत्सला ॥ ४१ ॥

लक्ष्मीं पर्यचरद्देवीं रामस्यार्थप्रसिद्धये ।
सत्यवादी दशरथः करोत्येव प्रतिश्रुतम् ॥ ४२ ॥

कैकेयीवशगः किन्तु कामुकः किं करिष्यति ।
इति व्याकुलचित्ता सा दुर्गां देवीमपूजयत् ॥ ४३ ॥

एतस्मिन्नन्तरे देवा देवीं वाणीमचोदयन् ।
गच्छ देवि भुवो लोकमयोध्यायां प्रयत्नतः ॥ ४४ ॥

रामाभिषेकविघ्नार्थं यतस्व ब्रह्मवाक्यतः ।
मन्थरां प्रविशस्वादौ कैकेयीं च ततः परम् ॥ ४५ ॥

ततो विघ्ने समुत्पन्ने पुनरेहि दिवं शुभे ।
तथेत्युक्त्वा तथा चक्रे प्रविवेशाथ मन्थराम् ॥ ४६ ॥

सापि कुब्जा त्रिवक्रा तु प्रासादाग्रमथारुहत् ।
नगरं परितो दृष्ट्वा सर्वतः समलङ्कृतम् ॥ ४७ ॥

असे बोलून राजाचे पुरोहित वसिष्ठ रथात बसून त्वरित निघून गेले. तेव्हा श्रीरामचंद्र लक्ष्मणाकडे पाहून हसत हसत म्हणाले. (३६)

"हे सौमित्रे, उद्या माझा युवराज-पदावर अभिषेक होणार. त्या वेळी मी केवळ निमित्तमात्र असेन. त्याचा कर्ता आणि भोक्ता मात्र तूच असशील. (३७)

कारण तूच माझा बाह्य प्राण आहेस. या बाबतीत विचार करू नकोस." त्यानंतर वसिष्ठांनी जसे सांगितले होते, तसेच रघुनाथांनी केले. (३८)

इकडे राजांजवळ जाऊन वसिष्ठांनी आपण जे काही केले ते सर्व दशरथांना सांगितले. जेव्हा महाराज दशरथ वसिष्ठांबरोबर रामचंद्रांच्या अभिषेकासंबंधी बोलत होते, त्या वेळी ते ऐकून कुणी तरी ती वार्ता संपूर्ण नगरात जाहीर केली, तसेच त्याने ती वार्ता रामाची माता कौसल्या आणि सुमित्रा यांनाही सांगितली. (३९-४०)

वार्ता ऐकून त्या दोघी अत्यंत आनंदित झाल्या व त्यांनी त्या पुरुषाला एक अतिशय उत्तम हार बक्षीस म्हणून दिला. मनात संतुष्ट झालेल्या पुत्रवत्सल कौसल्येने, रामचंद्रांची इष्टसिद्धी व्हावी म्हणून देवी लक्ष्मीचे पूजन केले. तिने विचार केला, 'दशरथ राजा सत्यवादी आहेत. ते आपली प्रतिज्ञा पालन करतात, हे प्रसिद्ध आहेत. परंतु ते कामुक आहेत आणि कैकेयीला वश आहेत. अशा स्थितीत ते आपली प्रतिज्ञा पूर्ण करू शकतील का ?' या विचाराने व्याकूळ झाल्यामुळे तिने दुर्गादेवीची पूजा करण्यास प्रारंभ केला. (४१-४३)

दरम्यानच्या काळात देवांनी सरस्वती देवीला प्रेरणा केली की "हे देवी, तू भूलोकावरील अयोध्या नगरीत मुद्दाम जा. (४४)

आणि तेथे जाऊन, ब्रह्मदेवांच्या वचनाप्रमाणे तू श्रीरामचंद्रांच्या राज्याभिषेकात विघ्न उपस्थित करण्याचा अवश्य प्रयत्न कर. प्रथम तू मंथरेमध्ये प्रवेश कर आणि त्यानंतर कैकेयीमध्ये प्रवेश कर. (४५)

हे शुभदेवी, विघ्न उपस्थित झाल्यावर तू पुनः स्वर्गलोकी परत ये." "ठीक आहे 'असे म्हणून सरस्वतीने त्या प्रमाणे केले. तिने प्रथम मंथरेमध्ये प्रवेश केला. (४६)

तीन ठिकाणी वाकडी असणारी ती कुब्जा मंथरा प्रासादाच्या गच्चीवर गेली होती. तेथून तिला दिसले की अयोध्या नगर हे सर्व बाजूंनी शृंगारले गेले आहे. (४७)

नानातोरणसम्बाधं पताकाभिरलङ्कृतम् ।
सर्वोत्सवसमायुक्तं विस्मिता पुनरागमत् ॥ ४८ ॥

धात्रीं पप्रच्छ मातः किं नगरं समलङ्कृतम् ।
नानोत्सवसमायुक्ता कौसल्या चातिहर्षिता ॥ ४९ ॥

ददाति विप्रमुख्येभ्यो वस्त्राणि विविधानि च ।
तामुवाच तदा धात्री रामचन्द्राभिषेचनम् ॥ ५० ॥

श्वो भविष्यति तेनाद्य सर्वतोऽलङ्कृतं पुरम् ।
तच्छ्रुत्वा त्वरितं गत्वा कैकेयीं वाक्यमब्रवीत् ॥ ५१ ॥

पर्यङ्कस्थां विशालाक्षीमेकान्ते पर्यवस्थिताम् ।
किं शेषे दुर्भगे मूढे महद्भयमुपस्थितम् ॥ ५२ ॥

न जानीषेऽतिसौन्दर्यमानिनी मत्तगामिनी ॥ ५३ ॥

रामस्यानुग्रहाद्राज्ञः श्वोऽभिषेको भविष्यति ।
तच्छ्रुत्वा सहसोत्थाय कैकेयी प्रियवादिनी ॥ ५४ ॥

तस्यै दिव्यं ददौ स्वर्णनूपुरं रत्नभूषितम् ।
हर्षस्थाने किमिति मे कथ्यते भयमागतम् ॥ ५५ ॥

भरतादधिको रामः प्रियकृन्मे प्रियंवदः ।
कौसल्यां मां समं पश्यन् सदा शुश्रूषते हि माम् ॥ ५६ ॥

रामाद्भयं किमापन्नं तव मूढे वदस्व मे ।
तच्छ्रुत्वा विषसादाथ कुब्जाकारणवैरिणी ॥ ५७ ॥

शृणु मद्वचनं देवि यथार्थं ते महद्भयम् ।
त्वां तोषयन् सदा राजा प्रियवाक्यानि भाषते ॥ ५८ ॥

कामुकोऽतथ्यवादी च त्वां वाचा परितोषयन् ।
कार्यं करोति तस्या वै राममातुः सुपुष्कलम् ॥ ५९ ॥

मनस्येतन्निधायैव प्रेषयामास ते सुतम् ।
भरतं मातुलकुले प्रेषयामास सानुजम् ॥ ६० ॥

नगरात नाना प्रकारची तोरणे बांधली गेली होती. चित्रविचित्र पताकांनी ते सुशोभित झाले होते. सर्व प्रकारचे उत्सव चालू होते. हे पाहून मंथरा अत्यंत आश्चर्यचकित झाली आणि खाली आली. (४८)

तिने दाईला विचारले, "माई, आज अयोध्या नगर का शृंगारले आहे ? तसेच नाना प्रकारचे उत्सव साजरे करीत अतिशय आनंदाने महाराणी कौसल्या ही श्रेष्ठ ब्राह्मणांना विविध वस्त्र-भूषणे का बरे दान देत आहे ?" तेव्हा दाईने तिला सांगितले, "उद्या रामांचा राज्याभिषेक होणार आहे. म्हणून आज सर्व बाजूंनी अयोध्या नगर शृंगारले गेले आहे." ते वचन ऐकताच मंथरा त्वरित कैकेयीजवळ गेली. (४९-५१)

त्या वेळी विशालाक्षी कैकेयी एकांत स्थानी पलंगावर बसलेली होती. मंथरा तिला म्हणाली, "अग अभागी मूर्ख स्त्रिये, तू कशी काय झोपली आहेस ? तुझ्यावर मोठे संकट आले आहे. (५२)

हे गजगामिनी, तुला स्वतःच्या सौंदर्याची फारच घमेंड आहे. त्यामुळे तुला कोणतीही गोष्ट माहीत नसते. (५३)

अग, महाराज दशरथाच्या कृपेने उद्या रामाचा राज्याभिषेक होणार आहे." ते ऐकताच गोड बोलणारी कैकेयी लगेच उठून उभी राहिली. (५४)

तिने मंथरेला दिव्य असे रत्नजडित सोन्याचे नूपुर दिले आणि ती म्हणाली "अग, रामाचा राज्याभिषेक ही फार आनंदाची वार्ता आहे. मग ते संकट आहे, असे तू कसे बरे म्हणतेस ? (५५)

भरतापेक्षा राम हा मला अधिक प्रिय आहे. तो मला आवडणारा आणि माझ्याशी गोड बोलणारा आहे. तो कौसल्या आणि मी यांच्याकडे समान भावनेने पाहात असतो. तसेच तो माझी नेहमीच सेवा करीत असतो. (५६)

अग मूर्ख स्त्रिये, अशा त्या रामापासून तुला कोणते भय वाटत आहे, ते मला सांग बरे." हे ऐकल्यानंतर, अकारण वैर करणारी ती कुब्जा विषण्ण झाली आणि म्हणाली. (५७)

"हे राणी, माझे वचन ऐक. खरे म्हणजे तुझ्यावरच मोठे संकट आले आहे. तुला संतुष्ट करण्यासाठी दशरथ राजा तुझ्याबरोबर नेहमी गोड गोड बोलतात. (५८)

ते फार कामुक आणि खोटारडे आहेत. तुला अशा प्रकारे केवळ शब्दांनी संतुष्ट करीत ते रामाच्या मातेचेच सर्व कार्य पूर्ण करीतात. (५९)

ही गोष्ट मनामध्ये बाळगून, तुझ्या भरत या पुत्राला शत्रुघ्नासह त्यांनी आजोळी पाठवून दिले आहे. (६०)

सुमित्रायाः समीचीनं भविष्यति न संशयः ।
लक्ष्मणो राममन्वेति राज्यं सोऽनुभविष्यति ॥ ६१ ॥

भरतो राघवस्याग्रे किङ्करो वा भविष्यति ।
विवास्यते वा नगरात्प्राणैर्वा हाप्यतेऽचिरात् ॥ ६२ ॥

त्वं तु दासीव कौसल्यां नित्यं परिचरिष्यसि ।
ततोऽपि मरणं श्रेयो यत्सपत्न्याः पराभवः ॥ ६३ ॥

अतः शीघ्रं यतस्वाद्य भरतस्याभिषेचने ।
रामस्य वनवासार्थं वर्षाणि नव पञ्च च ॥ ६४ ॥

ततो रूढोऽभये पुत्रस्तव राज्ञि भविष्यति ।
उपायं ते प्रवक्ष्यामि पूर्वमेव सुनिश्चितम् ॥ ६५ ॥

पुरा देवासुरे युद्धे राजा दशरथः स्वयम् ।
इन्द्रेण याचितो धन्वी सहायार्थं महारथः ॥ ६६ ॥

जगाम सेनया सार्धं त्वया सह शुभानने ।
युद्धं प्रकुर्वतस्तस्य राक्षसैः सह धन्विनः ॥ ६७ ॥

तदाक्षकीलो न्यपतच्छिन्नस्तस्य न वेद सः ।
त्वं तु हस्तं समावेश्य कीलरन्ध्रेऽतिधैर्यतः ॥ ६८ ॥

स्थितवत्यसितापाङ्गि पतिप्राणपरीप्सया ।
ततो हत्वासुरान्सर्वान् ददर्श त्वामरिन्दमः ॥ ६९ ॥

आश्चर्यं परमं लेभे त्वामालिङ्ग्य मुदान्वितः ।
वृणीष्व यत्ते मनसि वाञ्छितं वरदोऽस्म्यहम् ॥ ७० ॥

वरद्वयं वृणीष्व त्वमेवं राजावदत्स्वयम् ।
त्वयोक्तो वरदो राजन्यदि दत्तं वरद्वयम् ॥ ७१ ॥

त्वय्येव तिष्ठतु चिरं न्यासभूतं ममानघ ।
यदा मेऽवसरो भूयात्तदा देहि वरद्वयम् ॥ ७२ ॥

तथेत्युक्त्वा स्वयं राजा मन्दिरं व्रज सुव्रते ।
त्वत्तः श्रुतं मया पूर्वमिदानीं स्मृतिमागतम् ॥ ७३ ॥

या गोष्टीमुळे सुमित्रेचे तर सर्व काही भलेच होणार यात काहीच संशय नाही. कारण लक्ष्मण हा रामाचा अनुयायी आहे आणि म्हणून तोही राज्य-भोगाचा अनुभव घेईल. (६१)

परंतु भरताला रामाच्यापुढे त्याचा दास होऊन राहावे लागेल. अथवा त्याला लौकरच नगरातून हाकलून दिले जाईल अथवा त्याचे प्राण हरण केले जातील. (६२)

आणि तुला एकाद्या दासीप्रमाणे कौसल्येची सेवा करावी लागेल. अशा प्रकारे सवतीकडून अपमान करून घेऊन राहण्यापेक्षा मरून जाणे, हेच अधिक चांगले. (६३)

म्हणून आज तू लगेच भरताच्या राज्याभिषेकासाठी आणि रामाच्या चौदा वर्षे वनवासासाठी प्रयत्न कर. (६४)

हे राणी, असे झाल्यावर तुझा पुत्र भरत हा निष्कंटक राज्यपदावर आरूढ होईल. यासाठी मी पूर्वीच ठरवलेला उपाय तुला सांगते. (६५)

पूर्वी देव आणि असुर यांच्या संग्रामाच्या वेळी स्वतः इंद्राने धनुर्धारी, महारथी अशा राजा दशरथांना सहाय्यासाठी प्रार्थना केली होती. (६६)

हे सुंदरी, त्यावेळी तो सेनेसह तुला बरोबर घेऊन गेला होता. जेव्हा धनुर्धारी महाराज दशरथ राक्षसांबरोबर युद्ध करण्यात मग्न होते, तेव्हा रथाच्या कण्याची पाचर तुटून खाली पडली पण ही गोष्ट दशरथांना कळली नाही. त्या वेळी तू अतिशय धैर्याने आपला हात त्या कण्याच्या छिद्रामध्ये घातलास. (६७-६८)

आणि हे कृष्णाक्षी, पतीचे प्राण वाचविण्यासाठी तू बराच वेळ त्या स्थितीत राहिलीस. त्यानंतर सर्व दैत्यांना ठार करून, शत्रूचे दमन करणाऱ्या महाराज दशरथांनी तुझ्याकडे पाहिले. (६९)

तुला त्या स्थितीत पाहून त्यांना अतिशय आश्चर्य वाटले. प्रसन्न होऊन, तुला आलिंगन देऊन ते तुला म्हणाले, 'तुला वर देण्याची माझी इच्छा आहे. तुझ्या मनात जी इच्छा असेल ती मागून घे. (७०)

तू दोन वर माग.' असे दशरथ राजा स्वतः तुला म्हणाले होते. तेव्हा तू त्यांना म्हटलेस, 'महाराज, जर तुम्ही मला दोन वर देणार असाल, तर, हे निर्मळ मनाच्या राजा, ते वर माझी ठेव म्हणून तुमच्याजवळच राहू देत. जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा ते दोन वर तुम्ही मला द्या.' (७१-७२

'ठीक आहे' असे बोलून राजा तुला म्हणाला, 'सुव्रते, आता तू युद्धभूमीच्या शिबिरात चल.' हे महाराणी कैकेयी, हा संपूर्ण वृत्तांत मी पूर्वी तुझ्याकडूनच ऐकला होत मला आत्ता त्याचे स्मरण झाले. (७३

अतः शीघ्रं प्रविश्याद्य क्रोधागारं रुषान्विता ।
विमुच्य सर्वाभरणं सर्वतो विनिकीर्य च ।
भूमावेव शयाना त्वं तूष्णीमातिष्ठ भामिनि ॥ ७४ ॥

यावत्सत्यं प्रतिज्ञाय राजाभीष्टं करोति ते ।
श्रुत्वा त्रिवक्रयोक्तं तत्तदा केकयनन्दिनी ॥ ७५ ॥

तथ्यमेवाखिलं मेने दुःसङ्गाहितविभ्रमा ।
तामाह कैकेयी दुष्टा कुतस्ते बुद्धिरीदृशी ॥ ७६ ॥

एवं त्वां बुद्धिसम्पन्नां न जाने वक्रसुन्दरि ।
भरतो यदि राजा मे भविष्यति सुतः प्रियः ॥ ७७ ॥

ग्रामान् शतं प्रदास्यामि मम त्वं प्राणवल्लभा ।
इत्युक्त्वा कोपभवनं प्रविश्य सहसा रुषा ॥ ७८ ॥

विमुच्य सर्वाभरणं परिकीर्य समन्ततः ।
भूमौ शयाना मलिना मलिनाम्बरधारिणी ॥ ७९ ॥

प्रोवाच शृणु मे कुब्जे यावद्रामो वनं व्रजेत् ।
प्राणांस्त्यक्ष्येऽथ वा वक्रे शयिष्ये तावदेव हि ॥ ८० ॥

निश्चयं कुरु कल्याणि कल्याणं ते भविष्यति ।
इत्युक्त्वा प्रययौ कुब्जा गृहं सापि तथाकरोत् ॥ ८१ ॥

धीरोऽत्यन्तदयान्वितोऽपि सगुणा-
चारान्वितो वाथवा
नीतिज्ञो विधिवाददेशिकपरो
विद्याविवेकोऽथवा ।
दुष्टानामतिपापभावितधियां
सङ्गं सदा चेद्भजेत्-
तद्बुद्ध्या परिभावितो व्रजति तत्-
साम्यं क्रमेण स्फुटम् ॥ ८२ ॥

अतः सङ्गः परित्याज्यो दुष्टानां सर्वदैव हि ।
दुःसङ्गी च्यवते स्वार्थाद्यथेयं राजकन्यका ॥ ८३ ॥

म्हणून हे भामिनी, आता तू लगेच राग धरून क्रोध-भवनात प्रवेश कर आणि आपले सर्व अलंकार अंगावरून उतरवून इकडे तिकडे फेकून दे. राजा प्रतिज्ञा पूर्ण करून जोपर्यंत तुझे अभीष्ट कार्य करण्यास तयार होत नाहीत, तोपर्यंत तू जमिनीवर झोपून अगदी गप्प पडून राहा." त्रिवक्रा मंथरेने सांगितलेले ते वचन ऐकून, दुष्ट संगामुळे केकय-कन्या कैकेयीच्या बुद्धीमध्ये भ्रम निर्माण झाला त्यामुळे अहितामध्ये हित वाटू लागले. अशा प्रकारे बुद्धी दूषित झाल्यामुळे तिला मंथरेचे सर्व कथन खरे वाटले आणि मग कैकेयी तिला म्हणाली, "अग, तुझ्या ठिकाणी इतकी बुद्धी कोठून आली ? (७४-७६)

अग कुबडे, तू इतकी शहाणी आहेस, हे मला माहीत नव्हते. जर माझा लाडका पुत्र भरत राजा झाला, तर मी तुला शंभर गावे देईन. तू मला प्राणाइतकी प्रिय झाली आहेस." असे बोलून कैकेयी रागाने चट्दिशी कोपभवनात शिरली. (७७-७८)

आपले सर्व अलंकार अंगावरून उतरवून तिने सगळीकडे विखरून टाकले आणि मळकट वस्त्रे परिधान करून ती अतिशय मलिन स्थितीत जमिनीवर पडून राहिली आणि म्हणाली, "अग कुब्जे, ऐक. जोपर्यंत राम वनात जात नाही, तोपर्यंत हे वक्रे, मी प्राणत्याग तरी करीन किंवा अशीच येथे जमिनीवर पडून राहीन." (७९-८०)

"मग तू असेच कर. त्यामुळेच तुझे कल्याण होईल" असे कैकेयीला सांगून कुब्जा आपल्या घरी निघून गेली आणि इकडे त्या कैकेयीनेसुद्धा तसेच केले. (८१)

एखादा माणूस अत्यंत धैर्यवान्, अतिशय दयाळू, गुणांनी आणि सदाचाराने संपन्न, नीती जाणणारा, विद्या शिकविणाऱ्या गुरूच्या सेवेत तत्पर आणि विद्या व विवेक यांनी संपन्न असेना का, तथापि ज्यांच्या बुद्धीवर अतिशय पापाचे सावट पडले आहे, अशा दुष्टांच्या संगतीत जर तो नेहमी असेल, तर हळूहळू त्यांच्या बुद्धीने प्रभावित झालेला मनुष्य निश्चितपणे त्या दुष्टांच्या प्रमाणेच बनतो, हे खरे. (८२)

म्हणून दुष्ट पुरुषांची संगती नेहमीच सोडावी . कारण दुःसंग करणारा माणूस हा या राजकन्या कैकेयी प्रमाणे स्वतःच्या पुरुषार्थापासून च्युत होतो. (८३)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे अयोध्याकाण्डे द्वितीयः सर्गः ॥ २ ॥

तृतीय सर्ग

राजा दशरथांनी कैकेयीला वर दिला

श्रीमहादेव उवाच

ततो दशरथो राजा रामाभ्युदयकारणात् ।
आदिश्य मन्त्रिप्रकृतीः सानन्दो गृहमाविशत् ॥ १ ॥

तत्राहृष्ट्वा प्रियां राजा किमेतदतिविह्वलः ।
या पुरा मन्दिरं तस्याः प्रविष्टे मयि शोभना ॥ २ ॥

हसन्ती मामुपायाति सा किं नैवाद्य दृश्यते ।
इत्यात्मन्येव संचिन्त्य मनसातिविदूयता ॥ ३ ॥

पप्रच्छ दासीनिकरं कुतो वः स्वामिनी शुभा ।
नायाति मां यथापूर्वं मत्प्रिया प्रियदर्शना ॥ ४ ॥

ता ऊचुः क्रोधभवनं प्रविष्टा नैव विद्महे ।
कारणं तत्र देव त्वं गत्वा निश्चेतुमर्हसि ॥ ५ ॥

इत्युक्तो भयसन्त्रस्तो राजा तस्याः समीपगः ।
उपविश्य शनैर्देहं स्पृशन्वै पाणिनाब्रवीत् ॥ ६ ॥

किं शेषे वसुधापृष्ठे पर्यङ्कादीन् विहाय च ।
मां त्वं खेदयसे भीरु यतो मां नावभाषसे ॥ ७ ॥

अलङ्कारं परित्यज्य भूमौ मलिनवाससा ।
किमर्थं ब्रूहि सकलं विधास्ये तव वाञ्छितम् ॥ ८ ॥

को वा तवाहितं कर्ता नारी वा पुरुषोऽपि वा ।
स मे दण्ड्यश्च वध्यश्च भविष्यति न संशयः ॥ ९ ॥

ब्रूहि देवि यथा प्रीतिस्तदवश्यं ममाग्रतः ।
तदिदानीं साधयिष्ये सुदुर्लभमपि क्षणात् ॥ १० ॥

जानासि त्वं मम स्वान्तं प्रियं मां स्ववशे स्थितम् ।
तथापि मां खेदयसे वृथा तव परिश्रमः ॥ ११ ॥

श्रीमहादेव म्हणाले – त्यानंतर श्रीरामचंद्रांच्या अभ्युदयासाठी मंत्री आणि प्रजा-वर्ग यांना मंगल कार्य करण्याची आज्ञा करून दशरथ राजा आनंदाने आपल्या महालात शिरले. (१)

तेथे आपली लाडकी कैकेयी न दिसल्यामुळे अतिशय व्याकूळ होऊन ते मनात विचार करू लागले- "हे काय ? मी महालात शिरताच पूर्वी जी सुंदरी हसत हसत माझ्यापुढे येत असे, ती आज का बरे येथे दिसत नाही ?" मग मनात अतिशय दुःखी झालेल्या त्या राजांनी दासींना विचारले "तुमची शुभलक्षणा स्वामिनी कुठे आहे? ती माझी प्रियदर्शना प्रिया आज पूर्वीप्रमाणे माझ्यासमोर का बरे येत नाही ?" (२-४)

दासींनी सांगितले, "महाराज, ती आमची स्वामिनी क्रोधभवनात शिरली आहे. त्याचे कारण आम्हांस माहीत नाही. आपण स्वतःच तेथे जाऊन सर्व गोष्टी जाणून घ्याव्यात." (५)

दासींनी असे सांगितल्यावर भीतीने त्रस्त होऊन राजा कैकेयीजवळ गेले. तेथे बसून ते हळुवारपणे तिचा देह हाताने हळूहळू कुरवाळत म्हणाले. (६)

"अग प्रिये, पलंग इत्यादी सोडून देऊन तू आज जमिनीवर का झोपली आहेस ? तू माझ्याशी काही बोलत नाहीस ? त्यामुळे मला फार खेद होत आहे. (७)

सर्व अलंकार टाकून देऊन, मलिन वस्त्र परिधान करून, तू का बरे जमिनीवर पडली आहेस ? तुझी जी इच्छा असेल ती तू मला सांग. मी ती पूर्ण करीन. (८)

तुझे अनिष्ट करणारा कोण आहे ? तो स्त्री असो वा पुरुष असो, तो माझ्या शिक्षेला पात्र ठरेल. इतकेच नव्हे तर त्याला मृत्युदंडही देता देईन, यात काहीही संशय नाही. (९)

हे देवी, ज्यामुळे तुला आनंद होईल ती गोष्ट तू मला अवश्य सांग. ते कार्य अत्यंत अवघड असले तरीसुद्धा मी ते एका क्षणातच करून टाकीन. (१०)

तू माझे हृदय जाणतेसच. मी तुला अत्यंत प्रिय आहे, आणि तुला वश आहे. तरीसुद्धा तू मला खिन्न करीत आहेस. तुझा हा व्यर्थ खटाटोप आहे. (११)

ब्रूहि कं धनिनं कुर्यां दरिद्रं ते प्रियङ्करम् ।
धनिनं क्षणमात्रेण निर्धनं च तवाहितम् ॥ १२ ॥

मला सांग. तुला आवडणारी गोष्ट करणाऱ्या कोणत्या दरिद्री माणसाला एका क्षणात मी श्रीमंत करू ? किंवा तुला अप्रिय वाटणारी गोष्ट करणाऱ्या कोणत्या श्रीमंत माणसाला मी एका क्षणात निर्धन करू ? (१२)

ब्रूहि कं वा वधिष्यामि वधार्हो वा विमोक्ष्यते ।
किमत्र बहुनोक्तेन प्राणान्दास्यामि ते प्रिये ॥ १३ ॥

मला सांग, कोणाला मी ठार मारू अथवा वधाला योग्य असणाऱ्या कोणत्या माणसाला सोडून देऊ? जास्त काय सांगू ? हे प्रिये, मी तुझ्यासाठी माझे प्राणसुद्धा देईन. (१३)

मम प्राणात्प्रियतरो रामो राजीवलोचनः ।
तस्योपरि शपे ब्रूहि त्वद्धितं तत्करोम्यहम् ॥ १४ ॥

कमलनयन राम मला माझ्या प्राणांपेक्षासुद्धा अधिक प्रिय आहे. त्याची शपथ घेऊन मी तुला सांगतो. तुला जे आवडते ते तू मला सांग.मी तेच करीन." (१४)

इति ब्रुवाणं राजानं शपन्तं राघवोपरि ।
शनैर्विमृज्य नेत्रे सा राजानं प्रत्यभाषत ॥ १५ ॥

रामांची शपथ घेऊन महाराज दशरथांनी असे सांगितल्यावर, कैकेयीने हळूहळू आपले अश्रू पुसले आणि ती राजांना म्हणाली. (१५)

यदि सत्यप्रतिज्ञोऽसि शपथं कुरुषे यदि ।
याच्ञां मे सफलां कर्तुं शीघ्रमेव त्वमर्हसि ॥ १६ ॥

"हे महाराज, जर तुम्ही सत्यप्रतिज्ञ असाल आणि जर तुम्ही शपथसुद्धा घेत आहात, तर मी जी मागणी करीन ती तुम्ही ताबडतोब पूर्ण केली पाहिजे. (१६)

पूर्वं देवासुरे युद्धे मया त्वं परिरक्षितः ।
तदा वरद्वयं दत्तं त्वया मे तुष्टचेतसा ॥ १७ ॥

पूर्वी देव आणि असुर यांच्या युद्धात मी तुमचे सर्व प्रकारे रक्षण केले होते. त्या वेळी तुम्ही संतुष्ट होऊन मला दोन वर दिले होते. (१७)

तद्वद्वयं न्यासभूतं मे स्थापितं त्वयि सुव्रत ।
तत्रैकेन वरेणाशु भरतं मे प्रियं सुतम् ॥ १८ ॥

हे सुव्रता, त्या वेळी ते दोन वर मी तुमच्याजवळ ठेव म्हणून ठेवले होते. त्यातील एका वराने तुम्ही त्वरित माझ्या लाडक्या पुत्राला, भरताला, या जमविलेल्या राज्याभिषेकाच्या साहित्याने, युवराजपदावर अभिषेक करा आणि दुसऱ्या वराने राम ताबडतोब दंडक अरण्यात जाऊ दे. (१८-१९)

एभिः संभृतसंभारैर्युवराज्येऽभिषेचय ।
अपरेण वरेणाशु रामो गच्छतु दण्डकान् ॥ १९ ॥

तेथे राम हा मुनीचा वेष धारण करून, जटा आणि वल्कले ही भूषणे बाळगून, कंद, मुळे व फळे भक्षण करीत चौदा वर्षे तेथे राहू दे. (२०)

मुनिवेषधरः श्रीमान् जटावल्कलभूषणः ।
चतुर्दश समास्तत्र कन्दमूलफलाशनः ॥ २० ॥

त्यानंतर तो स्वतः आपल्या इच्छेनुसार अयोध्येला परत येऊ दे अथवा वनातच राहू दे. काही झाले तरी उद्या सकाळी कमलनयन राम हा वनात गेला पाहिजे. (२१)

पुनरायातु तस्यान्ते वने वा तिष्ठतु स्वयम् ।
प्रभाते गच्छतु वनं रामो राजीवलोचनः ॥ २१ ॥

जर या बाबतीत थोडा विलंब झाला तर मी तुमच्या समोरच आपल्या प्राणांचा त्याग करीन. आता तुम्ही आपली प्रतिज्ञा खरी करा. बस्, मला आवडणारी हीच गोष्ट आहे." (२२)

यदि किञ्चिद्विलम्बेत प्राणांस्त्यक्ष्ये तवाग्रतः ।
भव सत्यप्रतिज्ञस्त्वमेतदेव मम प्रियम् ॥ २२ ॥

अंगावर शहारे आणणारे हे कैकेयीचे कठोर वचन ऐकल्यावर वज्राचा तडाखा बसलेल्या पर्वताप्रमाणे महाराज दशरथ खाली कोसळले. (२३)

श्रुत्वैतद्दारुणं वाक्यं कैकेय्या रोमहर्षणम् ।
निपपात महीपालो वज्राहत इवाचलः ॥ २३ ॥

शनैरुन्मील्य नयने विमृज्य परया भिया ।
दुःस्वप्नो वा मया दृष्टो ह्यथवा चित्तविभ्रमः ॥ २४ ॥

इत्यालोक्य पुरः पत्नीं व्याघ्रीमिव पुरः स्थिताम् ।
किमिदं भाषसे भद्रे मम प्राणहरं वचः ॥ २५ ॥

रामः कमपराधं ते कृतवान्कमलेक्षणः ।
ममाग्रे राघवगुणान्वर्णयस्यनिशं शुभान् ॥ २६ ॥

कौसल्यां मां समं पश्यन् शुश्रूषां कुरुते सदा ।
इति ब्रुवन्ती त्वं पूर्वमिदानीं भाषसेऽन्यथा ॥ २७ ॥

राज्यं गृहाण पुत्राय रामस्तिष्ठतु मन्दिरे ।
अनुगृह्णीष्व मां वामे रामान्नास्ति भयं तव ॥ २८ ॥

इत्युक्त्वाश्रुपरीताक्षः पादयोर्निपपात ह ।
कैकेयी प्रत्युवाचेदं सापि रक्तान्तलोचना ॥ २९ ॥

राजेन्द्र किं त्वं भ्रान्तोऽसि उक्तं तद्भाषसेऽन्यथा ।
मिथ्या करोषि चेत्स्वीयं भाषितं नरको भवेत् ॥ ३० ॥

वनं न गच्छेद्यदि रामचन्द्रः
प्रभातकालेऽजिनचीरयुक्तः ।
उद्बन्धनं वा विषभक्षणं वा
कृत्वा मरिष्ये पुरतस्तवाहम् ॥ ३१ ॥

सत्यप्रतिज्ञोऽहमितीह लोके
विडम्बसे सर्वसभान्तरेषु ।
रामोपरि त्वं शपथं च कृत्वा
मिथ्याप्रतिज्ञो नरकं प्रयाहि ॥ ३२ ॥

इत्युक्तः प्रियया दीनो मग्नो दुःखार्णवे नृपः ।
मूर्च्छितः पतितो भूमौ विसंज्ञो मृतको यथा ॥ ३३ ॥

एवं रात्रिर्गता तस्य दुःखात्संवत्सरोपमा ।
अरुणोदयकाले तु बन्दिनो गायका जगुः ॥ ३४ ॥

त्यानंतर हळूहळू डोळे उघडून आणि अतिशय भयाने डोळे पुसून ते मनातल्या मनात विचार करू लागले, "हे काय, मी एखादे वाईट स्वप्न पाहिले की माझ्या चित्ताला भ्रम झाला आहे ? " (२४)

नंतर त्या वेळी एखाद्या वाघिणीप्रमाणे आपल्यासमोर बसलेल्या कैकेयीकडे पाहून दशरथ राजा म्हणू लागले, 'अग प्रिये, माझे प्राण हरण करणारे हे वचन तू काय बोलत आहेस ? (२५)

कमलनयन रामाने तुझा असा कोणता अपराध केला आहे ? यापूर्वी तू रात्रंदिवस माझ्यासमोर त्याचे उत्तम गुण वर्णन करीत होतीस. (२६)

पूर्वी तर तू असे म्हणत होतीस की मला व कौसल्येला समान मानून राम माझी सदा सेवा करतो. आता तर तू काही तरी वेगळेच बोलत आहेस. (२७)

पुत्रासाठी राज्य घे. पण रामाला मात्र घरातच राहू दे. हे सुंदरी, माझ्यावर अनुग्रह कर. तुला रामापासून कोणतेही भय नाही." (२८)

असे बोलून, रडत रडत महाराज दशरथ कैकेयीच्या पाया पडले. तेव्हा रागाने डोळे लाल करून कैकेयीसुद्धा असे प्रतिवचन बोलली. (२९)

"हे राजेंद्रा, तुमचा बुद्धिभ्रंश झाला आहे का? स्वतः दिलेल्या वचनांपासून तुम्ही माघार घेत आहात. लक्षात ठेवा, तुम्ही स्वतःची प्रतिज्ञा मोडाल, तर तुम्हाला नरक प्राप्त होईल. (३०)

मृगचर्म आणि वल्कले धारण करून रामचंद्र जर उद्या सकाळी वनामध्ये गेला नाही, तर मी तुमच्या पुढेच फास लावून अगर विष खाऊन मरून जाईन. (३१)

लोकांत सर्व सभांमध्ये 'मी सत्यप्रतिज्ञ आहे' असे सांगून तुम्ही आत्मस्तुती करीत आलात. आता रामाची शपथ घेऊन तुम्ही आपली प्रतिज्ञासुद्धा खोटी करीत आहात. म्हणून तुम्ही नरकात जाल." (३२)

आपल्या प्रियेने असे सांगितल्यावर महाराज दशरथ हा व्याकूळ होऊन दुःखरूपी सागरात बुडून गेले आणि एकाद्या मृत प्रेताप्रमाणे ते मूर्च्छित आणि चेतनाहीन होऊन जमिनीवर पडले. (३३)

अशा प्रकारे अतिशय दुःखामुळे त्याची ती रात्र एखाद्या वर्षाप्रमाणे व्यतीत झाली. इकडे अरुणोदयाच्या वेळी गायक आणि बंदिजन स्तुतिगान करू लागले. (३४)

निवारयित्वा तान् सर्वान्कैकेयी रोषमास्थिता ।
ततः प्रभातसमये मध्यकक्षमुपस्थिताः ॥ ३५ ॥

ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्या ऋषयः कन्यकास्तथा ।
छत्रं च चामरं दिव्यं गजो वाजी तथैव च ॥ ३६ ॥

अन्याश्च वारमुख्या याः पौरजानपदास्तथा ।
वसिष्ठेन यथाज्ञप्तं तत्सर्वं तत्र संस्थितम् ॥ ३७ ॥

स्त्रियो बालाश्च वृद्धाश्च रात्रौ निद्रां न लेभिरे ।
कदा द्रक्ष्यामहे रामं पीतकौशेयवाससम् ॥ ३८ ॥

सर्वाभरणसम्पन्नं किरीटकटकोज्वलम् ।
कौस्तुभाभरणं श्यामं कन्दर्पशतसुन्दरम् ॥ ३९ ॥

अभिषिक्तं समायातं गजारूढं स्मिताननम् ।
श्वेतच्छत्रधरं तत्र लक्ष्मणं लक्षणान्वितम् ॥ ४० ॥

रामं कदा वा द्रक्ष्यामः प्रभातं वा कदा भवेत् ।
इत्युत्सुकधियः सर्वे बभूवुः पुरवासिनः ॥ ४१ ॥

नेदानीमुत्थितो राजा किमर्थं चेति चिन्तयन् ।
सुमन्त्रः शनकैः प्रायाद्यत्र राजावतिष्ठते ॥ ४२ ॥

वर्धयन् जयशब्देन प्रणमञ्शिरसा नृपम् ।
अतिखिन्नं नृपं दृष्ट्वा कैकेयीं समपृच्छत ॥ ४३ ॥

देवि कैकेयि वर्धस्व किं राजा दृश्यतेऽन्यथा ।
तमाह कैकेयी राजा रात्रौ निद्रां न लब्धवान् ॥ ४४ ॥

राम रामेति रामेति राममेवानुचिन्तयन् ।
प्रजागरेण वै राजा ह्यस्वस्थ इव लक्ष्यते ।
राममानय शीघ्रं त्वं राजा द्रष्टुमिहेच्छति ॥ ४५ ॥

अश्रुत्वा राजवचनं कथं गच्छामि भामिनि ।
तच्छ्रुत्वा मन्त्रिणो वाक्यं राजा मन्त्रिणमब्रवीत् ॥ ४६ ॥

परंतु त्या सर्वांना थांबवून, कैकेयी राग धरून बसून राहिली होती. त्यानंतर प्रातःकाळ झाल्यावर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, ऋषिगण, कन्या, दिव्य छत्र आणि दिव्य चामर तसेच हत्ती, घोडे इत्यादी अभिषेकाला उपयोगी पडणाऱ्या वस्तू मधल्या चौकात जमा झाल्या. (३५-३६)

त्या प्रमाणेच इतर मुख्य वारांगना तसेच नगरवासी आणि जनपदवासी लोक हेही तेथे आले. वसिष्ठांनी आज्ञा केल्याप्रमाणे अभिषेकाला आवश्यक ते सर्व साहित्य तेथे आणले होते. (३७)

त्या रात्री स्त्रिया, बालक आणि वृद्ध यांपैकी कुणालाही झोप आली नाही. रेशमी पीतांबर परिधान केलेल्या भगवान श्रीरामांना आपण केव्हा एकदा पाहू, अशा उत्सुकतेने सर्वजण वाट पाहात होते. (३८)

सर्व अलंकारांनी विभूषित, उज्ज्वल किरीट आणि कटक (कडे) घातलेले, कौस्तुभ मणी धारण केलेले, सावळ्या वर्णाचे, शेकडो कामदेवांप्रमाणे सुंदर, सर्व शुभ लक्षणांनी युक्त अशा लक्ष्मणाने ज्यांच्या मस्तकावर श्वेत छत्र धरले आहे अशा हास्ययुक्त मुखाने राज्याभिषेकानंतर, हतीवर आरूढ होऊन येणाऱ्या रामांना आम्ही केव्हा बरे पाहू ? ती मंगल प्रभात केव्हा बरे येईल ? अशा प्रकारे सर्व नगरवासी लोकांची मने उत्कंठित झालेली होती.(३९-४१)

त्या वेळी "महाराज अद्यापि का बरे उठले नाहीत," असा विचार करीत सुमंत्र दशरथ महाराजांकडे गेला. (४२)

तेथे गेल्यावर, 'महाराजांचा विजय असो', असे म्हणून त्याने राजाचे अभिनंदन केले आणि मस्तक नमवून राजाला प्रणाम केला. परंतु राजा अतिशय खिन्न आहे हे पाहून त्याने कैकेयीला प्रश्न केला. (४३)

" कैकेयी राणीसाहेब, तुमचा विजय असो. महाराज असे दुःखी का बरे दिसत आहेत ?" तेव्हा कैकयीने त्याला सांगितले, "आज महाराजांना रात्री अजिबात झोप लागली नाही. (४४)

रात्रभर रामाचेच चिंतन करीत, 'राम, राम, राम' असे ते पुटपुटत राहिले. अशा प्रकारे रात्री संपूर्ण जागरण झाल्यानेच महाराज अस्वस्थ असल्याप्रमाणे दिसत आहेत. रामाला इथे पाहण्याची राजांची इच्छा आहे. म्हणून तू रामाला त्वरित इकडे घेऊन ये." (४५)

"हे महाराणी, राजांची आज्ञा त्यांचेकडून ऐकल्याशिवाय मी कसा बरे जाऊ?" मंत्र्याचे ते वाक्य ऐकल्यावर महाराज दशरथ त्याला म्हणाले. (४६)

सुमन्त्र रामं द्रक्ष्यामि शीघ्रमानय सुन्दरम् ।
इत्युक्तस्त्वरितं गत्वा सुमन्त्रो राममन्दिरम् ॥ ४७ ॥

अवारितः प्रविष्टोऽयं त्वरितं राममब्रवीत् ।
शीघ्रमागच्छ भद्रं ते राम राजीवलोचन ॥ ४८ ॥

पितुर्गेहं मया सार्धं राजा त्वां द्रष्टुमिच्छति ।
इत्युक्तो रथमारुह्य सम्भ्रमात्त्वरितो ययौ ॥ ४९ ॥

रामः सारथिना सार्धं लक्ष्मणेन समन्वितः ।
मध्यकक्षे वसिष्ठादीन् पश्यन्नेव त्वरान्वितः ॥ ५० ॥

पितुः समीपं सङ्गम्य ननाम चरणौ पितुः ।
राममालिङ्गितुं राजा समुत्थाय ससम्भ्रमः ॥ ५१ ॥

बाहू प्रसार्य रामेति दुःखान्मध्ये पपात ह ।
हाहेति रामस्तं शीघ्रमालिङ्ग्याङ्के न्यवेशयत् ॥ ५२ ॥

राजानं मूर्च्छितं दृष्ट्वा चुक्रुशुः सर्वयोषितः ।
किमर्थं रोदनमिति वसिष्ठोऽपि समाविशत् ॥ ५३ ॥

रामः पप्रच्छ किमिदं राज्ञो दुःखस्य कारणम् ।
एवं पृच्छति रामे सा कैकेयी राममब्रवीत् ॥ ५४ ॥

त्वमेव कारणं ह्यत्र राज्ञो दुःखोपशान्तये ।
किञ्चित्कार्यं त्वया राम कर्तव्यं नृपतेर्हितम् ॥ ५५ ॥

कुरु सत्यप्रतिज्ञस्त्वं राजानं सत्यवादिनम् ।
राज्ञा वरद्वयं दत्तं मम सन्तुष्टचेतसा ॥ ५६ ॥

त्वदधीनं तु तत्सर्वं वक्तुं त्वां लज्जते नृपः ।
सत्यपाशेन सम्बद्धं पितरं त्रातुमर्हसि ॥ ५७ ॥

पुत्रशब्देन चैतद्धि नरकात्त्रायते पिता ।
रामस्तयोदितं श्रुत्वा शूलेनाभिहतो यथा ॥ ५८ ॥

"सुमंत्रा, सुंदर रामाला भेटण्याची मला इच्छा आहे. त्याला तू लौकरच इकडे घेऊन ये." राजाने असे सांगितल्यावरच सुमंत्र त्वरित रामाच्या महालाकडेगेला. (४७)

कुणाचाही अडथळा न येता सुमंत्र त्वरित प्रभू रामांच्या महालात शिरून म्हणाला, "हे कमलनयन रामा, तुमचे कल्याण असो. माझ्याबरोबर तुम्ही चटकन तुमच्या पिताजींच्या महालात चला. तुम्हांला भेटण्याची महाराजांना इच्छा आहे,' असे त्याने रामांना सांगितल्यावर, चकित होऊन, रथावर आरोहण करून, राम त्वरित निघाले. (४८-४९)

सारथी आणि लक्ष्मण यांना बरोबर घेऊन, रामांनी मध्य कक्षात विराजमान असणाऱ्या वसिष्ठ इत्यादींना पाहून, पित्याच्या दर्शनाची घाई असल्यामुळे नेत्रांनी अभिवादनाचा शिष्टाचार करीत, त्वरेने पित्याजवळ जाऊन, त्यांनी पित्याच्या पायी प्रणाम केला. त्या वेळी रामांना आलिंगन देण्यासाठी, लगबगीने उठून महाराज दशरथांनी आवेगाने आपले हात पसरले, पण मध्येच दुःखाने 'अरे रामा, अरे रामा' असे म्हणत ते खाली पडले. तेव्हा 'हे काय झाले?' असे म्हणत हाहाकार करीत श्रीरामांनी झटपट दशरथांना आलिंगन देऊन, त्यांना आपल्याजवळ बसविले. (५०-५२)

महाराज मूर्च्छित पडले आहेत हे पाहून राणीवशातील सर्व स्त्रिया रडू लागल्या. तेव्हा हे रुदन कशासाठी चालले आहे, असा विचार करीत वसिष्ठसुद्धा तेथे येऊन पोचले. (५३)

भगवान श्रीरामांनी कैकेयीला असे विचारले, "महाराजांच्या दुःखाचे कारण काय बरे?" श्रीरामांनी असा प्रश्न केल्यावर कैकेयी त्यांना म्हणाली. (५४)

"अरे रामा, महाराजांचे हे दुःख दूर करणे तुझ्या हाती आहे. त्यांच्या दुःखाच्या शमनासाठी त्यांना हितकारक होईल, असे एखादे कार्य तुला करावयास हवे. (५५)

तू स्वतः सत्यप्रतिज्ञ आहेस. म्हणून दशरथ महाराजांनाही सत्यवादी सिद्ध कर. संतुष्ट चित्ताने राजांनी मला दोन वर दिले आहेत. (५६)

ते पूर्ण करणे हे तुझ्या स्वाधीन आहे. प्रत्यक्ष तुला सांगण्यास महाराजांना लाज वाटत आहे. सत्याच्या पाशाने बद्ध झालेल्या आपल्या पित्याचे रक्षण तूच करावयास हवे. (५७)

नरकात पडण्यापासून जो आपल्या पित्याचे रक्षण करतो, तोच पुत्र, असाच 'पुत्र' या शब्दाचा अर्थ आहे." कैकेयीने उच्चारलेले हे वचन ऐकून, शूलाने विद्ध झालेल्या

व्यथितः कैकयीं प्राह किं मामेवं प्रभाषसे ।
पित्रर्थे जीवितं दास्ये पिबेयं विषमुल्बणम् ॥ ५९ ॥

सीतां त्यक्ष्येऽथ कौसल्यां राज्यं चापि त्यजाम्यहम् ।
अनाज्ञप्तोऽपि कुरुते पितुः कार्यं स उत्तमः ॥ ६० ॥

उक्तः करोति यः पुत्रः स मध्यम उदाहृतः ।
उक्तोऽपि कुरुते नैव स पुत्रो मल उच्यते ॥ ६१ ॥

अतः करोमि तत्सर्वं यन्मामाह पिता मम ।
सत्यं सत्यं करोम्येव रामो द्विर्नाभिभाषते ॥ ६२ ॥

इति रामप्रतिज्ञां सा श्रुत्वा वक्तुं प्रचक्रमे ।
राम त्वदभिषेकार्थं संभाराः संभृताश्च ये ॥ ६३ ॥

तैरेव भरतोऽवश्यमभिषेच्यः प्रियो मम ।
अपरेण वरेणाशु चीरवासा जटाधरः ॥ ६४ ॥

वनं प्रयाहि शीघ्रं त्वमद्यैव पितुराज्ञया ।
चतुर्दश समास्तत्र वस मुन्यन्नभोजनः ॥ ६५ ॥

एतदेव पितुस्तेऽद्य कार्यं त्वं कर्तुमर्हसि ।
राजा तु लज्जते वक्तुं त्वामेवं रघुनन्दन ॥ ६६ ॥

श्रीराम उवाच

भरतस्यैव राज्यं स्यादहं गच्छामि दण्डकान् ।
किन्तु राजा न वक्तीह मां न जानेऽत्र कारणम् ॥ ६७ ॥

श्रुत्वैतद्वामवचनं दृष्ट्वा रामं पुरः स्थितम् ।
प्राह राजा दशरथो दुःखितो दुःखितं वचः ॥ ६८ ॥

स्त्रीजितं भ्रान्तहृदयमुन्मार्गपरिवर्तिनम् ।
निगृह्य मां गृहाणेदं राज्यं पापं न तद्भवेत् ॥ ६९ ॥

एवं चेदनृतं नैव मां स्पृशेद्रघुनन्दन ।
इत्युक्त्वा दुःखसन्तप्तो विललाप नृपस्तदा ॥ ७० ॥

माणसाप्रमाणे व्यथित होऊन श्रीराम कैकेयीला म्हणाले, "मातोश्री, आज तुम्ही मला असे का बोलत आहात? पित्यासाठी मी माझे जीवन देईन; भयंकर विषसुद्धा पिऊन टाकीन. (५८-५९)

तसेच पत्नी सीता, माता कौसल्या आणि राज्य यांचासुद्धा मी त्याग करीन. पित्याची आज्ञा नसतानासुद्धा जो पुत्र अभीष्ट कार्य करतो तो पुत्र उत्तम होय. (६०)

पित्याने सांगितल्यावर जो पुत्र कार्य करतो तो पुत्र मध्यम असे म्हटले जाते आणि पित्याने सांगितल्यावर सुद्धा जो त्याचे कार्य करीत नाही तो पुत्र अधम होय, असे म्हटले जाते. (६१)

म्हणून पित्याची जी आज्ञा असेल ती सर्व मी अवश्य पूर्ण करीन. हे निश्चितपणे खरे आहे. राम कधी दुतोंडी बोलत नाही." (६२)

श्रीरामांची अशी प्रतिज्ञा ऐकल्यावर कैकेयी असे बोलू लागली "अरे रामा, तुझ्या अभिषेकासाठी जी काही सामग्री एकत्रित केली गेली आहे, त्या सामग्रीनेच माझ्या प्रिय भरताचा अभिषेक अवश्य झाला पाहिजे, हा माझा पहिला वर आहे. दुसऱ्या वराने पित्याच्या आज्ञेने तू वल्कल-वस्त्रे परिधान करून आणि जटा धारण करून आजच त्वरित वनाप्रत जा आणि तेथे मुनिजनांना उचित कंदमूळ, फळे असे भोजन करीत चौदा वर्षे तेथेच राहा. (६३-६५)

बस्, तुझ्या पित्याचे हेच काम आहे. ते तू केले पाहिजेस. परंतु हे रघुनन्दना, तुला असे सांगण्यास राजांना लाज वाटत आहे." (६६)

श्रीराम म्हणाला – "मातोश्री, भरतालाच राज्य प्राप्त होवो. मीसुद्धा लगेच दंडकारण्यात जाईन. परंतु महाराज मला हे स्वतः का सांगत नाहीत, याचे कारण मात्र मला कळत नाही." (६७)

रामांचे वचन ऐकल्यावर आणि राम आपल्या समोर बसला आहे हे पाहून दुःखातुर होऊन राजा अतिशय दुःखाने बोलला. (६८)

"रामा, स्त्रीने जिंकलेल्या, चित्त गोंधळून गेलेल्या, चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या, पापी अशा मला बंधनात टाकून हे राज्य तू घे. त्यात तुला कोणतेही पाप लागणार नाही. (६९)

हे रघुनन्दना, असे जर झाले तर असत्य मला मुळीच स्पर्श करणार नाही."असे बोलून त्या वेळी राजा दुःखाने तळमळत विलाप करू लागले. (७०)

हा राम हा जगन्नाथ हा मम प्राणवल्लभ ।
मां विसृज्य कथं घोरं विपिनं गन्तुमर्हसि ॥ ७१ ॥

इति रामं समालिङ्ग्य मुक्तकण्ठो रुरोद ह ।
विमृज्य नयने रामः पितुः सजलपाणिना ॥ ७२ ॥

आश्वासयामास नृपं शनैः स नयकोविदः ।
किमत्र दुःखेन विभो राज्यं शासतु मेऽनुजः ॥ ७३ ॥

अहं प्रतिज्ञां निस्तीर्य पुनर्यास्यामि ते पुरम् ।
राज्यात्कोटिगुणं सौख्यं मम राजन्वने सतः ॥ ७४ ॥

त्वत्सत्यपालनं देवकार्यं चापि भविष्यति ।
कैकेय्याश्च प्रियो राजन्वनवासो महागुणः ॥ ७५ ॥

इदानीं गन्तुमिच्छामि व्येतु मातुश्च हृज्ज्वरः ।
सम्भाराश्चोपहीयन्तामभिषेकार्थमाहृताः ॥ ७६ ॥

मातरं च समाश्वास्य अनुनीय च जानकीम् ।
आगत्य पादौ वन्दित्वा तव यास्ये सुखं वनम् ॥ ७७ ॥

इत्युक्त्वा तु परिक्रम्य मातरं द्रष्टुमाययौ ।
कौसल्यापि हरेः पूजां कुरुते रामकारणात् ॥ ७८ ॥

होमं च कारयामास ब्राह्मणेभ्यो ददौ धनम् ।
ध्यायते विष्णुमेकाग्रमनसा मौनमास्थिता ॥ ७९ ॥

अन्तःस्थमेकं घनचित्प्रकाशं
निरस्तसर्वातिशयस्वरूपम् ।
विष्णुं सदानन्दमयं हृदब्जे
सा भावयन्ती न ददर्श रामम् ॥ ८० ॥

"हे रामा, हे जगन्नाथा, हे माझ्या प्राणप्रिया, अरे मला सोडून देऊन, घोर वनात तू कसा जाऊ शकशील?" (७१)

असे बोलून रामांना दृढ आलिंगन देऊन, जोरजोराने ते रडू लागले. तेव्हा हातात पाणी घेऊन रामांनी आपल्या पित्याचे डोळे पुसले. (७२)

आणि मग नीती जाणणाऱ्या रामांनी सावकाशपणे राजांना धीर दिला. ते म्हणू लागले, "महाराज, या बाबतीत दुःख करण्याचे कारण काय ? माझा धाकटा भाऊ भरत खुशाल राज्य करो. (७३)

मी तुमची प्रतिज्ञा तडीला नेऊन, तुमच्याजवळ अयोध्या नगरीला परत येईन. हे राजा, राज्य करण्यापेक्षा कोटिपट अधिक सौख्य वनात राहताना मला होईल. (७४)

तुमच्या सत्याचे पालन होईल, देवांचे इष्ट कार्य होईल आणि कैकेयी मातेची इच्छा पूर्ण होईल. महाराज, वनवासात पुष्कळ चांगल्या गोष्टी आहेत. (७५)

आता मी वनात जाऊ इच्छितो. कैकेयी मातेच्या मनातील व्यथा दूर होवो. आणि माझ्या अभिषेकासाठी एकत्रित केलेली ही सामग्री बाजूला ठेवा. (७६)

कौसल्या मातेचे सांत्वन करून, जानकीची समजूत घालून, मी लगेच परत येतो आणि तुमच्या चरणांना वंदन करून, मी सुखाने वनात जातो." (७७)

असे सांगून, पित्याला प्रदक्षिणा करून, श्रीराम मातेला भेटण्यास गेले. त्या वेळी कौसल्यासुद्धा श्रीरामांचे कल्याण होण्यासाठी भगवान विष्णूंची पूजा करीत होती. (७८)

तिने होम करवून घेतला होता. ब्राह्मणांना पुष्कळसे धन दान दिले होते आणि त्या वेळी ती मौन धारण करून एकाग्र मनाने भगवान श्रीविष्णूंचे ध्यान करीत होती. (७९)

अंतर्यामी रूपाने सर्वांच्या हृदयात वास करणाऱ्या, अद्वितीय, चिद्घनस्वरूप, आपल्या तेजाने सर्वांच्यावर मात करणाऱ्या, सदानंदमय, असे जे विष्णू, त्यांचे आपल्या हृदय-कमळात ध्यान करीत असल्यामुळे तिचे श्रीरामचंद्रांकडे लक्ष गेले नाही. (८०)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे अयोध्याकाण्डे तृतीयः सर्गः ॥ ३ ॥

चतुर्थ सर्ग

रामांनी मातेचा निरोप घेणे आणि सीता व लक्ष्मणासह वनगमनाची तयारी करणे.

श्रीमहादेव उवाच

ततः सुमित्रा दृष्ट्वैनं रामं राज्ञीं ससम्भ्रमा ।
कौसल्यां बोधयामास रामोऽयं समुपस्थितः ॥ १ ॥

श्रुत्वैव रामनामैषा बहिर्दृष्टिप्रवाहिता ।
रामं दृष्ट्वा विशालाक्षमालिङ्ग्याङ्के न्यवेशयत् ॥ २ ॥

मूर्ध्न्यवघ्राय पस्पर्श गात्रं नीलोत्पलच्छवि ।
भुङ्क्ष्व पुत्रेति च प्राह मिष्टमन्नं क्षुधार्दितः ॥ ३ ॥

रामः प्राह न मे मातर्भोजनावसरः कृतः ।
दण्डकागमने शीघ्रं मम कालोऽद्य निश्चितः ॥ ४ ॥

कैकेयीवरदानेन सत्यसन्धः पिता मम ।
भरताय ददौ राज्यं ममाप्यारण्यमुत्तमम् ॥ ५ ॥

चतुर्दश समास्तत्र ह्युषित्वा मुनिवेषधृक् ।
आगमिष्ये पुनः शीघ्रं न चिन्तां कर्तुमर्हसि ॥ ६ ॥

तच्छ्रुत्वा सहसोद्विग्ना मूर्च्छिता पुनरुत्थिता ।
आह रामं सुदुःखार्ता दुःखसागरसम्प्लुता ॥ ७ ॥

यदि राम वनं सत्यं यासि चेन्नय मामपि ।
त्वद्विहीना क्षणार्द्धं वा जीवितं धारये कथम् ॥ ८ ॥

यथा गौर्बालकं वत्सं त्यक्त्वा तिष्ठेन्न कुत्रचित् ।
तथैव त्वां न शक्नोमि त्यक्तुं प्राणात्प्रियं सुतम् ॥ ९ ॥

भरताय प्रसन्नश्चेद्राज्यं राजा प्रयच्छतु ।
किमर्थं वनवासाय त्वामाज्ञापयति प्रियम् ॥ १० ॥

कैकेय्या वरदो राजा सर्वस्वं वा प्रयच्छतु ।
त्वया किमपराद्धं हि कैकेय्या वा नृपस्य वा ॥ ११ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, श्रीरामांना पाहून राणी सुमित्रा गोंधळून गेली. आणि महाराणी कौसल्येला म्हणाली- "हा राम आला आहे." (१)

श्रीरामांचे नाव ऐकताच, कौसल्येची दृष्टी बाहेर वळली. विशालनयन रामांना पाहून आणि त्यांना आलिंगन देऊन, तिने त्यांना आपल्या मांडीवर बसविले. (२)

त्यांच्या मस्तकाचे अवघ्राण करून तिने नील कमलाप्रमाणे कांती असणाऱ्या प्रभू रामचंद्रांना कुरवाळले आणि म्हटले, "बाळा, तुला भूक लागली असेल. थोडी मिठाई खा." (३)

श्रीराम म्हणाले– "आई, ही वेळ भोजनाची नाही. कारण मी आज लगेच दंडकारण्यात जाण्याचे ठरवले आहे. (४)

कैकेयी मातेला वर देऊन माझ्या सत्यप्रतिज्ञ पित्यांनी भरताला अयोध्येचे राज्य दिले आहे आणि मलाही वनाचे उत्तम राज्य दिले आहे . (५)

मुनिवेष धारण करून मी चौदा वर्षे तेथे राहीन आणि मग पुनः लवकर परत येईन. तू कसलीही काळजी मुळीच करू नकोस ." (६)

अचानक ते वचन ऐकल्यावर उद्विग्न होऊन माता कौसल्या मूर्च्छित पडली. मग पुनः शुद्धीवर आल्यावर, दुःखरूपी सागरात बुडून गेलेली ती अतिशय दुःखाने व्याकूळ होऊन श्रीरामांना म्हणू लागली. (७)

"अरे रामा, जर तू खरोखरच वनात जाणार असशील तर मलाही तुझ्याबरोबर ने. कारण तुझ्याशिवाय मी अर्धा क्षण तरी कशी बरे जिवंत राहू शकेन ? (८)

ज्या प्रमाणे लहान वासराला सोडून एकादी गाय अन्य कुठेही राहू शकत नाही, त्या प्रमाणेच प्राणापेक्षा अधिक प्रिय असणाऱ्या तुझ्यासारख्या पुत्राला मी सोडू शकत नाही. (९)

महाराज जर भरतावर प्रसन्न झाले असतील, तर ते खुशाल त्याला राज्य देऊ देत. परंतु मला प्रिय असणाऱ्या तुला वनवासात जाण्याची आज्ञा त्यांनी का बरे दिली ? (१०)

कैकेयीला वर देणारे महाराज तिला खुशाल आपले सर्वस्व देऊ देत. परंतु तू कैकेयीचा अथवा महाराजांचा काय अपराध केला आहेस ? (११)

पिता गुरुर्यथा राम तवाहमधिका ततः ।
पित्राऽऽज्ञप्तो वनं गन्तुं वारयेयमहं सुतम् ॥ १२ ॥

यदि गच्छसि मद्वाक्यमुल्लङ्घ्य नृपवाक्यतः ।
तदा प्राणान्परित्यज्य गच्छामि यमसादनम् ॥ १३ ॥

लक्ष्मणोऽपि ततः श्रुत्वा कौसल्यावचनं रुषा ।
उवाच राघवं वीक्ष्य दहन्निव जगत्त्रयम् ॥ १४ ॥

उन्मत्तं भ्रान्तमनसं कैकेयीवशवर्तिनम् ।
बद्ध्वा निहन्मि भरतं तद्बन्धून्मातुलानपि ॥ १५ ॥

अद्य पश्यन्तु मे शौर्यं लोकान्प्रदहतः पुरा ।
राम त्वमभिषेकाय कुरु यत्नमरिन्दम ॥ १६ ॥

धनुष्पाणिरहं तत्र निहन्यां विघ्नकारिणः ।
इति ब्रुवन्तं सौमित्रिमालिङ्ग्य रघुनन्दनः ॥ १७ ॥

शूरोऽसि रघुशार्दूल ममात्यन्तहिते रतः ।
जानामि सर्वं ते सत्यं किन्तु तत्समयो न हि ॥ १८ ॥

यदिदं दृश्यते सर्वं राज्यं देहादिकं च यत् ।
यदि सत्यं भवेत्तत्र आयासः सफलश्च ते ॥ १९ ॥

भोगा मेघवितानस्थविद्युल्लेखेव चञ्चलाः ।
आयुरप्यग्निसन्तप्तलोहस्थजलबिन्दुवत् ॥ २० ॥

यथा व्यालगलस्थोऽपि भेको दंशानपेक्षते ।
तथा कालाहिना ग्रस्तो लोको भोगानशाश्वतान् ॥ २१ ॥

करोति दुःखेन हि कर्मतन्त्रं
शरीरभोगार्थमहर्निशं नरः ।
देहस्तु भिन्नः पुरुषात्समीक्ष्यते
को वात्र भोगः पुरुषेण भुज्यते ॥ २२ ॥

हे रामा, तुझे पिता जसे तुझे गुरू आहेत तशी मीसुद्धा त्यांच्यापेक्षा अधिक प्रमाणात तुझी गुरू आहे. जरी पित्यांनी तुला वनात जाण्याची आज्ञा केली असली, तरीसुद्धा मी माझ्या पुत्राला थांबवीन. (१२)

माझ्या वचनाचे उल्लंघन करून जर तू राजांच्या आज्ञेनं वनात जाशील, तर मी प्राणत्याग करून यमसदनाला जाईन." (१३)

त्या वेळी कौसल्येचे वचन लक्ष्मणानेसुद्धा ऐकले आणि श्रीरामांकडे पाहून, जणू तिन्ही लोकांना भस्म करीत तो म्हणाला. (१४)

"वेड्या, भ्रांतचित्त झालेल्या आणि कैकेयीला वश झालेल्या राजा दशरथांना कैद करून भरताला व त्याला सहाय्य करणाऱ्या त्याच्या मामांनासुद्धा मी ठार करून टाकीन. (१५)

कालाग्नीप्रमाणे सर्व लोकांना जाळून टाकू शकणाऱ्या माझे शौर्य आज सर्व लोकांना प्रथम बघू दे. शत्रूचे दमन करणाऱ्या हे रामा, तुम्ही स्वतःवर अभिषेक करवून घेण्याची तयारी करा. (१६)

त्यामध्ये विघ्न आणणाऱ्या माणसांना मी हातात धनुष्य घेऊन ठार करीन." असे बोलणाऱ्या लक्ष्मणाला आलिंगन देऊन रघुनाथ त्याला म्हणाले. (१७)

"हे रघुश्रेष्ठा लक्ष्मणा, तू फार शूर वीर आहेस आणि माझे हित जपण्यास तू तत्पर आहेस. तू जे काही म्हणालास ते सर्व खरे आहे, हे मी जाणतो. परंतु तसे करण्याची ही योग्य वेळ नव्हे. (१८)

हे जे काही सर्व राज्य तसेच देह इत्यादी दिसत आहेत ते जर सत्य असते तर त्या संदर्भातील तुझे परिश्रम सफळ झाले असते. (१९)

(परंतु तसे नाही.) मेघांच्या समूहात असणाऱ्या विजेच्या लखलखाटाप्रमाणे भोग हे चंचल, न टिकणारे आहेत. आणि अग्नीने तापलेल्या लोखंडावर पडलेल्या पाण्याच्या थेंबाप्रमाणे आयुष्य हेसुद्धा क्षणिक आहे. (२०)

सापाच्या तोंडात अडकलेल्या बेडकालासुद्धा माशा खाण्याची इच्छा होते; त्याप्रमाणे कालरूपी सापाने ग्रस्त झालेले लोकसुद्धा अनित्य भोगांची इच्छा करीत राहतात. (२१)

शरीराला भोग मिळावेत म्हणून माणूस रात्रंदिवस कष्ट करून मोठ्या दुःखाने कर्माच्या खटपटी करतो. परंतु देह हा आत्म्यापेक्षा भिन्न आहे, हे जर विवेकामुळे कळून आले तर या जगात कोणता मनुष्य भोग कसा भोगू शकेल? (२२)

पितृमातृसुतभ्रातृदारबन्ध्वादिसंगमः ।
प्रपायामिव जन्तूनां नद्यां काष्ठौघवच्चलः ॥ २३ ॥

छायेव लक्ष्मीश्चपला प्रतीता
तारुण्यमम्बूर्मिवदध्रुवं च ।
स्वप्नोपमं स्त्रीसुखमायुरल्पं
तथापि जन्तोरभिमान एषः ॥ २४ ॥

संसृतिः स्वप्नसदृशी सदा रोगादिसङ्कुला ।
गन्धर्वनगरप्रख्या मूढस्तामनुवर्तते ॥ २५ ॥

आयुष्यं क्षीयते यस्मादादित्यस्य गतागतैः ।
दृष्ट्वान्येषां जरामृत्यू कथञ्चिन्नैव बुध्यते ॥ २६ ॥

स एव दिवसः सैव रात्रिरित्येव मूढधीः ।
भोगाननुपतत्येव कालवेगं न पश्यति ॥ २७ ॥

प्रतिक्षणं क्षरत्येतदायुरामघटाम्बुवत् ।
सपत्ना इव रोगौघाः शरीरं प्रहरन्त्यहो ॥ २८ ॥

जरा व्याघ्रीव पुरतस्तर्जयन्त्यवतिष्ठते ।
मृत्युः सहैव यात्येष समयं सम्प्रतीक्षते ॥ २९ ॥

देहेऽहंभावमापन्नो राजाहं लोकविश्रुतः ।
इत्यस्मिन्मनुते जन्तुः कृमिविड्भस्मसंज्ञिते ॥ ३० ॥

त्वगस्थिमांसविण्मूत्ररेतोरक्तादिसंयुतः ।
विकारी परिणामी च देह आत्मा कथं वद ॥ ३१ ॥

यमास्थाय भवाँल्लोकं दग्धुमिच्छति लक्ष्मण ।
देहाभिमानिनः सर्वे दोषाः प्रादुर्भवन्ति हि ॥ ३२ ॥

देहोऽहमिति या बुद्धिरविद्या सा प्रकीर्तिता ।
नाहं देहश्चिदात्मेति बुद्धिर्विद्येति भण्यते ॥ ३३ ॥

बाप, आई, भाऊ, पुत्र, पत्नी व नातेवाईक यांच्याशी होणारी आपली भेट पाणपोईवर जमलेल्या प्राण्यांच्या भेटीप्रमाणे किंवा नदीच्या प्रवाहामध्ये एकत्र आलेल्या काष्ठांच्या समूहाप्रमाणे क्षणिक आहे. (२३)

लक्ष्मी ही छायेप्रमाणे चंचल असल्याचा अनुभव आहे. पाण्यावरील तरंगाप्रमाणे तारुण्य हे अनित्य आहे. स्त्रीसुख हे स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहे आणि आयुष्य अल्प आहे. तथापि प्राण्यांना केवढा हा अभिमान! (२४)

रोग इत्यादींनी सदैव भरलेला हा संसार स्वप्नाप्रमाणे आहे किंवा गंधर्वनगराप्रमाणे भासमान होणारा आहे. तो सत्य मानून मूढ लोक त्याचे अनुसरण करतात. (२५)

सूर्याच्या उदय व अस्ताबरोबर आयुष्य क्षीण होत असते, तसेच इतर लोकांचे वार्धक्य आणि मरण पाहिले जात असूनसुद्धा मूढ माणूस कधीही जागा होत नाही.(२६)

दिवस तसाच आहे आणि रात्रही तशीच आहे. (आज त्यात काही फरक नाही, असे वाटून)मतिमूढ झालेला माणूस हा भोगांच्या मागेच धावत सुटतो. त्याला काळाचा वेग कळत नाही. (२७)

कच्च्या घड्यात भरलेल्या पाण्याप्रमाणे प्रत्येक क्षणी आयुष्य क्षीण होत आहे आणि वाईट गोष्ट अशी की शत्रूंप्रमाणे रोगांचे समूह शरीर नष्ट करीत असतात. (२८)

वृद्धावस्था ही एकाद्या वाघिणीप्रमाणे भिववीत पुढे उभी असते. आणि मृत्यूसुद्धा तिच्याबरोबरच चालत असतो आणि तो अंतकाळाची वाट पाहात असतो. (२९)

तथापि कृमी, विष्ठा आणि भस्म असे स्वरूप असणाऱ्या या शरीराबद्दल अहंभावना धारण करणारा प्राणी हा 'मी लोकप्रसिद्ध राजा आहे,' असे समजत असतो. (३०)

हे लक्ष्मणा, ज्याच्या आधाराने तू जगाला दग्ध करू इच्छितोस तो देह त्वचा, अस्थि, मांस, विष्ठा, मूत्र, शुक्र आणि रक्त इत्यादींनी बनलेला असून तो विकार पावणारा आणि परिणाम पावणारा आहे. तो देह आपला आत्मा कसा असेल, ते सांग बरे ? देहाचा अभिमान बाळगणाऱ्या पुरुषाच्या ठिकाणीच सर्व दोष प्रकट होतात. (३१-३२)

देह म्हणजे मी, अशी जी बुद्धी तिचेच अविद्या हे नाव आहे आणि मी देह नाही, मी चेतन आत्मा आहे, अशा बुद्धीला विद्या असे म्हटले जाते. (३३)

अविद्या संसृतेर्हेतुर्विद्या तस्या निवर्तिका ।
तस्माद्यत्नः सदा कार्यो विद्याभ्यासे मुमुक्षुभिः ।
कामक्रोधादयस्तत्र शत्रवः शत्रुसूदन ॥ ३४ ॥

तत्रापि क्रोध एवालं मोक्षविघ्नाय सर्वदा ।
येनाविष्टः पुमान्हन्ति पितृभ्रातृसुहृत्सखीन् ॥ ३५ ॥

क्रोधमूलो मनस्तापः क्रोधः संसारबन्धनम् ।
धर्मक्षयकरः क्रोधस्तस्मात्क्रोधं परित्यज ॥ ३६ ॥

क्रोध एष महान् शत्रुस्तृष्णा वैतरणी नदी ।
सन्तोषो नन्दनवनं शान्तिरेव हि कामधुक् ॥ ३७ ॥

तस्माच्छान्तिं भजस्वाद्य शत्रुरेव भवेन्न ते ।
देहेन्द्रियमनःप्राणबुद्ध्यादिभ्यो विलक्षणः ॥ ३८ ॥

आत्मा शुद्धः स्वयंज्योतिरविकारी निराकृतिः ।
यावद्देहेन्द्रियप्राणैर्भिन्नत्वं नात्मनो विदुः ॥ ३९ ॥

तावत्संसारदुःखौघैः पीड्यन्ते मृत्युसंयुताः ।
तस्मात्त्वं सर्वदा भिन्नमात्मानं हृदि भावय ॥ ४० ॥

बुद्ध्यादिभ्यो बहिः सर्वमनुवर्तस्व मा खिदः ।
भुञ्जन्प्रारब्धमखिलं सुखं वा दुःखमेव वा ॥ ४१ ॥

प्रवाहपतितं कार्यं कुर्वन्नपि न लिप्यसे ।
बाह्ये सर्वत्र कर्तृत्वमावहन्नपि राघव ॥ ४२ ॥

अन्तःशुद्धस्वभावस्त्वं लिप्यसे न च कर्मभिः ।
एतन्मयोदितं कृत्स्नं हृदि भावय सर्वदा ॥ ४३ ॥

संसारदुःखैरखिलैर्बाध्यसे न कदाचन ।
त्वमप्यम्ब मयाऽऽदिष्टं हृदि भावय नित्यदा ॥ ४४ ॥

जन्म- मरण- रूपी संसाराचे कारण अविद्या आहे. तिला निवृत्त करणारी विद्या आहे. म्हणून मोक्षाची इच्छा करणाऱ्या माणसांनी नेहमी विद्येच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करावयास हवा. त्या प्रयत्नामध्ये, हे शत्रुघातका, काम, क्रोध इत्यादी विकार हे विघ्न आणणारे शत्रू आहेत. (३४)

त्यांमध्येसुद्धा क्रोध हा एकटाच मोक्षामध्ये विघ्न आणण्यास पुरेसा आहे. क्रोधाने झपाटलेला पुरुष हा माता, पिता, सुहृद व बांधव यांचासुद्धा वध करतो. (३५)

मनाच्या संतापाचे मूळ कारण क्रोधच आहे. क्रोध हाच माणसाला संसारात बद्ध करणारा आहे. क्रोध हा धर्माचा क्षय करणारा आहे. म्हणून हे लक्ष्मणा, तू क्रोध टाकून दे. (३६)

क्रोध हा एक महान् शत्रू आहे. तृष्णा म्हणजे वैतरणी नदी आहे. संतोष हा नंदनवन आहे आणि शांती हीच कामधेनू आहे. (३७)

म्हणून शांती धारण कर. त्यामुळे क्रोधरूपी शत्रूचा प्रभाव तुझ्यावर पडणार नाही. आत्मा हा देह, इंद्रिये, मन, प्राण, बुद्धी इत्यादींपेक्षा संपूर्णपणे वेगळा आहे. तो शुद्ध, स्वयंप्रकाशी, विकाररहित आणि आकाररहित आहे. जोपर्यंत देह, इंद्रिये, प्राण यांच्यापेक्षा आत्म्याचे भिन्नत्व माणसे जाणत नाहीत, तोपर्यंत मृत्युपाशाने बद्ध असणारी ती माणसे संसारातील दुःखसमूहांनी पीडित होतात. म्हणून हे लक्ष्मणा, आत्मा हा देह इत्यादींपेक्षा भिन्न आहे, ही गोष्ट तू नेहमी मनात बाळगून ठेव. आत्मा हा बुद्धी इत्यादींच्या पलीकडचा वेगळा आहे, हे जाणून तू सर्व बाह्य व्यवहार कर. सर्व प्रारब्ध सुखरूप किंवा दुःखरूप असेल तसे भोगत तू मनामध्ये खेद करू नकोस. (३८-४१)

हे रघुकुलोत्पन्न लक्ष्मणा, बाह्य जगात सर्वत्र इंद्रिये इत्यादींचे द्वारा कर्तृत्व प्रकट करीत, प्रारब्धाच्या प्रवाहात उपस्थित झालेले कार्य करतानासुद्धा तू कर्मबंधनात पडणार नाहीस. (४२)

आत राग, द्वेषरहित शुद्ध स्वभाव असणारा तू कर्मांनी लिप्त होणार नाहीस. हे जे मी आत्ता तुला सांगितले आहे, त्या सर्वांचा तू मनामध्ये नेहमी विचार कर. (४३)

हे लक्ष्मणा, मग तू संसारातील सर्व दुःखांनी कधीच बाधित होणार नाहीस. हे आई, तूसुद्धा मी सांगितलेल्या गोष्टींवर नेहमी मनात विचार कर. (४४)

समागमं प्रतीक्षस्व न दुःखैः पीड्यसे चिरम् ।
न सदैकत्र संवासः कर्ममार्गानुवर्तिनाम् ॥ ४५ ॥

यथा प्रवाहपतितप्लवानां सरितां तथा ।
चतुर्दशसमासाङ्ख्या क्षणार्द्धमिव जायते ॥ ४६ ॥

अनुमन्यस्व मामम्ब दुःखं सन्त्यज्य दूरतः ।
एवं चेत्सुखसंवासो भविष्यति वने मम ॥ ४७ ॥

इत्युक्त्वा दण्डवन्मातुः पादयोरपतच्चिरम् ।
उत्थाप्याङ्के समावेश्य आशीर्भिरभ्यनन्दयत् ॥ ४८ ॥

सर्वे देवाः सगन्धर्वा ब्रह्मविष्णुशिवादयः ।
रक्षन्तु त्वां सदा यान्तं तिष्ठन्तं निद्रया युतम् ॥ ४९ ॥

इति प्रस्थापयामास समालिङ्ग्य पुनः पुनः ।
लक्ष्मणोऽपि तदा रामं नत्वा हर्षाश्रुगद्गदः ॥ ५० ॥

आह राम ममान्तःस्थः संशयोऽयं त्वया हृतः ।
यास्यामि पृष्ठतो राम सेवां कर्तुं तदादिश ॥ ५१ ॥

अनुगृह्णीष्व मां राम नोचेत्प्राणांस्त्यजाम्यहम् ।
तथेति राघवोऽप्याह लक्ष्मणं याहि माचिरम् ॥ ५२ ॥

प्रतस्थे तां समाधातुं गतः सीतापतिर्विभुः ।
आगतं पतिमालोक्य सीता सुस्मितभाषिणी ॥ ५३ ॥

स्वर्णपात्रस्थसलिलैः पादौ प्रक्षाल्य भक्तितः ।
पप्रच्छ पतिमालोक्य देव किं सेनया विना ॥ ५४ ॥

आगतोऽसि गतः कुत्र श्वेतच्छत्रं च ते कुतः ।
वादित्राणि न वाद्यन्ते किरीटादिविवर्जितः ॥ ५५ ॥

सामन्तराजसहितः सम्भ्रमान्नागतोऽसि किम् ।
इति स्म सीतया पृष्टो रामः सस्मितमब्रवीत् ॥ ५६ ॥

नंतर हे माते, माझ्याशी पुनः होणाऱ्या भेटीची तू वाट पाहा. तुला फार काळ दुःख सोसावे लागणार नाही. ज्या प्रमाणे नद्यांच्या प्रवाहांत पडलेल्या नावांचे नेहमी एकत्र असणे संभवत नाही, त्या प्रमाणे प्रारब्धकर्मगतीमुळे सर्व जीवांचे नेहमी एकत्रच राहणे शक्य नसते. चौदा वर्षांचा अवधी अर्ध्या क्षणाप्रमाणे निघून जाईल. (४५-४६)

म्हणून हे आई, दुःखाला दूर ठेवून तू माझ्या वनगमनाला अनुमती दे. असे जर तू करशील तर मी वनामध्ये सुखाने राहू शकेन." (४७)

असे बोलून श्रीरामचंद्र पुष्कळ वेळपर्यंत मातेच्या चरणांवर पडून राहिले. त्यानंतर त्यांना उठवून आणि मांडीवर बसवून व आशीर्वाद देऊन, कौसल्येने त्यांचे अभिनंदन केले. (४८)

कौसल्या म्हणाली "हे रामा, तू हिंडत असताना, बसला असताना किंवा झोपी गेला असताना ब्रह्मदेव, विष्णू, शिव इत्यादी, तसेच गंधर्वासहित सर्व देव तुझे सदा रक्षण करोत." (४९)

अशा प्रकारे रामांना पुनः पुनः आलिंगन देऊन मातेने त्यांना निरोप दिला. त्या वेळी आनंदाश्रूंनी गद्गद झालेल्या लक्ष्मणानेसुद्धा श्रीरामांना वंदन केले आणि म्हटले, "दादा, माझ्या अंतःकरणातील संशय तुम्ही दूर केला. आता तुमची सेवा करण्यासाठी मी तुमच्या मागोमाग येईन. मला तशी अनुज्ञा द्या. (५०-५१)

दादा, माझ्यावर कृपा करा. तसे न झाल्यास मी प्राणत्याग करीन." तेव्हा श्रीराम लक्ष्मणाला म्हणाले, "ठीक आहे. चल, उशीर करू नकोस." (५२)

त्यानंतर सीतापती भगवान श्रीराम सीतेला समजावण्यासाठी निघाले आणि आपल्या महालात पोचले. तेव्हा सुंदर स्मित करीत बोलणाऱ्या सीतेने आपले पती आलेले पाहून, एका सुवर्ण-पात्रामध्ये पाणी घेऊन रामांचे चरण भक्तिपूर्वक धुतले आणि पतीकडे पाहून तिने विचारले, "हे देवा, या वेळी तुम्ही सेनेशिवाय कसे आला आहात ? प्रातःकाळी तुम्ही कुठे गेला होता ? तुमचे श्वेत छत्र कुठे आहे ? वाद्ये का वाजविली जात नाहीत ? आणि किरीट इत्यादी राजोचित भूषणांशिवाय तुम्ही कसे आला आहात? मंत्री व सामंत राजे यांच्यासह मोठ्या थाटामाटाने का आला नाहीत ?" अशा प्रकारे सीतेने प्रश्न केल्यावर श्रीरामचंद्रांनी स्मित हास्य करून म्हटले. (५३-५६)

राज्ञा मे दण्डकारण्ये राज्यं दत्तं शुभेऽखिलम् ।
अतस्तत्पालनार्थाय शीघ्रं यास्यामि भामिनि ॥५७॥

अद्यैव यास्यामि वनं त्वं तु श्वश्रूसमीपगा ।
शुश्रूषां कुरु मे मातुर्न मिथ्यावादिनो वयम् ॥ ५८ ॥

इति ब्रुवन्तं श्रीरामं सीता भीताब्रवीद्वचः ।
किमर्थं वनराज्यं ते पित्रा दत्तं महात्मना ॥ ५९ ॥

तामाह रामः कैकेय्यै राजा प्रीतो वरं ददौ ।
भरताय ददौ राज्यं वनवासं ममानघे ॥ ६० ॥

चतुर्दश समास्तत्र वासो मे किल याचितः ।
तया देव्या ददौ राजा सत्यवादी दयापरः ॥ ६१ ॥

अतः शीघ्रं गमिष्यामि मा विघ्नं कुरु भामिनि ।
श्रुत्वा तद्रामवचनं जानकी प्रीतिसंयुता ॥ ६२ ॥

अहमग्रे गमिष्यामि वनं पश्चात्त्वमेष्यसि ।
इत्याह मां विना गन्तुं तव राघव नोचितम् ॥ ६३ ॥

तामाह राघवः प्रीतः स्वप्रियां प्रियवादिनीम् ।
कथं वनं त्वां नेष्येऽहं बहुव्याघ्रमृगाकुलम् ॥ ६४ ॥

राक्षसा घोररूपाश्च सन्ति मानुषभोजिनः ।
सिंहव्याघ्रवराहाश्च सञ्चरन्ति समन्ततः ॥ ६५ ॥

कट्वम्लफलमूलानि भोजनार्थं सुमध्यमे ।
अपूपानि व्यञ्जनानि विद्यन्ते न कदाचन ॥ ६६ ॥

काले काले फलं वापि विद्यते कुत्र सुन्दरि ।
मार्गो न दृश्यते क्वापि शर्कराकण्टकान्वितः ॥ ६७ ॥

गुहागह्वरसम्बाधं झिल्लीदंशादिभिर्युतम् ।
एवं बहुविधं दोषं वनं दण्डकसंज्ञितम् ॥ ६८ ॥

"हे प्रिये, महाराजांनी मला दंडकारण्याचे संपूर्ण राज्य दिले आहे. म्हणून हे भामिनी, त्यांच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी मी त्वरितच तेथे जाणार आहे. (५७)

मी आजच वनात जाईन. तू मात्र आपल्या सासूचे जवळ राहून तिची सेवा-शुश्रूषा करीत राहा. मी खोटे बोलत नाही." (५८)

श्रीरामचंद्रांनी असे म्हटल्यावर भयभीत होऊन सीता त्यांना म्हणाली, "तुमच्या महात्म्या पित्यांनी तुम्हांला वनाचे राज्य का बरे दिले आहे?" (५९)

तेव्हा रामचंद्रांनी तिला सांगितले, "हे पुण्यशीले, प्रसन्न झालेल्या राजांनी कैकेयीला वर दिला आहे. त्यानुसार त्यांनी भरताला राज्य दिले आणि मला वनवास दिला. (६०)

त्या कैकेयी मातेने माझ्यासाठी, चौदा वर्षांचा वनवास मागितला. तेव्हा माझ्यावर प्रेम करणाऱ्या पण सत्यवादी राजांना तो मान्य करावा लागला. (६१)

म्हणून हे भामिनी, मी पित्याची प्रतिज्ञा खरी करण्यासाठी लगेच वनात जाणार आहे. त्या बाबतीत तू विघ्न आणू नकोस." ते श्रीरामांचे वचन ऐकून प्रसन्नतेने सीता त्यांना म्हणाली, "(जर तुम्ही जाणारच असाल तर) आधी मी वनात जाईन, नंतर तुम्ही यावे. हे राघवा, मला इथे सोडून तुम्ही जावे हे योग्य नव्हे." (६२-६३)

तेव्हा आनंदित झालेले रघुनाथ गोड बोलणाऱ्या आपल्या प्रिय जानकीला सांगू लागले, "पुष्कळ व्याघ्र इत्यादी वन्य पशूंनी भरलेल्या वनात मी तुला कसे बरे नेऊ? (६४)

तेथे माणसाला खाणारे, भयंकर स्वरूप असणारे असे राक्षस राहतात आणि सिंह, वाघ, वराह इत्यादी हिंस्र पशू त्या वनात सगळीकडे फिरत असतात. (६५)

हे प्रिये, त्या वनात भोजनासाठी कडू व आंबट अशी फळे आणि कंदमुळे मिळतात. घाऱ्या इत्यादी कोणतेही गोड पदार्थ आणि चटणी इत्यादी तोंडी लावणी तेथे कधीही मिळत नाहीत. (६६)

हे सुंदरी, ती फळेसुद्धा कधीतरी, कुठेतरी मिळतात. तसेच त्या वनात खडे, काटे व गवत यांनी झाकून गेल्यामुळे वाटसुद्धा अनेकदा दिसत नाही. (६७)

ते वन अनेक गुहा आणि बिळे यांनी भरलेले तसेच रातकिडे, चावणारे कीटक इत्यादींनी युक्त आहे. असे हे दंडकारण्य अनेक प्रकारच्या अडचणींनी भरलेले आहे. (६८)

पादचारेण गन्तव्यं शीतवातातपादिमत् ।
राक्षसादीन्वने दृष्ट्वा जीवितं हास्यसेऽचिरात् ॥ ६९ ॥

तस्माद्भद्रे गृहे तिष्ठ शीघ्रं द्रक्ष्यसि मां पुनः ।
रामस्य वचनं श्रुत्वा सीता दुःखसमन्विता ॥ ७० ॥

प्रत्युवाच स्फुरद्वक्त्रा किञ्चित्कोपसमन्विता ।
कथं मामिच्छसे त्यक्तुं धर्मपत्नीं पतिव्रताम् ॥ ७१ ॥

त्वदनन्यामदोषां मां धर्मज्ञोऽसि दयापरः ।
त्वत्समीपे स्थितां राम को वा मां धर्षयेद्वने ॥ ७२ ॥

फलमूलादिकं यद्यत्तव भुक्तावशेषितम् ।
तदेवामृततुल्यं मे तेन तुष्टा रमाम्यहम् ॥ ७३ ॥

त्वया सह चरन्त्या मे कुशाः काशाश्च कण्टकाः ।
पुष्पास्तरणतुल्या मे भविष्यन्ति न संशयः ॥ ७४ ॥

अहं त्वा क्लेशये नैव भवेयं कार्यसाधिनी ।
बाल्ये मां वीक्ष्य कश्चिद्वै ज्योतिःशास्त्रविशारदः ॥ ७५ ॥

प्राह ते विपिने वासः पत्या सह भविष्यति ।
सत्यवादी द्विजो भूयाद्गमिष्यामि त्वया सह ॥ ७६ ॥

अन्यत्किञ्चित्प्रवक्ष्यामि श्रुत्वा मां नय काननम् ।
रामायणानि बहुशः श्रुतानि बहुभिर्द्विजैः ॥ ७७ ॥

सीतां विना वनं रामो गतः किं कुत्रचिद्वद ।
अतस्त्वया गमिष्यामि सर्वथा त्वत्सहायिनी ॥ ७८ ॥

यदि गच्छसि मां त्यक्त्वा प्राणांस्त्यक्ष्यामि तेऽग्रतः ।
इति तं निश्चयं ज्ञात्वा सीताया रघुनन्दनः ॥ ७९ ॥

अब्रवीद्देवि गच्छ त्वं वनं शीघ्रं मया सह ।
अरुन्धत्यै प्रयच्छाशु हारानाभरणानि च ॥ ८० ॥

ब्राह्मणेभ्यो धनं सर्वं दत्त्वा गच्छामहे वनम् ।
इत्युक्त्वा लक्ष्मणेनाशु द्विजानाहूय भक्तितः ॥ ८१ ॥

ते वन थंडी, वारा आणि ऊन यांनी युक्त आहे. तेथे पायी चालावे लागते. त्या वनात भयंकर राक्षस इत्यादींना पाहून तू त्वरित प्राण गमावून बसशील. (६९)

म्हणून हे कल्याणी, तू घरातच राहा. तू मला पुनः लौकरच भेटशील." श्रीरामांचे हे वचन ऐकून दुःखी झालेली सीता थोडीशी रागावली आणि कंप पावणाऱ्या ओठांनी म्हणाली, "तुम्ही धर्मज्ञ आणि दयाळू आहात. मी तुमची पतिव्रता धर्मपत्नी आहे. मला घरी सोडून जाण्याची इच्छा तुम्हांला कशी बरे झाली? आपल्या अनन्यभक्त व निर्दोष असलेल्या मला कसे सोडता येईल? हे श्रीरामा, वनामध्ये मी तुमच्याजवळ राहात असताना मला कोण त्रास देईल? (७०-७२)

वनात जे काही फळ- मूळ इत्यादी तुम्ही खाऊन उरेल तेच मला अमृताप्रमाणे गोड वाटेल. त्यानेच संतुष्ट होऊन मी तुमच्याबरोबर आनंदाने रममाण होईन. (७३)

तुमच्याबरोबर हिंडत असताना कुश, काश, काटे इत्यादी सर्व काही मला फुलांनी आच्छादलेल्या गालिच्याप्रमाणे होईल, यात संशय नाही. (७४)

वनात मी तुम्हांला मुळीच त्रास देणार नाही. उलट तुमच्या कार्यात मी सहायक होईन. लहानपणी मला पाहून एका ज्योतिष शास्त्रज्ञाने मला सांगितले होते की, तू आपल्या पतीसह काही काळ अरण्यात राहशील. त्या ब्राह्मणाचे वाक्य खरे होऊ दे. त्यासाठी मी तुमच्याबरोबर वनात येणार. (७५-७६)

मी आणखी एक गोष्ट तुम्हांला सांगते. ती ऐकून तुम्ही मला वनात घेऊन जा. अनेक ब्राह्मणांच्या मुखांतून तुम्ही पुष्कळशी रामायणे ऐकलेली आहेत. (७७)

त्यामध्ये सीतेशिवाय राम वनात गेला असे कुठेतरी सांगितले आहे का, ते तुम्ही मला सांगा. म्हणून तुम्हांला साहाय्य करणारी मी तुमच्याबरोबर वनात येणारच. (७८)

जर तुम्ही माझा त्याग करून जाल तर मी तुमच्या समोरच माझे प्राण सोडीन." अशा प्रकारे सीतेचा तो दृढ निश्चय पाहिल्यावर, रघुनाथ तिला म्हणाले, "हे देवी, तू माझ्याबरोबर झटपट वनात चल. तू ताबडतोब आपले हार आणि अलंकार अरुंधती या वसिष्ठांच्या पत्नीला दे. (७९-८०)

आपले संपूर्ण धन ब्राह्मणांना देऊन आपण वनात जाऊ." असे सांगून भगवान श्रीरामांनी लक्ष्मणाकडून लगेच ब्राह्मणांना भक्तिपूर्वक बोलावून घेतले. (८१)

ददौ गवां वृन्दशतं धनानि
वस्त्राणि दिव्यानि विभूषणानि ।
कुटुम्बवद्भ्यः श्रुतशीलवद्भ्यो
मुदा द्विजेभ्यो रघुवंशकेतुः ॥ ८२ ॥

रघुकुलश्रेष्ठ रामांनी विद्वान आणि शीलसंपन्न अशा कुटुंबवत्सल ब्राह्मणांना शेकडो गाईचे कळप, पुष्कळ द्रव्य, दिव्य वस्त्रे आणि दिव्य अलंकार आनंदाने दिले. (८२)

अरुन्धत्यै ददौ सीता मुख्यान्याभरणानि च ।
रामो मातुः सेवकेभ्यो ददौ धनमनेकधा ॥ ८३ ॥

आपले मुख्य मुख्य अलंकार सीतेने अरुंधतीला दिले. तसेच श्रीरामांनी आपल्या आईच्या सेवकांना नाना प्रकारचे धन दिले. (८३)

स्वकान्तःपुरवासिभ्यः सेवकेभ्यस्तथैव च ।
पौरजानपदेभ्यश्च ब्राह्मणेभ्यः सहस्रशः ॥ ८४ ॥

तसेच स्वतःच्या अंतःपुरातील सेवक, हजारो नगरवासीजन, ग्रामीण भागांतील लोक आणि ब्राह्मण यांना श्रीरामांनी नाना प्रकारचे दान दिले. (८४)

लक्ष्मणोऽपि सुमित्रां तु कौसल्यायै समर्पयत् ।
धनुष्पाणिः समागत्य रामस्याग्रे व्यवस्थितः ॥ ८५ ॥

लक्ष्मणानेसुद्धा सुमित्रेला कौसल्येकडे सोपविले आणि हातात धनुष्य घेऊन तो श्रीरामांपुढे येऊन उभा राहिला. त्यानंतर राम, सीता आणि लक्ष्मण हे सगळे राजा दशरथांच्या महालाकडे जाण्यास निघाले. (८५-८६)

रामः सीता लक्ष्मणश्च जग्मुः सर्वे नृपालयम् ॥ ८६ ॥

श्रीरामः सह सीतया नृपपथे
गच्छन् शनैः सानुजः
पौरान् जानपदान्कुतूहलदृशः
सानन्दमुद्वीक्षयन् ।
श्यामः कामसहस्रसुन्दरवपुः
कान्त्या दिशो भासयन्
पादन्यासपवित्रिताखिलजगत्
प्रापालयं तत्पितुः ॥ ८७ ॥

हजारो कामदेवाप्रमाणे सुंदर शरीर असणारे व श्याम वर्णाचे भगवान श्रीराम सीतेसह आणि लक्ष्मण या धाकट्या भावासह, आपल्या कांतीने दशदिशांना प्रकाशित करीत राजमार्गावरून सावकाश चालू लागले. त्या वेळी वाटेत कुतूहलाने नगरवासी आणि ग्रामवासी श्रीरामप्रभू, सीता व लक्ष्मण यांचेकडे पाहात होते आणि श्रीराम आपल्या आनंदमय दृष्टीने त्यांच्याकडे पाहात व आपल्या चरणांच्या स्पर्शाने संपूर्ण जगाला पवित्र करीत आपल्या पित्याच्या महालात पोहोचले. (८७)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे अयोध्याकाण्डे चतुर्थः सर्गः ॥४॥

पञ्चम सर्ग

भगवंतांचे वनगमन

श्रीमहादेव उवाच

आयान्तं नागरा दृष्ट्वा मार्गे रामं सजानकिम् ।
लक्ष्मणेन समं वीक्ष्य ऊचुः सर्वे परस्परम् ॥ १ ॥

श्रीमहादेव म्हणाले – हे पार्वती, जानकी आणि लक्ष्मण यांच्यासह मार्गावरून जाताना रामचंद्रांना पाहून, आणि कैकेयीला दशरथांनी दिलेले वरदान इत्यादी ऐकून, सर्व नगरवासी लोक दुःखाने व्याकूळ होऊन गेले आणि ते एकमेकांना म्हणू लागले "हाय! हाय! कामी राजा दशरथांनी आपल्या सत्यप्रतिज्ञ प्रिय पुत्राला एका स्त्रीसाठी सोडून दिले. त्यांची सत्यपरायणता कुठे उरली ? आणि दुष्ट

कैकेय्या वरदानादि श्रुत्वा दुःखसमावृताः ।
बत राजा दशरथः सत्यसन्धं प्रियं सुतम् ॥ २ ॥

स्त्रीहेतोरत्यजत्कामी तस्य सत्यात्मता कुतः ।
कैकेयी वा कथं दुष्टा रामं सत्यं प्रियङ्करम् ॥ ३ ॥

विवासयामास कथं क्रूरकर्मातिमूढधीः ।
हे जना नात्र वस्तव्यं गच्छामोऽद्यैव काननम् ॥ ४ ॥

यत्र रामः सभार्यश्च सानुजो गन्तुमिच्छति ।
पश्यन्तु जानकीं सर्वे पादचारेण गच्छतीम् ॥ ५ ॥

पुंभिः कदाचिद्दृष्टा वा जानकी लोकसुन्दरी ।
सापि पादेन गच्छन्ती जनसङ्क्षेष्नावृता ॥ ६ ॥

रामोऽपि पादचारेण गजाश्वादिविवर्जितः ।
गच्छति द्रक्ष्यथ विभुं सर्वलोकैकसुन्दरम् ॥ ७ ॥

राक्षसी कैकयीनाम्नी जाता सर्वविनाशिनी ।
रामस्यापि भवेद्दुःखं सीतायाः पादयानतः ॥ ८ ॥

बलवान्विधिरेवात्र पुंप्रयत्नो हि दुर्बलः ।
इति दुःखाकुले वृन्दे साधूनां मुनिपुङ्गवः ॥ ९ ॥

अब्रवीद्वामदेवोऽथ साधूनां सङ्गमध्यगः ।
मानुशोचथ रामं वा सीतां वा वच्मि तत्त्वतः ॥ १० ॥

एष रामः परो विष्णुरादिनारायणः स्मृतः ।
एषा सा जानकी लक्ष्मीर्योगमायेति विश्रुता ॥ ११ ॥

असौ शेषस्तमन्वेति लक्ष्मणाख्यश्च साम्प्रतम् ।
एष मायागुणैर्युक्तस्तत्तदाकारवानिव ॥ १२ ॥

एष एव रजोयुक्तो ब्रह्माभूद्विश्वभावनः ।
सत्त्वाविष्टस्तथा विष्णुस्त्रिजगत्प्रतिपालकः ॥ १३ ॥

एष रुद्रस्तामसोऽन्ते जगत्प्रलयकारणम् ।
एष मत्स्यः पुरा भूत्वा भक्तं वैवस्वतं मनुम् ॥ १४ ॥

नाव्यारोप्य लयस्यान्ते पालयामास राघवः ।
समुद्रमथने पूर्वं मन्दरे सुतलं गते ॥ १५ ॥

कैकेयीनेसुद्धा सत्यवादी आणि प्रिय करणाऱ्या रामांना कसे बरे वनात हाकूलन दिले ? ती तर नेहमी श्रीरामांची प्रशंसा करीत असे. ती आज कशी बरे अशी क्रूर कर्म करणारी आणि मूढबुद्धी झाली? लोकहो, आता आपण येथे राहावयाचे नाही, आजच जेथे आपली पत्नी आणि धाकटा भाऊ लक्ष्मण यांचेसह श्रीराम जाणार आहेत, आपणसुद्धा तेथे वनात जाऊया. हाय! पाहा ना! आज जानकी पायी चालत आहेत ! पूर्वी कधीतरी कुणातरी पुरुषाने जगत्सुंदरी जानकीना पाहिले तरी होते काय ? त्या आज पडदा न घेता जमावातून पायी चालत आहेत. (१-६)

लोकहो, सर्व लोकांमध्ये अद्वितीय सुंदर असलेल्या रामांना तुम्ही पाहा ना ! तेसुद्धा आज हत्ती व घोडे यांशिवाय पायी निघाले आहेत. (७)

कैकेयी नावाची राक्षसी (जणू) सर्वांचा नाश करण्यासाठीच जन्माला आली आहे. सीता देवीना पायी चालताना पाहून श्रीरामांनासुद्धा दुःख झाले असणारच.(८)

(परंतु काय करावे ?) या बाबतीत दैव हेच बलवान आहे. त्यापुढे पुरुषाचा प्रयत्न हा बलहीन ठरतो." अशा प्रकारे बोलत त्या सज्जन माणसांचा समुदाय दुःखाने व्याकूळ झाला असताना, मुनिश्रेष्ठ वामदेव त्या सज्जन लोकांच्या समूहामध्ये येऊन त्यांना सांगू लागले, "तुम्ही श्रीराम अथवा सीता यांच्याबद्दल मुळीच शोक करू नका. मी तुम्हांला खरीखुरी गोष्ट सांगतो, ती ऐका. (९-१०)

हे श्रीराम म्हणजे श्रेष्ठ असे आदिनारायण भगवान विष्णू आहेत, असे म्हटले जाते आणि ही जानकी म्हणजे योगमाया या नावाने प्रसिद्ध असणारी विष्णूंची लक्ष्मी आहे. (११)

आणि या वेळी लक्ष्मण हे नाव असणारा शेष त्या रामांच्या मागोमाग जात आहे. परमात्मा हाच आपल्या मायेच्या गुणांनी युक्त होऊन जणू त्या त्या शरीरधारी व्यक्तीप्रमाणे भासतो. (१२)

रजोगुणाने युक्त होऊन हाच परमात्मा विश्व निर्माण करणारा ब्रह्मदेव झाला आहे आणि सत्त्वगुणाने संपन्न होऊन तोच तीन लोकांचे पालन करणारा भगवान विष्णू बनतो. (१३)

तसेच कल्पाच्या शेवटी तमोगुणाचा आश्रय घेऊन हाच जगाच्या प्रलयाचे कारण असणारा रुद्र बनतो. पूर्वी या रघुनाथांनीच मत्स्यरूप घेऊन आपला भक्त वैवस्वत मनू याला प्रलय-समयी नावेत बसवून त्याचे रक्षण केले. पूर्वी समुद्रमंथनाच्या वेळी मंदर पर्वत हा सुतल लोकाप्रत

अधारयत्स्वपृष्ठेऽद्रिं कूर्मरूपी रघूत्तमः ।
मही रसातलं याता प्रलये सूकरोऽभवत् ॥ १६ ॥

तोलयामास दंष्ट्राग्रे तां क्षोणीं रघुनन्दनः ।
नारसिंहं वपुः कृत्वा प्रह्लादवरदः पुरा ॥ १७ ॥

त्रैलोक्यकण्टकं रक्षः पाटयामास तन्नखैः ।
पुत्रराज्यं हृतं दृष्ट्वा ह्यदित्या याचितः पुरा ॥ १८ ॥

वामनत्वमुपागम्य याच्ञया चाहरत्पुनः ।
दुष्टक्षत्रियभूभारनिवृत्त्यै भार्गवोऽभवत् ॥ १९ ॥

स एव जगतां नाथ इदानीं रामतां गतः ।
रावणादीनि रक्षांसि कोटिशो निहनिष्यति ॥ २० ॥

मानुषेणैव मरणं तस्य दुष्टं दुरात्मनः ।
राज्ञा दशरथेनापि तपसाराधितो हरिः ॥ २१ ॥

पुत्रत्वाकाङ्क्षया विष्णोस्तदा पुत्रोऽभवद्धरिः ।
स एव विष्णुः श्रीरामो रावणादिवधाय हि ॥ २२ ॥

गन्ताद्यैव वनं रामो लक्ष्मणेन सहायवान् ।
एषा सीता हरेर्माया सृष्टिस्थित्यन्तकारिणी ॥ २३ ॥

राजा वा कैकयी वापि नात्र कारणमण्वपि ।
पूर्वेद्युर्नारदः प्राह भूभारहरणाय च ॥ २४ ॥

रामोऽप्याह स्वयं साक्षाच्छ्वो गमिष्याम्यहं वनम् ।
अतो रामं समुद्दिश्य चिन्तां त्यजत बालिशाः ॥ २५ ॥

रामरामेति ये नित्यं जपन्ति मनुजा भुवि ।
तेषां मृत्युभयादीनि न भवन्ति कदाचन ॥ २६ ॥

का पुनस्तस्य रामस्य दुःखशङ्का महात्मनः ।
रामनाम्नैव मुक्तिः स्यात्कलौ नान्येन केनचित् ॥ २७ ॥

गेला असता, कूर्मरूपी रघुश्रेष्ठाने त्या पर्वताला आपल्या पाठीवर धारण केले. प्रलय-काळी जेव्हा पृथ्वी रसातळाला गेली तेव्हा रघुनंदन वराह झाले आणि त्यांनी आपल्या सुळ्याच्या टोकावर धरून पृथ्वीला वर आणले. तसेच पूर्वी नरसिंहाचे रूप धारण करून त्यांनी प्रह्लादाला वर दिला. (१४-१७)

त्या वेळी त्यांनी तिन्ही लोकांना काट्याप्रमाणे सलणाऱ्या त्या दैत्यराज हिरण्यकशिपूला आपल्या नखांनी फाडून टाकले. अदितीने एकदा इंद्र या आपल्या पुत्राचे राज्य हरण केले गेले आहे असे पाहून श्रीरामांची प्रार्थना केली. (१८)

तेव्हा वामनरूप धारण करून बळी राजाकडे याचना करून, त्यांनी पुनः ते इंद्राचे राज्य मिळवले व इंद्राला दिले. दुष्ट अशा क्षत्रियांमुळे झालेल्या पृथ्वीच्या भाराचे निवारण करण्यासाठी श्रीराम भृगुपुत्र परशुराम झाले. (१९)

तेच जगाचे स्वामी असलेले परमात्मा आता श्रीराम झाले आहेत. आता तेच रावण इत्यादी कोट्यवधी राक्षसांना ठार करणार आहेत. (२०)

त्या दुरात्म्या रावणाचे मरण माणसाच्या हातूनच होईल, असे ठरले आहे. तसेच आपल्या पूर्वजन्मात विष्णू हा आपला पुत्र व्हावा, म्हणून महाराज दशरथांनी विष्णूंची आराधना तपश्चर्येच्या द्वारा केली होती. म्हणून हरी त्या दशरथांचे पुत्र झाले आहेत. तेच हे विष्णू म्हणजे श्रीराम होत. आता ते रावणाचा वध करण्यासाठी लक्ष्मणाला बरोबर घेऊन आजच वनात जाणार आहेत. ही सीता म्हणजे जगाची उत्पत्ती, स्थिती व लय करणारी भगवान विष्णूंची साक्षात माया आहे. (२१-२३)

या रामांच्या वनगमनाच्या बाबतीत राजा दशरथ किंवा कैकेयी हेसुद्धा अणुमात्रही कारण नाहीत. कारण पृथ्वीचा भार उतरविण्यासाठी नारदांनी कालच रामांची प्रार्थना केली होती. (२४)

त्या वेळी स्वतः श्रीरामांनीसुद्धा नारदांना सांगितले होते की 'मी उद्याच वनात जाईन.' म्हणून हे भोळ्या लोकांनो, रामांच्या बाबतीत तुम्ही चिंता करणे सोडून द्या. (२५)

या पृथ्वीवर जे लोक नित्य 'राम राम' असा जप करतील, त्यांना कधीही मृत्यूचे भय इत्यादी असणार नाही. (२६)

अशा स्थितीत त्या महात्म्या श्रीरामांना दुःख होईल, अशी शंका तरी करणे, कसे बरे शक्य आहे ? कलियुगात केवळ प्रभू रामांच्या नामानेच मुक्ती प्राप्त होऊ शकते; अन्य कोणत्याही उपायाने नाही. (२७)

मायामानुषरूपेण विडम्बयति लोककृत् ।
भक्तानां भजनार्थाय रावणस्य वधाय च ॥ २८ ॥

राज्ञश्चाभीष्टसिद्ध्यर्थं मानुषं वपुराश्रितः ।
इत्युक्त्वा विररामाथ वामदेवो महामुनिः ॥ २९ ॥

श्रुत्वा तेऽपि द्विजाः सर्वे रामं ज्ञात्वा हरिं विभुम् ।
जहुर्हृत्संशयग्रन्थिं राममेवान्वचिन्तयन् ॥ ३० ॥

य इदं चिन्तयेन्नित्यं रहस्यं रामसीतयोः ।
तस्य रामे दृढा भक्तिर्भवेद्विज्ञानपूर्विका ॥ ३१ ॥

रहस्यं गोपनीयं वो यूयं वै राघवप्रियाः ।
इत्युक्त्वा प्रययौ विप्रस्तेऽपि रामं परं विदुः ॥ ३२ ॥

ततो रामः समाविश्य पितृगेहमवारितः ।
सानुजः सीतया गत्वा कैकेयीमिदमब्रवीत् ॥ ३३ ॥

आगताः स्मो वयं मातस्त्वयस्ते सम्मतं वनम् ।
गन्तुं कृतधियः शीघ्रमाज्ञापयतु नः पिता ॥ ३४ ॥

इत्युक्ता सहसोत्थाय चीराणि प्रददौ स्वयम् ।
रामाय लक्ष्मणायाथ सीतायै च पृथक् पृथक् ॥ ३५ ॥

रामस्तु वस्त्राण्युत्सृज्य वन्यचीराणि पर्यधात् ।
लक्ष्मणोऽपि तथा चक्रे सीता तत्र विजानती ॥ ३६ ॥

हस्ते गृहीत्वा रामस्य लज्जया मुखमैक्षत ।
रामो गृहीत्वा तच्चीरमंशुके पर्यवेष्टयत् ॥ ३७ ॥

तद्दृष्ट्वा रुरुदुः सर्वे राजदाराः समन्ततः ।
वसिष्ठस्तु तदाकर्ण्य रुदितं भर्त्सयन् रुषा ॥ ३८ ॥

कैकेयीं प्राह दुर्वृत्ते राम एव त्वया वृतः ।
वनवासाय दुष्टे त्वं सीतायै किं प्रयच्छसि ॥ ३९ ॥

भक्तांना भगवंतांच्या गुण कीर्तनाचा सुयोग देण्यासाठी आणि रावणाचा वध करण्यासाठी जगाचे कर्ते प्रभू रामचंद्र माया-मानुष-रूप धारण करून या जगात लीला करीत आहेत. (२८)

तसेच राजा दशरथांचे मनोरथ सिद्ध होण्यासाठी यांनी मनुष्य शरीर धारण केले आहे." असे नगरवासी लोकांना सांगून महामुनी वामदेव थांबले. (२९)

असे ऐकल्यावर श्रीराम हेच सर्वव्यापक विष्णू भगवान आहेत, हे सर्व द्विजांना कळले. मग आपल्या मनातील संशय त्यांनी सोडला आणि ते श्रीरामचंद्रांचेच चिंतन करू लागले. (३०)

राम आणि सीता यांच्या या रहस्याचे मनन जो कोणी नित्य करेल त्याची श्रीरामांचे ठायी विज्ञानपूर्वक दृढ भक्ती होईल. (३१)

"तुम्ही सर्वजण रामांना प्रिय आहात. म्हणून मी हे सांगितले आहे, परंतु हे रहस्य गुप्त राखावे." असे सांगून ते विप्रश्रेष्ठ वामदेव तेथून निघून गेले. तेव्हा श्रीराम हे परमात्माच आहेत असे त्या पौरजनांनासुद्धा कळून आले. (३२)

नंतर लक्ष्मण आणि सीता यांच्यासह श्रीराम कोणताही अडथळा न येता आपल्या पित्याच्या महालात गेले आणि ते कैकेयीला म्हणाले. (३३)

"मातोश्री, तुमच्या इच्छेप्रमाणे वनवासास जाण्याचा निश्चय करून आम्ही तिघेजण येथे आलो आहोत. आता चट्दिशी पिताजींनी आम्हांला आज्ञा करावी." (३४)

श्रीरामांनी तिला असे सांगितल्यावर कैकेयी झट्दिशी उठली आणि तिने स्वतःच राम, लक्ष्मण व सीता यांना वल्कले दिली. (३५)

तेव्हा रामचंद्रांनी आपली राजोचित वस्त्रे काढून टाकली व वल्कले धारण केली. लक्ष्मणानेसुद्धा तसेच केले. परंतु सीता मात्र ती वल्कले परिधान करण्याचे जाणत नव्हती. (३६)

म्हणून वस्त्रे हातात घेऊन ती लाजेने श्रीरामांच्या मुखाकडे पाहू लागली. तेव्हा श्रीरामांनी ती वल्कले घेऊन, सीतेच्या रेशमी वस्त्रावरच गुंडाळून टाकली. (३७)

ते पाहून सर्व राजस्त्रिया सर्व बाजूंनी रडू लागल्या. तेव्हा तो रडण्याचा आवाज ऐकून वसिष्ठांनी रागाने कैकेयीची निर्भर्त्सना करीत म्हटले, "अग दुष्ट स्त्रिये, तू फक्त रामासाठीच वनात जाण्याचा वर मागितलेला आहेस ना ? तर मग तू सीतेलासुद्धा वनात जाण्यास योग्य अशी वल्कले का बरे देत आहेस ? (३८-३९)

यदि रामं समन्वेति सीता भक्त्या पतिव्रता ।
दिव्याम्बरधरा नित्यं सर्वाभरणभूषिता ॥ ४० ॥

रमयत्वनिशं रामं वनदुःखनिवारिणी ।
राजा दशरथोऽप्याह सुमन्त्रं रथमानय ॥ ४१ ॥

रथमारुह्य गच्छन्तु वनं वनचरप्रियाः ।
इत्युक्त्वा राममालोक्य सीतां चैव सलक्ष्मणम् ॥ ४२ ॥

दुःखान्निपतितो भूमौ रुरोदाश्रुपरिप्लुतः ।
आरुरोह रथं सीता शीघ्रं रामस्य पश्यतः ॥ ४३ ॥

रामः प्रदक्षिणं कृत्वा पितरं रथमारुहत् ।
लक्ष्मणः खड्गयुगलं धनुस्तूणीयुगं तथा ॥ ४४ ॥

गृहीत्वा रथमारुह्य नोदयामास सारथिम् ।
तिष्ठ तिष्ठ सुमन्त्रेति राजा दशरथोऽब्रवीत् ॥ ४५ ॥

गच्छ गच्छेति रामेण नोदितोऽचोदयद्रथम् ।
रामे दूरं गते राजा मूर्च्छितः प्रापतद्भुवि ॥ ४६ ॥

पौरास्तु बालवृद्धाश्च वृद्धा ब्राह्मणसत्तमाः ।
तिष्ठ तिष्ठेति रामेति क्रोशन्तो रथमन्वयुः ॥ ४७ ॥

राजा रुदित्वा सुचिरं मां नयन्तु गृहं प्रति ।
कौसल्याया राममातुरित्याह परिचारकान् ॥ ४८ ॥

किञ्चित्कालं भवेत्तत्र जीवनं दुःखितस्य मे ।
अत ऊर्ध्वं न जीवामि चिरं रामं विना कृतः ॥ ४९ ॥

ततो गृहं प्रविश्यैव कौसल्यायाः पपात ह ।
मूर्च्छितश्च चिरादबुद्ध्वा तूष्णीमेवावतस्थिवान् ॥ ५० ॥

रामस्तु तमसातीरं गत्वा तत्रावसत्सुखी ।
जलं प्राश्य निराहारो वृक्षमूलेऽस्वपद्विभुः ॥ ५१ ॥

जर पतिव्रता सीतेलाही भक्तीने श्रीरामांच्या मागोमाग जाण्याची इच्छा असेल तर ती सतत दिव्य वस्त्रे धारण करून आणि सर्व अलंकारांनी विभूषित होऊन, श्रीरामांचे वनातील दुःख हरण करीत रात्रंदिवस रामांना आनंदित करू दे." नंतर महाराज दशरथसुद्धा सुमंत्राला म्हणाले, "सुमंत्रा, तू रथ घेऊन ये. (४०-४१)

वनवासी लोकांना प्रिय असणारे राम इत्यादी रथात बसून जाऊ देत." असे बोलून, आणि लक्ष्मणासह रामांना तसेच सीतेला पाहून, ते दुःखाने जमिनीवर पडले आणि अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी ते रडू लागले. मग श्रीरामांच्या देखतच सीता चट्दिशी रथात चढली. (४२-४३)

नंतर पित्याला प्रदक्षिणा करून राम रथात चढले. दोन तलवारी, दोन धनुष्ये आणि बाणांचे दोन भाते घेऊन लक्ष्मणाने रथात आरोहण केले आणि त्याने सारथ्याला रथ हाकण्याची प्रेरणा दिली. तेव्हा राजा दशरथ म्हणू लागले, "अरे सुमंत्रा, थांब, थांब." (४४-४५)

परंतु 'नीघ, नीघ' असे म्हणत श्रीरामांनी सुमंत्राला रथ हाकण्यास प्रेरणा केली. श्रीराम दूर निघून गेल्यावर महाराज दशरथ मूर्च्छित होऊन धरणीवर पडले. (४६)

नंतर 'हे रामा, थांब थांब' असा आक्रोश करीत सर्व नगरवासी, बाल, वृद्ध आणि श्रेष्ठ ब्राह्मण रथाच्या मागोमाग निघाले. (४७)

खूप वेळ रडून झाल्यावर राजा दशरथ आपल्या सेवकांना म्हणाले, "मला राममाता कौसल्येच्या महालाकडे न्या. (४८)

तेथे काही काळपर्यंत माझे हे जीवन दुःखातून टिकू शकेल. यानंतर रामाच्या वियोगामुळे मी फार काळ जिवंत राहू शकणार नाही." (४९)

त्यानंतर कौसल्येच्या महालात प्रवेश करताच राजा मूर्च्छित होऊन पडले. नंतर पुष्कळ वेळाने शुद्धीवर आल्यानंतर ते गप्पच पडून राहिले. (५०)

इकडे श्रीरामचंद्र तमसा नदीच्या तीरावर पोचले आणि तेथे सुखाने राहिले. रात्रीचे वेळी कोणताही आहार न करता केवळ पाणी पिऊन, राम सीतेसह एका वृक्षाच्या खाली झोपी गेले. तेव्हा धर्मात्मा आणि धर्मज्ञ असा लक्ष्मण

सीतया सह धर्मात्मा धनुष्पाणिस्तु लक्ष्मणः ।
पालयामास धर्मज्ञः सुमन्त्रेण समन्वितः ॥ ५२ ॥

पौराः सर्वे समागत्य स्थितास्तस्याविदूरतः ।
शक्ता रामं पुरं नेतुं नोचेद्गच्छामहे वनम् ॥ ५३ ॥

इति निश्चयमाज्ञाय तेषां रामोऽतिविस्मितः ।
नाहं गच्छामि नगरमेते वै क्लेशभागिनः ॥ ५४ ॥

भविष्यन्तीति निश्चित्य सुमन्त्रमिदमब्रवीत् ।
इदानीमेव गच्छामः सुमन्त्र रथमानय ॥ ५५ ॥

इत्याज्ञप्तः सुमन्त्रोऽपि रथं वाहैरयोजयत् ।
आरुह्य रामः सीता च लक्ष्मणोऽपि ययुर्द्रुतम् ॥ ५६ ॥

अयोध्याभिमुखं गत्वा किञ्चिद्दूरं ततो ययुः ।
तेऽपि राममदृष्ट्वैव प्रातरुत्थाय दुःखिताः ॥ ५७ ॥

रथनेमिगतं मार्गं पश्यन्तस्ते पुरं ययुः ।
हृदि रामं ससीतं ते ध्यायन्तस्तस्थुरन्वहम् ॥ ५८ ॥

सुमन्त्रोऽपि रथं शीघ्रं नोदयामास सादरम् ।
स्फीताञ्जनपदान्पश्यन् रामः सीतासमन्वितः ॥ ५९ ॥

गङ्गातीरं समागच्छच्छृङ्गवेराविदूरतः ।
गङ्गां दृष्ट्वा नमस्कृत्य स्नात्वा सानन्दमानसः ॥ ६० ॥

शिंशपावृक्षमूले स निषसाद रघूत्तमः ।
ततो गुहो जनैः श्रुत्वा रामागममहोत्सवम् ॥ ६१ ॥

सखायं स्वामिनं द्रष्टुं हर्षात्पूर्णं समापतत् ।
फलानि मधुपुष्पादि गृहीत्वा भक्तिसंयुतः ॥ ६२ ॥

रामस्याग्रे विनिक्षिप्य दण्डवत्प्रापतद्भुवि ।
गुहमुत्थाप्य तं तूर्णं राघवः परिषस्वजे ॥ ६३ ॥

हातात धनुष्य घेऊन सुमंत्रासह श्रीरामांचे रक्षण करीत राहिला. (५१-५२)

सर्व नगरवासी लोकही तेथे आले आणि ते रामांच्याजवळ राहिले. श्रीरामांना अयोध्या नगरीला परत तरी नेऊ; नाहीतर आपणही त्यांचेबरोबर वनात जाऊ, असा त्यांचा निश्चय कळताच रामांना अतिशय आश्चर्य वाटले. "काही झाले तरी मी अयोध्या नगरीत परत जाणार नाही. तेव्हा हे लोक माझ्याबरोबर वनात येऊन क्लेशच भोगतील." असा विचार करून राम सुमंत्राला म्हणाले, "हे सुमंत्रा, तू रथ घेऊन ये. आपण आता ताबडतोब निघू या." (५३-५५)

श्रीरामांची अशी आज्ञा झाल्यावर सुमंत्रानेसुद्धा रथाला घोडे जोडले. मग राम, सीता, लक्ष्मण हेसुद्धा चट्दिशी रथात चढले आणि तेथून झपाट्याने निघून गेले. (५६)

अयोध्येकडे तोंड करून काही अंतर गेले. नंतर ते दूर वनात निघून गेले. प्रातःकाल होताच नगरवासी लोक उठले पण त्यांना राम कुठेच न दिसल्याने ते सर्वजण फार दुःखी झाले. (५७)

रथाच्या धावेने आक्रमिलेला मार्ग पाहात पाहात ते अयोध्या नगरीत पोचले. नंतर दररोज सीतेसह रामांचे ध्यान मनात करीत ते तेथेच राहू लागले. (५८)

इकडे सुमंत्रानेसुद्धा आदरपूर्वक रथ वेगाने चालविला. नंतर विस्तृत असा ग्रामीण भाग पाहात पाहात, सीतेसहित श्रीराम शृंगवेर नगरापासून अगदी जवळच असणाऱ्या गंगा नदीच्या तीरावर पोचले. गंगा नदी पाहून त्यांनी आनंदाने तिला नमस्कार केला आणि गंगेत स्नान केले. (५९-६०)

नंतर रघुश्रेष्ठ राम शिसवी वृक्षाच्या सावलीत बसले. त्या वेळी लोकांच्या मुखातून रामांच्या आगमनाचा मंगल समाचार ऐकल्यावर निषादराज गुह आनंदाने आपले स्वामी आणि मित्र असलेल्या श्रीरघुनाथांना भेटण्यास भक्तीने युक्त होऊन, फळे, मध, फुले इत्यादी घेऊन, सत्वर तेथे येऊन पोचला. (६१-६२)

नजराण्याची सामग्री पुढे ठेवून तो श्रीरामांपुढे दंडवत जमिनीवर पडला. तेव्हा गुहाला त्वरित उठवून श्रीरघुनाथांनी आलिंगन दिले. (६३)

संपृष्टकुशलो रामं गुहः प्राञ्जलिरब्रवीत् ।
धन्योऽहमद्य मे जन्म नैषादं लोकपावन ॥ ६४ ॥

बभूव परमानन्दः स्पृष्ट्वा तेऽङ्गं रघूत्तम ।
नैषादराज्यमेतत्ते किङ्करस्य रघूत्तम ॥ ६५ ॥

त्वदधीनं वसन्नत्र पालयास्मान् रघूद्वह ।
आगच्छ यामो नगरं पावनं कुरु मे गृहम् ॥ ६६ ॥

गृहाण फलमूलानि त्वदर्थं सञ्चितानि मे ।
अनुगृह्णीष्व भगवन् दासस्तेऽहं सुरोत्तम ॥ ६७ ॥

रामस्तमाह सुप्रीतो वचनं शृणु मे सखे ।
न वेक्ष्यामि गृहं ग्रामं नव वर्षाणि पञ्च च ॥ ६८ ॥

दत्तमन्येन नो भुञ्जे फलमूलादि किञ्चन ।
राज्यं ममैतत्ते सर्वं त्वं सखा मेऽतिवल्लभः ॥ ६९ ॥

वटक्षीरं समानाय्य जटामुकुटमादरात् ।
बबन्ध लक्ष्मणेनाथ सहितो रघुनन्दनः ॥ ७० ॥

जलमात्रं तु सम्प्राश्य सीतया सह राघवः ।
आस्तृतं कुशपर्णाद्यैः शयनं लक्ष्मणेन हि ॥ ७१ ॥

उवास तत्र नगरप्रासादाग्रे यथा पुरा ।
सुष्वाप तत्र वैदेह्या पर्यङ्क इव संस्कृते ॥ ७२ ॥

ततोऽविदूरे परिगृह्य चापं
सबाणतूणीरधनुः स लक्ष्मणः ।
रक्ष रामं परितो विपश्यन्
गुहेन सार्धं सशरासनेन ॥ ७३ ॥

त्यानंतर श्रीरामांनी त्याचे कुशल विचारले. मग हात जोडून गुह म्हणाला, "हे लोकपावन रामा, आज मी धन्य झालो. आज निषाद जातीतील माझा जन्म सफल झाला. (६४)

हे रघुश्रेष्ठा, तुमच्या शरीराचा स्पर्श झाल्याने मला फार मोठा आनंद झाला आहे. हे रघुवरा, तुमच्या सेवकाचे हे निषाद-राज्य तुमचेच आहे. म्हणून हे रघुनाथा, आता येथेच राहून तुम्ही आमचे पालन करा. या, आपण माझ्या नगरात जाऊ. तुम्ही माझे घर पावन करा. (६५-६६)

हे भगवन, जी काही फळे, मुळे इत्यादी मी तुमच्यासाठी गोळा केली आहेत, ती तुम्ही घ्या. हे सुरश्रेष्ठा, मी तुमचा दास आहे. तुम्ही माझ्यावर कृपा करा." (६७)

अतिशय प्रसन्न झालेले श्रीराम त्याला म्हणाले, "मित्रा, प्रतिज्ञा पालन करण्यासाठी चौदा वर्षे मी कोणत्याही गावात अगर घरात प्रवेश करणार नाही. (६८)

तसेच दुसऱ्या कोणी दिलेली कोणतीही फळे आणि मुळे मी खाणार नाही. तुझे हे संपूर्ण राज्य माझेच आहे. कारण तू माझा अतिशय लाडका मित्र आहेस." (६९)

त्यानंतर वडाचा चीक मागवून घेऊन, लक्ष्मणाने आणि श्रीरामांनी योग्य रीतीने जटाजूट बांधला. (७०)

सीतेबरोबर श्रीराम फक्त पाणी प्याले. तितक्यात कुश, पाने इत्यादींच्या सहाय्याने लक्ष्मणाने जमिनीवर शय्या तयार केली. (७१)

पूर्वी ज्याप्रमाणे अयोध्या नगरीतील प्रासादातील महालामध्ये जनकनंदिनीसहित राम शृंगारलेल्या अशा पलंगावर झोपत होते, त्या प्रमाणे त्या कुश-शय्येवर राम सीतेसह सुखाने पहुडले. (७२)

त्यानंतर जवळच, धनुष्यधारी गुहाबरोबर बाण, भाता व धनुष्य घेतलेला लक्ष्मण धनुष्य सज्ज ठेवून, सर्वत्र पाहात पाहात श्रीरामचंद्रांचे रक्षण करू लागला. (७३)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे अयोध्याकाण्डे पंचमः सर्गः ॥ ५ ॥

षष्ठ सर्ग

गंगा उतरून पलीकडे गमन आणि भरद्वाज व वाल्मीकी यांची भेट

श्रीमहादेव उवाच

सुप्तं रामं समालोक्य गुहः सोऽश्रुपरिप्लुतः ।
लक्ष्मणं प्राह विनयाद् भ्रातः पश्यसि राघवम् ॥ १ ॥

शयानं कुशपत्रौघसंस्तरे सीतया सह ।
यः शेते स्वर्णपर्यङ्के स्वास्तीर्णे भवनोत्तमे ॥ २ ॥

कैकेयी रामदुःखस्य कारणं विधिना कृता ।
मन्थराबुद्धिमास्थाय कैकेयी पापमाचरत् ॥ ३ ॥

तच्छ्रुत्वा लक्ष्मणः प्राह सखे शृणु वचो मम ।
कः कस्य हेतुर्दुःखस्य कश्च हेतुः सुखस्य वा ॥ ४ ॥

स्वपूर्वार्जितकर्मैव कारणं सुखदुःखयोः ॥ ५ ॥

सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता
परो ददातीति कुबुद्धिरेषा ।
अहं करोमीति वृथाभिमानः
स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः ॥ ६ ॥

सुहृन्मित्रार्युदासीनद्वेष्यमध्यस्थबान्धवाः ।
स्वयमेवाचरन्कर्म तथा तत्र विभाव्यते ॥ ७ ॥

सुखं वा यदि वा दुःखं स्वकर्मवशगो नरः ।
यद्यद्यथागतं तत्तद् भुक्त्वा स्वस्थमना भवेत् ॥ ८ ॥

न मे भोगागमे वाञ्छा न मे भोगविवर्जने ।
आगच्छत्वथ मागच्छत्वभोगवशगो भवेत् ॥ ९ ॥

यस्मिन् देशे च काले च यस्माद्वा येन केन वा ।
कृतं शुभाशुभं कर्म भोज्यं तत्तत्र नान्यथा ॥ १० ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, त्या वेळी झोपलेल्या श्रीरामांना पाहून गुहाचे डोळे अश्रूंनी भरून आले. तो विनयाने लक्ष्मणाला म्हणाला, "बंधू लक्ष्मणा, पाहा ना! जे रघुनाथ पूर्वी आपल्या उत्तम महालातील उत्तम प्रकारे शृंगारलेल्या सोन्याच्या पलंगावर सीतेसह झोपत होते, तेच श्रीराम आज सीतेसह कुश आणि पानांनी बनविलेल्या पथारीवर झोपले आहेत! (१-२)

ब्रह्मदेवाने या श्रीरामांच्या दुःखाचे कारण कैकेयीला बनविले. मंथरेच्या बुद्धीवर विश्वास ठेवून कैकेयीने पापकर्म केले." (३)

ते ऐकून लक्ष्मण म्हणाला, " मित्रा, माझे वचन ऐक. एखाद्याच्या दुःखाचे कारण अथवा एखाद्याच्या सुखाचे कारण दुसरा कोण असणार ? अर्थात् दुसरा कोणी कारण होऊ शकत नाही, तर माणसाने स्वतःच पूर्वी केलेले कर्मच त्याच्या सुखदुःखाचे कारण बनते. (४-५)

माणसाला सुख आणि दुःख देणारा अन्य कोणीही नाही. दुसरा कुणी सुखदुःख देतो, असे समजणे ही चुकीची समजूत आहे. 'मी करतो' हा माणसाचा फुकटचा अभिमान आहे. कारण लोक हे स्वतःच्या कर्माच्या दोरीने बांधलेले असतात. (६)

स्वतःच नाना प्रकारची कर्मे करणारा माणूस हा आपल्याच भावनेप्रमाणे सुहृद, मित्र, शत्रू, उदासीन, द्वेष्य, मध्यस्थ, बांधव इत्यादी वेगवेगळ्या कल्पना करीत राहतो. (७)

स्वतःच्या प्रारब्धानुसार माणसाने जे जे सुख अथवा दुःख जसे येईल तसे ते भोगून स्वस्थ मनाने राहावे. (८)

आपण भोगांच्या प्राप्तीची इच्छा करू नये. भोग येऊ नयेत अशी इच्छाही नाही. माझ्याकडे भोग येवोत अथवा न येवोत, असे मानून माणसाने भोगांच्या अधीन होऊ नये. (९)

ज्या स्थळी आणि ज्या काळी, ज्या योगाने, ज्या कोणी जे शुभ किंवा अशुभ कर्म केले असेल ते त्याला येथेच भोगावे लागते, त्यापेक्षा वेगळे असे अन्य काही घडणार नाही. (१०)

अलं हर्षविषादाभ्यां शुभाशुभफलोदये ।
विधात्रा विहितं यद्यत्तदलङ्घ्यं सुरासुरैः ॥ ११ ॥

सर्वदा सुखदुःखाभ्यां नरः प्रत्यवरुध्यते ।
शरीरं पुण्यपापाभ्यामुत्पन्नं सुखदुःखवत् ॥ १२ ॥

सुखस्यानन्तरं दुःखं दुःखस्यानन्तरं सुखम् ।
द्वयमेतद्धि जन्तूनामलङ्घ्यं दिनरात्रिवत् ॥ १३ ॥

सुखमध्ये स्थितं दुःखं दुःखमध्ये स्थितं सुखम् ।
द्वयमन्योन्यसंयुक्तं प्रोच्यते जलपङ्कवत् ॥ १४ ॥

तस्माद्धैर्येण विद्वांस इष्टानिष्टोपपत्तिषु ।
न हृष्यन्ति न मुह्यन्ति सर्वं मायेति भावनात् ॥ १५ ॥

गुहलक्ष्मणयोरेवं भाषतोर्विमलं नभः ।
बभूव रामः सलिलं स्पृष्ट्वा प्रातः समाहितः ॥ १६ ॥

उवाच शीघ्रं सुदृढां नावमानय मे सखे ।
श्रुत्वा रामस्य वचनं निषादाधिपतिर्गुहः ॥ १७ ॥

स्वयमेव दृढां नावमानिनाय सुलक्षणाम् ।
स्वामित्रारुह्यतां नौका सीतया लक्ष्मणेन च ॥ १८ ॥

वाहये ज्ञातिभिः सार्धमहमेव समाहितः ।
तथेति राघवः सीतामारोप्य शुभलक्षणाम् ॥ १९ ॥

गुहस्य हस्तावालम्ब्य स्वयं चारोहदच्युतः ।
आयुधादीन् समारोप्य लक्ष्मणोऽप्यारुरोह च ॥ २० ॥

गुहस्तान्वाहयामास ज्ञातिभिः सहितः स्वयम् ।
गङ्गामध्ये गता गङ्गां प्रार्थयामास जानकी ॥ २१ ॥

देवि गङ्गे नमस्तुभ्यं निवृत्ता वनवासतः ।
रामेण सहिताहं त्वां लक्ष्मणेन च पूजये ॥ २२ ॥

म्हणून शुभ अथवा अशुभ फळाची प्राप्ती झाली असता, हर्ष अथवा विषाद मानू नये. कारण विधात्याने जे जे काही ठरविलेले असेल, ते देव किंवा असुर यांनाही चुकविणे शक्य नाही. (११)

माणूस हा नेहमी सुख अथवा दुःख यांनी घेरलेला असतो. कारण शरीर हे पुण्य आणि पाप यांच्यामुळे उत्पन्न होते; म्हणून ते सुखदुःखांनी युक्त असते. (१२)

सुखानंतर दुःख येते आणि दुःखानंतर सुख येते. ही दोन्हीही दिवस-रात्रीप्रमाणे प्राण्यांना टाळता येणार नाहीत. (१३)

सुखामध्येच दुःख असते आणि दुःखामध्येच सुख असते. हे दोन्हीही पाणी आणि चिखल यांच्याप्रमाणे एकमेकांत मिसळून गेलेले असतात, असे म्हटले जाते. (१४)

म्हणून 'सर्व काही माया आहे' या भावनेने विद्वान लोक इष्ट अथवा अनिष्ट यांची प्राप्ती झाली असताना, धीर धरून, आनंदितही होत नाहीत अगर मोहितही होत नाहीत." (१५)

या प्रमाणे गुह आणि लक्ष्मण हे संभाषण करीत असताना, आकाश उजळून गेले. पाण्याने आचमन करून रामचंद्रांनी प्रातःकालचे संध्यावंदनादी उरकले. (१६)

मग श्रीराम गुहाला म्हणाले, "मित्रा, माझ्यासाठी एक चांगली बळकट नाव त्वरित घेऊन ये." श्रीरामांचे हे वचन ऐकल्यावर, निषादराज गुहाने स्वतःच एक चांगली अशी बळकट नाव आणली. मग तो श्रीरामांना म्हणाला, "स्वामी, सीता आणि लक्ष्मण यांच्यासह आपण नौकेत चढावे. (१७-१८)

माझ्या नातलगांसह मी स्वतःच काळजीपूर्वक ही नाव चालवीन." "ठीक आहे" असे म्हणून रामांनी प्रथम शुभलक्षणी सीतेला नौकेत चढविले. (१९)

नंतर गुहाच्या हातांचा आधार घेऊन भगवान राम स्वतः नावेत चढले. त्यानंतर आयुधे इत्यादी नावेत चढवून लक्ष्मणसुद्धा नावेत बसला. (२०)

आपल्या ज्ञातिबांधवांसह गुहाने स्वतःच ती नाव चालविली. ज्या वेळी ती नाव गंगेच्या मध्यभागी पोचली, तेव्हा जानकीने गंगेची प्रार्थना केली. (२१)

"हे देवी गंगे, तुला नमस्कार असो. वनवासातून परत आल्यावर राम आणि लक्ष्मण यांच्यासह मी तुझी पूजा करीन." (२२)

इत्युक्त्वा परकूलं तौ शनैरुत्तीर्य जग्मतुः ॥ २३ ॥

गुहोऽपि राघवं प्राह गमिष्यामि त्वया सह ।
अनुज्ञां देहि राजेन्द्र नोचेत्प्राणांस्त्यजाम्यहम् ॥ २४ ॥

श्रुत्वा नैषादिवचनं श्रीरामस्तमथाब्रवीत् ।
चतुर्दश समाः स्थित्वा दण्डके पुनरप्यहम् ॥ २५ ॥

आयास्याम्युदितं सत्यं नासत्यं रामभाषितम् ।
इत्युक्त्वालिङ्ग्य तं भक्तं समाश्वास्य पुनः पुनः ॥ २६ ॥

निवर्तयामास गुहं सोऽपि कृच्छ्राद्ययौ गृहम् ॥ २७ ॥

ततो रामस्तु वैदेह्या लक्ष्मणेन समन्वितः ॥ २८ ॥

भरद्वाजाश्रमपदं गत्वा बहिरुपस्थितः ।
तत्रैकं बटुकं दृष्ट्वा रामः प्राह च हे बटो ॥ २९ ॥

रामो दाशरथिः सीतालक्ष्मणाभ्यां समन्वितः ।
आस्ते बहिर्वनस्येति ह्युच्यतां मुनिसन्निधौ ॥ ३० ॥

तच्छ्रुत्वा सहसा गत्वा पादयोः पतितो मुनेः ।
स्वामिन् रामः समागत्य वनाद्बहिरवस्थितः ॥ ३१ ॥

सभार्यः सानुजः श्रीमानाह मां देवसन्निभः ।
भरद्वाजाय मुनये ज्ञापयस्व यथोचितम् ॥ ३२ ॥

तच्छ्रुत्वा सहसोत्थाय भरद्वाजो मुनीश्वरः ।
गृहीत्वार्घ्यं च पाद्यं च रामसामीप्यमाययौ ॥ ३३ ॥

दृष्ट्वा रामं यथान्यायं पूजयित्वा सलक्ष्मणम् ।
आह मे पर्णशालायां भो राम राजीवलोचन ॥ ३४ ॥

आगच्छ पादरजसा पुनीहि रघुनन्दन ।
इत्युक्त्वोटजमानीय सीतया सह राघवौ ॥ ३५ ॥

भक्त्या पुनः पूजयित्वा चकारातिथ्यमुत्तमम् ।
अद्याहं तपसः पारं गतोऽस्मि तव सङ्गमात् ॥ ३६ ॥

त्यानंतर ते सावकाशपणे गंगा नदी पार करून पलीकडच्या तीरावर पोचले. त्यानंतर गुह श्रीरघुनाथांना म्हणाला, "हे राजेंद्रा, मीसुद्धा तुमच्याबरोबर येईन. मला तशी अनुज्ञा द्या. नाहीतर मी प्राणांचा त्याग करीन.' (२४)

निषादराज गुहाचे वचन ऐकल्यावर, श्रीरामचंद्र त्याला म्हणाले, "दंडकारण्यात चौदा वर्षे राहिल्यावर मी पुनः येथे परत येईन. मी जे काही बोलतो ते सत्यच असते. रामाचे भाषण कधीच खोटे नसते." असे बोलून आणि त्या भक्ताला आलिंगन देऊन पुनः पुनः धीर दिला आणि मग रामांनी गुहाला परत पाठवून दिले. तेव्हा मोठ्या कष्टाने तोसुद्धा आपल्या घरी परत गेला. (२५-२७)

त्यानंतर जानकी आणि लक्ष्मण यांच्यासह श्रीरामचंद्र हे भरद्वाज मुनींच्या आश्रमस्थानी जाऊन बाहेरच उभे राहिले. तेथे एका बटूला पाहून श्रीरामचंद्र म्हणाले, "अरे बटू, सीता आणि लक्ष्मण यांच्यासह दशरथपुत्र राम आश्रमाच्या वनाच्या बाहेर उभा आहे, असे मुनींजवळ जाऊन तू सांग." (२८-३०)

रघुनाथांचे ते वचन ऐकल्यावर तो बटू त्वरित गेला आणि मुनींच्या चरणी लोटांगण घालून म्हणाला, "अहो भगवन्, आपली पत्नी व आपला धाकटा भाऊ यांच्यासह आलेल्या देवतुल्य श्रीमान् रामांनी मला सांगितले आहे की भरद्वाज मुनींना योग्य रीतीने मी आल्याचे कळव." (३१-३२)

ते वचन ऐकून मुनीश्वर भरद्वाज चट् दिशी उठले आणि अर्घ्य व पादोदक घेऊन ते रामांच्याजवळ आले. (३३)

श्रीरामांना पाहिल्यावर त्यांनी लक्ष्मणासह त्यांची यथाविधी पूजा केली आणि म्हटले, "हे कमलनयन रामा, या. हे रघुनन्दना, तुमच्या चरण धुळीने ही माझी पर्णशाला तुम्ही पवित्र करा." असे बोलून, सीतेसह त्या दोघा रघुकुमारांना त्यांनी आपल्या कुटीत आणले. (३४-३५)

त्यानंतर भक्तीने पुनः त्यांची पूजा करून त्यांनी त्यांचा उत्तम आदर-सत्कार केला आणि ते म्हणाले, "अहो रामा, तुमची भेट झाल्याने आज माझी तपश्चर्या सफल झाली आहे. हे रघुनन्दना रामा, तुमचा जो काही भूतकालीन आणि भविष्यकालीन वृत्तांत आहे तो सर्व मला ज्ञात आहे आणि मी हेही जाणतो की तुम्ही साक्षात परमात्मा आहात

ज्ञातं राम तवोदन्तं भूतं चागामिकं च यत् ।
जानामि त्वां परात्मानं मायया कार्यमानुषम् ॥३७॥

यदर्थमवतीर्णोऽसि प्रार्थितो ब्रह्मणा पुरा ।
यदर्थं वनवासस्ते यत्करिष्यसि वै पुरः ॥ ३८ ॥

जानामि ज्ञानदृष्ट्याहं जातया त्वदुपासनात् ।
इतः परं त्वां किं वक्ष्ये कृतार्थोऽहं रघूत्तम ॥ ३९ ॥

यस्त्वां पश्यामि काकुत्स्थं पुरुषं प्रकृतेः परम् ।
रामस्तमभिवाद्याह सीतालक्ष्मणसंयुतः ॥ ४० ॥

अनुग्राह्यास्त्वया ब्रह्मन्वयं क्षत्रियबान्धवाः ।
इति सम्भाष्य तेऽन्योन्यमुषित्वा मुनिसन्निधौ ॥ ४१ ॥

प्रातरुत्थाय यमुनामुत्तीर्य मुनिदारकैः ।
कृताप्लवेन मुनिना दृष्टमार्गेण राघवः ॥ ४२ ॥

प्रययौ चित्रकूटाद्रिं वाल्मीकेर्यत्र चाश्रमः ।
गत्वा रामोऽथ वाल्मीकेराश्रमं ऋषिसङ्कुलम् ॥ ४३ ॥

नानामृगद्विजाकीर्णं नित्यपुष्पफलाकुलम् ।
तत्र दृष्ट्वा समासीनं वाल्मीकिं मुनिसत्तमम् ॥ ४४ ॥

ननाम शिरसा रामो लक्ष्मणेन च सीतया ।
दृष्ट्वा रामं रमानाथं वाल्मीकिर्लोकसुन्दरम् ॥ ४५ ॥

जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमण्डितम् ।
कन्दर्पसदृशाकारं कमनीयाम्बुजेक्षणम् ॥ ४६ ॥

दृष्ट्वैव सहसोत्तस्थौ विस्मयानिमिषेक्षणः ।
आलिङ्ग्य परमानन्दं रामं हर्षाश्रुलोचनः ॥ ४७ ॥

पूजयित्वा जगत्पूज्यं भक्त्याघ्र्यादिभिरादृतः ।
फलमूलैः स मधुरैर्भोजयित्वा च लालितः ॥ ४८ ॥

राघवः प्राञ्जलिः प्राह वाल्मीकिं विनयान्वितः ।
पितुराज्ञां पुरस्कृत्य दण्डकानागता वयम् ॥४९॥

कार्याच्या सिद्धीसाठी तुम्ही मायेने मनुष्याचे रूप धारण केले आहे. (३६-३७)

पूर्वी ब्रह्मदेवाने प्रार्थना केल्यामुळे ज्या कारणासाठी तुम्ही अवतार घेतला आहे, ज्यासाठी तुम्हांला वनवास पत्करावा लागला आहे आणि यानंतर तुम्ही जे काही करणार आहात ते सर्व तुमची उपासना केल्यामुळे निर्माण झालेल्या ज्ञान-दृष्टीने मला कळले आहे. हे रघुश्रेष्ठा, यापेक्षा अधिक मी तुम्हांला काय सांगू ? मी कृतार्थ झालो आहे; कारण प्रकृतीच्या पलीकडे असणाऱ्या साक्षात पुरुषोत्तम अशा तुम्हांला- ककुत्स्थनंदनाला- मी पाहात आहे." त्यानंतर सीता आणि लक्ष्मण यांचे सह श्रीरामचंद्रांनी त्यांना प्रणाम केला. ते त्यांना म्हणाले. (३८-४०)

"हे ब्रह्मन, आम्हा क्षत्रियबांधवांवर तुम्ही कृपा करावी," अशा प्रकारे एकमेकांशी बोलून झाल्यावर श्रीराम मुनींच्या जवळ राहिले. (४१)

सर्वजण सकाळी उठले. मग मुनिकुमारांनी तयार केलेल्या होडीत बसून, यमुना नदी ओलांडून, मुनींनी दाखविलेल्या मार्गाने श्रीरघुनाथ चित्रकूट पर्वताकडे गेले. तेथे वाल्मीकि-मुनींचा आश्रम होता. तो ऋषि-समूहांनी भरलेला, नाना प्रकारच्या वन्य पशूंनी आणि पक्ष्यांनी गजबजलेला आणि नेहमी फुलांनी व फळांनी बहरलेला होता, त्या वाल्मीकींच्या आश्रमात गेल्यावर, रामांनी तेथे बसलेल्या मुनिश्रेष्ठ वाल्मीकींना पाहिले. (४२-४४)

आणि लक्ष्मण व सीता यांसह श्रीरामचंद्रांनी मस्तक नमवून वाल्मीकींना प्रणाम केला. तेव्हा सुंदर कमळाप्रमाणे नेत्र असणारे, मदनाप्रमाणे रूप असणारे, जटारूपी मुकुटाने विभूषित, सर्व लोकांमध्ये सुंदर, लक्ष्मीचे पती, आणि जानकी व लक्ष्मण यांच्याबरोबर असलेल्या रामचंद्र यांना वाल्मीकींनी पाहिले . (४५-४६)

त्यांना पाहताच वाल्मीकी लगबगीने उठून उभे राहिले. विस्मयाने त्यांच्या डोळ्यांच्या पापण्या हलेनाशा झाल्या आणि आनंदाश्रूंनी डोळे भरलेल्या स्थितीत त्यांनी परमानंद-स्वरूप अशा श्रीरामांना आलिंगन दिले. (४७)

सर्व जगाला पूज्य अशा भगवान रामांची अर्घ्य इत्यादींनी आदरपूर्वक भक्तीने पूजा करून व त्यांना मधुर फळे आणि मुळे यांचे भोजन देऊन वाल्मीकींनी वात्सल्य भावनेने त्यांचा सत्कार केला. (४८)

त्यानंतर अतिशय नम्रतापूर्वक हात जोडून श्रीरघुनाथ वाल्मीकींना म्हणाले " पित्याची आज्ञा मान्य करून आम्ही दण्डकारण्यात आलो आहोत. (४९)

भवन्तो यदि जानन्ति किं वक्ष्यामोऽत्र कारणम् ।
यत्र मे सुखवासाय भवेत्स्थानं वदस्व तत् ॥ ५० ॥

सीतया सहितः कालं किञ्चित्तत्र नयाम्यहम् ।
इत्युक्तो राघवेणासौ मुनिः सस्मितमब्रवीत् ॥ ५१ ॥

त्वमेव सर्वलोकानां निवासस्थानमुत्तमम् ।
तवापि सर्वभूतानि निवाससदनानि हि ॥ ५२ ॥

एवं साधारणं स्थानमुक्तं ते रघुनन्दन ।
सीतया सहितस्येति विशेषं पृच्छतस्तव ॥ ५३ ॥

तद्वक्ष्यामि रघुश्रेष्ठ यत्ते नियतमन्दिरम् ।
शान्तानां समदृष्टीनामद्वेष्टॄणां च जन्तुषु ।
त्वामेव भजतां नित्यं हृदयं तेऽधिमन्दिरम् ॥ ५४ ॥

धर्माधर्मान्परित्यज्य त्वामेव भजतोऽनिशम् ।
सीतया सह ते राम तस्य हृत्सुखमन्दिरम् ॥ ५५ ॥

त्वन्मन्त्रजापको यस्तु त्वामेव शरणं गतः ।
निर्द्वन्द्वो निःस्पृहस्तस्य हृदयं ते सुमन्दिरम् ॥ ५६ ॥

निरहङ्कारिणः शान्ता ये रागद्वेषवर्जिताः ।
समलोष्टाश्मकनकास्तेषां ते हृदयं गृहम् ॥ ५७ ॥

त्वयि दत्तमनोबुद्धिर्यः सन्तुष्टः सदा भवेत् ।
त्वयि सन्त्यक्तकर्मा यस्तन्मनस्ते शुभं गृहम् ॥ ५८ ॥

यो न द्वेष्ट्यप्रियं प्राप्य प्रियं प्राप्य न हृष्यति ।
सर्वं मायेति निश्चित्य त्वां भजेत्तन्मनो गृहम् ॥ ५९ ॥

षड्भावादिविकारान्यो देहे पश्यति नात्मनि ।
क्षुत्तृट् सुखं भयं दुःखं प्राणबुद्ध्योर्निरीक्षते ॥ ६० ॥

जर आपणास सर्व काही माहीत आहे, तर याचे कारण मी काय सांगणार ? तेव्हा आता सुखाने राहण्यासाठी योग्य असेल, ते स्थान आपण मला सांगा. (५०)

म्हणजे त्या स्थळी सीतेसहित मी काही काळ व्यतीत करीन." रघुनाथांनी असे म्हटल्यावर मुनिवर स्मितपूर्वक बोलले. (५१)

" हे श्रीराम, तुम्हीच सर्व लोकांचे एक मात्र उत्तम निवास-स्थान आहात, आणि सर्व भूते हीसुद्धा तुमच्या निवासाचे स्थान आहेत. (५२)

अशा प्रकारे, हे रघुनन्दना, मी तुमचे सर्वसामान्य असे निवासस्थान सांगितले. परंतु सीतेसहित राहण्यासाठी विशिष्ट असे निवासस्थान विचारले आहे, म्हणून हे रघुश्रेष्ठा, तुमच्यासाठी जे निश्चित स्थान आहे ते मी सांगतो. जे शांत आहेत, जे समदृष्टी आहेत, जे सर्व प्राण्यांच्या बाबतीत द्वेषरहित आहेत आणि जे नित्य तुमचेच भजन करतात, त्यांचे हृदय हेच तुमचे मुख्य निवास- स्थान आहे. (५३-५४)

हे रामा, धर्म व अधर्म यांचा त्याग करून जो निरंतर तुमचेच भजन करतो, त्याचे हृदय हेच सीतेसहित तुम्हांला राहण्यास सुखकारक मंदिर आहे. (५५)

जो तुमच्या नामाच्या मंत्राचा जप करतो आणि जो तुम्हांलाच शरण आला आहे, आणि जो द्वंद्वरहित आहे आणि निःस्पृह आहे त्याचे हृदय हे तुमच्यासाठी सुंदर मंदिर आहे. (५६)

जे अहंकाररहित व शांत आहेत, जे राग व द्वेष यांनी रहित आहेत आणि ज्यांना माती व दगड किंवा सोने एकसारखेच वाटतात, त्यांचे हृदय हे तुमच्यासाठी राहण्याचे घर आहे. (५७)

ज्याने आपले मन आणि बुद्धी हे तुमच्या ठिकाणी लावले आहेत, जो सदा संतुष्ट असतो आणि जो आपली सर्व कर्मे तुम्हांला अर्पण करतो, त्याचे मन हेच तुम्हांला राहण्यास शुभ गृह आहे. (५८)

जरी अप्रिय गोष्ट प्राप्त झाली तरी जो तिचा द्वेष करीत नाही आणि जो प्रिय गोष्ट मिळाल्यावरही आनंदित होत नाही, तसेच 'हे संपूर्ण जग माया आहे' असा निश्चय करून जो नेहमी तुम्हांला भजतो, त्याचे मन हेच तुम्हांला राहण्यास योग्य घर आहे. (५९)

(अस्तित्व, जन्म, वाढ, बदल, क्षीणत्व आणि नाश) हे वस्तूचे सहा विकार जो देहाच्या ठिकाणी म्हणजे देहाचे आहेत असे पाहातो, ते आत्म्याचे ठायी नाहीत असे जो जाणतो, तसेच तहान-भूक, सुख-दुःख, भय हे सर्व प्राण आणि बुद्धी यांचे परिणाम आहेत, असे जो जाणतो

संसारधर्मैर्निर्मुक्तस्तस्य ते मानसं गृहम् ॥ ६१ ॥

पश्यन्ति ये सर्वगुहाशयस्थं
त्वां चिद्घनं सत्यमनन्तमेकम् ।
अलेपकं सर्वगतं वरेण्यं
तेषां हृदब्जे सह सीतया वस ॥ ६२ ॥

निरन्तराभ्यासदृढीकृतात्मनां
त्वत्पादसेवापरिनिष्ठितानाम् ।
त्वन्नामकीर्त्या हतकल्मषाणां
सीतासमेतस्य गृहं हृदब्जे ॥ ६३ ॥

राम त्वन्नाममहिमा वर्ण्यते केन वा कथम् ।
यत्प्रभावादहं राम ब्रह्मर्षित्वमवाप्तवान् ॥ ६४ ॥

अहं पुरा किरातेषु किरातैः सह वर्धितः ।
जन्ममात्रद्विजत्वं मे शूद्राचारस्तः सदा ॥ ६५ ॥

शूद्रायां बहवः पुत्रा उत्पन्ना मेऽजितात्मनः ।
ततश्चौरैश्च सङ्गम्य चौरोऽहमभवं पुरा ॥ ६६ ॥

धनुर्बाणधरो नित्यं जीवानामन्तकोपमः ।
एकदा मुनयः सप्त दृष्टा महति कानने ॥ ६७ ॥

साक्षान्मया प्रकाशन्तो ज्वलनार्कसमप्रभाः ।
तानन्वधावं लोभेन तेषां सर्वपरिच्छदान् ॥ ६८ ॥

ग्रहीतुकामस्तत्राहं तिष्ठ तिष्ठेति चाब्रवम् ।
दृष्ट्वा मां मुनयोऽपृच्छन्किमायासि द्विजाधम ॥ ६९ ॥

अहं तानब्रवं किञ्चिदादातुं मुनिसत्तमाः ।
पुत्रदारादयः सन्ति बहवो मे बुभुक्षिताः ॥ ७० ॥

तेषां संरक्षणार्थाय चरामि गिरिकानने ।
ततो मामूचुरव्यग्राः पृच्छ गत्वा कुटुम्बकम् ॥ ७१ ॥

यो यो मया प्रतिदिनं क्रियते पापसञ्चयः ।
यूयं तद्भागिनः किं वा नेति वेति पृथक्पृथक् ॥ ७२ ॥

आणि जो स्वतः सांसारिक धर्मापासून संपूर्णपणे मुक्त आहे, त्याचे मन हे तुमचे राहण्यासाठीचे घर आहे. (६०-६१)

चिद्घन, सत्यस्वरूप, अनंत, एकमेवाद्वितीय, लेपरहित, सर्व व्यापक आणि आपलेसे करण्याजोगे, अशा तुम्हा परमेश्वराला जे सर्वांच्या अंतःकरणामध्ये विराजमान असले आहेत असे पाहतात, त्यांच्या हृदयकमलात, हे रामा, तुम्ही सीतेसह निवास करा. (६२)

निरंतर अभ्यास केल्याने ज्यांनी आपले चित्त तुमच्यामध्ये स्थिर केले आहे, जे तुमच्या चरणसेवेत पूर्णपणे रत आहेत, तुमच्या नामाच्या संकीर्तनाने ज्यांचे पाप नष्ट होऊन गेले आहे, त्यांच्या हृदयकमळात, हे रामा, सीतेसह तुमचे निवास-स्थान आहे. (६३)

ज्याच्या प्रभावामुळे, हे रामा, मी ब्रह्मर्षि-पद प्राप्त करून घेतले आहे, त्या तुमच्या नामाचा महिमा कोण व कसा वर्णन करू शकेल ? (६४)

फार पूर्वी मी किरातलोकांमध्ये राहात होतो व त्या किरातांकडूनच मी वाढविला गेलो. मी नेहमी शूद्रांच्या आचारातच रत होतो. माझे द्विजत्व हे केवळ जन्मानेच होते. (६५)

इंद्रियांवर नियंत्रण नसणाऱ्या अशा मला एका शूद्र स्त्रीपासून पुष्कळ पुत्र उत्पन्न झाले होते. त्या वेळी चोरांच्या संगतीत राहिल्याने मी पूर्वी स्वतःही चोर बनलो होतो.(६६)

जीवांचा अंत करणाऱ्या यमाप्रमाणे असणारा मी नेहमी धनुष्य बाण जवळ बाळगीत असे. अग्नी व सूर्याप्रमाणे तेज असणारे आणि प्रकाशमान असणारे असे साक्षात सप्त ऋषी एकदा मला मोठ्या घोर वनात दिसले. त्यांच्या जवळची वस्त्रे इत्यादी सर्व सामग्री हिरावून घेण्याच्या लोभामुळे मी त्यांच्या मागे धावलो आणि 'थांबा, थांबा' असे ओरडलो. तेव्हा मला पाहून मुनींनी विचारले, 'अरे अधम द्विजा, तू येथे का आला आहेस ?' (६७-६९)

तेव्हा मी त्यांना म्हटले, "हे मुनिश्रेष्ठांनो, मला पुष्कळ पुत्र, पत्नी इत्यादी आहेत. ते भुकेलेले आहेत. त्यांच्यासाठी तुमच्याकडून काही तरी लुबाडून घेण्यास मी आलो आहे. (७०)

त्या पुत्र इत्यादींचे पालन-पोषण करण्यासाठी मी पर्वतावर आणि अरण्यात फिरत असतो." तेव्हा ते मला निर्भयपणे म्हणाले, "तू तुझ्या कुटुंबाकडे जा आणि प्रत्येकाला वेगवेगळे विचार की 'दररोज मी जो पापाचा संचय करतो, त्याचा काही भाग तुम्ही घेणार आहात की नाही.?' (७१-७२)

वयं स्थास्यामहे तावदागमिष्यसि निश्चयः ।
तथेत्युक्त्वा गृहं गत्वा मुनिभिर्यदुदीरितम् ॥ ७३ ॥

अपृच्छं पुत्रदारादींस्तैरुक्तोऽहं रघूत्तम ।
पापं तवैव तत्सर्वं वयं तु फलभागिनः ॥ ७४ ॥

तच्छ्रुत्वा जातनिर्वेदो विचार्य पुनरागमम् ।
मुनयो यत्र तिष्ठन्ति करुणापूर्णमानसाः ॥ ७५ ॥

मुनीनां दर्शनादेव शुद्धान्तःकरणोऽभवम् ।
धनुरादीन्परित्यज्य दण्डवत्पतितोऽस्म्यहम् ॥ ७६ ॥

रक्षध्वं मां मुनिश्रेष्ठा गच्छन्तं निरयार्णवम् ।
इत्यग्रे पतितं दृष्ट्वा मामूचुर्मुनिसत्तमाः ॥ ७७ ॥

उत्तिष्ठोत्तिष्ठ भद्रं ते सफलः सत्समागमः ।
उपदेक्ष्यामहे तुभ्यं किञ्चित्तेनैव मोक्ष्यसे ।
परस्परं समालोच्य दुर्वृत्तोऽयं द्विजाधमः ॥ ७८ ॥

उपेक्ष्य एव सद्वृत्तैस्तथापि शरणं गतः ।
रक्षणीयः प्रयत्नेन मोक्षमार्गोपदेशतः ॥ ७९ ॥

इत्युक्त्वा राम ते नाम व्यत्यस्ताक्षरपूर्वकम् ।
एकाग्रमनसात्रैव मरेति जप सर्वदा ॥ ८० ॥

आगच्छामः पुनर्यावत्तावदुक्तं सदा जप ।
इत्युक्त्वा प्रययुः सर्वे मुनयो दिव्यदर्शनाः ॥ ८१ ॥

अहं यथोपदिष्टं तैस्तथाकरवमञ्जसा ।
जपन्नेकाग्रमनसा बाह्यं विस्मृतवानहम् ॥ ८२ ॥

एवं बहुतिथे काले गते निश्चलरूपिणः ।
सर्वसङ्गविहीनस्य वल्मीकोऽभून्ममोपरि ॥ ८३ ॥

ततो युगसहस्रान्ते ऋषयः पुनरागमन् ।
मामूचुर्निष्क्रमस्वेति तच्छ्रुत्वा तूर्णमुत्थितः ॥ ८४ ॥

तू परत येईपर्यंत आम्ही निश्चितपणे येथेच थांबू.'' 'ठीक आहे' असे म्हणून मी घरी गेलो आणि मुनींनी जे सांगितले होते ते मी माझे पुत्र, पत्नी इत्यादींना विचारले. तेव्हा, हे रघूत्तमा, ते मला म्हणाले, "ते सर्व पाप तुम्हीच भोगा. (धनाचे) फळ मात्र आम्ही भोगू." (७३-७४)

ते ऐकून मला वैराग्य आले. आणि मग मी विचार करीत, करुणेने मन पूर्ण भरलेले मुनी जेथे उभे होते तेथे पुनः परत आलो. (७५)

त्या वेळी त्या मुनींच्या दर्शनानेच माझे अंतःकरण शुद्ध झाले. मी धनुष्य इत्यादी फेकून दिले आणि त्या मुनींपुढे साष्टांग नमस्कार घातला. (७६)

मी त्यांना म्हणालो "हे मुनिश्रेष्ठांनो, नरकरूप सागराकडे जाणाऱ्या माझे रक्षण करा." तेव्हा त्यांच्यापुढे पडलेल्या मला ते श्रेष्ठ मुनी म्हणाले. (७७)

"ऊठ, ऊठ. तुझे कल्याण होवो. तुझा सत्समागम सफल झाला आहे. आम्ही तुला थोडासा उपदेश देतो. त्यामुळेच तू कर्माच्या बंधनातून मुक्त होशील." त्यानंतर त्यांनी परस्परांमध्ये विचार करून म्हटले " हा अधम ब्राह्मण दुराचारी असल्यामुळे सज्जनांनी याची उपेक्षाच केली पाहिजे. पण तो आपणास शरण आला आहे. म्हणून त्याला मोक्षमार्गाचा उपदेश करून त्याचे अवश्य रक्षण करावयास हवे." (७८-७९)

असे बोलून, हे रामा, तुमच्या नावातील अक्षरे उलटी करून ते मला म्हणाले, 'येथेच राहून तू एकाग्रचित्ताने 'मरा' असा सतत जप कर. (८०)

आम्ही पुनः परत येईपर्यंत तू आम्ही सांगितलेल्या नावाचा सतत जप कर.' असे सांगून दिव्य दर्शन असणारे ते सर्व मुनी तेथून निघून गेले. (८१)

त्या वेळी त्यांनी ज्या प्रमाणे सांगितले होते त्या प्रमाणे मी सरळ भावाने करीत राहिलो. अशा प्रकारे एकाग्र मनाने जप करता करता मी बाह्य जग विसरून गेलो. (८२)

अशा प्रकारे पुष्कळ काळ व्यतीत झाला असता, सर्व संगाने रहित आणि निश्चल स्वरूपात राहिल्यामुळे माझ्या अंगावर एक वारूळ तयार झाले. (८३)

त्यानंतर एक हजार युगांच्या शेवटी ते ऋषी पुनः तेथे परत आले. ते मला म्हणाले "तू वारूळातून बाहेर ये." ते शब्द ऐकून मी झट्दिशी उठून उभा राहिलो. (८४)

वल्मीकान्निर्गतश्चाहं नीहारादिव भास्करः ।
मामप्याहुर्मुनिगणा वाल्मीकिस्त्वं मुनीश्वर ॥ ८५ ॥

वल्मीकात्समभवो यस्माद् द्वितीयं जन्म तेऽभवत् ।
इत्युक्त्वा ते ययुर्दिव्यगतिं रघुकुलोत्तम ॥ ८६ ॥

अहं ते राम नाम्नश्च प्रभावादीदृशोऽभवम् ।
अद्य साक्षात्प्रपश्यामि ससीतं लक्ष्मणेन च ॥ ८७ ॥

रामं राजीवपत्राक्षं त्वां मुक्तो नात्र संशयः ।
आगच्छ राम भद्रं ते स्थलं वै दर्शयाम्यहम् ॥ ८८ ॥

एवमुक्त्वा मुनिः श्रीमाँल्लक्ष्मणेन समन्वितः ।
शिष्यैः परिवृतो गत्वा मध्ये पर्वतगह्वयोः ॥ ८९ ॥

तत्र शालां सुविस्तीर्णां कारयामास वासभूः ।
प्राक्पश्चिमं दक्षिणोदक् शोभनं मन्दिरद्वयम् ॥ ९० ॥

जानक्या सहितो रामो लक्ष्मणेन समन्वितः ।
तत्र ते देवसदृशा ह्यवसन् भवनोत्तमे ॥ ९१ ॥

वाल्मीकिना तत्र सुपूजितोऽयं
रामः ससीतः सह लक्ष्मणेन ।
दैवैर्मुनीन्द्रैः सहितो मुदास्ते
स्वर्गे यथा देवपतिः सशच्या ॥ ९२ ॥

ज्या प्रमाणे धुक्यातून सूर्य बाहेर येतो, त्या प्रमाणे मी त्या वारुळातून बाहेर आलो. तेव्हा ते मुनी मला म्हणाले, "हे मुनिवर, तू वाल्मीकी आहेस. (८५)

आत्ता तू वारुळातून जन्मला आहेस. म्हणून हा तुझा दुसरा जन्म झाला आहे" असे सांगून हे रघुकुलश्रेष्ठा, ते मुनी दिव्यलोकी गेले. (८६)

श्रीरामा, तुमच्या नामाच्या सामर्थ्याने मी असा झालो आहे. लक्ष्मण व सीता यांच्यासह, कमल-पत्राप्रमाणे नयन असणाऱ्या अशा श्रीरामा, तुम्हांला मी आज साक्षात पाहात आहे. मी निश्चितपणे मुक्त झालो यात संशय नाही. हे श्रीरामा, तुमचे मंगल होवो. या. मी तुम्हांला राहण्यास योग्य असे स्थळ दाखवितो." (८७-८८)

असे बोलून शिष्यांबरोबर ते श्रीमान मुनिवर लक्ष्मणाला तसेच राम व सीतेला बरोबर घेऊन, पर्वत आणि गंगा नदी यांच्यामधील प्रदेशात गेले. ते स्थान त्यांनी रामांना दाखविले. मग सर्व जगाचे निवास-स्थान असलेल्या रामांनी तेथे एक अतिशय विस्तीर्ण पर्ण-शाला तसेच एक पूर्वपश्चिम आणि एक दक्षिणोत्तर अशी दोन सुंदर घरे तयार करवून घेतली. (८९-९०)

जानकी आणि लक्ष्मण यांच्यासह, देवसदृश असणारे राम तेथे त्या उत्तम भवनात राहू लागले. (९१)

देवांचा राजा इंद्र ज्या प्रमाणे देव आणि शचीसह स्वर्गात आनंदाने राहातो, त्या प्रमाणे वाल्मीकीकडून चांगल्या प्रकारे सन्मानित झालेले श्रीराम हे सीता व लक्ष्मण यांच्यासमवेत आणि मुनिश्रेष्ठांसह तेथे आनंदाने राहू लागले. (९२)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे अयोध्याकाण्डे षष्ठः सर्गः ॥६ ॥

सप्तम सर्ग

सुमंत्राचे प्रत्यागमन, राजा दशरथाचे स्वर्गगमन, तसेच मातुलगृहातून भरताचे आगमन आणि वसिष्ठांच्या आदेशाने त्याने पित्याचे अंत्येष्टी संस्कार करणे.

श्रीमहादेव उवाच

सुमन्त्रोऽपि तदायोध्यां दिनान्ते प्रविवेश ह ।
वस्त्रेण मुखमाच्छाद्य बाष्पाकुलितलोचनः ॥ १ ॥

श्रीमहादेव म्हणाले- त्या वेळी इकडे संध्याकाळच्या वेळी, आपले तोंड वस्त्राने झाकून, अश्रूंनी डोळे डबडबलेल्या सुमंत्राने अयोध्येत प्रवेश केला. (१)

बहिरेव रथं स्थाप्य राजानं द्रष्टुमाययौ ।
जयशब्देन राजानं स्तुत्वा तं प्रणनाम ह ॥ २ ॥

ततो राजा नमन्तं तं सुमन्त्रं विह्वलोऽब्रवीत् ।
सुमन्त्र रामः कुत्रास्ते सीतया लक्ष्मणेन च ॥ ३ ॥

कुत्र त्यक्तस्त्वया रामः किं मां पापिनमब्रवीत् ।
सीता वा लक्ष्मणो वापि निर्दयं मां किमब्रवीत् ॥ ४ ॥

हा राम हा गुणनिधे हा सीते प्रियवादिनि ।
दुःखार्णवे निमग्नं मां प्रियमाणं न पश्यसि ॥ ५ ॥

विलप्यैवं चिरं राजा निमग्नो दुःखसागरे ।
एवं मन्त्री रुदन्तं तं प्राञ्जलिर्वाक्यमब्रवीत् ॥ ६ ॥

रामः सीता च सौमित्रिर्मया नीता रथेन ते ।
शृङ्गवेरपुराभ्याशे गङ्गाकूले व्यवस्थिताः ॥ ७ ॥

गुहेन किञ्चिदानीतं फलमूलादिकं च यत् ।
स्पृष्ट्वा हस्तेन सम्प्रीत्या नाग्रहीद्विससर्ज तत् ॥ ८ ॥

वटक्षीरं समानाय्य गुहेन रघुनन्दनः ।
जटामुकुटमाबद्ध्य मामाह नृपते स्वयम् ॥ ९ ॥

सुमन्त्र ब्रूहि राजानं शोकस्तेऽस्तु न मत्कृते ।
साकेतादधिकं सौख्यं विपिने नो भविष्यति ॥ १० ॥

मातुर्मे वन्दनं ब्रूहि शोकं त्यजतु मत्कृते ।
आश्वासयतु राजानं वृद्धं शोकपरिप्लुतम् ॥ ११ ॥

सीता चाश्रुपरीताक्षी मामाह नृपसत्तम ।
दुःखगद्गदया वाचा रामं किञ्चिदवेक्षती ॥ १२ ॥

श्वश्वाङ्घ्रिं प्रणिपातं मे ब्रूहि श्वश्वोः पदाम्बुजे ।
इति प्ररुदती सीता गता किञ्चिदवाङ्मुखी ॥ १३ ॥

तस्तेऽश्रुपरीताक्षा नावमारुरुहुस्तदा ।
जवद्गङ्गां समुत्तीर्य गतास्तावदहं स्थितः ॥ १४ ॥

बाहेरच रथ ठेवून राजांना भेटण्यासाठी तो अंत:पुरात गेला आणि 'जय' शब्दाच्या उच्चाराने राजांची स्तुती केली व त्यांना त्याला प्रणाम केला. (२)

त्यानंतर शोकाने विव्हळ झालेले राजा दशरथ नमस्कार करणाऱ्या सुमंत्राला म्हणाले, "अरे सुमंत्रा, सीता व लक्ष्मण यांच्यासह राम कुठे आहे ? (३)

तू रामाला कुठे सोडलेस ? त्याने मज पाप्याला काय निरोप दिला आहे ? तसेच सीता व लक्ष्मण हेसुद्धा मज निर्दयाला काय म्हणाले ? (४)

हाय रामा ! हाय गुणनिधे ! हाय प्रियवादिनी सीते ! दु:खरूपी सागरात बुडून मरणारा मी तुम्हाला दिसत नाही काय ? " (५)

दु:खसमुद्रात निमग्न असणाऱ्या राजांनी पुष्कळ वेळपर्यंत अशा प्रकारे विलाप केला. रडणाऱ्या राजांना मंत्री सुमंत्र हात जोडून बोलला. (६)

"महाराज, राम, सीता व लक्ष्मण यांना तुमच्या रथात बसवून मी त्यांना शृंगवेर नगराजवळ नेले; तेथे ते गंगा नदीच्या तीरावर थांबले. (७)

तेथे निषाद राजाने जी काही फळे, मुळे इत्यादी आणले होते, त्यांना रामांनी प्रीतिपूर्वक हाताने स्पर्श केला, पण ती घेतली नाहीत, ती परत केली. (८)

महाराज, त्यानंतर गुहाकडून वटवृक्षाचा चीक आणवून घेऊन, जटारूपी मुकुट श्रीरामांनी बांधला आणि ते स्वत: मला म्हणाले. (९)

'हे सुमंत्रा, राजांना माझा निरोप सांग की तुम्ही माझ्यासाठी शोक करू नका. अयोध्या नगरीपेक्षा अधिक सौख्य आम्हांला येथे अरण्यात मिळेल. (१०)

आईला माझा प्रणाम सांग. तिने माझ्यासाठी शोक करणे सोडून शोकाकुल वृद्ध राजांचे सांत्वन करावे. (११)

त्यानंतर हे नृपश्रेष्ठा, अश्रूंनी डोळे भरलेली सीता रामांकडे किंचित पाहात दु:खाने दाटलेल्या वाणीने मला म्हणाली . (१२)

' कौसल्या आणि सुमित्रा या दोघी सासवांच्या चरणकमळांना माझा प्रणिपात सांग.' असे काहीसे बोलून, तोंडखाली करून, सीता रडत तेथून निघून गेली. (१३)

त्यानंतर त्या वेळी सजल नेत्रांनी ते तिघे नावेत चढले. ते गंगा पार करून जात होते तोपर्यंत मी तेथे थांबलो. (१४)

ततो दुःखेन महता पुनरेवाहमागतः ।
ततो रुदन्ती कौसल्या राजानमिदमब्रवीत् ॥ १५ ॥

कैकेय्यै प्रियभार्यायै प्रसन्नो दत्तवान्वरम् ।
त्वं राज्यं देहि तस्यैव मत्पुत्रः किं विवासितः ॥ १६ ॥

कृत्वा त्वमेव तत्सर्वमिदानीं किं नु रोदिषि ।
कौसल्यावचनं श्रुत्वा क्षते स्पृष्ट इवाग्निना ॥ १७ ॥

पुनः शोकाश्रुपूर्णाक्षः कौसल्यामिदमब्रवीत् ।
दुःखेन म्रियमाणं मां किं पुनर्दुःखयस्यलम् ॥ १८ ॥

इदानीमेव मे प्राणा उत्क्रमिष्यन्ति निश्चयः ।
शप्तोऽहं बाल्यभावेन केनचिन्मुनिना पुरा ॥ १९ ॥

पुराहं यौवने हृष्टश्चापबाणधरो निशि ।
अचरं मृगयासक्तो नद्यास्तीरे महावने ॥ २० ॥

तत्रार्धरात्रसमये मुनिः कश्चित्तृषार्दितः ।
पिपासार्दितयोः पित्रोर्जलमानेतुमुद्यतः ।
अपूरयज्जले कुम्भं तदा शब्दोऽभवन्महान् ॥ २१ ॥

गजः पिबति पानीयमिति मत्वा महानिशि ।
बाणं धनुषि सन्धाय शब्दवेधिनमक्षिपम् ॥ २२ ॥

हा हतोऽस्मीति तत्राभूच्छब्दो मानुषसूचकः ।
कस्यापि न कृतो दोषो मया केन हतो विधे ॥ २३ ॥

प्रतीक्षते मां माता च पिता च जलकाङ्क्षया ।
तच्छ्रुत्वा भयसन्त्रस्तस्ततोऽहं पौरुषं वचः ॥ २४ ॥

शनैर्गत्वाथ तत्पार्श्वं स्वामिन् दशरथोऽस्म्यहम् ।
अजानता मया विद्धस्त्रातुमर्हसि मां मुने ॥ २५ ॥

इत्युक्त्वा पादयोस्तस्य पतितो गद्गदाक्षरः ।
तदा मामाह स मुनिर्मा भैषीर्नृपसत्तम ॥ २६ ॥

त्यानंतर मोठ्या दुःखाने परत आलो." तेव्हा रडत रडत कौसल्या राजांना म्हणाली. (१५)

"कैकेयी या आवडत्या भार्येला तुम्ही प्रसन्न होऊन वर दिलात. ठीक आहे. तुम्ही खुशाल तिच्या पुत्राला राज्य द्या. माझे काही म्हणणे नाही. परंतु तुम्ही माझ्या पुत्राला राज्यातून का घालवले ? (१६)

हे सर्व करून आता तुम्हीच का बरे रडत आहात?" कौसल्येचे हे वचन ऐकल्यावर महाराजांना अशी वेदना झाली की जणू जखमेला अग्नीचा स्पर्श झाला. (१७)

तेव्हा पुनः शोकाश्रूंनी डोळे भरलेले दशरथ कौसल्येला म्हणाले, "दुःखाने मरत असताना मला तू पुनः का बरे आणखी दुःख देत आहेस ? (१८)

आताच माझे प्राण जाणार आहेत हे निश्चित आहे. कारण फार पूर्वी माझ्या मूर्खपणामुळे एका मुनीने मला शाप दिला होता. (१९)

(त्या वेळची गोष्ट अशी आहे की) पूर्वी तरुणपणी घमेंडीत मृगयेमध्ये आसक्त होऊन, धनुष्य- बाण घेऊन, रात्रीच्या वेळी मी एका घोर वनात नदीच्या तीरावर फिरत होतो. (२०)

तेथे मध्यरात्रीच्या वेळी तहानेने व्याकूळ झालेला मुनी तहान लेल्या आपल्या आई-बापासाठी पाणी आणण्यास आला होता. त्याने पाण्यात घागर बुडविली. तेव्हा फार मोठा आवाज झाला. (२१)

त्या घोर रात्री 'एखादा हत्ती पाणी पीत आहे' असे वाटून मी एक शब्दवेधी बाण धनुष्यावर चढवून सोडला. (२२)

तेव्हा एका माणसाचे शब्द तेथून ऐकू आले- 'हाय ! मी मेलो. हे विधे, मी कुणाचाही अपराध केलेला नाही. मग मला कुणी का मारले ? (२३)

पाण्यासाठी माता-पिता माझी वाट पाहात असतील.' त्या वेळी ते पुरुषाचे शब्द ऐकल्यावर मी भयाने अतिशय त्रस्त झालो. (२४)

मग सावकाश त्याचेजवळ जाऊन मी म्हटले, 'अहो, स्वामी, मी दशरथ आहे. अजाणता माझ्याकडून तुम्ही बाणाने विद्ध केला गेला आहात. हे मुने, माझे रक्षण करा.' (२५)

गद्गद कंठाने असे शब्द उच्चारून मी त्यांच्या पाया पडलो. तेव्हा ते मुनिवर मला म्हणाले, 'हे नृपश्रेष्ठा, तू भिऊ नकोस. (२६)

ब्रह्महत्या स्पृशेत्त्वां वैश्योऽहं तपसि स्थितः ।
पितरौ मां प्रतीक्षेते क्षुत्तृड्भ्यां परिपीडितौ ॥ २७ ॥

तयोस्त्वमुदकं देहि शीघ्रमेवाविचारयन् ।
न चेत्त्वां भस्मसात्कुर्यात्पिता मे यदि कुप्यति ॥ २८ ॥

जलं दत्त्वा तु तौ नत्वा कृतं सर्वं निवेदय ।
शल्यमुद्धर मे देहात्प्राणांस्त्यक्ष्यामि पीडितः ॥ २९ ॥

इत्युक्तो मुनिना शीघ्रं बाणमुत्पाट्य देहतः ।
सजलं कलशं धृत्वा गतोऽहं यत्र दम्पती ॥ ३० ॥

अतिवृद्धावन्धदृशौ क्षुत्पिपासार्दितौ निशि ।
नायाति सलिलं गृह्य पुत्रः किं वात्र कारणम् ॥ ३१ ॥

अनन्यगतिकौ वृद्धौ शोच्यौ तृट्परिपीडितौ ।
आवामुपेक्षते किं वा भक्तिमानावयोः सुतः ॥ ३२ ॥

इति चिन्ताव्याकुलौ तौ मत्पादन्यासजं ध्वनिम् ।
श्रुत्वा प्राह पिता पुत्र किं विलम्बः कृतस्त्वया ॥ ३३ ॥

देह्यावयोः सुपानीयं पिब त्वमपि पुत्रक ।
इत्येवं लपतोर्भीत्या सकाशमगमं शनैः ॥ ३४ ॥

पादयोः प्रणिपत्याहमब्रवं विनयान्वितः ।
नाहं पुत्रस्त्वयोध्याया राजा दशरथोऽस्म्यहम् ॥ ३५ ॥

पापोऽहं मृगयासक्तो रात्रौ मृगविहिंसकः ।
जलावताराद्दूरेऽहं स्थित्वा जलगतं ध्वनिम् ॥ ३६ ॥

श्रुत्वाहं शब्दवेधित्वादेकं बाणमथात्यजम् ।
हतोऽस्मीति ध्वनिं श्रुत्वा भयात्तत्राहमागतः ॥ ३७ ॥

जटा विकीर्य पतितं दृष्ट्वाहं मुनिदारकम् ।
भीतो गृहीत्वा तत्पादौ रक्ष रक्षेति चाब्रवम् ॥ ३८ ॥

तुला बह्महत्या लागणार नाही. कारण मी तपस्या करणारा एक वैश्य आहे. तहान-भुकेने अतिशय व्याकूळ झालेले माझे आईबाप माझी वाट पाहात आहेत. (२७)

तेव्हा कसलाही विचार न करता तू त्यांना चट्दिशी पाणी नेऊन दे. तसे झाले नाही तर मात्र माझा पिता रागावेल व तो तुला भस्मसात करून टाकील. (२८)

त्यांना पाणी देऊन आणि नमस्कार करून, तू स्वतः केलेले सर्व कृत्य त्यांना सांगून टाक. मला अत्यंत पीडा होत आहे. तेव्हा तू माझ्या शरीरातून बाण काढून टाक. मी प्राण सोडतो.' (२९)

मुनींनी असे सांगितल्यावर मी त्यांच्या शरीरातून झट्दिशी बाण उपसून काढला आणि मग पाण्याने भरलेला घडा घेऊन, जेथे ते जोडपे होते तेथे मी गेलो. (३०)

त्या वेळी ते दोघे चिंतेने व्याकूळ झाले होते. 'आम्ही दोघे अत्यंत वृद्ध आहोत आणि दोन्ही डोळ्यांनी आंधळे आहोत. आम्ही तहान-भुकेने त्रस्त आहोत. या रात्रीच्या वेळी आमचा पुत्र पाणी घेऊन अजुनी आलेला नाही. याचे काय कारण असावे बरे ? पुत्राखेरीज आम्हांला दुसरा कोणताही आधार नाही. आम्ही दोघे वृद्ध, शोकाकुल आणि तहानेने फार त्रस्त झालेले आहोत. आमच्यावर भक्ती असणारा आमचा पुत्र आमची उपेक्षा करीत आहे, याचे काय कारण असावे बरे ?' ते अशी चिंता करीत असतानाच, त्यांनी माझ्या पावलांचा आवाज ऐकला. तो ऐकून पिता म्हणाला, 'बाळा, या वेळी तू का उशीर केलास बरे ? (३१-३३)

आम्हाला पाणी दे आणि बाळा, तूसुद्धा थोडे पाणी पी.' अशा प्रकारे ते दोघे बोलत असताना, मी भीतभीत हळूहळू त्यांच्याजवळ गेलो. (३४)

त्यांच्या चरणांना प्रणाम करून मी अतिशय विनयाने त्यांना म्हणालो, 'मी तुमचा पुत्र नव्हे. तर मी अयोध्येचा राजा दशरथ आहे. (३५).

मी पापी आहे. शिकार करण्याच्या नादात रात्रीच्या वेळी पशूंचा वध करीत मी फिरत होतो. पाण्याच्या घाटापासून दूर उभा होतो. त्या वेळी पाण्यात झालेला शब्द ऐकून मी तिकडे एक शब्दवेधी बाण सोडला. तेव्हा 'मी मेलो !' असे शब्द ऐकल्यावर मी भयभीत होऊन गेलो. (३६-३७)

तेथे गेल्यावर जटा सुटलेल्या अवस्थेत पडलेला मुनिकुमार पाहून मी भ्यालो आणि त्याचे पाय पकडून, 'रक्षण कर, रक्षण कर' असे त्याला म्हणालो. (३८)

मा भैषीरिति मां प्राह ब्रह्महत्याभयं न ते ।
मत्पित्रोः सलिलं दत्त्वा नत्वा प्रार्थय जीवितम् ॥ ३९ ॥

इत्युक्तो मुनिना तेन ह्यागतो मुनिहिंसकः ।
रक्षेतां मां दयायुक्तौ युवां हि शरणागतम् ॥ ४० ॥

इति श्रुत्वा तु दुःखार्तौ विलप्य बहु शोच्य तम् ।
पतितौ नौ सुतो यत्र नय तत्राविलम्बयन् ॥ ४१ ॥

ततो नीतौ सुतो यत्र मया तौ वृद्धदम्पती ।
स्पृष्ट्वा सुतं तौ हस्ताभ्यां बहुशोऽथ विलेपतुः ॥ ४२ ॥

हाहेति क्रन्दमानौ तौ पुत्रपुत्रेत्यवोचताम् ।
जलं देहीति पुत्रेति किमर्थं न ददास्यलम् ॥ ४३ ॥

ततो मामूचतुः शीघ्रं चितिं रचय भूपते ।
मया तदैव रचिता चितिस्तत्र निवेशिताः ।
त्रयस्तत्राग्निरुत्सृष्टो दग्धास्ते त्रिदिवं ययुः ॥ ४४ ॥

तत्र वृद्धः पिता प्राह त्वमप्येवं भविष्यसि ।
पुत्रशोकेन मरणं प्राप्स्यसे वचनान्मम ॥ ४५ ॥

स इदानीं मम प्राप्तः शापकालोऽनिवारितः ।
इत्युक्त्वा विललापाथ राजा शोकसमाकुलः ॥ ४६ ॥

हा राम पुत्र हा सीते हा लक्ष्मण गुणाकर ।
त्वद्वियोगादहं प्राप्तो मृत्युं कैकेयिसम्भवम् ॥ ४७ ॥

वदन्नेवं दशरथः प्राणांस्त्यक्त्वा दिवं गतः ।
कौसल्या च सुमित्रा च तथान्या राजयोषितः ॥ ४८ ॥

चुक्रुशुश्च विलेपुश्च उरस्ताडनपूर्वकम् ।
वसिष्ठः प्रययौ तत्र प्रातर्मन्त्रिभिरावृतः ॥ ४९ ॥

तैलद्रोण्यां दशरथं क्षिप्त्वा दूतानथाब्रवीत् ।
गच्छत त्वरितं साश्वा युधाजिन्नगरं प्रति ॥ ५० ॥

तेव्हा तो मला म्हणाला, 'भिऊ नकोस. तुला ब्रह्महत्येचे भय नाही. माझ्या माता-पित्यांना पाणी देऊन तू त्यांना प्रणाम कर आणि जीवन-दान देण्यासाठी त्यांची प्रार्थना कर.' (३९)

मुनिकुमाराने मला असे सांगितल्यावर, मुनीची हिंसा करणारा मी तुम्हांला शरण आलो आहे. तुम्ही दोघांनी दयायुक्त होऊन माझे रक्षण करा.' (४०)

हे ऐकल्यावर दुःखाने पीडित झालेल्या त्या दोघांनी पुत्रासाठी फार शोक केला आणि रडत रडत ते जमिनीवर पडले आणि म्हणू लागले 'आमचा पुत्र जेथे पडला आहे तेथे आम्हांला ताबडतोब ने.' (४१)

मग त्यांचा पुत्र जेथे होता तेथे मी त्या वृद्ध दांपत्याला नेले. आपल्या दोन्ही हातांनी पुत्राला स्पर्श करून ते दोघे फारच विलाप करू लागले. (४२)

'हा ! हा ! अरे मुला ! अरे पोरा !' अशा प्रकारे आक्रंदन करीत ते बोलू लागले 'मुला, आम्हांला पाणी दे. आम्हांला भरपूर पाणी तू का बरे देत नाहीस ?' (४३)

नंतर ते दोघे मला म्हणाले, 'हे राजा, ताबडतोब एक चिता तयार कर.' त्या वेळी लगेच मी एक चिता रचली. मग त्या तिघांनाही चितेवर ठेवले. चितेला अग्नी दिला. जळून ते स्वर्गलोकी गेले. (४४)

मरणापूर्वी तो वृद्ध पिता मला म्हणाला, 'तुझ्या बाबतीतसुद्धा असेच होईल. माझ्या वचनानुसार तूसुद्धा पुत्रशोकाने मरण पावशील. ' (४५)

तो अनिवार्य असा शापकाल आता माझ्या बाबतीत प्राप्त झाला आहे." असे बोलून नंतर अत्यंत शोकाकुल झालेले राजा दशरथ विलाप करू लागले. (४६)

"हाय पुत्रा रामा ! हाय सीते ! हाय गुणांची खाण असणाऱ्या लक्ष्मणा ! तुमच्या वियोगामुळे कैकेयीने निर्माण केलेल्या मृत्यूप्रत मी आता पोहोचलो आहे." (४७)

असे बोलत असतानाच प्राणत्याग करून महाराज दशरथ स्वर्गलोकी गेले. तेव्हा कौसल्या, सुमित्रा आणि इतर राजस्त्रिया छाती बडवून घेत आक्रोश आणि विलाप करू लागल्या. सकाळ होताच मंत्र्यांसह मुनिवर वसिष्ठ तेथे गेले. (४८-४९)

नंतर तेलाने भरलेल्या एका डोणीत दशरथ महाराजांचे शव ठेवून, वसिष्ठ दूतांना म्हणाले, 'घोड्यांवर बसून तुम्ही ताबडतोब युधाजिताच्या राजधानीला जा. (५०)

तत्रास्ते भरतः श्रीमाञ्छत्रुघ्नसहितः प्रभुः ।
उच्यतां भरतः शीघ्रमागच्छेति ममाज्ञया ॥ ५१ ॥

अयोध्यां प्रति राजानं कैकेयीं चापि पश्यतु ।
इत्युक्तास्त्वरितं दूता गत्वा भरतमातुलम् ॥ ५२ ॥

युधाजितं प्रणम्योचुर्भरतं सानुजं प्रति ।
वसिष्ठस्त्वाब्रवीद्राजन् भरतः सानुजः प्रभुः ॥ ५३ ॥

शीघ्रमागच्छतु पुरीमयोध्यामविचारयन् ।
इत्याज्ञप्तोऽथ भरतस्त्वरितं भयविह्वलः ॥ ५४ ॥

आययौ गुरुणादिष्टः सह दूतैस्तु सानुजः ।
राज्ञो वा राघवस्यापि दुःखं किञ्चिदुपस्थितम् ॥ ५५ ॥

इति चिन्तापरो मार्गे चिन्तयन्नगरं ययौ ।
नगरं भ्रष्टलक्ष्मीकं जनसम्बाधवर्जितम् ॥ ५६ ॥

उत्सवैश्च परित्यक्तं दृष्ट्वा चिन्तापरोऽभवत् ।
प्रविश्य राजभवनं राजलक्ष्मीविवर्जितम् ॥ ५७ ॥

अपश्यत्कैकयीं तत्र एकामेवासने स्थिताम् ।
ननाम शिरसा पादौ मातुर्भक्तिसमन्वितः ॥ ५८ ॥

आगतं भरतं दृष्ट्वा कैकेयी प्रेमसम्भ्रमात् ।
उत्थायालिङ्ग्य रभसा स्वाङ्कमारोप्य संस्थिता ॥ ५९ ॥

मूर्ध्न्यवघ्राय पप्रच्छ कुशलं स्वकुलस्य सा ।
पिता मे कुशली भ्राता माता च शुभलक्षणा ॥ ६० ॥

दिष्ट्या त्वमद्य कुशली मया दृष्टोऽसि पुत्रक ।
इति पृष्टः स भरतो मात्रा चिन्ताकुलेन्द्रियः ॥ ६१ ॥

दूयमानेन मनसा मातरं समपृच्छत ।
मातः पिता मे कुत्रास्ते एका त्वमिह संस्थिता ॥ ६२ ॥

त्वया विना न मे तातः कदाचिद्रहसि स्थितः ।
इदानीं दृश्यते नैव कुत्र तिष्ठति मे वद ॥ ६३ ॥

अदृष्ट्वा पितरं मेऽद्य भयं दुःखं च जायते ।
अथाह कैकयी पुत्रं किं दुःखेन तवानघ ॥ ६४ ॥

तेथे शत्रुघ्नासहित श्रीमान प्रभू भरत आहे. माझी आज्ञा म्हणून तुम्ही भरताला सांगा- 'अयोध्येला शीघ्र निघून ये आणि येथे आल्यावर राजा दशरथ व कैकेयी यांचे दर्शन घे.' वसिष्ठांनी दूतांना असे सांगितल्यावर ते दूत त्वरित तिकडे गेले आणि भरताचा मामा युधाजित आणि शत्रुघ्न या धाकट्या भावासह भरताला प्रणाम करून ते युधाजिताला म्हणाले-' हे राजन, वसिष्ठांनी तुम्हांला सांगितले आहे की शत्रुघ्नासह महाराज भरताने कोणताही विचार न करता ताबडतोब अयोध्या नगरीला यावे.' तेव्हा अशी आज्ञा ऐकून लगेच भरत भीतीने विव्हल झाला आणि गुरूंच्या आदेशानुसार, लहान भाऊ शत्रुघ्न आणि दूत यांच्यासह तो निघाला. "महाराज दशरथ अथवा रघुनाथ यांच्यावर कोणते तरी घोर संकट आले असावे का? "असा वाटेत मनातल्या मनात विचार करीत, तो अयोध्या नगरीत पोचला. ती नगरी कळाहीन वाटत होती. लोकांची वर्दळ नाही, तसेच उत्सव दिसत नाहीत, असे पाहून भरत चिंताक्रांत झाला. राजलक्ष्मीने रहित अशा राजवाड्यात प्रवेश केल्यावर तेथे त्याला दिसले की एकाकी कैकेयी एका आसनावर बसलेली आहे. भक्तीने युक्त होऊन त्याने मातेच्या चरणांवर मस्तक ठेवून तिला प्रणाम केला. (५१-५८)

भरत आला आहे, हे पाहून कैकेयीने मोठ्या प्रेमाने तत्काळ उठून त्याला आलिंगन दिले आणि त्याला मांडीवर घेऊन ती बसली. (५९)

नंतर त्याच्या मस्तकाचे अवघ्राण करून, तिने आपल्या स्वतःच्या कुळाचे कुशल त्याला विचारले, "माझी सुलक्षणा आई, बाबा व भाऊ सर्व खुशाल आहेत ना? (६०)

हे बाळा, तुला आज खुशाल पाहून मला बरे वाटले." मातेने असे म्हटल्यावर, काळजीने व्याकूळ झालेल्या भरताने दुःखी मनाने तिला विचारले, "आई, माझे तात कुठे आहेत? कारण तू एकटीच येथे बसलेली आहेस. (६१-६२)

तुझ्याविना तर माझे तात एकांतात कधीही राहात नसतात. परंतु आता मात्र ते कुठे दिसत नाहीत. ते कुठे आहेत, ते मला सांग. (६३)

पिताजी न दिसल्यामुळे आज मला दुःख होत आहे आणि भयही वाटत आहे, " तेव्हा कैकेयी पुत्राला म्हणाली, "हे पुण्यशील भरता, तुला दुःख का होत आहे ? (६४)

या गतिर्धर्मशीलानामश्वमेधादियाजिनाम् ।
तां गतिं गतवानद्य पिता ते पितृवत्सल ॥ ६५ ॥

तच्छ्रुत्वा निपपातोर्व्यां भरतः शोकविह्वलः ।
हा तात क्व गतोऽसि त्वं त्यक्त्वा मां वृजिनार्णवे ॥ ६६ ॥

असमर्प्यैव रामाय राज्ञे मां क्व गतोऽसि भोः ।
इति विलपितं पुत्रं पतितं मुक्तमूर्धजम् ॥ ६७ ॥

उत्थाप्यामृज्य नयने कैकेयी पुत्रमब्रवीत् ।
समाश्वसिहि भद्रं ते सर्वं सम्पादितं मया ॥ ६८ ॥

तामाह भरतस्तातो म्रियमाणः किमब्रवीत् ।
तमाह कैकयी देवी भरतं भयवर्जिता ॥ ६९ ॥

हा राम राम सीतेति लक्ष्मणेति पुनः पुनः ।
विलपन्नेव सुचिरं देहं त्यक्त्वा दिवं ययौ ॥ ७० ॥

तामाह भरतो हेऽम्ब रामः सन्निहितो न किम् ।
तदानीं लक्ष्मणो वापि सीता वा कुत्र ते गताः ॥ ७१ ॥

कैकेय्युवाच

रामस्य यौवराज्यार्थं पित्रा ते सम्भ्रमः कृतः ।
तव राज्यप्रदानाय तदाहं विघ्नमाचरम् ॥ ७२ ॥

राज्ञा दत्तं हि मे पूर्वं वरद्वेन वरद्वयम् ।
याचितं तदिदानीं मे तयोरेकेन तेऽखिलम् ॥ ७३ ॥

राज्यं रामस्य चैकेन वनवासो मुनिव्रतम् ।
ततः सत्यपरो राजा राज्यं दत्त्वा तवैव हि ॥ ७४ ॥

रामं सम्प्रेषयामास वनमेव पिता तव ।
सीताप्यनुगता रामं पातिव्रत्यमुपाश्रिता ॥ ७५ ॥

सौभ्रात्रं दर्शयन्राममनुयातोऽपि लक्ष्मणः ।
वनं गतेषु सर्वेषु राजा तानेव चिन्तयन् ॥ ७६ ॥

प्रलपन् राम रामेति ममार नृपसत्तमः ।
इति मातुर्वचः श्रुत्वा वज्राहत इव द्रुमः ॥ ७७ ॥

पपात भूमौ निःसंज्ञस्तं दृष्ट्वा दुःखिता तदा ।
कैकेयी पुनरप्याह वत्स शोकेन किं तव ॥ ७८ ॥

हे पितृवत्सल भरता, अश्वमेध इत्यादी यज्ञ करणाऱ्या धर्मपरायण पुरुषांची जी गत होते, तीच गत आज तुझ्या पित्याचीसुद्धा झाली आहे." (६५)

ते ऐकताच शोकाने विव्हल झालेला भरत धरणीवर पडला आणि म्हणू लागला, "अहो बाबा, मला दुःखसागरात लोटून तुम्ही कुठे गेलात ? अहो, महाराज, श्रीरामांकडे मला सोपविल्याशिवाय तुम्ही कुठे गेलात ?" विस्कटलेल्या केसांच्या स्थितीत भरत धरणीवर पडून विलाप करू लागला. त्याला उठवून, त्याचे डोळे पुसून, कैकेयी म्हणाली, "मुला, शांत हो, तुझे कल्याण असो. तुझ्यासाठी पुत्राला आवश्यक ते सर्व मी प्राप्त करून घेतले आहे." (६६-६८)

तेव्हा भरताने तिला विचारले, "भरताना पिताजी काय म्हणाले ?" तेव्हा राणी कैकेयीने निर्भयपणे भरताला सांगितले. "हा राम ! हा राम ! हा सीते ! हा लक्ष्मण !' अशा प्रकारे पुष्कळ काळपर्यंत वारंवार विलाप करीत, देहाचा त्याग करून तुझे वडील स्वर्गात गेले."(६९-७०)

तेव्हा भरताने तिला विचारले, "अग आई, त्या वेळी श्रीराम जवळ नव्हता काय ? त्या वेळी लक्ष्मण तसेच सीता हे कुठे गेले होते ?" (७१)

कैकेयी म्हणाली– "तुझ्या पित्याने रामाच्या यौवराज्याच्या अभिषेकासाठी तयारी केली होती. तेव्हा त्यांनी तुला राज्य द्यावे, म्हणून मी त्यात विघ्न निर्माण केले. (७२)

पूर्वी राजांनी मला दोन वर दिले होते. आता त्यांतील एका वराने मी तुझ्यासाठी संपूर्ण राज्य मागून घेतले आणि दुसऱ्या वराने रामासाठी मुनिव्रतपूर्वक वनवास मागून घेतला. तेव्हा सत्यपरायण अशा महाराज दशरथांनी तुला राज्य दिले आणि रामाला वनवासात पाठविले. पातिव्रत्याचे पालन करीत सीता हीसुद्धा रामाच्या मागोमाग वनात गेली. (७३-७५)

त्या वेळी भ्रातृप्रेमामुळे लक्ष्मण हासुद्धा रामाच्या मागोमाग वनात गेला. ते सगळे वनात गेल्यावर, त्यांचेच स्मरण करीत आणि 'राम ! राम !' असे पुटपुटत महाराजही मृत्यू पावले." आईचे हे वचन ऐकल्यावर वज्राचा तडाखा बसलेल्या वृक्षाप्रमाणे भरत बेशुद्ध होऊन धरणीवर पडला. तेव्हा त्याला पाहून दुःखी झालेली कैकेयी पुन्हा त्याला म्हणाली, " बाळा, तू कशासाठी शोक करीत आहेस ? (७६-७८)

राज्ये महति सम्प्राप्ते दुःखस्यावसरः कुतः ।
इति ब्रुवन्तीमालोक्य मातरं प्रदहन्निव ॥ ७९ ॥

असम्भाष्यासि पापे मे घोरे त्वं भर्तृघातिनी ।
पापे त्वद्गर्भजातोऽहं पापवानस्मि साम्प्रतम् ।
अहमग्निं प्रवेक्ष्यामि विषं वा भक्षयाम्यहम् ॥ ८० ॥

खड्गेन वाथ चात्मानं हत्वा यामि यमक्षयम् ।
भर्तृघातिनि दुष्टे त्वं कुम्भीपाकं गमिष्यसि ॥ ८१ ॥

इति निर्भर्त्स्य कैकेयीं कौसल्याभवनं ययौ ।
सापि तं भरतं दृष्ट्वा मुक्तकण्ठा रुरोद ह ॥ ८२ ॥

पादयोः पतितस्तस्या भरतोऽपि तदारुदत् ।
आलिङ्ग्य भरतं साध्वी राममाता यशस्विनी ।
कृशातिदीनवदना साश्रुनेत्रेदमब्रवीत् ॥ ८३ ॥

पुत्र त्वयि गते दूरमेवं सर्वमभूदिदम् ।
उक्तं मात्रा श्रुतं सर्वं त्वया ते मातृचेष्टितम् ॥ ८४ ॥

पुत्रः सभार्यो वनमेव यातः
सलक्ष्मणो मे रघुरामचन्द्रः ।
चीराम्बरो बद्धजटाकलापः
सन्त्यज्य मां दुःखसमुद्रमग्नाम् ॥ ८५ ॥

हा राम हा मे रघुवंशनाथ
जातोऽसि मे त्वं परतः परात्मा ।
तथापि दुःखं न जहाति मां वै
विधिर्बलीयानिति मे मनीषा ॥ ८६ ॥

स एवं भरतो वीक्ष्य विलपन्तीं भृशं शुचा ।
पादौ गृहीत्वा प्राहेदं शृणु मातर्वचो मम ॥ ८७ ॥

कैकेय्या यत्कृतं कर्म रामराज्याभिषेचने ।
अन्यद्वा यदि जानामि सा मया नोदिता यदि ॥ ८८ ॥

एवढे मोठे राज्य प्राप्त झाल्यावर दुःख करण्याचे कारण काय?" असे बोलणाऱ्या आईकडे पाहून रागाने जणू जाळीत भरत म्हणाला, "अग पापिणी, मी तुझ्याशी बोलणेसुद्धा योग्य नाही. अग भयंकर स्त्रिये, तू आपल्या पतीची हत्या केली आहेस. अग पापिणी, तुझ्या पोटी जन्मलेला मीसुद्धा आता पापी झालो आहे. मी आता अग्नीत प्रवेश करतो अथवा विष खातो. (७९-८०)

अथवा तरवारीने स्वतःला ठार करून मी यमसदनास जातो. नवऱ्याला मारणाऱ्या हे दुष्टे, तू कुंभीपाक नरकात जाशील." (८१)

अशा रीतीने कैकेयीची निर्भर्त्सना करून भरत कौसल्येच्या महालात गेला. भरताला पाहाताच तीसुद्धा धाय मोकलून रडू लागली. (८२)

तेव्हा तिच्या पाया पडून भरतसुद्धा रडू लागला. भरताला आलिंगन देऊन दुःखाने कृश झालेली , अतिशय दीन-वदन असणारी, साध्वी, यशस्विनी अशी रामाची माता डोळ्यांत अश्रू आणून त्याला म्हणाली. (८३)

"बाळा, तू दूर गेला असताना, हे सर्व असे घडले. तुझ्या आईने जे काही केले ते सर्व तिने तुला सांगितले असेल व ते सर्व तू ऐकले असशीलच. (८४)

दुःखसागरात बुडलेल्या माझा त्याग करून, माझा पुत्र रघुश्रेष्ठ श्रीरामचंद्र आपली भार्या व लक्ष्मण यांच्यासह वल्कले धारण करून आणि मस्तकावर जटाजूट बांधून वनामध्ये निघून गेला. (८५)

हाय रामा ! हाय माझ्या रघुवंशाच्या शिरोमणी ! अरे, सर्वश्रेष्ठ असा परमात्मा असून माझा पुत्र म्हणून जन्माला आलास. तथापि दुःख काही मला सोडीत नाही. म्हणून मला वाटते की दैव हेच बलवान होय." (८६)

अतिशय शोकाने अशा प्रकारे विलाप करणाऱ्या कौसल्येला पाहून भरताने तिचे पाय धरले आणि तो म्हणाला, "हे माते, माझे वचन ऐक. (८७)

श्रीरामांच्या राज्याभिषेकाच्या वेळी कैकयीने जे काही कृत्य केले किंवा आणखी जे काही केले असेल, ते जर मला ठाऊक असेल किंवा मी जर तिला प्रेरणा दिली असेल तर हे माते, शंभर ब्रह्महत्यांमुळे उद्भवणारे महापाप